७९६
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ७९६
REFBK-0019190

# गोड निबंध

## ( भाग दुसरा )

अर्थात्

‘ कॉंग्रेस ’ व ‘ विद्यार्थी ’ यांतील निवडक लेख

लेखक

**साने गुरुजी,**

एम्. ए.

REFBK-0019190

किंमत ३ रुपये

प्रकाशक व व्यवस्थापक
रा. ज. देशमुख,
देशमुख आणि कंपनी
१९१ शनिवार पेठ, पुणें २.

संचालक
भ. व्यं. देशमुख,
बी. ए., एल्‌एल्. बी.

१ पुढील आवृत्तींचे सर्व हक्क मो. धों. पुसाळकर यांच्याकडे आहेत.

२ मुखपृष्ठावरील चित्र श्री. दीनानाथ दलाल यांचें आहे.

३ मुखपृष्ठावरील चित्राचे ब्लॉक बॉंबे प्रोसेस स्टुडिओंत केले आहेत.

एकमेव विक्रेते
पंडित अनंत कुलकर्णी
मु. पो. लोहारा, जि. उस्मानाबाद.

मुद्रक
न. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
२९५/५ सदाशिव पेठ, पुणें २

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

| | |
|---|---|
| फुलें आणि दगड (आ. दुसरी) | ३ |
| घरट्याबाहेर ( ,, ) | ३ |
| पहिली लाट ( ,, ) | ३ |
| स्त्री आणि पुरुष | २ |
| कलिका | २। |
| मृगजळांतील कळ्या | २॥ |
| सायंकाल (आ. २ री) | २। |
| अविनाश | १॥ |
| मंदाकिनी | १॥ |
| सहा भाषणें | २ |
| फुलें आणि कांटे | २। |
| हिरवा चांफा (आ. तिसरी) | ५ |
| दोन ध्रुव ( ,, ) | ५ |
| पहिलें प्रेम (आ. दुसरी) | ३ |
| क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| जळलेला मोहोर | ३ |

## ग. त्र्यं. माडखोलकर

| | |
|---|---|
| अवशेष | २ |
| नागकन्या | २ |
| माझी नभोवाणी | २ |
| नवे संसार (जप्त) | ४ |
| चंदनवाडी | ६। |
| व्यक्तिरेखा | २॥ |

## ना. धों. ताम्हनकर

| | |
|---|---|
| ताल्या भाग १ ला (आ. दुसरी) | ४ |
| ताल्या भाग २ रा | ३ |
| निवाडे भाग १ ला | २॥ |
| चकमकी | १॥ |
| बच्चा नवरा | १॥ |
| अनेक आशीर्वाद | ३॥ |
| दाजी भा. १ ला (आ. दुसरी) | ३॥ |
| निवाडे भाग २ रा | ४ |

## चिं. वि. जोशी

| | |
|---|---|
| आणखी चिमणराव (आ. २री) | ४ |
| नवें भारूड | २ |
| स्टेशनमास्तर | २ |
| नटश्रेष्ठ | -।।।- |

## साने गुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म (आ. दुसरी) | ३ |
| आस्तिक ( ,, ) | ३ |
| सोन्यामारुति! ( ,, ) | २ |
| गोड निबंध (भाग १) | ३ |
| गोड निबंध (भाग २) | ३ |

## दत्तु बांदेकर

| | |
|---|---|
| सख्याहरी (आ. दुसरी) | १॥ |
| नवी आघाडी | १॥ |
| तूं आणि मी | २। |

### प्र. के. अत्रे

साखरपुडा १॥

ललितवाङ्मय ३॥

### द. र. कवठेकर

अपुरा डाव ३

रेशमाच्या गांठी ३

### वा. म. जोशी

स्मृति–लहरी २

विचार–लहरी २।

विचार–विहार ४

### पु. य. देशपांडे

नवें जग ? २॥

### भाई बेके

रॉयचरित्र १॥

### वि. स. खांडेकर (परिचय लेखक)

काव्यज्योति १

### आनंदीबाई जयवंत

पारंब्या २

### लक्ष्मणराव सरदेसाई

ढासळलेले बुरुज २

### प्रो. वि. ह. कुलकर्णी

व्यक्तिचित्रें २॥

### ना. ह. आपटे

फसगत १॥

साजणी ५

### शकुंतला परांजपे

भिल्लिणीचीं बोरें ३

### कृष्णाबाई मोटे

मीनाक्षीचें जीवन २।

### र. गो. सरदेसाई

चलतीं नाणीं २

### रा. श्री. जोग

सौंदर्यशोध आणि आनंद बोध ८

### ना. म. पटवर्धन

हितपत्रें ३

वा. म. जोशी यांचें चरित्र ४।

### वि. वि. बोकील

बेबीची बहीण ३

### सत्यग्राही

ग्रह आणि तारे ४।=

### अनंत काणेकर

धुक्यांतून लाल
तान्याकडे (आ. दुसरी) ३

पिकलीं पानें ( ,, ) १॥

### काकासाहेब कालेलकर

ब्रह्मदेशाचा प्रवास १॥

### य. दि. पेण्ढरकर

प्रापंचिक पत्रें ३

घायाळ २

### वि. म. भुस्कुटे

स्टॅलिन ३॥

### कमलाबाई टिळक

आकाशगंगा २॥

### रामतनय

साखरगोटी ६

# अनुक्रम


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | सूर चढूं लागला | ७ |
| २. | कॉंग्रेसपुढील गंभीर प्रश्न | १० |
| ३. | प्रश्नोत्तरें | १३ |
| ४. | प्रश्नोत्तरें (रा. स्व. संघाविषयीं) | १८ |
| ५. | प्रश्नोत्तरें (शेतकरी-कामकरी यांचेविषयीं) | २३ |
| ६. | दुतोंडी लेखणी | २९ |
| ७. | चीनचें अंतरंग | ३४ |
| ८. | कम्युनिस्ट आणि हिंसा | ३७ |
| ९. | सुंदर कवितांचे गद्य अनुवाद | ३९ |
| १०. | मय लोकांची आश्चर्यमय संस्कृति | ४४ |
| ११. | जगीं धन्य दोघे खरे ब्रह्मचारी | ५१ |
| १२. | गोमातेची थोरवी | ५५ |
| १३. | जपानमधील कांहीं विशिष्ट गोष्टी | ५९ |
| १४. | देशभक्ति | ६७ |
| १५. | बालदिन | ७७ |
| १६. | राष्ट्राची मुंज होऊं दे | ८० |
| १७. | चीनमधील क्रांति : हुतात्मा हॅन | ८२ |
| १८. | एका फुलाची इच्छा | ८५ |
| १९. | एक सुंदर कविता | ८६ |
| २०. | मननीय विचार | ९० |

पृष्ठ

२१. चीनमधील जागृत विद्यार्थी ९३
२२. चीनमधील क्रांतिकारक स्त्रिया ९४
२३. सामर्थ्य व शुद्धि ९६
२४. हिंदु-मुसलमान एकी १००
२५. हेला मारणें १०३
२६. साक्षरता-प्रदर्शन १०६
२७. विद्यार्थी परिषद् ११३
२८. सडलेला समाज १२१
२९. सत्य सोपें नाहीं १२४
३०. २६ जानेवारी : स्वातंत्र्यदिन १२८
३१. साक्षरता-प्रसार १३२
३२. आपलीं राज्यें गेलीं व इंग्रजांचें कसें आलें? १३५
३३. दोन महात्म्यांची भेट १३८
३४. हिंदुमहासभावाले १४४
३५. वंदे मातरम् १५०

नि. ८४७

## सूर चढूं लागला १

गंगा आरंभीं लहान परन्तु पुढें एवढी विशाल होते कीं, मोठमोठीं गलबतें तिच्यांतून जा ये करितात. वामनाचें पाऊल प्रथम लहान असलें तरी पुढें त्या पावलांत त्रिभुवन सामावतें. सूर्याचें बिंब प्रथम बेचक्याएवढें दिसतें, परन्तु पुढें त्याच्या तेजानें सारें विश्व धवलतें. वटवृक्षाचें बीं मोहरीहून बारीक असतें, परन्तु पुढें त्याचा विस्तार वर आकाशाला, खालीं पाताळाला व सभोंवतीं दशदिशांना कवटाळतो.

सर्व थोरांचें असेंच आहे. सर्व सुंदर वस्तूंचें असेंच आहे. लहानशी कळी, परन्तु वाढत वाढत शेवटीं सर्वत्र सुगंध पसरते व त्यांना उतावीळ नसते. कलाकृति घाईनें होत नाहींत. सुंदर गोष्टी घाईनें होत नाहींत. आई नवमास गर्भ वाढवते व मग सुंदर बाळ जन्मास येतें. विनतेनें घाई केली तर पांगळा अरुण मिळाला. परन्तु तिनें धीर धरला व विष्णूला पंखावर घेऊन उड्डाण करणारा गरुड जन्मास आला.

उत्कृष्ट गवयाच्या गाण्यांत प्रथम रंग भरत नाहीं. अधीर लोक कांहीं अर्थ नाहीं म्हणून उठून जातात. परन्तु जे धीरानें बसतात, त्यांना संगिताची अमर मेजवानी प्राप्त होते. उत्कृष्ट भावनाप्रधान वक्ता आधीं हलक्या आवाजांत सुरुवात करतो, परन्तु पुढें आवाज एवढा वाढतो कीं, लाखांना खुशाल ऐकूं जावा.

महात्माजी असेच कलावान आहेत. कर्मकुशलता म्हणजे योग. महात्माजींजवळ अधीरपणाला वाव नाहीं. उतावीळपणा नाहीं. परन्तु निश्चित ध्येय डोळ्यांसमोर अखंड असतें. स्वतःच्या सामर्थ्याचा आत्मप्रत्यय असल्यामुळें ते सदैव आशावान असतात. सिंह, कुत्र्यांप्रमाणें येतां जातां भुंकत

नाहीं बसत. परन्तु वेळ आली म्हणजे अशी घनगर्जना करतात कीं, सारे चुपचाप बसतात.

महायुद्ध सुरू झाल्यापासून महात्माजींचा सूर कसा हळु होता. पुनःपुन्हां ब्रिटिशांची ते नाडी पहात होते. शत्रूच्या उद्गारांत अधिकांत अधिक अर्थ पहावा. त्याच्यावर जास्तींत जास्त विश्वास प्रकट करून त्याच्याजवळ बोलणें करायला जावें. परन्तु शेवटीं प्रतिपक्षाचें दुष्ट नष्ट स्वरूपच प्रकट व्हावें. महात्माजींच्या या सत्याग्रही वृत्तीमुळें सरकारचें अंतरंग अधिकच काळेंकुट्ट दिसतें. महात्माजींच्या या पार्श्वभूमीवर नोकरशाहीचें कुटिल व हिडिस स्वरूप अधिकच स्पष्टपणें सर्व जगाच्या नजरेस भरतें. महात्माजींच्या बाजूला जास्तींत जास्त नैतिक सामर्थ्य येऊन उभें रहातें.

व्हॉइसरायांना भेटून आल्यावर कांहीं निष्पन्न झालें नाहीं असें जरी महात्माजी म्हणत होते तरी ‘ अद्याप दार लागलें नाहीं. अजून वाटाघाटींची शक्यता आहे ’ असें त्यांनीं लिहून ठेवलें. त्या लेखांत, केव्हां लढ्याची वेळ येईल याचा नेम नाहीं तरी जनतेनें तयारीनें असावें, असाहि इशारा त्यांनीं दिला होता. त्यानंतर लॉर्ड झेटलंड ह्यांचें तें उपमर्दकारक भाषण झालें. त्याला महात्माजींनीं स्पष्ट उत्तर दिलें, व इंग्लंडला निश्चितपणें बजावलें कीं भारताला स्वातंत्र्याची उत्कट इच्छा आहे, हें मी गंभीरपणें सांगूं इच्छितों. त्यानंतर पुन्हां त्यानीं जो परवां लेख लिहिला आहे, त्यांत ब्रिटिश सरकार हिन्दुस्थानावरची पकड दूर करूं इच्छित नाहीं ही दुःखाची गोष्ट आहे, असें सांगितलें आहे. हिन्दुस्थानला स्वातंत्र्य देण्याची ब्रिटिशांची इच्छा नाहीं, इच्छा असती तर मार्ग सांपडता. हिंदी स्वातंत्र्याच्या आड ब्रिटिश लोकानीं चार धोंडे उभे केले आहेत. युरोपियन लोकांचे हितसंबंध, लष्कर, संस्थानें व जातीय तेढ या चार दगडांच्या आड ब्रि. सरकार लपत आहे. त्यांना आपली पिळवणूक व लूट कायम करायची आहे.

युरोपियन [ त्यांत ब्रिटिश आलेच ] व्यापाऱ्यांचें कोट्यवधि भांडवल येथें गुंतलेलें आहे. कोट्यवधि रुपयांचें त्यांचें कर्ज हिंदुस्थान सरकारला आहे. ही चंदी सुखासुखी ब्रिटिश व युरोपियन व्यापारी कशी सोडणार? हिंदुस्थान आपलें संरक्षण कसें करणार ही दुसरी चिंता इंग्रजांना आहे. पहिल्या चिंतेतून ही दुसरी चिंता उत्पन्न झाली आहे. हिंदुस्थानची चिंता

इंग्लंडला कां? त्यांचें अपरंपार भांडवल गुंतलेलें आहे म्हणून. हा हिंदी संरक्षणाच्या प्रेमाचा पुळका नसून स्वतःची लूट चालावी म्हणून हें सारें आहे.

तिसरा संस्थानांचा प्रश्न. म्हणे आमचे तहनामे आहेत. हे तहनामे वाटेल तेव्हां, ब्रि. साम्राज्य सरकारला इच्छा असते तेव्हां ढिले होतात. परन्तु हे तहनामे त्रेतायुगांत झाले. त्यांचें का आज लोकशाहीच्या काळांत महत्त्व? जनतेचा कौल घ्या.

संस्थानिकांना काय विचारतां? स्वयंनिर्णय अमलांत आणा. यूरोप-खंडांत जर त्या तत्त्वाप्रमाणें लोकांचें मत अजमावलें जातें, तर येथें कां अजमावलें जाऊं नये? या संस्थानिकांच्या सुलतानशाह्या पाहिजेत का? असें विचारा जनतेला. जनता म्हणजे गुरेंढोरें किंवा निर्जीव चिजा नव्हत. जनतेला मन आहे, आत्मा आहे.

जातीय तेढ तुम्हीच निर्माण केली आहे. गुलामगिरी असली म्हणजे कर्तृत्वाला अवसर नसतो; मग नोकऱ्यासाठीं भांडणें. स्वराज्य द्या म्हणजे ही तेढ आपोआप नष्ट होईल. सूर्य आला म्हणजे अंधार जातो, धुकें पळतें; घूत्कार करणारीं घुबडें दडून बसतात. स्वातंत्र्याचा सूर्य आला म्हणजे जातिनिष्ठ घुबडें अंधारांत दडतील. सारी प्रजा स्वतंत्र पक्षाप्रमाणें उडूं लागेल, गाणें गाऊं लागेल.

ब्रिटिश साम्राज्य सरकार हें असें कधींहि करणार नाहीं. महात्माजींना ही गोष्ट पूर्वी दिसत नव्हती असें नाहीं. परन्तु पुन्हां एकदां खडा टाकून ते बघतात. त्यानें कांहीं बिघडत नाहीं. अद्याप साम्राज्य सरकार निगरगट्टच आहे हें जगाला स्पष्ट कळतें.

महात्माजी लिहितात, 'जर हिंदुस्थानवरची पकड ब्रि. साम्राज्य सरकारला कायम ठेवायची असेल, तर ब्रिटिशांना जय मिळावा असें मी इच्छिणार नाहीं. अर्थात् हें वाक्य मी अत्यंत दुःखानें लिहीत आहें.'

साम्राज्यांतलि सारे भाग जोंपर्यंत एकत्र बसूं शकत नाहींत, संपूर्ण स्वातंत्र्याचा आपला हक्क आहे, वाटेल तेव्हां साम्राज्यांतून फुटून निघूं अशा हक्कानें जोंपर्यंत बसूं शकत नाहींत, तोंपर्यंत हें साम्राज्य नष्ट व्हावें असेंच त्या साम्राज्यांतलि दडपले जाणारे लोक म्हणणार.

महात्माजींचा सूर आस्ते आस्ते तीव्र होत आहे. त्यांच्या शब्दांत हळु-

हळू वज्राचें सामर्थ्य येत आहे, त्याच्या आधीं गांधी सेवासंघाची महत्त्वाची बैठक भरत आहे. एक महिना आहे. हा महिना अत्यन्त महत्त्वाचा आहे. कामगारांनीं लढा सुरू केला आहे. रेल्वेचे कामगार असंतुष्ट आहेत. दडपशाहीस सुरुवात जोरानें होत आहे. दररोज धरपकडी होत आहेत. २४ तारखेस श्री. सुभाषचंद्रांनीं ' दडपशाही निषेधदिन ' पाळण्याचें जाहीर केलें होतें. तो ठिकठिकाणीं पाळला गेला असेल असें वाटतें. असें वातावरण आहे. रामगड कॉंग्रेस काय तो आदेश देईल. कुचाची तयारी करून ठेवूं या. गांवोगांव स्वयंसेवकांची नोंद ठेवूं या. हजारोंच्या संख्येनें तयार राहूं या. हस्तपत्रकें तयार ठेवूं या. मुंबईला सायक्लोस्टाईल्स कॉंग्रेसचे कार्यकर्ते विकत घेऊं लागले. अहमदाबादच्या बाजूला सत्याग्रहींची नोंद सुरू झाल्याचें कळतें. महाराष्ट्र, तूं कोठें आहेस ? तूं केवळ बावळटासारखा पडून राहूं नको. सूत कांत, रस्ते झाड, खादी खपव. परन्तु भाई हो, हुशार तयार रहा, असें पदोपदीं सांगण्याचें विसरूं नको. खानदेशांतील किसानांनो, कामगारांनो, तरुणांनो, बन्धुभगिनींनो, लहानथोरांनो, सत्त्वपरीक्षा आली तर कमी ठरूं नका. गांवोगांव तयारी टेवा. प्रत्येक तालुक्यांत हजार दोन हजार सत्याग्रहींची नोंद तयार पाहिजे. कातणाऱ्यांची नोंद होत आहे. खादी घालणाऱ्यांची नोंद होत आहे. परन्तु मरणाऱ्यांची नोंद होत आहे का ? मरणाऱ्यांची नोंद करण्याची जरूरी नाहीं. हांक कानीं येतांच ते नाचत पुढें येतील व होमकुंडांत उड्या घेतील हें खरें आहे. तरीहि निःशंक खात्री असावी म्हणून तालुक्यातालुक्यातून सत्याग्रहींची सेना नोंदवून ठेवा. शिंग फुंकलें गेलें कीं एकच घोंगाट करून उटा.

—वर्ष २ रें, अंक ४६.

## कॉंग्रेसपुढील गंभीर प्रश्न २

त्रिपुरी कॉंग्रेस भरण्याच्या आधींपासून व भरल्यानंतर एकंदर सारें कॉंग्रेसचें वातावरण चमत्कारिक झालें आहे. संशय व अविश्वास यांचें धुकें

पसरलेलें आहे. हें धुकें भुरकन उडून जाण्याऐवजीं अधिकच दाट होत आहे. आकाशांत ढग आलेले असावेत व जीव गुदमरावा तसें झालें आहे. स्वच्छ सूर्यप्रकाश तरी येऊं दे, निर्मळ स्वच्छ पाऊस तरी पडूं दे. हीं अभ्रें फार वाईट. ना प्रकाश ना पाणी, केवळ कोंडमारा.

मॉडर्न रिव्ह्यूमध्यें सुभाषबाबूंनीं, 'माझें विचित्र आजारीपण' म्हणून लेख लिहिला होता तो लेख वाचून वाईट वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. 'माझ्या आजारीपणाचीहि प्रतिष्ठित कार्यकर्त्यांनीं शंका घ्यावी!' असें राष्ट्रपति लिहितात. राजकारणांतलि ही क्षुद्र हलकी वृत्ति पाहून आपण हिमालयांत जावें, अरविंदांप्रमाणें अलिप्त राहून अनंतांत बुडी मारावी, असें सुभाषचंद्रांच्या मनांत आलें. त्रिपुरीला पुष्कळांना शिसारी आल्यावांचून राहिली नाहीं. परन्तु त्रिपुरी झाली. पुढें काय? गोविंद वल्लभपंतांचा ठराव बेकायदेशीर होता असें सुभाषबाबूंनीं लिहिलें. सुभाषबाबू तो ठराव जर बेकायदेशीर म्हणत असतील तर महात्माजी तरी काय करणार? ते एवढेंच म्हणतील 'त्या ठरावाचा जो अर्थ तुम्हांला वाटतो तो ऑ. इं. कां. कमिटीसमोर मांडा, व मंजूर करून घ्या.' पंतांच्या या ठरावाविषयीं राष्ट्रपतींची ही भूमिका असल्यामुळें राष्ट्रपतींवर उघड अविश्वासाचा ठराव येत्या ऑ. इं. कां. कमिटींत येणार आहे. त्रिपुरी कांग्रेसच्या वेळींच एक उजवे कां. कार्यकर्ते म्हणाले होते कीं, पंतांचा ठराव पास झाला म्हणजे सुभाषबाबूंनीं राजीनामा दिलाच पाहिजे. पंतांचा ठराव म्हणजे राष्ट्रपतींवर अविश्वास असेंच त्यांना वाटत होतें. पुष्कळांना हीच गोष्ट त्या ठरावांत स्पष्ट दिसत आहे. 'तसें नाहीं' असें सांगण्यांत अर्थ नाहीं. त्या ठरावांत जो गर्भितार्थ होता, त्याचा उघड ठरावच आतां येणार आहे. इकडे राष्ट्रपति म्हणतात, 'महात्माजींचे उपवासाचे वेळीं आम्ही राजीनामे दिले असें हिं. सरकारला मंत्र्यांनीं कळविलें तें कोणाच्या परवानगीनें' असा प्रश्न विचारला आहे. त्या वेळेस व. कमिटीच्या सभासदांनीं राजीनामे दिले होते. पार्लमेंटरी बोर्ड अस्तित्वांत नव्हतें. अशा वेळेस मंत्र्यांनीं राष्ट्रपतींस या बाबतींत विचारलें पाहिजे. मंत्र्यांनीं राजीनामे दिले असते तर जबाबदारी कोणावर? कांग्रेसच्या अध्यक्षांस त्यासंबंधीं विचारलें गेलें नाहीं. अशा रीतीनें अधिकच चिघळत जात आहे प्रकरण.

वाईट आहे. जगांत महायुद्धाचें भीषण वादळ घोंघावत आहे. युद्ध सुरू झालें तर हिंदुस्थान सरकारच्या हातांत व प्रांतिक गव्हर्नरांच्या हातांत अधिक सत्ता असावी असें बिल पार्लमेंटमध्यें येत आहे. म्हणजे उद्यां प्रांतिक कारभारावर सरकार आक्रमण करील. जवाहरलाल नेहरूंनीं या गोष्टीची गंभीरता पटविली आहे. संयुक्तप्रांत कांग्रेस कमिटीनें या बाबतींत ठरावहि केला आहे. युद्धाचे वेळेस आमचें धोरण काय राहील, प्रांतिक कारभारावर आक्रमण आलें तर काय करावयाचें, हें सारें ठरलें पाहिजे. या वेळेस प्राणमय ऐक्य पाहिजे. वारा आला म्हणजे कचरा उडून जातो. त्याप्रमाणें क्षुद्र भेदांचा कचरा महान वारें सुटल्यामुळें उडून गेला पाहिजे. मनें साफ झालीं पाहिजेत. एकमेकांस भेटलें पाहिजे. वर्किंग कमिटी सर्वसंग्राहक बनविली पाहिजे. 'त्वया जितं मया जितं' असा हा प्रश्न नाहीं. आम्ही तरी, नाहीं तर तुम्ही तरी असा हा प्रश्न नाहीं. तुम्ही आम्ही सारे एकत्र येऊं या. सारे अहिंसक आहोंत. अहिंसेवर सद्य:-परिस्थितींत तरी विश्वास राखणारे आहोंत. नवीन विचारप्रवाहांनाहि जवळ घेतलें पाहिजे. नवीन पाणी नदीला मिळणार नाहीं तर नदी सुकून जाईल. हिमालयांतून गंगेला नवीन पाणी मिळत असतें. हें नवीन पाणी लाल दिसतें क्षणभर. परन्तु घाबरूं नका. तें पाणी क्षणांत निर्मळ होईल. आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय व रवींद्रनाथ यांनीं महात्माजींस व राष्ट्रपतींस प्रार्थिलें आहे कीं, 'समक्ष भेटा, पत्रापत्री नको. आणीबाणीचे वेळीं भेद दुर्लंघ्य करूं नका.' एक थोर शास्त्रज्ञ व महान् कवि — यांची ही प्रार्थना का फोल होईल? रवींद्रनाथांनीं मुलाखतींत सांगितलें कीं, 'महात्माजींच्या निशाणा-भोंवतीं निष्ठेनें सारे उभे रहा. आजची वेळ ओळखा. भ्रामक भेद निर्मू नका.' पंडित जवाहिरलाल नेहरू राष्ट्रपतींस भेटावयास गेले आहेत असें कळतें. प्रकरण चिडणार नाहीं अशी आशा करूं या. निरोगी शरीरांतील जखम पटकन् भरून येते. कॉंग्रेससारख्या प्रतिदिन वाढणाऱ्या बलवंत संस्थें-तील जखमा पटकन् भरून येतील यांत संशय नाहीं.

२८ तारखेस नवीन वर्किंग कमिटी भरेल व २९ तारखेस ऑ. इं कां. कमिटी भरेल. अनेकांचे अनेक ठराव येणार आहेत. कम्युनिस्ट मंडळी 'महायुद्ध सुरूं झालें तर कोणतें धोरण असावें' याविषयीं ठराव आणणार

आहेत. प्रो. रंगा वगैरे किसान कार्यकर्ते कराची, फैजपूर वगैरे ठिकाणीं पास झालेला जनताकार्यक्रम, किसान कामगार कार्यक्रम मंत्रिमण्डळानें अधिक त्वरेनें व तीव्रतेनें अंमलांत आणावा, राष्ट्रीय मागणीच्या त्रिपुरीच्या ठरावास येरव्हीं जोर असणार नाहीं, अशा अर्थाचा ठराव आणणार आहेत. कॉंग्रेसच्या सर्व प्रांतिक मंत्रिमण्डळांनीं मुसलमान व अल्पसंख्याक या बाबतींत कसें धोरण ठेवलें याची चौकशी करणारा ठराव येणार आहे. अशा अनेक ठरावांच्या नोटिसा मिळाल्या आहेत. कलकत्त्याच्या २८।२९ तारखेस होणाऱ्या घडामोडींकडे राष्ट्राचें लक्ष लागून राहिलें आहे. परिषदेची तयारी होत आहे. बंगाली प्रेक्षकांनीं गडबड करूं नये, शांत रहावें अशी राष्ट्रपतींनीं इच्छा व्यक्त केली आहे. बंगाली लोक दंगल माजवतील, म्हणून सभेच्या वेळेस प्रेक्षकांस येऊं देऊं नये असें कोणी सुचवीत आहेत. सुभाषचंद्रांचा याला विरोध आहे. परिषदांचें काम कसें चालतें तें पाहून जनतेला शिक्षण मिळतें. कोणी गडबड केल्यास त्यांना जा सांगण्याचा हक्क आहेच. परन्तु आधींपासून प्रेक्षकांस बंदी करूं नये." असें त्यांचें म्हणणें आहे. हा सर्व कारभार यशस्वी होवो, राष्ट्रास नीट मार्गदर्शक होवो, क्षुद्र वैयक्तिक भेद गंगेंत वाहून जावोत व नवीन झगड्यासाठीं राष्ट्र एका आवाजानें उठून उभें राहो दुसरें काय?

—वर्ष २, अंक ३

## प्रश्नोत्तरें ३

[ आगगाडींतून जातांना कांहीं लोकांनीं निरनिराळे प्रश्न विचारले. त्यांचीं मी जीं उत्तरें दिलीं तीं खालीं देत आहें. ]

प्रश्न:—सुभाषबाबूंच्या बाबतींत अन्याय झाला असें आपणांस वाटतें का?

उत्तर:—सुभाषबाबूंच्या बाबतींत जास्तींत जास्त कोणी अन्याय केला असेल तर त्यांना निवडून देणारांनीं, सुभाषबाबू विशिष्ट भूमिकेसाठीं उभे

राहिले होते. ज्यांनीं त्यांना निवडून दिलें त्यांनीं हें ध्यानांत धरिलें पाहिजे होतें. परंतु पट्टाभींचा पराजय तो माझा पराजय असें महात्माजींनीं जाहीर करतांच सुभाषांना निवडून देणारे गारठले. ते म्हणाले, ' आम्हांला ही नव्हती गोष्ट माहीत. पट्टाभींपेक्षां सुभाष बरे असें आम्हांला वाटलें. परंतु सुभाष बरे म्हणजे महात्माजी जाणें असा अर्थ होत असेल तर आम्हांला पुन्हां पाऊल सुधारलें पाहिजे. जहाल गटांतलि लोक पंतांच्या ठरावावर मूग गिळून बसले. सुभाषचंद्र उघडे पडले. महात्माजींना काय बोल ? त्यांची भूमिका स्पष्ट होती.

प्रश्नः—महात्माजींनीं सुभाष निवडून आले तर तो मी माझा पराजय समजेन, असें आधीं कां जाहीर केलें नाहीं ?

उत्तर :—महात्माजींच्या वजनामुळें सुभाष निवडून आले नाहींत असें लोक म्हणतील.

प्रश्न :—पूर्वीचे प्रश्न जावेत. परन्तु कलकत्त्यास प्रकार झाले ते बरे का ?

उत्तर :—मला व्यक्तिशः असें वाटतें कीं, वर्किंग कमिटींत नवीन लोक घेतले असते तर चांगलें झालें असतें. त्यालाच सहकार्य म्हणतात. नव्या वृत्तिचे कांहीं सभासद असते तर कांहीं मोठा उत्पात झाला नसता. सुभाषबाबूंनीं मागणी कमी कमी करीत आणली. परन्तु गांधीवादी मंडळींनीं तडजोड केली नाहीं. पूर्वींची व. कमिटी संपूर्णपणें एकदां सुभाषबाबूंनीं मंजूर करावी, मग वाटलें तर एकदोन जागा आम्ही खालीं करूं असें त्यांचें म्हणणें. यांत सुभाषबाबूंचा संपूर्ण स्वाभिमान धुळींत मिळविणें ही एकच गोष्ट होती. सुभाषबाबूंनीं राजीनामा दिला. जें पाहिजे होतें तें झालें. एकीकडे राष्ट्रांत ऐक्य पाहिजे असा कंठशोष केला जात आहे तर इकडे थोडीहि देवाण घेवाण न करण्याचें व्रत ! सहकार्यासाठीं सर्वांना तहान हवी.

प्रश्न :—महात्मा गांधी पत्रव्यवहारांत लिहितात कीं, पंतांचा ठराव मला अलाहाबादेस येईपर्यंत माहीत नव्हता. ही गोष्ट खरी का ?

उत्तर :—महात्माजींवर मी असत्याचा आरोप कसा करूं ? जीवनांत संपूर्णपणें सत्य यावें म्हणून ज्यांना तळमळ, त्यांचा शब्द मी प्रमाण मानतों

प्रश्न :—त्रिपुरीस हा ठराव महात्माजींस पसंत आहे अशा कंड्या पसरविल्या जात त्यांचें काय ?

उत्तर :—महात्माजींच्या नांवावर कोणी असें म्हटलें तर त्याचा दोष महात्माजींवर नाहीं. राजगोपालाचारी वगैरे तेथें म्हणालेच होते कीं, हा ठराव महात्माजींना आवडेल कीं नाहीं हें आम्हांस पहावयाचें नाहीं. आम्हांला महात्माजी पाहिजे आहेत व म्हणून हा ठराव.

प्रश्न :—महात्माजी पत्रव्यवहारांत म्हणतात, 'हा ठराव जों जों मी वाचतों, तों तों मला तो अधिक अप्रिय वाटतो.' महात्माजींना ठराव अप्रिय असेल तर त्यांचे अनुयायी तो मागें कां घेत नाहींत ?

उत्तर :—ते म्हणतील महात्माजींच्या पसंती–नापसंतीचा हा प्रश्न नाहीं. हा राष्ट्रांतील सभासदांच्या स्वेच्छेचा प्रश्न आहे. महात्माजींचे अनुयायी त्यांचे आंधळे भक्त नाहींत हेंहि यावरून सिद्ध होईल.

प्रश्नः— अहिंसा, सत्य जर सुभाषचंद्राहि मानतात तर मग विरोध कां ?

उत्तर:— विरोध कोठें आहे ती गोष्ट स्पष्ट झाली नाहीं. १९३३–३४ सालीं जेव्हां सत्याग्रह थांबविण्यांत आला, तेव्हां युरोपांतून स्वर्गीय विठ्ठलभाई पटेल व सुभाषबाबू यांनीं एक पत्रक काढलें होतें. त्यांत त्यांनीं म्हटलें होतें, 'सत्य, अहिंसा हीं सनातन तत्त्वें राजकारणांत आणणें योग्य नव्हे. आजचें पुढारीपण दूर केलें पाहिजे.' पूर्वींच्या अशा पत्रकामुळें सुभाषबाबूंवर विश्वास बसत नसेल. परंतु सुभाषबाबू आज सांगतात तर त्यांच्या शब्दांवर विश्वास ठेवला पाहिजे. परंतु सत्य व अहिंसा मानूनहि कार्यक्रमांत फेर असेल.

प्रश्नः— तो कसा ?

उत्तर:—समजा उद्यां सत्याग्रह झाला. पूर्वींच्या सत्याग्रहापेक्षां तो निराळा होईल. किसान संघ, कामगार संघ त्यांत सामील होतील. रेल्वे कामगार सामिल होतिल. अशा वेळीं शांति व अहिंसा राहील का ? १९३० सालच्या रेल्वे सत्याग्रहाला गाड्या उलथून टाकतील, रूळ काढून टाकतील, पूल उडवतील अशी भीति वाटे. आपण सत्य व अहिंसा मानूनहि ती शक्य होईल का ? अशाच बाबतींत महात्माजींचा व सुभाषांचा मतभेद असेल. तसेंच महायुद्ध सुरू झालें तर प्रतिसरकार एकदम स्थापावें असें सुभाषांचें म्हणणें असेल.

आपलीं कोर्टें, आपल्या कचेऱ्या, आपलीं स्वयंसेवकदलें म्हणजेच पोलीस व लष्करी सैन्य अशा रीतीनें आपलें स्वातंत्र्य एकदम कृतींत आणावयाचें. सुभाषचंद्रांची ही आवडती कल्पना आहे. आयर्लंडमध्यें असेच प्रकार झाले. मंत्रिमंडळांनीं प्रांतांत आपलें प्रतिसरकार स्थापतां येईल अशा ध्येयानें कार-भार हांकावा असें सुभाषचंद्रांस वाटतें. कांग्रेस कमिट्यांस महत्त्व दिलें पाहिजे. पाटील, मामलेदार, कलेक्टर यांच्या इतकेंच किंबहुना त्यांच्याहूनहि जास्त महत्त्व ग्राम, तालुका व जिल्हा कां. कमिट्यांस मिळावें असें त्यांना वाटतें. स्वयंसेवकदलें ठायीं ठायीं हवींत. परंतु आज असें कोठें आहे ? सरकारी अधिकाऱ्यांचेच रिपोर्ट अद्याप महत्त्वाचे मानले जातात. सुभाषचंद्रांच्या या कल्पना महात्माजींस कदाचित् पसंत नसतील. पॅरलल् गव्हर्मेंट, प्रतिसरकार आपण स्थापन करूं. पाहूं तर! इंग्रज रक्तपात करील. लष्करी कायद्यांचा धिंगाणा सुरू होईल. लोकहि शांत रहाणार नाहींत असें त्यांस वाटलें असेल. किंवा शत्रूची अडचण ती आपली संधि ही विचारसरणीहि महात्माजींस मान्य नसेल. कारण त्यांत खरें सामर्थ्य नाहीं. जी गोष्ट खऱ्या सामर्थ्यावर अधिष्ठित नाहीं, ती तात्पुरती आहे. महात्माजी पत्रव्यवहारांत लिहितात, ‘ राजकीय व आर्थिक बाबतींत तुमचें आमचें पटेल असें वाटत नाहीं. सहकार्य कसें व्हावें ? दोन भिन्न प्रवाह आहेत. तुम्ही विचार-प्रसार करा. ’ तुमच्याजवळ मी जें बोलतों आहें तें माझ्या कल्पनेनें; कोठें विरोध आहे तें स्पष्ट केलें नसल्यामुळें. जो तो आपला तर्क चालवितो. राष्ट्रीय उद्योगीकरणाच्या समितीचे कार्यवाह श्री. कामत यांनीं मागें सुचविलें होतें कीं, ‘ त्रिपुरीच्या आधीं बार्डोलीस जी वर्किंग कमिटी भरली, जेथें कांहीं एक ठरलें नाहीं, तेथें महत्त्वाचे प्रश्न चर्चिले गेले असावेत. महात्माजी व सुभाष यांच्यामध्यें कोठें स्पष्ट मतभेद आहेत तें जनतेला कळलें पाहिजे; त्या चर्चा प्रसिद्ध व्हाव्या. ’ परन्तु तसें कांहीं एक झालें नाहीं.

प्रश्न :—फेडरेशन घेतलें जाणार का ?

उत्तर :—ठराव तर त्रिपुरीला स्पष्ट आहे. घटनासमितमार्फतच आम्ही आमची योजना बनवूं.

प्रश्न :—हल्लीं वल्लभभाई वगैरे सारे म्हणत आहेत कीं, ‘ राष्ट्राची तयारी नाहीं. शिस्त नाहीं. सख्य नाहीं. अहिंसेचा अस्त दिसतो. सरकारला

आव्हान कसें द्यावें. आम्ही दुबळे झालों आहोंत.' या म्हणण्याचा इत्यर्थ असाच नाहीं का कीं, फेडरेशनला विरोध कसा करावा? शक्तिहीन झाल्या-मुळें येईल तसें घ्यावें; पुढें पाहूं.

उत्तर:—मला असें वाटत नाहीं. राष्ट्रानें सावध व्हावें, दक्ष व्हावें म्हणून ही सूचना आहे. शिवाय महात्माजी कधीं एकदम सत्याग्रह जाहीर करतील त्याचा नेम नाहीं. ३० सालच्या सत्याग्रहाबद्दल ते म्हणाले होते, 'कोणाला असें माहीत होतें कीं सारें राष्ट्र उठेल? परन्तु ईश्वराची तशी इच्छा होती. सारें राष्ट्र पेटलें.' ३० सालीं महात्माजींस राष्ट्राची खात्री नव्हती, तरी ते उठले. तसेंच ३९–४० सालीं होईल. तेजोभंग करण्याचा त्यांचा हेतु नाहीं. परन्तु अधिक संघटित व्हा, हिंसेचा प्रचार नका करूं, असें ते म्हणत आहेत.

प्रश्न:—तुम्हांला असेंच वाटतें का कीं, राष्ट्राची तयारी नाहीं?

उत्तर:—किसानांत खूप जागृति झाली आहे. कामगार तर प्रचंड रीतीनें संघटित होत आहेत. विद्यार्थ्यांत नवचैतन्य आहे. ३० सालच्या मानानें राष्ट्रांत अपूर्व जागृति आहे असें वाटतें. परन्तु ही जागृति, हा उत्साह, आम्हीं अहिंसक व संघटित केला पाहिजे. असें करूं तर आपला विजय होईल. महात्माजींनीं लिहिलें होतें, 'पुन्हां सत्याग्रहाची लढाई द्यावी असें मला वाटतें. मी थकलों नाहीं.'

प्रश्न:—त्यांनीं असेंहि म्हटलें होतें कीं 'पार्लमेंटरी पद्धत ही कायमची राहावयास आली आहे' म्हणजे असेंब्लींतून सनदशीर कारभारच चालवावयाचा असा नाहीं का अर्थ?

उत्तर:—राष्ट्रांत शक्ति येईपर्यंत चालवावयाचा. आपलीं मंत्रिमंडळें असतील तर पुढील लढ्यासाठीं अधिक संघटना व सामर्थ्य वाढवतां येईल. प्रचारास अडथळा राहणार नाहीं. आत्मविश्वास वाढेल, भय कमी होईल. ते मंत्रिमंडळें घेतांना म्हणाले होते 'पुढील लढ्यासाठीं अधिक शक्ति यावी म्हणून मंत्रिमंडळें घेण्यास मी संमति देतों.' त्यांच्या डोळ्यांसमोर लढा आहे.

प्रश्न:—परंतु मंत्रिमंडळें घेतल्यावर महात्माजींनीं असेंहि लिहिलें होतें कीं 'सत्याग्रह न करतांहि आहे त्याच घटनेतून मी स्वराज्य मिळवूं शकेन.'

उत्तरः—सत्याग्रही आशावंत असतो. सरकार लोकप्रतिनिधींच्या मंत्रिमंडळाच्या कामाला जर अडथळा न करील, राष्ट्राच्या आकांक्षास जर विरोध न करील तर स्वराज्य यांतूनहि येईल असें त्यांचें म्हणणें. त्याच लेखांत ते म्हणाले होते "सरकार असें न करील तर पुढें तीव्र प्रक्षोभ होईल." ब्रिटिशांच्या सदिच्छेवर ते अवलंबून आहेत. परंतु मंत्रिमंडळांस जर पुढें महत्त्वाच्या प्रश्नांत अडथळा होऊं लागेल, संस्थानी प्रश्नांच्या बाबतींत जर कांहींच झालें नाहीं, लढाईच्या वेळेस प्रांतिक कारभारावर जर गदा आली तर महात्माजी रणशिंग फुंकतील.

प्रश्नः— महात्माजींच्या परस्परविरोधी वचनांची संगति कशी लावावयाची ?

उत्तरः— त्या त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें त्या त्या वेळचीं वाक्यें असतात. त्या त्या वेळेपुरतीं तीं सत्य असतात. महात्माजींना राष्ट्रीय स्वातंत्र्याची तहान आहे, त्यासाठीं त्यांचा आत्मा तडफडत आहे, ही गोष्ट ज्याला पटते, त्याला या विसंगतींतहि संगति दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीच्या निदिध्यासाच्या प्रकाशांत हीं वाक्यें तपासलीं पाहिजेत. म्हणजे मेळ घालतां येईल.

—वर्ष २, अंक ७.

## प्रश्नोत्तरें ४

[ एकदां राष्ट्रीय स्वयंसेवक संघांतील एक माझा मित्र मला भेटला होता. त्याचीं माझीं प्रश्नोत्तरें देत आहें. ]

प्रश्नः— तूं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला कां नावें ठेवतोस ? देशांतील तरुण नीट सुसंघटित होऊं नयेत असें का तुला वाटतें ?

उत्तरः—असें कोणाला वाटेल ? आपल्या देशांतील मुलीमुलें नीट सुसंघटित, चपळ, संघटित, तेजस्वी, कणखर होऊं नयेत असें का मला वाटतें ? कसा तरी वेडावांकडा उभा राहतो, कोठें तरी बघतो, सद्र्याला

गुंडी नाहीं, टोपी कशी तरी डोक्यावर घातलेली, असा बावळट मुलगा अतःपर हिंदुस्थानांत असूं नये, असें मलाहि वाटतें.

प्रश्नः—मग अशा चळवळीस कां विरोध? का तुम्ही अहिंसावादी आहांत म्हणून विरोध? परंतु हिंदुस्थानला लष्करी शिक्षणाची जरूर नाहीं का?

उत्तरः—उगीच वेड्यासारखें बोलूं नकोस. लष्करी शिक्षण नको असें कोण म्हणतो? बिहारमध्यें लष्करी शिक्षण देण्यासाठीं कॉलेज निघणार आहे. श्री. गोपालचारी यांनीं तरुणांस लष्करी शिक्षण घ्या असा उपदेश केला. इतर कां. मंत्रिमंडळेंहि या बाबतींत लक्ष घालणार आहेत. उद्यां स्वराज्य मिळालें तर आम्हांस लष्कर ठेवावें लागेल. महात्माजी मागें म्हणाले होते 'लष्कर ठेवावेंच लागणार नाहीं असा काळ अद्याप माझ्या डोळ्यांसमोर नाहीं. माझीं ध्येयें प्रत्यक्ष संसारांत यावयास अद्याप ५-१० हजार वर्षें लागतील.' स्वतः महात्माजींनीं ३० सालीं ज्या ११ मागण्या मागितल्या, त्यांत शस्त्रास्त्रें वापरण्यास परवानगी असावी असें मागितलें होतें. शस्त्रास्त्रें हातीं असूनहि तीं अहिंसेनें न वापरणें ही निराळी गोष्ट आहे. अहिंसा दुबळ्यांची नसून बलवंतांची आहे. महात्माजींनीं दुबळेपणाला कांहीं उत्तेजन दिलें नाहीं.

प्रश्न :—मग आमच्या या चळवळीस कां विरोध? अडचण कोठें येते?

उत्तर :—तुम्ही हिंदुस्थानचे तुकडे करूं पाहतां. हिंदुस्थान हिंदूंचा, हा मंत्र मला योग्य वाटत नाहीं. तुम्ही हिंदुस्थान हिंदूंचा म्हणतां, मग मुसलमान म्हणतात उत्तर हिंदुस्थान मुसलमानांचा बनवा. एक अखंड भारत बनवावा असें आम्हांला वाटतें. आपण तें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून वागलें पाहिजे. येथें जे मुसलमान आहेत ते का परदेशांतून येथें आले आहेत? आपलेच ते जातभाई होते. स्वधर्मातील जुलमामुळें, परधर्मीयांच्या छळामुळें व कांहीं स्वतःच्या स्वार्थामुळें या धर्मांत गेले. हिंदुस्थानांत त्यांची जन्मभूमि व पितृभूमि, कोठें जाणार ते? आज हिंदुस्थानांत एक कोट खिश्चन आहेत. ते का या देशांतील नाहींत? येथेंच ते हजारों वर्षें नांदत आले आहेत. कोठें जातील ते? सारांश, मुसलमान व खिश्चन यांचीहि हिंदुस्थान हचि आतां मायभूमि आहे. पितृभूमि आहे ही गोष्ट नाकारणें म्हणजे इतिहास नाकारणें होय.

प्रश्न :—मुसलमान अलगच राहूं इच्छितात. आपली लिपी, आपली भाषा सारें स्वतंत्र ठेवूं इच्छितात. अशानें ऐक्य कसें होणार ?

उत्तर :—या बाबतींत रशिया तुमचा गुरु आहे. आज रशियांत शेंकडों भाषा बोलणारे प्रांत आहेत. रशियांतील कम्युनिस्ट सरकारनें सर्वांना भाषा-स्वातंत्र्य दिलें आहे. त्यांत काय बिघडलें ? दोन लिप्या व दोन भाषा राहूं द्या. आपणांस बंधुभाव वाढवावयाचा आहे ना ? दोन भाषा शिकूं, दोन लिप्या कांहींजण शिकूं. एकदां आपण सर्वांनीं स्वातंत्र्य जाहीर करूं या, म्हणजे संशय उरत नाहीं. उरला तर त्यास इलाज नाहीं. तो अनुभवानें जाईल. महान देशावर जबाबदारी अधिक. रशियांत अनेक सोव्हिएटस आहेत. त्यांचें युनियन आहे. त्यांचें संयुक्तसरकार. उगीच अहंकार व अभिमान यानें ऐक्य होत नाहीं.

प्रश्नः— मुसलमान हिंदूंवर जुलूम करतात.

उत्तर:— असलीं भाषणें करण्यांत अर्थ नाहीं. सारे मुसलमान वाईट असें कधीं म्हणूं नये. ती चूक आहे. वाईट लोक सर्वत्र आहेत. हिंदुमुसलमान गुंडांचा बंदोबस्त केलाच पाहिजे. खरी गोष्ट अशी आहे कीं ते व आपण एकमेकांचे जवळ कधीं जात नाहीं. ते दूर आपण दूर. जवळ जाऊं, मैत्री जोडूं, एकत्र अधिक येऊं, तर वातावरण अधिक निर्मळ होईल. तुम्हीं दूर दूर चाललेत. ते दूर दूर चालले. दोघांना जवळ आणण्यासाठीं एक माझी थोर कॉंग्रेस माता जवळ उभी आहे. परन्तु तुम्हीं दोघे तिला लाथ मारीत आहांत. मारा लाथ. मुलानें वातांत लाथ मारली तरी माता रागावत नाहीं. ती अधिकच सेवा करते. महान् ध्येय ठेवून, थोर भारतीय पूर्वजांचें थोर ध्येय डोळ्यांपुढें ठेवून कॉंग्रेस वागत आहे. नादीरशहा दिल्लीचे बादशहावर चालून येत असतां बाजीराव दिल्लीचे बादशहाचे मदतीस गेला. ५७ सालीं हिंदुमुस्लीम एक होऊन लढले. १९१९।२० त एकत्र त्यांनीं रक्त सांडलें. इतिहासांतील ही आशा घेऊन आम्हीं पुढें जाऊं. सोन्याच्या कणावर दृष्टि खिळवावी. काळ्याकुट्ट ढगांकडे न पहातां सोनेरी किनार बघावी. सोन्याच्या लगडी सहज मिळत नाहींत. हजारों मातीच्या कणांतून एक कण सोन्याचा मिळतो. तो आपण गोळा करतों. त्याप्रमाणें गत इतिहासांतील किंवा आज सभोंवती घडणाऱ्या इतिहासांतील ऐक्याचे, उदारतेचे सोन्याचे

कण गोळा करून त्यांच्यावर जनतेचें लक्ष वेधावें. अशानेंच मानवी समाज पुढें जाईल.

प्रश्नः—मुसलमान कधीं सुधारतील असें मला वाटत नाहीं. जगांत कधीं प्रेमराज्य सुरू होईल असें मला वाटत नाहीं. जगांत बळी तो कानपिळी असेंच चालणार, अंधार व प्रकाश यांचें मिश्रण राहणार, मारामाऱ्या जगांत व्हावयाच्याच.

उत्तरः—असें बोलणें म्हणजे नास्तिकपणा आहे. मानवी समाज यापुढें जात आहे यांत शंका नाहीं. प्रगति थोडी का होईना होत आहे. अंधार व प्रकाश राहील. परंतु अंधारांत कोट्यवधि मंगल तारे चमचम करीत असतात. ज्याला मानवी समाज शेवटीं सुंदर होईल असें वाटत नाहीं, त्याच्या प्रयत्नांस अर्थ तरी काय? नदी शेवटीं समुद्रास मिळेल. मानवी समाजहि प्रेमाकडे जाईल. आज जग जवळ येत आहे. कदाचित् मारण्यासाठीं जवळ येत असेल. परंतु त्यांतूनच उद्यां तारणें निर्माण होईल. कच्ची कैरी पिकत पिकत गोड होईल. तिचा आंबटपणा जाईल. मानव जातीच्या उज्वल भवितव्यावर तुझी श्रद्धा नसेल तर बोलणेंच संपलें.

प्रश्न :—अशी श्रद्धा टिकणें म्हणजे कठीण काम.

उत्तर :—त्यांतच पुरुषार्थ आहे. समर्थांनीं सांगितलें, 'उत्कट भव्य तें घ्यावें! मिळमिळीत अवघेंचि टाकावें—' जें थोर दिव्य भव्य आहे तें घ्यावें. मारुति जन्मतांच लाल सूर्याला मिठी मारण्यासाठीं उडाला. आपणहि नव भारताच्या नवीन मुलांनीं तें सर्वांचें ऐक्य, हें महान् ध्येय, तें घेण्यासाठीं पुढें जाऊं या. विविधतेंत एकता पहा. अरे बगीच्यांत एकाच रंगाचीं, गंधाचीं फुलें असण्यांत काय मौज? जेथें शेंकडों रंगांचीं व गंधाचीं फुलें फुलतात तो बगीचा गोड दिसतो. हिंदुस्थानांत नाना संस्कृति परस्परांस शोभवतील. हा देवाचा महान् बगीचा होईल. केवढें थोर ध्येय! आपलें हें भाग्य आहे. अविरोधानें सारे फुलूं या. गुलाब मोगरा एकत्र फुलूं देत. ताजमहाल व अजिंठा एकत्र नांदूं देत. त्यांच्या सणाला आपण जाऊं. आपल्या संक्रांतीच्या सणाला त्यांना बोलावूं. ईदच्या दिवशीं हिंदी मुसलमान जी प्रार्थना म्हणतात, तींत 'देवा, हिंदु-मुसलमानांचा सांभाळ कर' असें म्हणतात. पूर्वजांनीं हा मंत्र दिला. हिंदूंच्या व मुसलमानांच्या

थोर पूर्वजांनीं हा मंत्र दिला. हिंदूंच्या व मुसलमानांच्या थोर पूर्वजांनीं चिखलांतून कमळें फुलवण्याचे प्रयत्न केले. तेच प्रयत्न श्रद्धेनें आपण पुढें नेऊं या. मित्रा कवाईत करा, शिस्त शिका, चपलपणा आणा; परंतु हिंदुस्थानांतलि एकमेकांबद्दल विष मनांत बाळगूं नका. भारतमातेच्या आंगावर तिच्या मुलांचें रक्त न सांडलें जावो. इंग्रज वगैरे परकीयांचाहि आम्ही तिरस्कार करीत नाहीं. त्यांनीं लुटारू न होतां येथें रहावें. आमच्यांतील चतकोर भाकर त्यांनींहि घ्यावी. परंतु जाचक मालक म्हणून न राहतां मित्र म्हणून रहावें, भारतीयांचीं भावंडें म्हणून रहावें.

प्रश्नः— त्या दिवशीं आमची मिरवणूक जात होती. तूं दारांत येऊन पहात होतास. प्रथम हंसलास. परंतु मागाहून एकदम डोळे मिटून घेतलेस. कां बरें ?

उत्तरः— हृदयांतलि गोष्टी कोणास सांगूं ? तुमचा बॅंड, तुमची कवाईत पाहून मला उचंबळून येत होतें. एकदम तोंडावर हास्य फुललें. परंतु तुम्हांला जें विषारी बौद्धिक खाद्य दिलें जातें, जी संकुचित दृष्टि दिली जाते, तें सारें मनांत येऊन वाईट वाटलें. मी डोळे मिटून माझ्या देवाला सांगितलें "द्वेषापासून तुझी ही आवडती भूमि तूंच वांचव. या मुलांना मंगलाकडे ने."

प्रश्नः— तुम्हीं नाहीं का द्वेष फैलावील ? हिंदुमुसलमानांमध्यें नसाल फैलावीत पण वर्गावर्गांत फैलावीत आहांत.

उत्तरः— अरे, तुम्हाला खोल दृष्टीच नाहीं. वर्गावर्गांत आजपर्यंत युद्धें चालू आहेत, द्वेष आहे. हे द्वेष जावयास हवे असतील तर खाजगी मालमत्ता ठेवणें योग्य होणार नाहीं. लोकांजवळ थोडी खाजगी इष्टेट राखा. परंतु प्रचंड कारखाने, प्रचंड इस्टेटी, साम्राज्याच्या मालकीच्या करा. जगांतील सर्व द्वेष यानेंच जाईल. यानेंच पिळवणूक कमी होईल. आम्हीं द्वेष वाढवीत नाहीं. द्वेष आहेच. एक उपासमारीनें मरतो व एक अजीर्णानें मरतो. हें का आम्हीं निर्माण केलें ? ही स्थिति जावयास हवी असेल तर साम्यवाद त्यावर उपाय आहे. तो अहिंसेनें आणावयाचा का हिंसेनें एवढा प्रश्न राहतो. एकादा इंग्रज चांगला असला तरी ज्याप्रमाणें इंग्रज सरकार येथें योग्य ठरत नाहीं, त्याप्रमाणें कांहीं सावकार—कारखानदार भले असले तरी तेवढ्यानें

सावकारी वा कारखानदारी योग्य ठरत नाहींत. व्यक्तींच्या लहरीवर कोट्यवधि लोकांचें कल्याण अवलंबून ठेवतां येणार नाहीं. आम्हीं द्वेष फैलावणारे नाहीं. एका विशिष्ट पद्धतीचा आम्ही द्वेष करतों. ज्याप्रमाणें कॉंग्रेस इंग्रजांचा द्वेष करीत नाहीं, सरकारी राज्यपद्धतीचा द्वेष करते, त्याप्रमाणें आम्ही भांडवलवाल्यांचा द्वेष करीत नसून भांडवलशाही पद्धतीचाच फक्त द्वेष करतों.

प्रश्न :—मग मी काय करूं ?

उत्तर :—तुझ्या हृदयाला विचार. चांगलें व वाईट यांची लढाई सनातन आहे. जातीजातींची, धर्माधर्मांची लढाई ही त्याज्य आहे. लढाईचें खरें स्वरूप निराळें आहे. सत्प्रवृत्ति असत्प्रवृत्तींशीं लढत आहे. तूं कोणती बाजू घेणार तें ठरव. वाईट माझा नातलग असला तरी त्याज्य, भला एकादा मुसलमान असला तरी पूज्य. ही भावना हवी. आपलें ध्येय असें असावें. ' जेथें वाईट असेल तेथें जाऊन आम्ही झगडूं. घाण कोणत्याहि गल्लींत असो, ती जाळूं. आणि आधीं स्वतःच्या गल्लींतील, स्वतःच्या घरांतलि जाळूं. ' यांत सारें समज. शेवटीं एके दिवशीं सारें चांगलें होईल, आंबा पिकेल अशी मला श्रद्धा आहे.

—वर्ष २, अंक १८.

# प्रश्नोत्तरें

[ शेतकरी, कामकरी, विद्यार्थी यांचे वर्ग घेतांना अनेक प्रश्न निघतात. तीं प्रश्नोत्तरें खेड्यापाड्यांतलि जनतेला कळलीं पाहिजेत. म्हणजे त्यांना पुष्कळ गोष्टींचा उलगडा होईल. ]

प्रश्नः— हैदराबादचा सत्याग्रह तेथील कॉंग्रेसनें कां थांबविला ?

उत्तरः— सर्व ठिकाणचा सत्याग्रह तूर्त थांबवावा अशी सल्ला महात्माजींनीं दिली. सर्वांनीं ती ऐकली. महात्माजींना असें वाटत असेल कीं लोकांनीं आपली शक्ति सांठवून ठेवावी. आजच दमून जाल तर उद्यां

फेडरेशनचा प्रचंड लढा सुरू होईल तेव्हां कदाचित् स्वस्थ बसाल. शिवाय संस्थानांत प्रचार नाहीं. महात्माजींनीं खेड्यापाड्यांतून विधायक काम सुरू करा अशी सल्ला दिली. विधायक कामाबरोबर राजकारण जातें. खेड्यापाड्यांतून आज जर प्रचार होईल तर उद्यां फेडरेशनचा अखिल भारतीय लढा सुरू झाला म्हणजे संस्थानांतील विधायक कामानें जागृत झालेली प्रजाहि त्यांत हजारोंनीं सामील होईल.

प्रश्न :—आर्यसमाज व हिंदुमहासभा यांत कोणता भेद आहे ?

उत्तर :—भेद वृत्तीचा आहे. आर्यसमाजाचे ते थोर कार्यकर्ते कॉंग्रेसची टिंगल करीत नाहींत. ते महात्माजींना पदोपदीं भेटतात, सल्ला घेतात. ते कांग्रेसद्रोही नाहींत. कांग्रेसची अखिल भारतीय जबाबदारी ते ओळखतात. परंतु हिंदुमहासभेचें तसें नाहीं. निदान आपल्या महाराष्ट्रांत तरी कां. नाहींशी करणें हा त्यांचा डाव आहे.

प्रश्न :—परवां वाचलें खरें स्वातंत्र्यवीर सावरकरांचें नाशिकच्या लोकांस पत्र, कीं आतां पुढच्या निवडणुकींत निदान महाराष्ट्रांत तरी, आपण विजयी होऊं व प्रांतिक सत्ता जी काय आहे ती आपण काबीज करूं. पुढच्या निवडणुकींत निदान त्यांना मिळेल का जय ?

उत्तर :—मुंबई प्रांतांत गुजराथ, महाराष्ट्र, कर्नाटक व मुंबई शहर असे भाग आहेत. गुजराथ व कर्नाटक कांग्रेसचे उमेदवार निवडून दिल्याशिवाय राहणार नाहीं. मुंबईतहि कांग्रेसच निवडून येईल. महाराष्ट्राचा प्रश्न राहिला. महाराष्ट्रांत तुम्ही शेतकरी व कामकरी ज्याला मत द्याल त्याचा विजय होईल.

प्रश्न :—आम्ही का कांग्रेसशिवाय मत देऊं? कांग्रेस कशीहि असली तरी तीच आधार. तिनें आम्हांला लिहावाचायला शिकवण्यासाठीं कंबर बांधली आहे. दारू बंद करणार आहे. कर्ज बिल आणीत आहे. खंडकऱ्याला संरक्षण देणार आहे. तहशील कमी होणार आहेत. दोन आणे का होईना, कांहीं ठिकाणीं सूट तिनें यंदा दिली. विहिरी, रस्ते यांना पैसे दिले. अधिकाऱ्यांची घमेंड थोडी कमी झाली. नदी-नाल्यांचें शेताला पाणी घेतलें तर पैसा नाहीं. बारीक सारीक दोन वर्षांत किती गोष्टी. आम्ही तिलाच मतें देऊं. हिंदुमहासभा शेतकरी कामकऱ्यांचें करील का कल्याण ?

उत्तर :—त्यांच्या बाजूच्या पत्रांवरून त्यांच्याविषयींचा अंदाज करावयाचा. साधें खंडकरी बिल आणलें तरी केसरी सारखीं पत्रें ' बोल्शेव्हिझम आला म्हणून बोंबलूं लागलीं. जळगांव, मालेगांव येथें सावकार व्यापारी यांच्या परिषदा भरल्या. कांग्रेसचें कर्जबिल पसंत नाहीं. म्हणतात काय आम्ही कांग्रेसला राजीनामा द्यायला लावूं. हे मूठभर लुटारू लोक! म्हणतात मंत्र्यांना राजीनामा द्यायला लावूं. या जमलेल्या लोकांत हिंदुमहासभावाले, वर्णाश्रमवाले सनातनी यांचा भरणा अधिक होता. हिंदुमहासभेला अशांचा कळवळा असतो. केसरीनें एकदां म्हणतात सांगितलें होतें कीं, सावकार, इनामदार, जमीनदार यांचे आम्ही.

प्रश्न :—यांच्या सभेला म्हणे मुसलमानहि गेले होते ?

उत्तर :—हाच तर चावटपणा आहे. हिंदु मुसलमान हे खरे भेद नाहींत; ते ज्यास भरपूर मिळतें अशांचेच आहेत. भविष्यकाळांत हिंदुस्थानांतील मुस्लीमलीगचे नबाब, हिंदुमहासभेला पाठिंबा देणारे सारे जमीनदार, सावकार, इनामदार हे एक होतील व गरीब हिंदु-मुसलमानास चिरडूं पाहातील.

प्रश्न :—यासाठींच का ते संघ आहेत ? प्रत्येक शहरांत आहेत. खेड्यांत हें विष अद्याप आलें नाहीं.

उत्तर :—हिंदुमहासभेचें तें भावी लष्कर आहे. तें भांडवलवाल्यांचें लष्कर होईल आणि शेतकरी व कामकऱ्यांना दडपील.

प्रश्न :—स्पेनमध्यें असेंच झालें म्हणतात तें खरें का ?

उत्तर :—होय. तेथें शेतकरी कामकरी राज्य होतांच बडे लोक एक झाले. जमीनदार, मठवाले, सरदार, इनामदार सारे एक होऊन उठले. आज पुन्हां या भांडवलवाल्यांची सत्ता येथें स्थापन झाली आहे.

प्रश्न :—आपल्याकडे असेंच का होईल ?

उत्तर :—होय. हिटलर, मुसोलिनी हे या लोकांचे गुरु आहेत. आपापल्या स्वयंसेवकांच्या पलटणींच्या जोरावर तेथील शेतकरी, कामकरी त्यांनीं आज दाबून ठेवले आहेत. त्यांना बोलण्याचें स्वातंत्र्य नाहीं, लिहिण्याचें स्वातंत्र्य नाहीं. जर्मनींतून परवां एक गृहस्थ आले. ते म्हणाले, जर्मनीच्या मानानें हिंदुस्थानांत किती स्वातंत्र्य ! तेथें तोंड उघडतां येत नाहीं, आपल्या

देशांतील संघ हे पुढें आपणां सर्व गरीबांच्या मानगुटीस बसतील. तुम्ही सावध रहा.

प्रश्न :—मग आम्हीं काय करावें ?

उत्तर :—तुम्हीं हिंदुमुसलमान असल्या भेद पाडणाऱ्या चावटपणास बळी पडूं नका. शेतकरी तेवढा एक, कामकरी तेवढा एक असें करा. आपली पोलादी संघटना करा. दिवसभर नांगर चालवावा. रात्रीं तिरंगी झेंडा रोंवा. लाठी शिकावी. कवाईत शिकावी. निर्भय व्हावें. गांवोगांव तरुण किसान सेना स्थापा. मधून मधून हजारोंनीं एकत्र जमून बाजे लावून शिस्तीनें मिरवणुका काढा. असें कराल तरच आशा आहे. नाहींतर तुम्हां गरिबांचा कठीण काळ आहे. कॉंग्रेसच्या साध्या सुधारणांसहि हे बेटे विरोध करीत आहेत. जो आम्हांला पोटभर भाकर देईल त्याला म्हणावें मत. कॉंग्रेस भाकर देईल. तिचें हृदय तुमच्याकडे आहे. जरा जपून ती जात आहे. धीर, धीर धरा.

प्रश्न :——खेड्यांत म्हणतात सारें कर्ज कां रद्द केलें नाहीं ?

उत्तर :——खरोखर तसेंच केलें पाहिजे. पण तसें कॉंग्रेस केव्हां करील ? जेव्हां सर्व सत्ता तिच्या हातीं येईल. जळगांवला सावकार म्हणाले, “मंत्र्यांना राजीनामे द्यायला लावूं.” कोणाच्या जोरावर हे असें करणार ? प्रांतिक सुधारणा ज्या मिळाल्या आहेत, त्यांत असें एक कलम आहे कीं अल्पसंख्य लोकांच्या संरक्षणाची जबाबदारी सरकारवर, गव्हर्नरवर आहे. आज साधें कर्जबिल आणलें तर हे सावकार म्हणतात कीं राजीनामे द्यायला लावूं. जर सर्वच कर्ज रद्द करा असें बिल आणलें तर हे सावकार छाती बडवीत गव्हर्नरच्या दारांत जाते व “पाहि मां पाहि मां” महाराज आमचें रक्षण करा, कॉंग्रेस आम्हांला अगदीं धुळीस मिळवीत आहे असें म्हणाले असते. मग गव्हर्नर मंत्र्यास म्हणतात “हें असें बिल नको. तर जरा सौम्य करा.” तुमची तयारी असती सर मंत्र्यांनीं राजीनामे दिले असते. तुमची कोठें आहे पुरी तयारी ? सावकार सारे बंद केले तर तुम्हांला कर्ज देण्यासाठीं भरपूर भांडवलाच्या बँका हव्यात. त्यांत भांडवल असावें म्हणून पैसे हवेत. लष्कराचे खर्च, ऑफिसरांचे पगार यांना काट मारल्याशिवाय कोठून येणार

पैसे ? यासाठीं सत्याग्रह करावा लागेल. त्यासाठीं तयार रहा. आज कॉंग्रेस जेवढी शक्ति आहे त्या मानानें सारें करीत आहे.

प्रश्न :—मग तुम्ही तरी कां टीका करतां कांग्रेसवर ?

उत्तर:—मंत्रि जेवढें करीत आहेत तेवढ्यानें आमचें समाधान नाहीं, हें जाहीर केलेंच पाहिजे. नाहीं तर गव्हर्नर म्हणावयाचे कीं, लोक अगदीं खुशींत आहेत. आम्हांला अधिक पाहिजे, मंत्र्यांनीं त्यासाठीं भांडावें, आम्ही सत्याग्रहास तयार आहोंत, असें आपण जगाला जाहीर केलें पाहिजे, आणि तयारी करीत राहिलें पाहिजे. म्हणजे मंत्र्यांचे हातहि तिकडे बळकट होतात. तेहि सावकारांस सांगतील, 'एवढें साधें करतों तर टीका करतां. शेतकरी तर आणखी मागत आहे. तेव्हां आम्ही म्हणतों एवढ्यासाठीं तरी कबूल व्हा.' असें असतें हें. त्यांत का कांग्रेसवर राग असतो ?

प्रश्न:—समजलें आम्हांला. आपली मागणी सारखी ठेवली पाहिजे. मनांत प्रेम ठेवून बाहेर राग दाखविला पाहिजे. आम्हीं तयारीहि सत्याग्रहाची ठेवली पाहिजे.

उत्तर :—तयारी करा. चुलीवर पाणी ठेवलें, परन्तु खालीं जाळ नसेल तर पाण्याला कढ येईल का, भात शिजेल काय ? त्याप्रमाणें नुसते कांग्रेस मंत्री काय करतील ? गांवें संघटित करा. गांवांत सेवा-मंडळें स्थापा. गांव स्वच्छ करा. गांव साक्षर करा. गांवांत तरुणांनीं एकी करावी. भेदभाव मोडावे. गुंडगिरी दूर करावी. सेवेनें लोकांचीं मनें वेधावीं. गांवांत कॉलरा येऊं देऊं नये. आजाऱ्यास मदत करावी. विहिरीजवळ स्वच्छता करा. खताचे नीट खड्डे खणा. विष्टेवर नीट माती टाका. गांवांत रहाट चालवा. कपडा करा. आळस नको. झेंडावंदन करा. कवाईत शिका. हजारोंनीं कॉं.चे सभासद व्हा. मधून मधून या गांवाहून त्या गांवाला गाणीं गात मिरवणुका न्या. गाणें, पोवाडे शिका. अशा रीतीनें जागृति आणा. असा खालून जाळ पेटवतांच, खेडींपाडीं जागृत होऊं लागलीं म्हणजे मग वर कढ येईल, आधण येईल; भात शिजूं लागेल. रस्ते दुरुस्त होतील. सरकारचे खर्च कमी करून, सत्ता हातीं घेऊन, लष्कर ताब्यांत घेऊन, तुमच्या सुखासाठीं पैसे दिल्लीहून आणतां येतील. खरें ना ?

प्रश्न:— हो आम्ही सारें करूं, एक कांग्रेस ओळखूं. तीच शेवटीं करील

सारें. आजपर्यंत दीडशें वर्षांत कोणी कर्जबिल आणलें नाहीं, खंडकरी बिल आणलें नाहीं. दारूबंदी हातीं घेतली नाहीं, शिक्षणाला चालना दिली नाहीं. जय कांग्रेस आई—तुला मत देऊं, तुझें गाणें गाऊं, तुझें नांव घेऊं, तुला प्राण देऊं, सारें तुझ्यासाठीं. परंतु खरेंच निवडणूक होईल काय ?

उत्तर :—कांग्रेस तर लढ्यासाठीं उत्सुक आहे. अमदाबादला वल्लभभाई परवां म्हणाले, ' जर पुढील वर्षीं दिल्लीहून दारूबंदीसाठीं आम्हांस दीडदोन कोटी रुपये मिळणार नाहींत तर आम्ही मंत्रिपदें झुगारून देऊं. सत्याग्रह करूं. कदाचित् सत्याग्रह सुरू करूं किंवा जनतेचा कांग्रेसवरच विश्वास आहे, तिचा कार्यक्रम मान्य आहे, हें दाखविण्यासाठीं पुन्हां निवडणुका लढवूं. जर निवडणूक झाली तर तुमच्यासाठीं कायदे करणाऱ्या कांग्रेसचा द्वेष करणाऱ्या कोणाला एक तरी मत द्याल का ?

प्रश्न :—नाहीं. नाहीं. शेतकरी, कामकरी आतां बावळट राहणार नाहीं. धर्माच्या नांवानें गप्पा मारून, गरिबांस शेवटीं दरिद्री ठेवूं पाहणाऱ्या वरिष्ठांच्या नादीं लागणार नाहीं. खरा धर्म म्हणजे जनतेस सुखी करणें, गरिबास सुखी ठेवणें. असें नाहीं का ?

उत्तर :—होय. तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे, ' जे कां रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ॥ देव तेथेंची जाणावा । तोचि साधु ओळखावा ॥

कोट्यवधि लोकांच्या पोटांत पुरेसें अन्न नाहीं. अंगावर नीट कपडा नाहीं. अशांचे संसार सुखाचे करणें हा पहिला महान् धर्म आहे. महाभारतांत भीष्मानीं सांगितलें आहे. ' दरिद्रान् भर कौंतेय ' अरे धर्मराजा, आधीं गरिबांची काळजी घे. श्रमजीवी जनतेच्या पोटाला अन्न दे, अंगाला वस्त्र व रहायला घर दे, मुलाबाळांस ज्ञान दे. सर्वांना माणुसकी दे. असा हा धर्म या खऱ्या धर्माला विसरूं नका. कॉंग्रेसची संघटना वडाच्या प्रचंड वृक्षाप्रमाणें वाढवा. पाळेंमुळें सर्वत्र खोल जाऊं देत. म्हणजे ती छाया देईल.

—वर्ष २, अंक १७.

## दुतोंडी लेखणी



धुळें येथील भारताच्या २५ जुलैच्या अंकांत 'मा. वा. ना.' नांवाच्या लेखकांनीं मला अहिंसेच्या बाबतींत कांठावरहि पास होणार नाहीं असें सांगितलें आहे. त्यांच्या या सूचनेबद्दल आभारी आहें. परीक्षक ते नसून परमेश्वर असल्यामुळें मला भीति वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. कॉंग्रेस पत्रांतील लेख वाचून त्यांनीं विसंगति दाखविली आहे. आणि भावनाप्रधान माणसाकडून विसंगतीशिवाय दुसरें काय मिळणार असें सुचविलें आहे.

या सद्‌गृहस्थांस सुचवावेंसें वाटतें कीं जगांतील माझ्यासारखे क्षुद्र लोक तर बाजूलाच ठेवा. ते चंचल म्हणून सोडून द्या प्रश्न. परन्तु जगांतील जेवढे महापुरुष झाले व आहेत त्यांच्या प्रत्येक उद्गारांत सुसंगतीच दिसेल का ? लो. टिळकांचे केसरींतील लेख वाचूं तर परस्परविरोधी शेंकडों वचनें काढून दाखवितां येतील. महात्माजींच्या लेखांतून काढतां येतील. त्या विसंगतींतहि एक प्रकारची सुसंगति असते. आणि आपण त्या सर्वांचा समन्वय करीत असतों. निरनिराळ्या परिस्थितींत, निरनिराळ्या प्रश्नांकडे लक्ष ठेवून त्या त्या क्षणीं आपण बोलत असतों. जेव्हां आज्ञाधारकपणावर व्याख्यान कोणी देतो तेव्हां त्यावर जोर देतो. जेव्हां बुद्धिस्वातंत्र्यावर देतों तेव्हां निराळें बोलतों. विवेकानंद एकदां म्हणाले, 'Play foot-ball and you will get God. फुटबॉल खेळा म्हणजे देव मिळेल.' तर दुसरीकडे ते सांगतील, 'ईश्वराचें स्मरण करीत जेव्हां वेडे व्हाल तेव्हां देव भेटेल.' मनुस्मृतींत 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' असेंहि वचन आहे. व 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' असेंहि वचन आहे. हे मा. वा. ना. जगांतील महान् विभूतींचे सारे उद्‌गार, सारें लिहिणें जर वाचूं लागतील तर त्यांना म्हणावें लागेल कीं, त्यांची लेखणी शततोंडी होती.

जीवनाचा विकास अनेक रीतींनीं होत असतो. वटवृक्षासारख्या प्रचंड वृक्षाला फांटेहि खूप फुटतात. त्यांतच त्याचें वैभव आहे. धुळ्याच्या मित्रांना हे वटवृक्षाचे फांटे आवडतात का ? त्यांनीं वटवृक्षास सांगावें 'एक फांदी

इकडे, एक फांदी तिकडे — हा काय चावटपणा, असा सहस्रतोंडीं काय होतोस ? ही अहिंसा नव्हे.' वटवृक्ष काय उत्तर देईल ? मला माहीत नाहीं. परन्तु मला खांडावयास या. 'मा. वा. ना.' गृहस्थांनीं जशी लेखणी हातीं घेतली आहे, तशी वटवृक्षास खांडावयास कुऱ्हाड घेतील का ? त्या वटवृक्षाच्या फाट्यांतून त्याचें विकासवैभव प्रकट होत असतें. एकच जिवनरस सर्व फाट्यांतून खेळत असतो.

नदी समुद्राकडे जाते. तिला जर म्हणाल, 'सरळ जा' तर ती म्हणेल मी मरतें. ती कड्यावरून उड्या घेत, कधीं रडत, कधीं हंसत, कधीं सरळ, कधीं वांकडी अशी जाते. परन्तु समुद्र तिला पास करतो; प्रेमानें हृदयाशीं धरतो. मनुष्याचें जीवन असेंच आहे. तें दिसावयास विसंगत दिसलें, वेडें-वांकडें दिसलें, तरी आंत प्रबल सरलता असते. ती समुद्रास भेटूं इच्छित असते. सर्व धडपडींतून, सर्व विसंगत उक्तींतून दिव्यतेकडे जाण्याची, ध्येयाकडे जाण्याची एक अविचल वृत्ति असते.

इथलें एक वाक्य घेऊन तिथलें एक वाक्य घेऊन सत्य हातीं लागत नसतें. आणि सारीं वाक्यें घेऊनहि सत्य हातीं लागणार नाहीं. शरिराचे सारे अवयव आणले तरी माणूस मिळणार नाहीं. ते सारे अवयव जोडून एक रक्त जेव्हां खेळूं वाहूं लागेल तेव्हां जिवंत जीव मिळतो. त्याप्रमाणें माणसांचीं येथलीं वाक्यें व तेथलीं वाक्यें घेऊनहि सत्य सांपडणार नाहीं. त्या माणसाची जी एक तळमळ असते, ती तळमळ हातीं घेऊन जेव्हां त्याचीं सारीं वाक्यें तपासूं तेव्हां त्यांत सुसंगतीचाच सूर दिसेल, वेड्यावांकड्या, चंचल, उच्छृंखल, भावनाप्रधान, नदीच्या हृदयांतील सागराला भेटण्याची एकतानता दिसून येईल.

परवां अंमळनेरला साक्षरतेचें महत्त्व मी कोठें सांगत होतों. चीनमध्यें, रशियामध्यें किसान कामगारांनीं ज्ञानाचा, साक्षरतेचा, प्रचार केला होता. आणि रशियांत तर शेतकरी कामकरी राज्य झाल्यावर सर्वांना साक्षर करण्याची प्रचंड मोहीम झाली. म्हातारे मुलांबरोबर शाळेंत जाऊं लागले. माझ्या या भाषणांत एका मित्राला विसंगति दिसली. ते म्हणाले, "सारें व्याख्यान परस्परविरोधी वचनांनीं भरलेलें होतें. रशियांत क्रान्ति झाल्यावर मग त्यांनीं सर्व साक्षर करण्याचें काम हातीं घेतलें. क्रान्तीच्या आधीं नाहीं."

माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नव्हता कीं, क्रान्तीच्या आधीं सर्व साक्षर केले. परन्तु ज्यांना क्रान्ति करावयाची असते, त्यांना लोक साक्षर करावे लागतात. जे होणार नाहींत त्यांना स्वराज्य मिळाल्यावर करूं. परंतु क्रान्तीच्या मार्गाकडे जात असतां वाटेंत लोकांना शिकवीत जावें लागतें. स्पेनमध्यें शेतकरी कामकरी कसे वर्ग चालवीत, चीनमध्यें क्रांति होण्यापूर्वी तरुण लोक चिनी शेतकऱ्यांस वाटेंतच दोन अक्षरें कशीं शिकवीत याचे इतिहास त्या मित्रास माहित असते तर त्यांस विसंगति दिसली नसती. क्रांति झाल्यावर सत्ता हातीं येते व उरलेलें काम झपाट्यानें करतां येतें. परंतु क्रांतिपथावर असतांनाहि साक्षरतेचें शस्त्र जितक्या अधिक प्रमाणांत जनतेच्या स्त्री–पुरुषांच्या हातीं देतां येईल तितकें द्यावें लागतें.

त्या मित्रास माझें भाषण विसंगतीनें भरलेलें वाटलें. परन्तु माझी दृष्टि त्याच्याजवळ असती, तर त्यांत सुसंगति दिसली असती. मी आज दुतोंडीच झालों आहें. माझा कमी विकास आहे. मला तर शततोंडी, सहस्रतोंडी व्हावयाचें आहे. दुतोंडीच लेखणी काय, ती सहस्रतोंडी व्हावी अशी मला तहान आहे.

'सुतानें स्वर्गास जातां येतें.' या माझ्या वाक्यामुळें या गृहस्थास एकदम 'मी खादीची टिंगल केली आहे.' असा अजब शोध लागला! हे दिव्य सत्यशोधक, दुसऱ्याच्या अंतरंगाचा ठाव घेणाऱ्या तुझ्या दिव्य दृष्टीस या पापात्म्याचे सहस्र प्रणाम! सुतानें स्वर्गास जातां येतें ही मराठींतलि सनातन म्हण आहे. ही म्हण कोणी वापरली कीं एकदम खादीची टिंगल होत नसते. बेटा जमाल, सत्यसंशोधन इतकें स्वस्त नाहीं रे बाबा!

कांग्रेस शुद्धिसमितीनें 'इतर गटांत असणारे लोक कांग्रेसमध्यें नकोत.' असा उघड व स्पष्ट ठराव आणला असता तर त्यांत प्रामाणिकपणा तरी दिसला असता. परन्तु जवाहिरलालांनीं याला विरोध केला. तो हेतु जेव्हां मग निवडणुकीचे नियमांत बदल, सत्याग्रह परवानगी वगैरे ठराव आले तेव्हां पुन्हां साध्य केला गेला. यालाच मी कारस्थान म्हणतों. राजकारणांत कारस्थानें लोक करतात. परन्तु तुम्ही सत्य अहिंसेचें ब्रीद पाळतां व आम्हांला त्याचे डोस पाजीत असतां. म्हणून माझ्यासारखा

म्हणतो, जेथें कारस्थान आहे, तेथें सत्याचा खून आहे. कारस्थानें करून नका घालवूं. उघड नकोत हे लोक असा ठराव करा.

बहुमत हें जेव्हां थोडें फार मिळतें घेणारें असतें, त्यांत सूड नसतो, तेव्हां तें शोभून दिसतें. शौर्य विजयानें शोभतें. बहुमत खेळीमेळीनें शोभतें. एकादा सशक्त मनुष्य अशक्ताशीं खेळीमेळीनें वागतो. त्याच्याहि थोडें कलानें घेतो, त्या वेळेस त्याच्या शक्तीचें कौतुक करावेंसें वाटतें. परंतु आपल्या शक्तीच्या ताठरपणामुळें तो जर सर्वांस थपडा मारूं लागेल तर त्याचे पोवाडे गाणारे कमी होतील. त्याच्या शक्तीचें कौतुक वाटेनासें होईल.

बहुमताचें असेंच आहे. कांग्रेसमधील बहुमत थोडें थपडा खाणारें झालें आहे. सुभाषबाबू कलकत्त्यास वर्किंग कमिटींत आमचे पांच घ्या, दोन घ्या, असें दातांच्या कण्या करीत विनवीत होते. परंतु सत्य व अहिंसा ताठरच राहिली. राष्ट्रानें ज्यास अध्यक्ष म्हणून निवडून दिलें त्यास संपूर्ण शरण येण्यास लावणें ही केवढी अहिंसा!

जहालांजवळ तुमचें न पटण्याइतकें जर ते हिंसक व असत्य असतील तर त्यांना कॉंग्रेसमधून काढून लावा. परन्तु तसेंहि स्वच्छ उघड उघड ठराव मांडून करीत नाहींत. तुरुंगांत आम्ही शिपायांस असें म्हणत असूं 'आम्हाला ठार तरी मारा.' त्यांचें उत्तर असे 'ठार तर मारायचें नाहीं. छळ तर थांबवायचा नाहीं.' यांत मजा असते. असली भेसूर मजा सत्य-अहिंसा आज अनुभवीत आहे. आणि बहुमताच्या जोरावर सारें साजून दिसत आहे. सत्य व अहिंसेचीं सारीं ब्रीदवाक्यें झळकवीत, डावपेंच लढवीत बसणें, वक्रमार्गांनीं हेतु साध्य करून घेणें मला तरी कसेंसेंच वाटतें.

या सद्‌गृहस्थांना मी त्यागमूर्ति गांधीवादी लोकांवर टीका केली म्हणून राग आला आहे. त्याग अनेक लोक करीत आहेत. गांधीवादी लोकांपेक्षां कम्युनिस्ट लोक त्यागांत कांकणभर अधिकच आहेत अशी माझी अनुभवाची गोष्ट आहे. तरीहि त्या लोकांवर गांधीवादी कशी टीका करीत असतात, जनतेचे शत्रू, आगलाव्ये वगैरे शिलकी विशेषणें देत असतात, तें या सद्‌गृहस्थांस माहीत नाहीं का? त्याबद्दल त्यांना कधीं वाईट वाटलें का?

बहुमताच्या कृतीपाठीमागील हेतु स्पष्ट करणें व जनतेस जागें करणें हेंहि एक कर्तव्यच असतें. कांग्रेसमधील कांहीं गोष्टींवर टीका केल्यानें आम्हीं शत्रू होत नाहीं. कोणी आम्हांला तसें म्हटलें तर आमचें मन आम्हांस ग्वाही आहे. आम्ही लहान असलों तरी निर्मळ आहोंत. दंवबिंदु लहान असतो. परन्तु तो निर्मळ असल्यानें सूर्याचें प्रतिबिंब आपल्या पोटांत सांठवूं शकतो. आणि एकादा तलाव मोठा असून जर गढूळ असेल तर सूर्याचें प्रतिबिंब तेथें पडणार नाहीं. सत्य अहिंसा कदाचित् एकाद्या लहान माणसाजवळहि थोडी अधिक होण्याचा संभव असतो. आणि एकाद्या मोठ्या माणसाजवळ कमी असण्याची शक्यता असते.

बिहारमधील किसानांमधील झगडणाऱ्या लोकांस राजकीय कैदी कां मानीत नाहीं ? ते का डाकू आहेत ? त्यांना का इष्टेटी वाढवावयाच्या आहेत ? राजकारण म्हणजे तरी काय ? सर्व श्रमजीवींच्या पोटाचा लढा म्हणजे राजकारण हा आज अर्थ आहे. कदाचित् १९३० सालींहि आम्हीं सत्याग्रही खरे राजकिय कैदी नसूं. कारण शेतकरी, कामकरी स्वराज्य या शब्दानें, स्वातंत्र्याचा स्वच्छ अर्थ त्यांना कळत नव्हता. आज त्यांना अर्थ कळत आहे. तहशील कमी होण्यासाठीं, जमीनदारांचे जुलूम बंद होण्यासाठीं, सावकारी पाश तुटण्यासाठीं, गिरण्यांतलि नरकसमान परिस्थिति बंद होण्यासाठीं, स्वातंत्र्याचा लढा आहे. हें त्यांना आज समजूं लागलें आहे. परंतु बिहारमधील या किसान सत्याग्रह्यांची सरदार वल्लभभाईनीं टिंगल केली. त्या सत्याग्रहांत राहुल सांस्कृत्यायनांसारखे त्रिखंडपंडित आहेत. हंस-मासिकांत राहुलजींचा परिचय आलेला आहे. ते गाढे विद्वान् आहेत व त्यागी आहेत. या कैद्यांना राजकैदी माना म्हणून ते पुन्हा पुन्हा उपवास करीत आहेत. परंतु ते राजकयि कैदी आज ठरत नाहींत. आम्हांला या गोष्टीचा राग येतो. वल्लभभाई म्हणाले तुरुंगांत तुम्हांला चैन पाहिजे. मग वाटेल तो सत्याग्रही होईल. हाल सोसून सत्याग्रही होतो. हे असले शब्द म्हणजे दुःखावर डागणी आहे. तुरुंगांत पोळी खायला मिळावी म्हणून का राहुलजींचा सत्याग्रह आहे ? हा तत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकरी कामकऱ्यांची स्थिति सुधारण्यासाठीं जो सत्याग्रह करतो त्याला डाकूच्या सदरांत घालूं नका, त्याला मिठाची भाकर द्या. परंतु त्याला राजकीय कैदी म्हणा असें

आमचें म्हणणें आहे. म्हणून मी म्हटलें "आम्हांला हिंसक ठरवतील, देशद्रोही ठरवतील." आणि तेंच तर होत आहे. भारतांतलि लेखकास राग आला. आमचें लिहिणें अनुदारपणाचें वाटलें. परंतु गांधीवादी लोकांशीं ज्यांचे मतभेद होतात, त्यांना एकदम तुच्छ मानणें, देशद्रोही म्हणणें हा अनुदारपणा नाहीं काय?

असो. लिहावें तितकें थोडेंच आहे. मला दुतोंडी म्हणा वा शततोंडी म्हणा. मला त्याची लाज नाहीं, पर्वा नाहीं. मला कां. चा शत्रू म्हणा, वा मित्र म्हणा; खादीचा शत्रु म्हणा वा मित्र म्हणा. मरतांना माझ्या ओंठावर कांग्रेस शब्द नाचेल व शेवटच्या श्वासांतून खादी खादी आवाज निघेल. जिवंतपणीं मला कांग्रेसचा शत्रू ठरवलात तरी मेल्यावर मी कांग्रेसचा मित्र ठरेन.

किसान कामगारांनो, लाखोंनीं कांग्रेसमध्यें शिरा व तिला आत्मसात् करून टाका. तुम्ही प्रांतोप्रांतीं, जिल्ह्या-जिल्ह्यांतून, तालुक्या-तालुक्यांतून जोंपर्यंत लाखोंनीं कांग्रेसमध्यें शिरणार नाहीं, तोंपर्यंत तुमची बाजू घेऊन भांडणाऱ्यांचे असेच सारे धिंडवडे काढतील. परन्तु आजचे आमच्यासारखे बहिष्कृत उद्यांचे वारसदार आहेत ही गोष्ट इतिहास जळजळीत वाणीनें सांगत आहे व तीच आमची आशा आहे.

—वर्ष २, अंक १७.

## चीनचें अंतरंग ७

कांग्रेसनें चीनला सहानुभूति दाखविण्यासाठीं शुश्रूषापथक पाठविलें आहे. त्यांतील एक डॉ. देवेश मुकर्जी हे आहेत. त्यांनीं एक पत्र पाठविलें आहे. त्याचा सारांश:—

आम्ही येनान गांवच्या जवळजवळ येत होतों. दुरून डोंगरावरचें मंदिर दिसत होतें. त्यास पगोडा म्हणतात. चीनमधील बहुतेक शहरांची ही मुख्य खूण आहे. या बुद्ध मंदिरांचे उंच कळस दुरूनच दिसत

असतात. आमचें स्वागत करण्यासाठीं लोक जमले होते. ते आमची वाट पहात होते. विमानांतून हल्ला होईल या भीतीनें जरी सर्व लोक जमले नव्हते तरी कांहीं हजार तेथें निर्भयपणें उभे होते. आम्हांला पहातांच आमचें त्यांनीं स्वागत केलें. त्यांनीं आम्हास हारतुरे दिले का? नाहीं 'साम्राज्यशाही जपानचा धिक्कार असो—जपान लष्करशाही नष्ट करा.' अशा ललकाऱ्यांनीं त्यांनीं आमचें स्वागत केलें. अधिकारी, विद्यार्थी, कामगार सर्वांचा एकच पोशाख होता. त्या जमलेल्या हजार लोकांचीं तोंडें तेजानें फुललीं होतीं. एक प्रकारचें समाधान तोंडावर चमकत होतें व तें पाहून आम्हांलाहि कृतार्थ वाटलें. हा येनान भाग चीनमधील अत्यंत दरिद्री भाग आहे. लढाईमुळें तर आणखीच कठीण दशा आली आहे. कारण जें कांहीं थोडेंफार चांगलें असेल तें आघाडीवर शिपायांसाठीं पाठवावें लागतें. अशा स्थितींतहि त्या लोकांच्या तोंडावर तें तेज कोठून बरें आलें?

कारण येथील शेतकरी आज जमिनीचा मालक झाला आहे? तो आज स्वतःसाठीं नांगरतो. कोणा जमिनदारासाठीं किंवा सावकारासाठीं नाहीं. आपलें पिकविलेलें उद्यां पळवलें जाईल अशी भीति नसते. विलासांत राहणाऱ्या चंदुलालसाठीं तो श्रमत नसतो; बाण्डगुळांसाठीं तो श्रमत नसतो. तसेंच कामगार काम करतो तो यंत्राचा वा मालकाचा गुलाम म्हणून नाहीं. कामगारच जणूं आज मालक आहेत. काम जो करणार नाहीं, त्याला खायला मिळणार नाहीं, असा समाजाचा नीतिनियम आहे. येथें सोव्हिएट समाजवादी पद्धति स्थापन झाल्यापासून ऐतखाऊ श्रीमंत जमीनदारांकडून जमिनी काढून घेण्यांत आल्या. व त्या किसानांत वाटल्या गेल्या. सारे अयोग्य कर कमी करण्यांत आले. जेवढें पिकेल त्यांतील कांहीं भाग शेतकरी सरकारला देतो. सहकारी तत्त्वाचा खूप प्रचार झाला आहे.

येथील शिक्षणहि हिंदुस्थानांतील शिक्षणापेक्षां किती निराळें! समाजाच्या पुढें उपयोगी पडेल अशा रीतीनें विद्यार्थी तयार केला जातो. बुद्धिपूर्वक वागणाऱ्या समाजाचा तो एक बुद्धिपूर्वक वागणारा घटक व्हावा अशी दृष्टि असते. भ्रामक कल्पना, रूढी, बावळटपणा, अंधविश्वास यांस फाटा दिला

जातो. ठराविक शिक्षण देण्यासाठीं येथें विद्यार्थी जमविले जात नाहींत. आम्ही 'एव्हकाई सियो' येथील मेडिकल स्कूल पहावयास गेलों होतों. त्यांत एक हजार विद्यार्थी होते. स्कूलमध्यें नांव घालतांना पूर्वी किती शिकलास, पालकाचें उत्पन्न किती वगैरे प्रश्न विचारले जात नाहींत. अगदीं अडाणी किसानकन्या वा किसानपुत्र त्या शाळेंत दाखल होतात. साक्षराइतकाच निरक्षरालाहि त्या विद्यालयांत येण्याचा हक्क आहे. त्यांना शिकविण्याची पद्धत वेगळी. निरक्षरास मुळाक्षरें शिकविण्यापासून सुरुवात होते. वैद्यकीय पुस्तकें साधारण समजूं लागतील इतकें ज्ञान त्यांना तेथें देतात. हा खर्च सरकारचा असतो. येथें फी तर नाहींच. उलट प्रत्येकास महिना ८ आणे किरकोळ खर्चास दिले जातात. विद्यार्थ्यांच्या खोल्या साध्या पण स्वच्छ होत्या. सर्व कांहीं सरकारमार्फत पुरवलें जातें. मुलामुलींचा एकच पोषाख. हें लष्करी मेडिकल विद्यालय असल्यामुळें लष्करी पोषाख होता. साधें अन्न दिवसांतून दोन वेळां दिलें जाई. आठवड्यांतून किंवा पंधरवड्यांतून एकदां मांसाहार दिला जाई. या विद्यार्थ्यांत कोणी असमाधानी असे का? एका विद्यार्थ्यानें आम्हांस सांगितलें 'आमचा देश फार गरीब आहे. येथें जें कांहीं बरें वाईट आहे तें आमचेंच आहे. तें सुधारण्याची खटपट आम्हीं करीत आहोंत. आम्ही सुखी आहोंत.' राष्ट्र, राष्ट्राचें स्वातंत्र्य, समाज, समाजाचें ध्येय, या गोष्टी त्यांच्यासमोर असतात. कितीहि त्याग किंवा कष्ट पडले तरी त्यांना त्याचें वाईट वाटत नाहीं.

विद्यार्थ्यास आठ आणे देतात. ही रक्कम कमी नका समजूं. चीनमधील अधिकारी कितीसा पगार घेतात? तेथील अध्यक्ष व सेनापति दिवसाचा फक्त २॥ रु. पगार घेतात म्हणजे महिना ७५ रु. ज्यांना थोडा पगार अधिक असतो, तेहि कम्युनिस्ट पार्टीला त्यांतून देऊन टाकतात.

स्त्री–पुरुषांचा येथें समान दर्जा, समान पोषाख, समान पगार, समान मजुरी. त्यांना समान वागणूक, समान मतदानाचा हक्क, लग्नाच्या वेळेस एकच कुण्डली पाहिली जाते. एकच नाडी पाहिली जाते. ती कोणती? वधूवरांचीं राजकीय मतें समान आहेत ना? राजकीय ध्येयें एकरूप आहेत ना? लग्न झाल्यावर हें लग्न सेवेला विघ्नरूप तर होणार नाहीं ना? एकमेकांचें काम बिघडणार नाहीं ना? ही गोष्ट पाहून लग्नें केलीं जातात! खरीं

धर्ममय, अनुरूप व सनातन धर्मीय लग्नें. लग्नाचे वेळेस मुलचिं वय कमींत कमी १८ व मुलाचें वय २० असलें पाहिजे. कोणत्याहि रजिस्टर कचेरींत उभयतांच्या संमतीनें विनामूल्य लग्न केलें जातें. पटलें नाहीं तर घटस्फोटास परवानगी पटकन मिळते. मात्र मुलांची जबाबदारी दोघांवर असते.

असो. ऑगस्ट महिन्यांत आम्हांला येऊन एक वर्ष होईल. कॉंग्रेसनें परवानगी दिली तर आणखी सहा महिने येथें रहावें असें मला वाटतें. रशियांतहि जाण्याची मला फार इच्छा आहे. पासपोर्ट मिळाला तर जाईन. कांहींहि होवो. रशियांत जाऊन यायचेंच असें निश्चित केलें आहे.

—वर्ष २, अंक २.

## कम्युनिस्ट आणि हिंसा ८

कम्युनिस्ट लोक वर्गद्वेषाचें विष पसरवितात व हिंसेचा प्रचार करतात, असा एक आरोप त्यांच्यावर करण्यांत येत असतो. पण तो खोटा आहे. हिंसेची त्यांना आवड नाहीं. हिंसा चांगली असते असें ते कधींच म्हणत नाहींत. किंबहुना या जगांत कुसल्याहि तऱ्हेची हिंसा होऊं नये हें कम्युनिझमचें साध्य आहे. एकादा रोग नाहींसा करावयाचा असल्यास रोगाचीं खरीं कारणें शोधून काढून तीं नाहींशीं करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणें हिंसेचीं खरीं कारणें शोधून काढलीं पाहिजेत. कम्युनिस्ट म्हणतो त्याच्या आजच्या भांडवलदारी समाजपद्धतींत, प्रत्येक क्षणाला भांडवलदारांकडून व जमीनदारांकडून मजुरांची व शेतावरील कुळांची पिळवणूक होत आहे, तीच हिंसेचें खरें कारण आहे. तेव्हां मजुरांची व कुळांची होणारी खरी पिळवणूक थांबविण्याचा जो मनुष्य प्रयत्न करतो तो हिंसेचा उपासक आहे असें कधींच म्हणतां यावयाचें नाहीं. परन्तु यावर असें म्हणण्यांत येतें कीं, पिळवणूक थांबवावयाची ही गोष्ट खरी; पण ती सुद्धां अहिंसक मार्गानें आणि साधनांनीं थांबवावयाची. हिंसेनें हिंसा थांबणार नाहीं. याला कम्युनिस्टांचें असें उत्तर आहे कीं, हिंसेनें हिंसा थांबणार

नाहीं या वाक्यांत जरा खोंच आहे. दोन्हीहि तऱ्हेच्या हिंसांचा दर्जा हा सारखाच समजला जातो, ही चूक आहे. कम्युनिस्ट लोकांना ज्या हिंसेचा अवलंब करावा लागतो ती हिंसा व भांडवलदारी समाजपद्धतींतील हिंसा या सारख्या नाहींत. एकादे वेळीं दोन्हीहि हिंसांचें स्वरूप किंवा वर्णन हें सारखें होऊं शकेल, पण तेवढ्यावरून दोन्हीहि हिंसांना एकाच माळेंत ओंवतां येणार नाहीं. ज्या समाजांत हिंसा होणार नाहीं असा वर्गविहीन अहिंसक समाज निर्माण करणें हें कम्युनिझमचें साध्य आहे. कम्युनिस्टांना ज्या हिंसेचा अवलंब करावा लागतो ती हिंसा हें साध्य मिळवण्याचें साधन आहे. भांडवलदारी समाजपद्धतींतील हिंसा ही त्या समाजपद्धतीचें जीवनसर्वस्व आहे. कम्युनिझमची हिंसा ही क्रांतिवादी हिंसा आहे. समाजाला व जगाला प्रगतिपथावर नेणारी हिंसा आहे. भांडवलशाही हिंसा ही जगाला मागें खेंचणारी, क्रूर अवस्थेंत नेणारी आहे. एखाद्या दरवडेखोरानें दुसऱ्या माणसावर हल्ला करून त्याला लुबाडण्याकरितां त्याच्या पोटांत सुरा खुपसला ही हिंसा आहे. आणि एखाद्या डॉक्टरनें पोटांतील रोग काढण्याकरितां पोट चिरलें तर ही सुद्धां हिंसाच होते. पण, दरवडेखोराची हिंसा व डॉक्टराची हिंसा यांत फरक आहे. संभव आहे कीं, एखादे वेळीं दरवडेखोरानें केलेली जखम जितकी लांब असेल तितकीच लांब जखम डॉ नेंहि केलेली असेल. कदाचित् दोन्ही प्रकारच्या जखमांतूनहि सारख्याच प्रमाणांत रक्त गळेल. तथापि त्या दोन्हीहि हिंसा एकाच प्रकारच्या नाहींत. डॉक्टरची हिंसा ही माणसाला उपयुक्त असते. ती त्याला निरोगी बनवते. दरवडेखोराची हिंसा ही माणसाला ठार मारते. भांडवलशाही हिंसा ही दरवडेखोरांची हिंसा आहे. कम्युनिझमची हिंसा डॉक्टरची हिंसा आहे.

राज्यसंस्थेचें अस्तित्व हेंच मुळीं हिंसेचें प्रतीक आहे. जोंपर्यंत आजची समाजपद्धति वर्गतत्त्वावर आधारलेली आहे, तोंपर्यंत ज्या ज्या वेळीं जो जो वर्ग अधिकारारूढ असेल त्या त्या वेळीं त्या त्या वर्गाच्या सरकारला आपली सत्ता टिकविण्याकरितां लष्कर ठेवणें भागच असतें. भांडवलदारांचा वर्ग अधिकारारूढ झाला; हें अधिकारपद शांततेनें त्याला मिळालें नाहीं. दुसऱ्या वर्गाला नेस्तनाबूत करून, युद्ध करून, राज्यक्रांति करून ह्या वर्गानें

सत्ता मिळविली आहे. रक्तानें मिळविलेली सत्ता रक्त सांडल्याशिवाय दुसऱ्या वर्गाचे हातांत जाणार नाहीं. जगांत ज्या राज्यक्रांत्या झाल्या त्यांत पाशवी शक्ति वापरण्यांत आलेली आहे. इतकेंच काय पण राज्यक्रांतीची, पाशवी शक्ति ही अंगभूत गोष्ट होऊन बसली आहे. राज्यक्रांति म्हणजे युद्ध असें समीकरण जरी करतां आलें नाहीं, तरी युद्धांच्या मागील सर्वसाधारण भूमिका ही राज्यक्रांतींत दिसते. अधिकारारूढ वर्गाच्या जुलमाखालीं भरडल्या जाणाऱ्या वर्गास त्याशिवाय दुसरा मार्ग नसतो. कारण त्या वर्गास, अधिकारारूढ वर्गाच्या अमदानींत, न्याय मिळेल किंवा त्याच्या हिताचे कायदे करण्यांत येतील अशी समजूत फक्त इतिहासाकडे डोळेझांक करून कल्पनासृष्टींत राहूनच करतां येईल. सारांश, वर्गतत्त्वावर आधारलेल्या समाजांत अहिंसेचा उपदेश करणें म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें दरवडेखोराच्या हिंसेला संरक्षण देऊन, तिचें समर्थन करून, डॉक्टरांच्या हिंसेचा निषेध करण्यासारखें आहे. अशा रीतीनें कम्युनिस्टांचा हिंसेविषयीं असा तात्त्विक दृष्टिकोन असला तरी हिंदुस्थानांतलि कम्युनिस्टांनीं हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्यांत एकजूट निर्माण करण्यासाठीं अहिंसेच्या धोरणास तात्पुरती कबुली दाखविली आहे.

—वर्ष २, अंक २.

## सुंदर कवितांचे गद्य अनुवाद १

### एका इटॅलियन कवीची एक सुंदर कविता

आकाशांत एवढे तारे कां बरें चमकत आहेत ? आकाशांतून इतके तारे कां तुटत आहेत ? मला माहीत आहे. आकाशांतून हे दंवबिंदू कां बरें टपटप पडत आहेत, हे अश्रुपूर कां बरें ? मला माहीत आहे.

एक चिमणी एकदां आपल्या घरट्यांत परत येत होती, परंतु त्या दुष्टांनीं तिला मारलें. ती चिमणी काट्यांत पडली. तिच्या लहानशा चोंचींत तिनें एक किडा धरून आणला होता; आपल्या पिलांसाठीं तो फराळ ती नेत

होती. परंतु अरेरे, ती आतां काट्यांत पडली आहे. आकाशाकडे दृष्टि लावून तो किडा तसाच चोंचींत धरून ती पडली आहे. तिच्या घरट्यांत तिचीं पिलें वाट पहात आहेत, चिंवचिंव करीत आहेत !

त्या चिमणीप्रमाणेंच एक मनुष्य आपल्या घरीं येत होता; परंतु वाटेंत त्याला वाटमाऱ्यांनीं मारलें. तो मरतांना म्हणाला, 'मी मला मारणारांना क्षमा करतों.' त्याच्या डोळ्यांत ईश्वराला मारलेली हांक दिसत होती व दोन अश्रुबिंदू चमकत होते. त्यानें आपल्या मुलांसाठीं दोन लहानशा बाहुल्या बरोबर आणल्या होत्या. घरीं आपले बाबा आतां परत येतील कांहीं तरी घेऊन येतील, अशी त्यांचीं मुलें वाट पहात आहेत ! वेडीं मुलें उगीच वाट पाहात आहेत. हा तर इकडे एकटा मरून पडला आहे; त्याचे प्राण गेले आहेत. हातांतील दोन बाहुल्या तशाच त्याचे हातांत धरलेल्या त्याच्या छातीवर आहेत. त्या ताऱ्यांना तो दाखवीत आहे.

हे अनंत परमेश्वरा ! हे शाश्वत ईश्वरा ! हें जगांतील क्रौर्य पाहून हें अनंत आकाश तारकारूपी अश्रूंनीं तूं भरून टाकलें आहेस. हे तुझे अनंत अश्रू वरती अनंत आकाशांत चमकत आहेत. हे पहा !

* * *

## एका इटॅलियन कवीनें केलेलें बैलाचें वर्णन

हे पवित्र बैलोबा, मला तूं फार आवडतोस. मी तुझ्यावर मनापासून प्रेम करतों. तुला पाहिलें कीं धैर्याचें, उत्साहाचें, शांतीचें चित्र माझ्या चित्ता-समोर उभें राहतें. तूं किती गंभीर आहेस ! जणूं एकादा पुतळाच ! अफाट व सुपीक शेताकडे तूं आपली शांत दृष्टि लाविली आहेस; तुझ्या मानेवर जूं ठेवलें तर शांतपणें आपली मान तूं खालीं वाकवतोस. मनुष्याचें काम लौकर व्हावें म्हणून तूं आपली सर्व शक्ति त्याच्या ठायीं खर्च करतोस, मनुष्य तुझ्यावर संतापतो, तुझ्या अंगावर वस्कन् येतो, तुला आरीनें टोंचतो, चाबकानें मारतो. परंतु बेटा, तूं तें सर्व कीं रे सहन करतोस ! त्यानें तुला टोंचलें, मारलें तर तूं आपली शांत, सोशिक दृष्टि त्याच्याकडे वळवतोस व मुकेपणाच्या बोलण्यानें त्याला सांगतोस 'नाहीं का रे मी तुझ्या ठायीं मरमर काम करीत ? नाहीं का रे कष्ट करीत ? कां बरें मला विनाकारण छळतोस ?'

काम करून विस्तृत झालेल्या तुझ्या नाकपुड्यांतून जोरजोरानें श्वासोच्छ्वास होत असतो. काळ्या ओलसर धुराचे लोटच जणूं तुझ्या त्या नाकांतून बाहेर पडत असतात! कधीं कधीं तूं डुरकतोस, तें तुझें डुरकणें शांत वेळीं किती गंभीर व मौजेचें वाटतें! हे बैलोबा! तुझ्या त्या निळसर मधुर अशा दृष्टींत, तुझ्या त्या इंद्रनील मण्यासम दृष्टींत, त्या तुझ्या विशाल दृष्टींत सर्व सृष्टीचें हरितश्यामलरूप जणूं प्रतिबिंबित आहे!

* * *

[ वाल्ट व्हिटमन हा थोर अमेरिकन कवि गेल्या शतकांत झाला. त्याच्या दोन कवितांचा अनुवाद देत आहें. ]

## १. मृत्युदेवाचें गाणें

ये, सुंदर मृत्यो ये; समाधान देणाऱ्या मृत्यो ये; हळुहळू पण गंभीरपणानें ये. आम्हांस–सर्वांस भेट. रात्रीं, दिवसां, आज ना उद्यां सर्वांस भेटावयासाठीं ये. हे कोमल मृत्युदेवा ये, ये, ये.

सर्व लोक या विश्वाची स्तुति करतात. हें विश्व अनंत आहे, अफाट आहे. शेंकडों आश्चर्यकारक गोष्टी येथें आहेत; नाना प्रकारचें ज्ञान आहे. या विश्वांत प्रेम आहे, स्नेह आहे. तरीपण या सर्वांपेक्षां तुझीच खरी स्तुति करावी अशा योग्यतेचा तूं आहेस. तूंच स्तवनीय आहेस, नमनीय आहेस; तूं रमणीय आहेस; कमनीय आहेस. मृत्युदेवा! तुझे हात सर्वांना कवटाळतात, सर्वांना आलिंगन देतात, तुझ्याजवळ भेदभाव नाहीं.

हे मृत्यो, हे कृष्णवर्ण आई–होय, तूं माझी काळी सांवळी आईच आहेस; जगाची आई आहेस. आई खेळणाऱ्या मुलास सायंकाळ झाली म्हणजे हळूच पाठीकडून येऊन उचलून घेते व निजविते व माझें बाळ दमलें म्हणते. त्याप्रमाणें हे मृत्युआई! जगाच्या मैदानावर खेळणारे जे आम्हीं, त्या आमच्या पाठीमागून तूं हळूंच पाय न वाजवतां येतेस व आम्हांला घेऊन जातेस व निजवतेस. हे मृत्युआई, आजपर्यंत जगांत मनापासून तुझें स्तोत्र कोणीच केलें नाहीं का? तुझें स्वागत–मनापासून कोणीच केलें नाहीं का? तर मग मी करतों हो तुझें गाणें, मी रचतों तुझें स्तोत्र.

सर्वांपेक्षां तूं थोर आहेस. मी तुझीं गाणीं गातों, ये. न चुकतां निःशंकपणें ये. मला तुझी भीति नाहीं वाटत. तूं तर आई—ये.

हे मृत्युमाई, तूं मुक्त करणारी आहेस. ने, आम्हांस ने. ये, मृत्युदेवा ये. तुझ्या अपरंपार उसळणाऱ्या लाटांवर हे जीव सुखानें घेऊन जा. ये, तुझीं मी आनंदानें गाणीं गातों, गुणगुणतों. हे मृत्यु आई!

* * *

## २. रणार्थ आव्हान

रणनौबदींनो तुम्ही वाजा; रणशिंगांनों कानठळ्या बसणारा आवाज काढा. सर्व घरांच्या खिडक्यांतून, दारांतून तुमचा प्रचंड ध्वनि आंत घुसूं दे. ती देवळांत कसली धर्मपरिषद चालली आहे, कसलें प्रवचन चाललें आहे? हा आवाज तेथें घुमूं दे व सभा उधळून लावूं दे. असल्या सभा भरवण्याची वेळ नाहीं आतां. आतां देशासाठीं मरणाची वेळ येऊन ठेपली आहे. ते पहा, विद्यार्थी पुस्तकें वाचण्यांत, अध्ययन करण्यांत गुंग आहेत. हा आवाज त्यांच्या कानांत शिरूं दे. ही अभ्यासाची वेळ नाहीं. देश स्वतंत्र झाल्यावर मग अभ्यास. तो पहा एक तरुण. तो म्हणतो, माझें नुकतेंच लग्न झालें आहे. कसलें आणलें आहे लग्न. देशासाठीं चल, बाहेर पड. ही वेळ सुखविलासाची नाहीं, घरांत गप्पा-विनोद करण्याची नाहीं. तो पहा शेतकरी, शेतांत नांगरीत आहे. धान्य कोठारांत सांठवीत आहे. चला, त्यालाहि ओढा. आतां सगळ्यांना एकच काम——लढाईवर चला. वाजा, रणनौबदींनो, भयंकर रीतीनें वाजा, आकाश भरून टाका; रणशिंगांनों, वाजा, फुंका.

वाजूं दे. रणनौबदा झडूं दे. रणकर्णे घुमूं दे. तुमुल नाद होऊं दे. शहरांतली देवघेव अजून बंद नाहीं का पडली? अजून गाडीवाले गाड्या हांकीत आहेत, माल विकीत आहेत! छे, गाड्या हांकण्यास माल देण्या-घेण्यास कोणी नको! चला——सर्वजण चला. गाड्यांच्या चाकांचा आवाज बंद पडूं दे. ते पहा रात्रींची निजण्याची तयारी करूं लागले! कसले रे निजतां? लाज नाहीं वाटत? तुमच्या डोळ्यांवरची झोंप उडून गेली पाहिजे. चला, गुंडाळा ते बिछाने व बाहेर पडा. ते पहा, मालाचा सौदा

करीत आहेत, किंमतीची घासाघीस करीत आहेत. ते पहा दलाल लोक; ते पहा, उद्यां कपाशीचा भाव काय होईल वगैरे अंदाज करणारे लोक. चला ओढा सर्वांना. रणांगणावर आधीं चला. काय? अजून गप्पीदास गप्पाच मारीत बसले आहेत? व्याख्यानबाजी करणारे व्याख्यानेंच झोडीत बसले आहेत? आपल्या झिरमिळयांच्या पगड्या सांवरीत हे वकील कोर्टांत जाऊन आपल्या पक्षकाराची अजून तरफदारी करण्यांत दंग आहेत? काय, हे गाणारे अजून गाण्याच्या मजलसीच भरवीत आहेत? छेः हें कांहीं नाहीं उपयोगी! वाजा, नौबदींनो वाजा; रणशिंगांनों घुमा. जितकी शक्ति असेल त्या सर्व शक्तीनें वाजा, आवाज करा, तुमचा आवाज ऐकून सर्व बाहेर आले पाहिजेत!

वाजा, रणनौबदींनो भयंकर गर्जना करा; शिंगें—कर्ण्यांनो, कानठळ्या बसवा; वाजा! अरे त्याच्याजवळ वादविवाद काय करीत बसलांत? ही काय वादविवादाची वेळ आहे? अरे त्याची कानउघाडणी करण्यांतहि वेळ दवडूं नको. बोलायला वेळ नाहीं; उदंड कामें पडलीं आहेत. चला, एकदम ओढा सर्वांना. काय रे म्हणतो तो? म्हणे मी भित्रा आहें—असशील भित्रा; चल. शूरांचीं कृत्यें पाहून तूंहि शूर होशील. हे पहा रडुबाई, डोळ्यांत पाणी आणून म्हणतो 'मला नका रे नेऊं'! नका रे नेऊं म्हणजे? चल, नीघ, तो पहा हात जोडून विनवण्या करीत आहे! ओढा त्याला; खेंचा. ते पहा वृद्ध गृहस्थ—ते त्या तरुणाला म्हणत आहेत 'नको रे आम्हांस सोडून जाऊं! नाहीं—ही वेळ त्या म्हातारबोवांच्या केवीलवाण्या प्रार्थना ऐकण्याची नाहीं. ओढा त्या तरुणाला. तें पहा लहान मूल म्हणत आहे 'माझ्या बाबांना नका नेऊं. मग मला कोण? आईला कोण? ऐकूं नका रे करुण शब्द. देव त्यांची काळजी घेईल. प्रथम देश—मग मुलेंबाळें! ओढा त्याला. ती पहा प्रेमळ माता डोळ्यांस पदर लावून म्हणत आहे, 'नका गायवांसरांची ताटातूट करूं; नका माझा प्राण नेऊं, नका माझा आधार नेऊं. लहानपणापासून याला अंगाखांद्यावर वाढवला, दूध दिलें,' रात्रंदिवस यांची खस्त खाल्ली. तें सर्व यानें मला म्हातारपणीं सोडून जावें, यानें रणांगणावर मरावें, त्याला कोल्ह्याकुत्र्यांनीं खावें—म्हणून का रे? नका रे चांडाळांनो, माझा प्राण नेऊं—' छेः ऐकूं नका या सुक्या शब्दांना. आयांचा हा मोह आहे. त्यांनीं

आपण होऊन पुत्रांना लढाईवर पाठविलें पाहिजे. ओढा त्याला. आजचा प्रसंग असा आहे कीं, सर्वांनीं घरें दारें, आप्तमित्र, बायकापोरें सोडून गेलेंच पाहिजे. रणवाद्यांनो, तुमचा नाद एवढा प्रचंड होऊं दे कीं, मेलेले खड-बडून जागे व्हावे व त्यांनीं दंड थोपटून लढाईसाठीं धांवत यावें ! होऊं दे भयंकर रणनाद ! वाजा, गर्जा, चला सारे ! देश—देश—माझा, आपला देश—चला–वंदे मातरम्.

—विद्यार्थी मासिकांतून.

## मयलोकांची आश्चर्यमय संस्कृति १०

महाभारतांतील मयासुर व त्यानें बांधलेली अद्‌भुत मयसभा यांची माहिती कोणास नाहीं ? या मयसभेंत पाण्याच्या भासानें धोतर वगैरे वर घ्यावें तेथें पाणी नसावें व जेथें पाणी नाहीं असें वाटे, तेथें नेमकें पाणी असावें व त्यांत पडून ओलेंचिंब व्हावें—अशी फजीति दुर्योधनादिकांची झाली व द्रौपदी त्यांना हांसली. पांडवांच्या या वैभवानें, द्रौपदीच्या या हास्यानें तर पुढील घनघोर संग्रामाचा पाया घतला.

हा मय कोठून आला होता ? हा मय पाताळांतून आला होता. पाताळ म्हणजे कोणता देश ?—अमेरिका देश. अमेरिकेंत आपल्याकडे उजाडलें म्हणजे सायंकाळ होते व तिकडे प्रातःकाळ झाली म्हणजे आपणांकडे सायंकाळ होते. आपल्या उलट बाजूस ते आहेत. म्हणून अमेरिकेस पाताळ म्हणत. पाताळांतील हा मयासुर होता. हल्लीं संशोधकांचें असें म्हणणें आहे कीं, फार प्राचीन काळीं अमेरिका व आशियाचा पूर्व भाग यांच्यामध्यें दळणवळण होतें. वरच्या बेहरिनच्या सामुद्रधुनींतून खालीं जा ये होत असावी किंवा पॅसिफिक महासागरांत मध्यभागीं एक प्रकारचे प्रवाह आहेत. त्या प्रवाहांच्या वेगानें अमेरिकेंत गलबतें लौकर जात-येत असावींत. मार्ग कोणताहि असो; परंतु चीन, हिंदुस्थान वगैरे देशांशीं या अमेरिकेंतील लोकांचा व्यवहार बराच असावा. तिकडचे लोक इकडे येत व इकडचे तिकडे जात. हिंदी संस्कृतीचे नमुने तिकडे आढळले आहेत.

मध्य अमेरिका या नांवानें जो प्रदेश आज ओळखला जातो, तोच मयासुराचा व त्याच्या पूर्वजांचा देश होय. याच प्रदेशांत मय लोक सुखानें नांदले, आनंदानें पिढ्यान्‌पिढ्या राज्य करते झाले, आणि जगाचे डोळे दिपवून टाकणाऱ्या आपल्या संस्कृतीचे अवशेष मागें टाकून आज हे मयांचे वंशज कोठें रानावनांत हिंडत फिरत आहेत. हे मय लोक येथें केव्हां आले, कसे आले याबद्दल नक्की माहिती कोणासच नाहीं. परंतु मयांच्या उपलब्ध पंचांगावरून खिस्त शकापूर्वीं ६ आगष्ट ६१३ या दिवशीं हे मय लोक तेथें आले असावेत असा तर्क आहे. तत्पूर्वीं ते कोठें होते? उत्तर अमेरिकें-तून ते खालीं सरकत आले असावेत. परंतु वर वेराक्रूझ, यूकाटन, हांडुरास वगैरे प्रांतांत खिस्तशकापूर्वीं सातव्या शतकांत ते स्थाईक झाले एवढें निर्विवाद तत्पूर्वीचा इतिहास सर्वज्ञ काळालाच ठाऊक!

या मध्य अमेरिकेंत खिस्तपूर्व सातव्या शतकापासून तों खिस्तोत्तर सातव्या शतकापर्यंत म्हणजे जवळ जवळ हजार दीडहजार वर्षें मयांची सारखी भरभराट-च होत गेली. परंतु यानंतर मात्र अकल्पित त्यांचा विनाशकाल आला. संस्कृ-तीच्या उच्च शिखरावर पोहोंचलेले हे मय लोक एकाएकीं आपलीं सुधारलेलीं शृंगारलेलीं घरेंदारें शहरें सोडून येथून निघून गेले! त्यांची अशी वाताहात कां झाली याचें खरें कारण समजत नाहीं. आधुनिक शास्त्रज्ञांचें असें मत आहे कीं अमेरिकेच्या या भागांत सर्वसाधारण असणारा जो पीतज्वर त्याची भयंकर सांथ आली असावी व मयांची वाताहत झाली! परंतु हा तर्कच-आहे. उरलेल्या मयांनीं आपलें साम्राज्य पूर्ववत् स्थापण्याचा व आपलें गेलेलें वैभव परत मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परन्तु विस्कटलेली घडी पूर्ववत् बसली नाहीं. तरीसुद्धां सोळाव्या शतकांत अति-लोभी बुभुक्षित स्पॅनिश पिशाच्चें येथें येईपर्यंत मयलोक स्वातंत्र्यसुख अनु-भवीत होते.

स्पॅनिशांच्या आगमनानंतरचा इतिहास अत्यंत करुणास्पद आहे. अंगावर शहारे येतात व रक्त गोठून जातें, असे अत्याचार रक्तपिपासु व द्रव्यलोभी स्पॅनिशांनीं केले! सर्वच युरोपियन वसाहतवाल्यांचा इतिहास रक्तानें लिहिलेला आहे. परन्तु त्यांत स्पॅनिशांनीं कळस केला. मयांचें वैभव गेलें व ते गुलाम झाले. स्पॅनिश लोकांनीं येथें येऊन सर्वस्वाचा नाश केला!

मयांचीं शहरें, घरेंदारें सर्व भस्मसात् केलें. ते मय लोकांना व राजाला सांगत, ही खोली सोन्याचांदीनें भरून द्या, ही दुसरी द्या, ही तिसरी द्या! मयलोकांनीं आपल्या अगणित द्रव्यानें खोल्या भरून दिल्या—मग स्पॅनिशांना आणखी हांव सुटून ते सर्वांना छळीत, भाजीत, मारीत! मयांचीं सोन्याचांदीचीं भांडीं स्पेनला गेलीं व ते अन्नाला मोताद होऊन रानावनांत हिंडूं लागले. एके काळीं वैभवाचे शिखरावर असलेले हे सुसंस्कृत लोक आज जगांतील रानटी म्हणून समजले जात आहेत. स्वतंत्र असलेले लोक पारतंत्र्यांत लोळत आहेत! सोन्याचांदीच्या ढिगावर बसणारे आज मातीच्या मडक्यांनाहि महाग झाले आहेत! हा सगळा प्रभाव कशाचा? हा प्रभाव पांढऱ्या पायांचा. जेथें जेथें हे पांढरे अवदसेचे पाय गेले तेथें तेथें एकच इतिहास आहे. पाश्चात्य लोकांच्या संस्कृतीचा हा एकमेव विशेष आहे कीं आपल्यापेक्षां संस्कृतीनें उच्च असलेल्या लोकांचा नायनाट करून त्यांची संस्कृति लयास न्यावयाची व नंतर रानटी मानून त्यांची हेटाळणी करावयाची व आम्ही त्यांस सुधारणारे, संरक्षणारे म्हणून पुन्हां मोठेपणा घ्यावयाचा. मयांचा इतिहास, अझरेकस् इंकाझ् यांचा इतिहास, इजिप्तचा इतिहास, हिंदुस्थानचा इतिहास, चीनचा इतिहास—सर्वत्र हेंच भीषण व रक्ताळ चित्र दिसतें.

मयांच्या संस्कृतीचीं अनेक अंगें होतीं. शिल्पशास्त्र, ज्योतिष, गणित, नानाकला व खेळ—सर्व बाबतींत मय लोक तत्कालीन जगाच्या कितीतरी पुढें गेले होते. आज अमेरिकेंतील लोक अत्युच्च इमारती बांधतात, परंतु मय लोक प्राचीन काळीं तीनचारशें फूट उंचीच्या इमारती किती तरी बांधीत. इमारती बांधण्याचे कामीं मयलोकांचा हातखंडा असे. भव्य व सुंदर इमारतींचे अवशेष आज मध्य अमेरिकेंत सांपडले आहेत. आज सुमारें सतरा शतकें या भिंती वारा पाऊस खात पडल्या आहेत! आज सीमेंट कॉंक्रीटचा शोध लागला व त्यामुळें इमारती बांधण्याच्या कलेंत मोठी क्रांति घडून आली असें सर्वसाधारण मानतात. परंतु मय लोकांच्या या सर्व इमारती सीमेंट कॉंक्रीटच्या आहेत. मयांना हा शोध पूर्वींच माहीत होता. दगडावर खोदीव काम करण्यांतहि ते तरबेज होते. मोठमोठ्या चुन्याविटांच्या, दगडांच्या भव्य व विशाल इमारती बांधून त्यांत आनंदमय जीवन नेणारे हे

मय आज रानावनांत वणवण करीत आहेत. मय लोक मोठमोठे राजवाडे, देवळें वगैरे बांधून आपल्या शहरांस शोभा आणीत. रस्ते ४०।५० फूट रुंद असत. रस्ते निर्मळ व सारखे असत. त्याला चढउतार नसे. इमारतीस लागणारे मोठमोठे दगड सुरुंग लावून फोडून आणीत! मय लोकांच्या इमारतींमध्यें एकच व्यंग असे. तें हें कीं, कमानी बांधण्याचें त्यांना माहीत नव्हतें. कमानीमुळें इमारती जास्त टिकतात.

वनस्पतिशास्त्रांतहि त्यांची चांगलीच प्रगति झाली होती. निरनिराळ्या प्रकारचीं धान्यें, फळें, बटाटे, तंबाखू, रताळीं, कोको, रबर इत्यादि खास अमेरिकेंतलि चिजा—ज्या आज जगभर पसरल्या आहेत त्या मयांच्या नित्य परिचयांतलि होत्या. या सर्व वस्तूंची ते लागवड करीत. कापूस जरी त्या काळीं पाश्चात्यांस माहीत नसला, तरी मय लोकांस तो माहीत होता. ते कापूस पिकवीत व त्याचीं सुंदर वस्त्रें विणीत! रानटी लोकांप्रमाणें केवळ कातडीं व झाडाच्या साली यांनीं ते शीतनिवारण करीत नसत—तर ते लोकरीचींहि वस्त्रें मोठीं सुंदर विणीत. औषधी वनस्पतींची तर त्यांस फारच माहिती होती. विषारी वनस्पति त्यांस पुष्कळ माहीत होत्या. हिंवतापावर क्विनाईन (कोयनेल) शोधून काढून जर कोणी सर्व जगावर उपकार केले असतलि तर ते या मय लोकांनींच! क्विनाईन व कोकेन या औषधांचें जनकत्व मय लोकांकडे आहे. रबराची लागवड व त्याचे निरनिराळे उपयोग जगास प्रथम मयांनींच शिकविले. शस्त्रक्रियेच्या बाबतींत ते बरेच पुढें गेले असावे. रोग बरे करण्यासाठीं शरीरच्छेदनांत ते निरनिराळ्या शस्त्रांचा उपयोग करीत. क्लोरोफॉर्मसारखा कांहीं तरी शोध त्यांना माहीत असावा. दांत किडला म्हणजे हल्लीं तो काढून टाकतात, किंवा त्याला पडलेलें भोंक अधिक स्वच्छ करून त्यामध्यें सोनें चांदी किंवा अशाच प्रकारची अन्य धातु बसवतात. ही कला मय लोकांना पूर्ण अवगत होती. सोनें चांदी ऐवजीं ते पोलाद बसवीत. आपल्या ऋग्वेदांतहि पेदु नांवाच्या लंगड्या माणसाला लोखंडी पाय बसवल्याची कथा आहे. पुढें आलेले दांत वाईट दिसतात म्हणून मयांचे शस्त्रवैद्य ते दांत कानसून काढीत व तसें करतांना कांहीं इजा होणार नाहीं अशी खबरदारी घेत. अशा प्रकारें किडक्या भागांत पोलाद असलेले दांत सांपडले आहेत.

घरांच्या व नागरांच्या स्वच्छतेबद्दल मय लोक फार काळजी घेत. आपल्याकडील दिवाळीच्या सणासारखाच त्यांचा एक सण असे. त्या दिवशीं प्रत्येक मयानें आपलें घर, घरांतील सामानसुमान, वस्त्रपात्रें, सर्व धुऊन, घांसूनपुसून, झाडून स्वच्छ केलेंच पाहिजे असे नियम असत. देवळांची तर विशेष काळजी घेतली जाई. सर्व देवळें धुऊन त्यांस सुंदर रंग देत, उत्तम चित्रें काढीत. विनोदी चित्रें काढण्यांत मय कुशल असत. घरें स्वच्छ करणें, त्यांना रंगरंगोटी देणें हीं कामें स्त्रिया करीत. त्यांना हीं कामें करण्याची मोठी हौस असे.

बायका घरेंदारें शृंगारण्यांत गुंतलेल्या असत तर पुरुषवर्ग त्या दिवसांत खेळ खेळत. हिंदुस्थानांत टेनिस गोऱ्या पायांबरोबर आला, परंतु हे गोरे लोक कोणापासून चोरते झाले ? मयांपासून. अमेरिका म्हणजे रबराचें आगर. टेनिससारख्या खेळास लागणारे चेंडू तयार करण्यास रबराची आवश्यकता. मय लोक टेनिस किंवा तत्सदृश खेळ फार आवडीनें खेळत. स्त्रिया घरकामांत मग्न असतां व इतर उत्सवप्रसंगीं व करमणुकीच्या वेळीं मयलोक हा खेळ खेळत. हा खेळ खेळण्यासाठीं त्यांनीं तयार केलेलीं क्रीडांगणें ( टेनिस कोर्टें ) आज सांपडलीं आहेत. हीं टेनिसकोर्टें अजून जशींच्या तशींच आहेत.

परंतु सर्वांमध्यें आश्चर्यकारक अशी जर कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे मयांचें पंचांग. आज रशियामध्यें पांच दिवसांचा आठवडा व सहा आठवड्यांचा महिना व बारा महिन्यांचें वर्ष असे ३६० दिवस करून उरलेले पांच दिवस राष्ट्रीय उत्सवाचे मानावयाचे असें ठरलें आहे. ही पद्धति मयांच्या राजवटींत चालू होती. फक्त फरक हा कीं, रशियन लोकांनीं पांच दिवस राष्ट्रीय उत्सवाचे ठेवले आहेत. तर मय लोकांनीं ते घरादारांची व शहराची स्वच्छता निर्माण करण्यासाठीं ठेवले होते ! मयांच्या पंचांगांत मुळींच चूक नसे. त्यांचें अगदीं जुनें पंचांग म्हणजे ६ आगष्ट ६१३ चें आज उपलब्ध आहे. या पंचांगाच्या सहाय्यानें ते मयलोक खिस्तपूर्व १४ आक्टोबर ३३७३ पर्यंतचा वाटेल, तो दिवस, तिथि, वार, नक्षत्रसुद्धां बिनचूक सांगत ! हें त्यांचें पंचांग इ. स. १५८२ पर्यंत चालू होतें. परंतु

पिशाच्चसम राक्षसी स्पॅनिश लोकांनीं इतर सर्व विध्वंसक कामगिरीबरोबर हें उत्कृष्ट पंचांगहि जाळून टाकलें.

दिवसमान हें सूर्य व इतर ग्रह यांच्या गतीवर अवलंबून असतें. यामुळें कांहीं वर्षांनीं पंचांगांत थोडी फार चूक पडते. ही चूक काढून टाकण्याकरितां लीप वर्ष, अधिक मास वगैरे युक्त्या योजाव्या लागतात; इतकें करूनहि थोडी फार चूक राहतेच. परंतु मयांचे पंचांगांत चूक नाहीं. एक दिवसाची चूक पडण्यास तीन लक्ष वर्षें लागलीं असतीं—इतकें त्याचें पंचांग शुद्ध होतें ! मय लोक वाटेल तितका मागला किंवा वाटेल तितका पुढला दिवस अगदीं बिनचूक सांगत असत. कालाच्या अनंतत्वाची कल्पना त्यांच्या हाडींमाशीं पूर्णपणें बिंबली होती. प्रत्येक दिवसाचें ५२ वर्षें होईपर्यंत नवीन वेगळें नांव असे—५२ वर्षांनीं पुन्हां तेंच नांव परत येई ! आपल्याला साहाजिकच वाटेल कीं इतकीं हजारों नांवें त्यांना सुचत तरी कशीं ? परंतु मय होतेच तसे कल्पक. त्याच नांवाचा दिवस ५२ वर्षांनीं परत येणार म्हणून वाढदिवस करणारांची मात्र निराशा होई. कारण ५२ वर्षें वाट पाहिली पाहिजे ! ज्याला ही संधि मिळेल तो भाग्यवान मानीत.

हें आश्चर्यकारक बिनचूक पंचांग तयार करण्यास त्यांना खगोल शास्त्राची फार मदत होई. आज आपणाकडे जशा वेधशाळा आहेत तशा मयांच्या मध्य अमेरिकेंतहि होत्या. परंतु मय लोक आपण सूर्य, चंद्राकडे पाहण्यापेक्षां सूर्य-चंद्रांना आपल्या योजनांकडे पहावयास लावीत. मयांजवळ दुर्बिणी नव्हत्या. उंच उंच मनोरे बांधून त्यांना लहान लहान खिडक्या मय लोक ठेवीत. सूर्य जसजसा दक्षिणेकडून उत्तरेकडे किंवा उत्तरेकडून दक्षिणेकडे जाई, तसतशी त्याच्या किरणांची दिशा व कोन बदलत. या फरकावरून मय लोक कोणता ऋतु चालू आहे हें बिनचूक सांगत.

मय लोक अत्यंत धार्मिक होते. त्यांचीं अनेक देवळें होतीं. ते अनेक देवता मानीत व त्यांची उपासना करीत. देवांच्या पूजेकरितां पुजारी असत. संन्यासी, जोगिणी यांचे संप्रदाय असत. या संन्यासी-संन्यासिनींस अगदीं व्रतस्थ राहावें लागे. पातकाबद्दल मोठी शिक्षा म्हणजे केलेलें पातक चार लोकांसमक्ष कबूल करून पुन्हां तसें पातक न करण्याबद्दल निश्चय करणें—

ही समज. मृत्युपूर्वी आपलीं पातकें धर्मगुरूजवळ कबूल करून ते मोक्षाची याचना करीत.

मयांचा परस्परांवर विश्वास असे. चोरीमारी सहसा होत नसे. अन्यायाची त्यांना चीड असे. धर्मयुद्ध व नीति यांचे नियम फार कडक असत. एवढीं मोठीं वैभवसंपन्न शहरें असत, परन्तु त्यांना तट वगैरे कांहीं नसे. कारण अधर्मानें कोणी एकदम स्वारी करणार नाहीं असें त्यांना वाटे. स्पॅनिश लोकांनीं या त्यांच्या पराकोटीस गेलेल्या सद्‌गुणांचा नीचतम रीतीनें फायदा घेतला व मयांचें साम्राज्य धुळीला मिळविलें. मय लोक विद्येचे मोठे व्यासंगी होते. निरनिराळीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं होतीं. परंतु त्यांपैकीं आज तीनच पुस्तकें उपलब्ध आहेत! बाकीचीं सर्व स्पॅनिश सैतानांनीं, पोपाच्या पापी यमदूतांनीं भस्मसात् केलीं. हीं जीं तीन पुस्तकें आहेत व मयांच्या इमारतींचे जे अवशेष आहेत व सांपडत आहेत त्यांच्या आधारें मयांच्या नितांतरम्य इतिहासाचा शोध लावण्याचें काम आज चालू झालें आहे व ज्या जंगलांतून जमिनीनें जातां येत नाहीं, त्या जंगलांची विमानांतून वरून पाहणी करीत आहेत व कोठें इमारतींचे अवशेष वगैरे दिसले कीं तेथें उतरतात! अशा प्रकारें विमानांचा उपयोग संशोधनार्थ लिंडबर्ग वगैरे करूं लागले आहेत.

मयांची संस्कृति उच्च व आदरणीय अशी होती. सर्वभक्षक काळ व सर्वविनाशक स्वार्थी व दुष्ट मानव या दोघांच्या तडाक्यांत सांपडून ती संस्कृति नामशेष झाली हें पाहून कोणाहि सहृदयाचें मन उद्विग्न होईल. मय लोकांबद्दल हिंदवासीयांना तर जास्तच आपलेपणा वाटेल. स्पॅनिशांनीं जसें मयांना नाहींसें केलें, तशीच स्थिति आपण जागे झालों नाहीं तर आपलीहि होईल.

पाश्चात्य लोक आतां मयांचा कौतुकावह इतिहास लिहूं लागले आहेत, शोधूं लागले आहेत. परंतु पिलांसकट नरमादीस ठार मारून त्याच्या उरलेल्या सुंदर घरट्यांचें कौतुक करून नक्राश्रु ढाळण्याप्रमाणेंच हें आहे! १।।कोटी मयांपैकीं आज किती हयात आहेत? त्यांची लोकसंख्या एक लाखावर जाणार नाहीं. अमेरिकेंतील रेड इंडियन, आस्ट्रेलियांतलि बुशमेन यांची संख्या जवळजवळ नाहींशी झाली आहे. या सर्वांचें कारण काय? कारण एकच

आहे—तें हें कीं पाश्चात्यांनीं केलेल्या कत्तली व कापाकापी! या पाश्चात्यांच्या आहारीं सर्व पडले. अमेरिकेंत तद्देशीयांचीं अशीं अनेक राष्ट्रें नाहींशीं झालीं. आपल्याकडे पाताळें सात होतीं अशी कल्पना आहे. कदाचित् अमेरिकेंतील हीं सात राष्ट्रें असतील. वैभवसंपन्न राजवाडे गेले, वेधशाळा गेल्या, ग्रंथ गेले, जडजवाहीर गेलें. सर्व गेलें! चक्रनेमिक्रम जर खरा असेल, तर तेच मय लोक यमसदृश पाश्चात्यांवर सत्ता गाजवतील, पुनश्च वैभवावर चढतील! परंतु आज तरी ही कालचक्राची गति पाहून 'कालाय तस्मै नमः' असें म्हटल्याशिवाय राहावत नाहीं.

—विद्यार्थी मासिकांतून.

## जगीं धन्य दोघे खरे ब्रह्मचारी ११

माघ महिन्यांत दोन थोर जगद्वंद्य पुरुषांच्या पुण्यतिथी येतात. हे दोघेहि महान् ब्रह्मचारी होते. माघ महिन्याच्या शुक्लपक्षांतील अष्टमीचे दिवशीं भगवान् भीष्म हे निजधामास गेले. म्हणून ही अष्टमी भीष्माष्टमी म्हणून प्रसिद्ध आहे. याच माघ महिन्याच्या कृष्णपक्षांत नवमीच्या दिवशीं श्रीसमर्थ रामदासस्वामी हे निजधामास गेले म्हणून ही नवमी दासनवमी या नांवानें प्रसिद्ध आहे.

महाभारतांतील अनेक महनीय विभूतींत भीष्म ही विभूति सर्वश्रेष्ठ आहे. केवढा त्यांचा स्वार्थत्याग, केवढी विरक्तता, केवढी पितृभक्ति! आपल्या पित्याचें मन धींवर कन्या सत्यवती हिच्यावर बसलें आहे हें कळतांच तो त्या कोळ्याकडे जातो. 'माझ्या मुलीच्या संततीकडे राज्यपद जावें हें कबूल करशील तर मी मुलगी देतों.' असें तो धींवर म्हणाला. भीष्मांनीं सांगितलें, 'कबूल, मला राज्याचा अभिलाष नाहीं.' परंतु तेवढ्यानेंहि समाधान न होतां तो कोळी म्हणाला, 'तूं विवाह करशील व तुझ्या मुलांकडे राज्यपद जाईल.' भीष्म म्हणाले, 'मी आमरण ब्रह्मचारी राहीन, मग

तर झालें ?' सत्यवती शंतनूस मिळाली. याच प्रतिज्ञेमुळें देवव्रत यांस भीष्म हें नांव प्राप्त झालें.

सत्यवतीस झालेला पुत्र विचित्रवीर्य हा संततिहीन मरण पावला. तेव्हां राज्यास कोणी वारस पुढें पाहिजे म्हणून सत्यवती भीष्मास विवाह करण्यास आग्रह करिते. ती म्हणते 'तूं लग्न कर व हें राज्यपद घे.' परंतु प्रतिज्ञेची पूजा करणारे भीष्म म्हणाले, 'पृथ्वी आपला गंध सोडील, पाणी आपला वाहण्याचा धर्म सोडील, ज्योति तेजाचा त्याग करील, वायु स्पर्शगुण सोडील, पराक्रमी इंद्र पराक्रमाचा त्याग करील, यमधर्म धर्म सोडून वागेल, परंतु मी माझें व्रत सोडणार नाहीं.'

मुलांनो, आज भीष्मासारखे सत्यप्रतिज्ञ व दृढनिश्चयी तरुण राष्ट्रसेवेस पाहिजे आहेत. आज स्वदेशी कपडा वापरण्याची प्रतिज्ञा करणारे, व उद्यां विदेशी परिधान करणारे, आज चहा–विडी वगैरेंचा त्याग करूं म्हणणारे, पण पुन्हां त्यांचे गुलाम होणारे असे तरुण नको आहेत. दृढ निश्चयानें राष्ट्राचीं अनेक कार्यें अंगावर घेणारे व पार पाडणारे अनेक लोक पाहिजे आहेत. भीष्मांचें ब्रह्मचर्य व भीष्मांचा दृढ निश्चय यांची जितकी महती गावी तेवढी थोडीच आहे. या ब्रह्मचर्याच्याच जोरावर भीष्म पितामह वृद्ध झाले होते, तरी अर्जुनासारख्यांस त्यांनीं त्राहि भगवान् करून सोडलें.

भीष्म हे निःस्पृह होते. परशुरामासारख्या गुरूंनीं विवाह करण्यास सांगितलें परंतु त्यांनीं गुरूंचें हें अयोग्य सांगणें मानलें नाहीं. गुरु जरी झाला तरी तो जर अयोग्य सांगत असेल तर त्याचा खुशाल परित्याग करावा. भीष्मांनीं कर्तव्य व धर्मपालन म्हणून परशुरामांजवळ लढाईसुद्धां केली. गुरुभक्तीपेक्षां सत्यभक्ति थोर आहे.

मुलांनो, प्राचीन काळांतील भीष्माचार्यांप्रमाणें सतराव्या शतकांत समर्थ रामदास स्वामी होऊन गेले. देवव्रतास जसें भीष्म नांव मिळालें तसें रामदास स्वामींस त्यांच्या कर्तबगारीमुळें 'समर्थ' हें नामाभिधान प्राप्त झालें.

लहानपणींच एका कोपऱ्यांत बसून समर्थ विश्वाची चिंता करूं लागले. आई मुलास हुडकीत आहे, परंतु मुलगा सांपडेना. शेवटीं समर्थ एका एकांतांत आढळले. 'आई, चिंता करितों विश्वाची' हें त्यांचें बाळपणींचें

उत्तर, मुलांनो, लक्षांत ठेवा. त्या वेळेस महाराष्ट्र, सर्व भारत दीन झाला होता. मुसलमान शिरजोर झाले होते. धर्म नाहींसा झाला, खावयास मिळेनासें झालें. राष्ट्राच्या तरणोपायाची चिंता समर्थांस लागली. आधीं स्वतःचा तरणोपाय प्राप्त करून घेण्यासाठीं त्यांनीं बारा वर्षे घोर तपश्चर्या केली. ब्रह्मचारी व्रतानें राहून स्वतःचें मन ताब्यांत घेतलें, ईश्वरी अनुग्रह प्राप्त करून घेतला, नंतर देशस्थिति पहाण्यासाठीं सर्व हिंदुस्थानभर प्रवास केला आणि महाराष्ट्र ही आपली कार्यभूमि ठरविली. धर्माचा, तेजस्वी विचारांचा प्रसार करण्यासाठीं हजारों मठ स्थापन केले. जेथें मुसलमानांची जास्त वस्ती तेथें समर्थांचे दोन मठ असावयाचे ! या मठांची नीट व्यवस्था लाविली. आचार-नियम लावून दिले. या मठांतून ग्रंथ–संग्रहालयें स्थापन केलीं. कांहीं कांहीं मठांतून हस्तलिखित हजार हजार ग्रंथ होते ! त्या काळांत ही केवढी कामगिरी !

राष्ट्रांत प्रथम विचारप्रसार व्हावा लागतो, मग राष्ट्र कृति करतें. Thought is more Powerful than sword. तरवारीपेक्षां विचार महत्त्वाचा आहे. फ्रेंच राज्यक्रांतीस रूसोचा सोशल कॉंट्रॅक्ट हा ग्रंथ कारणीभूत झाला. नेपोलियन म्हणतो, ‘ If there would not have been Social Contract, French Revolution would not have happened. ’ यावरून विचारप्रसारास किती महत्त्व आहे, हें मुलांनो, ध्यानांत धरा. समर्थांनीं याच विचारांचा प्रसार केला. ‘ मराठा तेवढा मेळवावा, ’ ‘ शक्तीनें मिळती राज्यें, युक्तीनें कार्य होतसे. शक्ति-युक्ति जये ठायीं, तेथें श्रीमंत धांवती ’ वगैरे ठणठणीत विचार जनतेपुढें मांडले. ‘ उत्कट भव्य तें घ्यावें, मिळमिळीत अवघेंच टाकावें ’ ‘ कांहीं एक उत्कटेंवीण, कीर्ति कदापि नाहीं जाण ’, ‘ जितका व्याप तितकें वैभव, न्यायासारखा हावभाव ’ ‘ यत्न तो देव जाणावा ’—अशा प्रकारचे धीरोदात्त विचार, कर्तव्यचालना देणारे विचार सर्वत्र पसरिले. श्रीछत्रपतींचा पराक्रम व हे विचार यांनीं देशांत स्वराज्य निर्माण केलें, महाराष्ट्र खडबडून जागा झाला. समर्थ म्हणतात, ‘ धीर धरा धीर धरा,’ समर्थ म्हणतात, ‘ हडबडूं गडबडूं नका. ’ समर्थ म्हणजे मूर्तिमंत आशावाद होते. महाराष्ट्रांत जोर व आशा त्यांनीं निर्माण केली.

समर्थांच्या नंतर याच तेजस्वी विचारांचा व ऐक्याचा, संघटनेचा प्रसार करणारे महंत झाले नाहींत. तरवारबहादूरांची या वीरप्रसू महाराष्ट्रास वाण आतांपर्यंत पडली नाहीं. पण विचार-प्रसार करणारांची वाण पडली. राजवाडे म्हणतात, 'शिंदे होळकरांच्या ढाला अटकेपर्यंत गेल्या. परंतु या जिंकलेल्या प्रदेशांत विचार-प्रसार करणारे कोण होते ? रजपुतांस, जाटांस, स्वधर्माची जाणीव देऊन ऐक्याचा संदेश सांगण्यास कोण होते ? निरनिराळ्या सरदारांत स्पर्धा पसरत असतां त्यांस ऐक्याचें महत्त्व कोण शिकवा-वयास होते ? कोणी नाहीं. उलट याची कागाळी त्याला सांगणार, ब्रह्मेंद्र मात्र झाला.' पानपतची लढाई पराक्रम नसल्यामुळें गमावली असें नाहीं. त्या लढाईत भारती वीरांप्रमाणें महाराष्ट्रीय वीरांनीं पराक्रम केला. परंतु थोर विचार, ऐक्याची भावना, संघटना, मराठा तेवढा मेळवावा वगैरे तत्त्वांचा तरवारी धरणाऱ्यांस विसर पडत चालला होता. हा विसराळूपणा, ही थोर तत्त्वशिकवणुकीबद्दलची विस्मृति आमच्या नाशास कारणभूत झाली.

मुलांनो, आज पुन्हां अशाच विचारांची राष्ट्रास जरूरी आहे. विवेकानंद, लोकमान्य टिळक, न्या. रानडे, यांनीं हेंच काम केलें. महात्मा गांधीसारख्यानीं हेंच काम आज चालविलें आहे. परंतु लक्षांत ठेवा, या थोर विचाराप्रमाणें आचार करण्यासहि तयार राहिलें पाहिजे. नाहीं तर "फुकाचें मुखीं बोलतां काय वेंचे ?" असें समर्थांनींच म्हटलें आहे. क्रियेवीण होणारी वाचाळता व्यर्थ आहे. हेंच समर्थांनीं स्वतःच्या आचारानें शिकविलें. ते खरोखरच निरिच्छ होते. त्यांना स्वतःला कांहीं मिळवावयाचें नव्हतें. परंतु राष्ट्राच्या उद्धारासाठीं त्यांनीं आटाआटी केली आणि स्वराज्य स्थापन झालेलें पाहून ते म्हणाले, "उदंड जाहलें पाणी, स्नानसंध्या करावया." त्यांना कसली आसक्ति नव्हती. रामनामाच्या आनंदांत राहावें हेंच त्यांचें ध्येय. परंतु वैयक्तिक इच्छा दूर ठेवून जनांच्या कल्याणासाठीं थोर लोकांस खटपटी कराव्या लागतात. टिळकांना ज्ञानाचा, विद्येचा, तत्त्वज्ञानाचा ध्यास होता. परंतु राजकारणाच्या धकाधकीच्या मामल्यांत त्यांस लोकांसाठीं पडावें लागलें. यावरूनहि एक गोष्ट, मुलांनो तुमच्या ध्यानांत येईल कीं, राष्ट्राच्या कल्याणा-साठीं आपल्या आवडी नावडी क्षणभर बाजूस ठेवाव्या लागतात. राष्ट्र

स्वतंत्र करावें व मग आपापल्या आवडीप्रमाणें कोणी ग्रंथ लिहावे, कोणी ग्रंथ वाचावे, कोणी स्नानसंध्या करावी, कोणी गायनवादन करावें, कोणी चित्रकार व्हावें– परंतु हें सर्व मागून. प्रथम राष्ट्र स्वतंत्र करण्याच्या मार्गास थोरामोठ्यांनीं, लहानासानांनीं लागलें पाहिजे. हाच समर्थांच्या चरित्राचा बोध आहे.

भीष्माचार्य व समर्थ यांचीं दिव्य चरित्रें विसरूं नका. म्हणजे तुमच्या उद्धाराची आशा तरी आहे.

—विद्यार्थी मासिकांतून.

## 'गोमातेची थोरवी' १२

हिंन्दूमात्रांस गायीसारखी अन्य पवित्र वस्तु काय आहे ? या भारत वर्षांत प्राचीन काळापासून गोमाता वंद्य व पवित्र मानली गेली आहे. ऋग्वेदांत निरनिराळ्या प्रार्थनांतून हे देवा ! तूं आमच्या गायी सुखरूप ठेव असें मागितलेलें आहे. ऋग्वेदांत गाय ही परमपूज्य मानली गेली आहे. ऋग्वेदाच्या आठव्या मंडळांत १०१ या सूक्तांत गोमातेचें फारच उदात्त वर्णन केलें आहे.

माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाम् अमृतस्य नाभिः ।
प्रनुवोचं चिकितुषे जनाय मा गामनागां अदितिं वधिष्ठ ॥
वचोविदं वाचमुदीरयंतीं विश्वाभिः धीर्भिः उपतिष्ठमानाम् ।
देवीं देवेभ्यः पर्येयुषीं गां आ मावृक्त मर्त्यो दभ्रचेताः ॥ १ ॥

अर्थ :—गायत्री ही रुद्र देवांची माता आहे, वसूंची कन्या आहे, ती आदित्याची बहीण आहे; अमृताचें स्थान आहे; मी विचारी माणसांस प्रार्थून सांगतों कीं, या निष्पाप गायीस कधीं मारूं नका.

वाणी जाणणारी, वाणी बोलणारी, अनेक स्तोत्रांनीं स्तविली जाणारी, देवांच्याजवळ वास करणारी अशी जी ही गोमाता तिला अल्पमति मानवानें छळूं नये.

ज्या सूक्तांत वरील सुंदर ऋचा आहेत, तें सूक्त भृगुकुलोत्पन्न जमदग्नि ऋषीचें आहे. या ऋषीनें गोमातेला जास्त पूज्यता प्राप्त करून दिली असेल.

आर्यलोकांचें प्राचीन काळांतील धन म्हणजे गाय हेंच असे. त्यांनीं गायीचें दूध प्यावें, गायींचें तूप खावें व आरोग्यसंपन्न राहावें. धर्म-कार्यांत-सुद्धां दुधाला तुपाला याचमुळें महत्त्व आलें. देवाला यज्ञांमध्यें घृताची आहुति द्यावयाची असें ठरलें.

गायीला कामधेनु हें नांव पडलें. खरोखर गाय काय देत नाहीं? ती आपलीं शेतें नांगरण्यास खोंड देते, शेतें पिकण्यास शेणाचें, मूत्राचें खत देते. गोमूत्रासारखें रोगहारक अन्य काय आहे? द्राक्षाच्या वेलींवर कीड पडली तर गोमूत्र शिंपडून त्याचा नाश होतो.

गोमूत्र हें उत्कृष्ट खत आहे. गोमूत्राची महती आपल्या पूर्वजांना माहीत होती. श्रावणीच्या वेळेस गोमूत्र प्राशन करावयाचें असतें; सुतक किंवा सोहेर जावयाच्या वेळेस गोमूत्र आणून शिंपडावें लागतें. गोमूत्रापासून अनेक तेलें वगैरे काढतां येतील असें शास्त्रज्ञ म्हणतात; गायींच्या केंसांत विद्युत् फार आहे. विशेषतः तिच्या शेंपटीच्या झुबक्यांत विद्युत तीव्रपणें वास करिते; म्हणून पुष्कळ जुन्या धर्मशील बायका सकाळीं गोमातेस वंदन करून तिच्या शेंपटीस आपल्या तोंडावर फिरवितात व स्वतःस पवित्र समजतात. गायीचें दूध अत्यंत मधुर व आरोग्यदायक आहे. तें पचण्यास सोपें व बुद्धिवर्धक आहे. बंगालमध्यें म्हशीचें दूध पिणें कसेंसेंच समजतात. तिकडे गायीचेंच दूध पिण्यांत येतें. अशी ही गाय आहे. दूध देणारी, रोग हरणारी, शेतेंभातें खतानें व बैल देऊन पुष्ट करणारी ती आहे. तिच्या-मुळेंच आर्य जगूं शकले. या कृषिप्रधान देशांत गायीवांचून आमचें कसें चालणार म्हणून गाय ही देवता झाली; गायीस पवित्रपणा प्राप्त झाला. तिच्या सर्व शरीरांत देवतांची वस्ति आहे असें मानलें गेलें.

प्राचीन काळांत राजांचें धन गोधनावरून समजून येई. विराटाजवळ साठ हजार गायी होत्या. दुर्योधनाच्या हजारों गायी ठिकठिकाणीं ठेवलेल्या होत्या. वसिष्ठाजवळची उत्कृष्ट कामधेनु घेण्यासाठीं विश्वामित्र त्याला कोट्यवधि गायी देण्यास तयार होतो, यावरून त्याच्याजवळ किती गायी असतील याची कल्पना करावी. मोठमोठ्या आचार्यांजवळ गायी असत, व शिष्यांना

गोरक्षणाचें काम करावें लागे. वसिष्ठानें दिलीप राजाला पुत्रप्राप्तिसाठीं नंदिनी या कामधेनूच्या मुलीची सेवा करण्यास सांगितलें. नंदिनीचें संरक्षण करण्यासाठीं तिच्यावर झडप घालूं पाहणाऱ्या सिंहरूपी नंदिनीस तो स्वतःचे प्राण देण्यास तयार होतो. दिलीपानें अशी गोसेवा केली व तो धन्य झाला. धौम्य ऋषीनें आपल्या उपमन्यु वगैरे शिष्यांस अशीच गोसेवा करावयास सांगावें.

गायींची थोरवी श्रीकृष्ण—चरित्रामुळें वाढली. श्रीकृष्ण हा वृंदावनांत वाढलेला 'परमेश्वर'. गोकुळामध्यें आपल्या हजारों गायींचीं खिल्लारें घेऊन कृष्ण-बळरामांनीं धीरसमीरें यमुनातीरें जावें. काळी कांबळी, व सुंदर काठी घेऊन, गळ्यांत वनमाळा घालून, ओंठांनीं पांवा वाजवून कृष्ण भगवानांनीं यमुनातटीं गायी चाराव्या. याच कृष्णाची 'बहुळा' ही आवडती गाय होती. या बहुळेचें गाणें जुन्या बायकांना येतें तें फार गोड आहे. कृष्णास जेव्हां देवत्व प्राप्त झालें, त्याची पूजा सर्वत्र होऊं लागली, तेव्हां गोमातेसहि साहजिकच महत्त्व चढलें. गोपालकृष्ण गायी चारीत व मुरली वाजवीत वृक्षातळीं उभे आहेत हें चित्र लाखों लोकांच्या हृदयास भक्तिप्रेमाचें भरतें आणतें हा आपला नित्याचा अनुभव आहे.

आर्यावर्तांत गोपूजा सुरू झाली. हिंदुमात्र गायीस देवतेप्रमाणें मानूं लागला. प्रत्येक कुटुंबांत गाय ही असावयाचीच. मोठमोठे दुष्काळ पडावे तरी गायित्रीला विकूं नये अशीं शेंकडों उदाहरणें लोकांस माहित आहेत. गाय म्हणजे कुटुंबांतलि माणसांचा जीव कीं प्राण, गाय दिसावयास किती सुंदर, दिलदार व अत्यंत निर्मळ असते. म्हसराप्रमाणें चिखलांत लोळणें, डबक्यांत डुंबणें तिला आवडत नाहीं.

तिची मानेजवळची पोळी किती छान दिसते. तेथें तिला हळुहळू खाजवावें. म्हणजे ती मान वर वर नेते व आणखी कुरवाळा असें सांगते. तिच्या अंगावरची लव किती मृदु व तजेलदार! तिचीं पाडसें किती खेळकर व तल्लख! कशीं उड्या मारतात, पाठीवर शेंपटी घेऊन नाचतात. मोठीं अचपळ असतात तीं. असें तें खोडकर वासरूं गायीस ढुश्या देतें व गायीस जास्त प्रेमाचा पान्हा फुटतो व ती त्याचें अंग चोळत राहाते. असें हें दृश्य फारच मनोहर असतें.

अशी गाय कुटुंबाची संपत्ति आहे. तिला विकलें तर अजूनहि पाप मानतात. गोदानासारखें पुण्य नाहीं. आपणांत निरनिराळ्या वेळीं गोप्रदानें देण्याची पद्धत होती. हल्लीं चार आणे दिले म्हणजे गोप्रदान होतें. परन्तु पूर्वीं खरोखरच्या गाई दिल्या जात. अजूनहि मनुष्य मरावयाचे आधीं गोप्रदान करतो. अशा रीतीनें गाय हें सर्वांत श्रेष्ठ दान, सर्वश्रेष्ठ धन आपणांकडे मानलें गेलें होतें.

मुसलमान येण्यापूर्वीं गायींची हत्या होत नसे. परन्तु मुसलमान आले व त्यांनीं हिंदूंच्या विरुद्ध तें करावयाचें असें ठराविलें. गाय मारण्याचें हें कृत्य ते आज धार्मिक समजतात. कोणत्याच प्राण्याची हिंसा परमेश्वरास आवडणार नाहीं. त्यांतून गायीसारख्या अत्यंत परोपकारक प्राण्यांसहि मारणें याहून नीचतर कोणती गोष्ट असेल ? परन्तु दुसऱ्याच्या मनास दुखविणारी गोष्ट करणें हाच ज्यांचा धर्म त्यांना काय सांगावयाचें ? मुसलमान ईद वगैरे वेळीं गायींची हत्या करूं लागले. कसायीखाने ठिकठिकाणीं स्थापन झाले, व गायींच्या माना तुटल्या जाऊं लागल्या. थोर पुण्यप्रतापी छत्रपति शिवाजी महाराजांनीं पुनरपि गोमातेच्या साठीं प्राणपर खटपट केली. ज्या यवनांनीं गोमातेची छळणा मांडली होती त्या यवनांचा त्यांनीं उच्छेद केला. महादजी शिंद्यासारख्या नरवीरांनीं दिल्लीच्या बादशहाकडून आपल्या राज्यांत गोवध बंदीची द्वाही फिरवायला लावली. मुसलमानांतहि कांहीं थोर राजे झाले, त्यांनीं गोवध त्याज्य ठरविला होता. बाबरानें आपल्या पुढील पिढीस सांगून ठेवलें " हिंदूंस खुषी ठेवावयाचें असेल व हिंदुस्थानवर राज्य करावयाचें असेल तर गोवध करूं नका."

हिंदूंस तर गाय प्राणांहून प्रिय आहे, तशीच ती सर्वांस असली पाहिजे. आपणांकडे पूर्वीं गायी पुष्कळ दूध देणाऱ्या होत्या. अकबराच्या कारकीर्दींत तीस तीस, चाळीस चाळीस शेर दुधें देणाऱ्या गायी होत्या. हल्लींसुद्धां कांहीं डेअरींतून रोज चाळीस शेर दूध देणाऱ्या गायी आहेत. परन्तु एकंदरींत पाहिलें तर गायी कमी दूध देणाऱ्या झाल्या आहेत. त्यांना भरपूर चारा वगैरे मिळत नाहीं. पूर्वींसारखीं खुलीं व मोफत गायरानें आतां नाहींत. आतां जंगल खात्यानें फारच त्रास होतो. रानमाळांत मोकळेपणानें चरतां येत नाहीं. इतर गोष्टींचीहि महर्गता होत चालली. यामुळें गायी रोड होत

चालल्या, दुर्बळ होत चालल्या. बोंडलेंभर दूध देणाऱ्या गायी दिसूं लागल्या. पुन्हां गायींची संख्याहि कमी होऊं लागली. कलकत्ता, वांद्रें वगैरे ठिकाणीं असलेल्या कसाईखान्यांनीं आजपर्यंत कोट्यवधि गायी मारल्या आहेत.

परन्तु सरकारच जर त्यांना आळा घालीत नाहीं तर होणार कसें ? उद्यां गायी सर्व नाहींशा झाल्या तर मुसलमानांनो ! तुम्ही तरी शेतीभाती कशी करणार व खाणार काय ? मूर्खपणाचा द्वेष काय कामाचा ? गायींचें संरक्षण करण्यास सर्वांनीं पुढें झालें पाहिजे. हिंदूंप्रमाणें मुसलमानांनींहि आपला घातकी मूर्खपणा सोडून गोमातेची थोरवी समजून घेतली पाहिजे. गायरानें मोफत चरायीसाठीं खुलीं ठेवलीं पाहिजेत. गायींची शास्त्रीय निपज केली पाहिजे. पूर्वीसारखीं भरगच्च गोकुळें दिसूं लागून, गायींच्या दुधातुपानें पुष्टांग अशीं हिंदबाळें दिसूं लागलीं पाहिजेत. परन्तु हें सर्व केव्हां होणार ? आम्ही कळकळीनें काम केलें तर होईल. तेंहि नच होईल तर चौंडे महाराजांनीं सुरू केलेल्या गोरक्षण कार्यास तरी हस्तें परहस्तें या कार्तिकांतील गोसप्ताहांत मदत करावी; नेहमींच करावी.

—विद्यार्थी मासिकांतून.

## जपानमधील कांहीं विशिष्ट गोष्टी १३

जपानी लोक आपल्या देशास उगवत्या सूर्याचा देश म्हणतात. त्यांचें राष्ट्रीय निशाण याच अर्थाचें द्योतक आहे. पांढऱ्या स्वच्छ पार्श्वभूमीवर उगवत्या सूर्याचें रक्तबिंब ही त्यांच्या निशाणाची खूण आहे.

जपानांत भूकंप वगैरे फार. यामुळें जपानांतील विद्वान् भूगर्भ-शास्त्राचा जास्त अभ्यास करतात. भूगर्भ-शास्त्रवेत्त्यांमध्यें तेथील शास्त्रज्ञांचीं नांवें प्रामुख्यानें असतात.

जपानांतील फूजीयामा या पर्वतास तेथील लोक फार पवित्र मानितात. हा पर्वत फार सुंदर आहे. त्याची उंची १२३६५ फूट आहे. हा एक

ज्वालामुखीच आहे. या पर्वताचीं शिखरें नेहमीं बर्फाच्छादित असतात. या पर्वताच्या यात्रेस पुष्कळ माणसें जातात. जपानी चित्रावर पुष्कळ वेळां फूजियामा पर्वताचें चित्र असतें. तिकडील बालबालिका या पर्वताच्या स्तुतिपर एक गोड गीत पुष्कळ वेळां म्हणतात. त्या गीताचा भावार्थ सांगतों :

" परमेश्वरानें हें सुंदर निष्पोत बेट निर्माण केलें. तें बेट उत्पन्न केल्यावर त्याला भूषविण्याची ईश्वरास इच्छा झाली व त्या इच्छेचें दृश्य स्वरूप म्हणजेच 'फुजिसान' पर्वत होय ! राजवाड्यांत राहणाऱ्या राजाच्याहि मनास, त्याचप्रमाणें चंद्रमौळी झोंपडींत राहणाऱ्या दरिद्री नारायणाच्याहि मनास फूजियामा सारखाच आनंद देतो."

जपानी लोकांचा मच्छिमारी हा एक महत्त्वाचा उपजीविकेचा धंदा आहे. मासे हें जपानी लोकांचें आवडतें खाद्य आहे. मच्छिमारीची एक विचित्र पद्धत आज सुमारें हजार वर्षांपासून जपानांत चालू आहे. मासे पकडण्यासाठीं जपानी लोक कोमोरेंट नांवाचा एक पक्षी पाळतात. या पक्षाच्या गळ्याभोंवतीं एक लोखंडाची कडी किंवा दोरी असते; म्हणजे त्या पक्षानें पकडलेला मासा त्याला गिळतां येऊं नये. या पक्ष्यांचा नदींतलि मासे पकडण्याच्या कामीं फार उपयोग होतो. मासे पकडण्यास जातांना या पक्षांना पेटींत ( जाळीदार ) घालून नदीवर नेतात; तेथें त्यास सोडतात. थोड्या वेळांत हा पक्षी पुष्कळ मासे पकडून आणतो. हा त्या कामांत मोठा पटाईत. पुरेसे मासे झाले म्हणजे पुन्हां त्या पक्षाला पिंजऱ्यांत घालतात. हा धंदा करणाऱ्यांजवळ असले चार पांच तरी पक्षी असावयाचेच.

जपानी लोकांत हरकसबीपणा फार. जपानांत तांदुळ होतो. अर्थात् भाताचा पेंढा पुष्कळ असतो. या पेंढ्याच्या नाना वस्तू ते करतात. वहाणा रेनकोट, टोप्या, चटया, दोर, टोपल्या इत्यादि वस्तू पेंढ्यापासून ते करतात. हे पेंढ्याचे रेनकोट ते पावसाळ्यांत वापरतात. पेंढ्यापासून केलेल्या वाहाणा फारच स्वस्त असतात. अर्धा पाऊण आणा दिला कीं नवीन वाहणांचा जोड ! यामुळें किती जोड फाटले तरी ते पर्वा करीत नाहींत. पावसाळ्यांत मात्र या वाहणा उपयोगी नाहींत. पावसाळ्यांत लाकडी वाहणा वापरतात.

जपानांतील कागदांचे कारखाने फार प्रसिद्ध आहेत. कांहीं कांहीं कागद तर इतके चिवट असतात कीं, कमावलेल्या कातड्याऐवजीं या कागदांचाच उपयोग करतात. मेण–कापड, कांचेचीं भांडीं, पंखे, रबरी व कचकड्याचीं खेळणीं, आगपेट्या, कापूर, धातूंचीं व चिनई मातीचीं सुंदर भांडीं या बाबतींत जपान अग्रेसर आहे. रेशमाचा व्यापारहि फार आहे. अलीकडे हिंदुस्थानांतून कापूस वगैरे जाऊन जपान दुसरें इंग्लंडच होऊं पहात आहे. मोत्यांचा व्यापारहि–कृत्रिम मोत्यांचा–अलीकडे सुरू झाला आहे. जपानी लोक हुषार व कष्टाळू असल्यामुळें त्यांनीं औद्योगिक क्षेत्रांत विलक्षण प्रगति घडवून आणली आहे. खेड्यापाड्यांतील घरधंदे त्यांनीं बुडविले नाहींत. जपानांत यंत्र व हात यांचें मोठें सहकार्य आहे.

जपानांत वरचेवर भूकंप होतात, यास्तव घरें दगडधोंड्याचीं बांधीत नाहींत. कारण अशीं घरें वरचेवर बांधणें कठीण आणि अंगावर घर कोसळलें तर चक्काचूर व्हावयाचा. जपानांतील घरें बांबूंचीं असतात. जपानांत बांबू मोठमोठे ७।८ इंच जाडीचे होतात. ते वजनाला हलके असतात पण भक्कम असतात. छप्परहि जपानांतील बांबूंच्या कांबट्यांचें व घरांच्या भिंतीहि या कांबट्यांच्याच. घरें वरतीं पेंढ्यानें शाकारलेलीं असतात. पत्रें व कौलें घरांवर नाहींत. ज्या भागास थंडी फार तेथें या कांबटीच्या भिंतीस आंतून गिलावा करतात. आपल्याकडे घर बांधतांनाच जितक्या खोल्या वगैरे लागतील तितक्या बांधून ठेवाव्या लागतात; परंतु जपानांत तशी जरूरी नसते. एकाद्या घरांत सकाळीं तीन खोल्या असतात तर सायंकाळीं चार होतात; चाराच्या पुन्हां दोन होतात! कळकाचें पार्टीशन घातलें कीं झाली नवीन खोली–तें काढलें कीं, मोडली खोली! पाहुणा आला तर एकदम नवीन खोली निर्माण होते.

घरांतील जमीन सुद्धां बांबू ठेचून घालून केलेली असते. जमिनीवर चटया आंथरतात व बसण्यास गाद्या व टेंकण्यास तक्के लोड असतात. घरांतील जमिनीवर आंथरलेली चटई स्वच्छ व मृदु असते. जपानी लोक टापटीप व स्वच्छता यांचे फार भोक्ते. घरांत येतांना दाराशीं जोडा काढून ठेवतात व घरांत कॅन्व्हासचा किंवा जाड कापडाचा जोडा वापरतात.

झोपतांना दिवा जळत ठेवतात. अंधारांत झोंपणें अभाग्याचें मानतात. एक कागदाचा चौकोनी डबा म्हणजेच हा दिवा. ह्यांत एका वाटींत तेल

वात घालून तेवत ठेवतात. जपानी लोकांना बागांची फार हौस. प्रत्येक घराजवळ बाग असतेच. शिवाय शहरांतून व इतरत्र मोठमोठ्या बागा असतात. कधीं कधीं शहरांपासून दूर रमणीय भागीं बागा करतात. व त्या पहावयास हजारों लोक देशी, विदेशी जातात. या बागा तयार करण्यांत जपानी लोकांची कल्पकता चांगलीच दृष्टीस पडते. या बागांतून कृत्रिम टेंकड्या करतात; त्यांच्यापासून पाण्याचा प्रवाह नदीसारखा आणतात.—या नदीला वाटेंत धबधबे करतात; नदीमध्यें बेटें करतात, पूल बांधतात! बागेंत कारंजीं असतात; चित्रविचित्र फुलें असतात. जपानांत फुलें फार. बागेंत लहानसें बुद्धाचें देऊळ व पुतळा असतो!

एकदां एक परदेशीय प्रवासी जपानी शहरांत गेला होता. तेथें त्याला कळलें कीं, येथून ३-४ मैलांवर सुंदर धबधबा आहे. तो पहाण्यासाठीं म्हणून तो निघाला. वाटेंत पाटी होती. तिच्यावर लिहिलें होतें. 'धबधब्याकडे जाणारा रस्ता'—तो गृहस्थ वाटाड्यास घेऊन गेला, वाटेंत ५।६ फूट उंचीवरून एक प्रवाह पडत होता! याला धबधबा म्हणत व त्याच्या पाऱ्या असत. जपानी लोक अशा तऱ्हेनें लहान वस्तूचीहि प्रसिद्धी करतात.

जपानांतील जेवण्याबद्दल थोडें सांगतों. जेवतांना लहान लहान गांठीवर ते बसतात व सर्वांच्या समोर सुमारें सहा इंच उंचीचें असें मोठें टेबल असतें. त्यावर छोटीं छोटीं ताटें प्रत्येकासाठीं मांडतात; घरीं पुरुष पाहुणा आला तर कुलस्त्रिया त्याच्यासमोर बसून जेवत नाहींत. परंतु पाहुण्याबरोबर त्याची पत्नीहि आली असेल तर मात्र सर्वजण एकत्र जेवण करतात.

जपानी लोकांच्या घरांत दोन देव पूजिले जातात. या दोन देवांच्या प्रतिमा घरांत असतात. एक मत्स्य देव दुसरा ओदन देव. मत्स्यदेवाचे एका हातांत मासे धरण्याचें जाळें व दुसऱ्या हातांत मासे असतात! ओदन देव तांदळाच्या राशीवर बसलेला असतो. तांदुळ व मत्स्य हेंच जपानी लोकांचें मुख्य अन्न. रोजच्या जेवणांत मासे असावयाचेच. वर्षप्रतिपदेच्या दिवशीं जपानी लोक एकमेकांस मोठमोठे मासे भेट म्हणून पाठवतात. साधारणपणें माशांशिवाय इतर मांस जपानी खात नाहींत.

जपानांत स्वयंपाक करण्यासाठीं घरोघर चुली पेटत नाहींत. घरांतून

शिधासामग्री घेऊन सार्वजनिक चुलाणावर जाऊन अन्न शिजवून आणतात. हें कमी खर्चाचें असतें.

जपानांत हॉटेलें फार. हॉटेल म्हणजे चहाचींच दुकानें; कारण मुख्य विक्री चहाची. साधारणपणें पाणी पिण्याऐवजीं चहाचाच उपयोग जपानी लोक करतात. हॉटेलांतून लहान लहान पाण्याच्या पुष्कळच टाक्या असतात व त्यांत हरतऱ्हेचे मासे पोहत असतात. गिऱ्हाइकानें यांतील पसंत पडेल तो मासा दाखवावा, कीं लगेच त्या माशाची भाजी, चटणी गिऱ्हाइकास करून मिळते. हॉटेलमध्यें मिळणाऱ्या वस्तू न विचारतां सर्व माहिती प्रवाशाला मिळते. हॉटेलमध्यें कोणी पाहुणा आला तर त्याला मालक व नोकर सामोरे जातात. त्याला चहा दशमी लगेच देतात. हा चहा घेऊन येणाऱ्या मोलकरणीस त्याला कांहींतरी चिरीमिरी द्यावी लागते, त्याबद्दल त्याला ती मोलकरीण पावती देते.

जपानी लोकांचा पोशाख मोठा विचित्र. एक सैल पायघोळ अंगरखा अंगांत घालतात. त्याच्या बाह्या तर फारच सैल असतात. वेळप्रसंगीं ह्या बाह्यांचा खिशांप्रमाणें उपयोग होतो. कामकरी लोक एक मोठी टोपी डोकीस घालतात. ही टोपी कसली ? एक आपली उथळ टोपलीच डोकीवर ठेवून देतात म्हणा ना !

आपल्याकडील स्त्रिया मुलें कडेवर घेऊन जातात; जपानी स्त्रिया पाठुंगळीस घेतात. जपानांतील मुलींचें मुख्य काम म्हणजे आपल्या धाकट्या भावंडास सांभाळणें. कोणालाहि मुलगा झाला म्हणजे तो आपल्या घरावर एका काठीला कागदी मासे बांधून ठेवतो. मूल १०० दिवसांचें झालें म्हणजे मोठा उत्सव करतात. घरांतील लहान मुलांस खाऊ, खेळणीं देतात; नंतर घरांतील सर्वांत वडील मुलीच्या स्वाधीन तें मूल करण्यांत येतें. १०० दिवसांच्या आधीं मूल घराबाहेर नेण्यास मोकळीक नसते. आपल्या कडील सूर्यदर्शन तिसरे महिन्यांत करण्यासारखेंच हें आहे.

खास मुलांचे असे दोन उत्सव जपानांत असतात. एक मुलांचा व एक मुलींचा. मुलांचा उत्सव मे महिन्याच्या पांचव्या तारखेस येतो. या सणास निशाणाचा दिवस म्हणतात. नाना रंगाचीं; नाना आकारांचीं लहान मोठीं निशाणें सर्वत्र फडकत असतात. हीं निशाणें करण्यांत मोठी कल्पकता

दाखवतात. हीं निशाणें माशांच्या वगैरे प्राण्यांचे आकाराचीं असतात. कांहीं कागदी मासे तर वीस–पंचवीस फूट मोठे असतात. त्यांचीं तोंडें उघडींच ठेवतात! यामुळें वारा सुटतांच तोंडांतून हवा आंत जाते व फुगून हे कागदी मासे खरोखरच्या माशांप्रमाणें दिसूं लागतात. निरनिराळ्या प्राण्यांचे आकार अगदीं हुबेहुब करतात. या दिवशींचा मुख्य खेळ पतंग उडवणें. पंतगांचे आकारहि चित्रविचित्र असतात. बऱ्याच पतंगांचे आकार कार्प नांवाच्या माशाच्या आकाराचे असतात. जपानी लोक कार्प माशाला पराक्रमाची देवता समजतात. आपल्या मुलानें पराक्रमी व्हावें अशी प्रत्येक जपानी पित्याची इच्छा असते. म्हणून या दिवशीं मुलांना कार्पच्या आकाराचे पतंग मुद्दाम देण्यांत येतात.

मुलींच्या उत्सवाचा दिवस मार्चच्या तिसऱ्या तारखेस येतो. या दिवसाला 'बाहुल्यांची मेजवानी' असें म्हणतात. या दिवशीं मुलीला सुंदर बाहुली देणें म्हणजे मोठा मान समजतात. या बाहुल्या फार जुन्या असतात. या घरकुलांतून मनुष्यास लागणाऱ्या सर्व सोयी लहान प्रमाणांत करून ठेवतात.

जपानांत मुलांना बरेंच लौकर शाळेंत घालतात. तीन चार वर्षांच्या मुलांमुलींस शाळेंत घालतात. मुलें लहान असल्यामुळें वाटेंत चुकतील वगैरे म्हणून पालकाचें नांव, पत्ता वगैरे ज्यावर कोरलेलें आहे असा पितळेचा बिल्ला त्यांच्या दंडांवर बांधलेला असतो. पोलीस तो बिल्ला पाहतो व मूल चुकलेलें असेल तर त्या पत्त्यावर पोंचवतो. शाळेंत जाणाऱ्या सर्व मुलांचे त्या त्या वर्गांचे पोषाख ठरलेले असतात. एकाच वर्गांत दोन निरनिराळ्या रंगाचे पोषाख केलेले मुलगे आढळणार नाहींत. तांबडा रंग तिसरी यत्तेचा, काळा चवथीचा असें ठरवून ठेवतात! जपानी लेखन-पद्धति आपल्या अगदीं उलट. जेथें आपलें पुस्तक संपतें तेथें त्यांचें पहिलें पान येतें. आपण आडव्या ओळी लिहितों, ते उभ्या लिहितात.

जपानांत रेल्वे आहेत. परंतु बराच प्रवास जिनरिक्षा गाडीनें करतात. जिन म्हणजे माणूस; रि. म्हणजे शक्ति; शा म्हणजे चाक. माणसाच्या शक्तीनें चालणारें चाक असा हा समास सोडवावयाचा. ही दुचाकी गाडी माणूसच ओढून नेतो. दरताशीं भाडें पांच सहा आणे पडतें, बहुतेक

गाड्यांतून एकच माणूस बसण्याची सोय असते. परंतु कांहींतून चोहोंचीहि सोय असते. गाडीला वर टप असतो व टपाला सुंदर रंग दिलेला असून वेल-बुट्टी काढलेली असते. साध्या पण रमणीय अशा चित्रकलेंत जपानी लोक फार प्रवीण असतात. ही गाडी ओढणाराला किकि म्हणतात. तो दुडक्या चालीनें चालतो. रस्ता चांगला असेल तर तो दिवसाला २० मैल गाडी घेऊन जातो. सार्वजनिक रिकशांना परवाना काढावा लागतो.

असो. जपानी लोक हे अत्यंत थोर देशभक्त आहेत. देश हा त्यांचा देव आहे. देशासाठीं ते स्वतःचे प्राण फुलांप्रमाणें देऊन टाकतात. या शतकाच्या आरंभीं जें रूसोजपानी युद्ध झालें त्यामध्यें तोंडांत बोटें घालण्यास लावणारीं शेंकडों कृत्यें बायकापुरुषांनीं केलीं. आपल्या एकुलत्या एक मुलास रणांगणावर जाण्यास मिळावें म्हणून एका आईनें स्वतःस मारून घेतलें. पोर्ट ऑर्थर बंदरांत मुद्दाम बोटी बुडवावयाच्या होत्या. शत्रूचें तेथील आरमार बंदर बुजवून कोंडून टाकावयाचें होतें. या बोटी बुडविण्यांस व त्यांबरोबर बुडण्यास शेंकडों तरुणांचे अर्ज आले व कांहींनीं आपल्याला आधीं पसंत केलें जावें म्हणून आपले अर्ज स्वतःच्या रक्तानें लिहिले. जपानी वीर रणांगणावर गेले म्हणजे त्यांच्या बायका देवळांतून जात व आपले केंस कापून टाकीत! जणूं आम्ही विधवा झालों असें त्या दाखवीत. पण एवढाच हेतु केंस कापण्यांत नसे, तर पुन्हां आम्ही लग्न करणार नाहीं असाहि त्या निश्चय करीत. ते कापलेले केंस पांढऱ्या कागदाच्या पट्टींत बांधून देवळाच्या गाभाऱ्याच्या दारावर टांगून ठेवीत. पुष्कळ बायकांचे असे केंस तेथें जमले म्हणजे त्यांची दोरी वळीत व ती दोरी लष्करांत व आरमारी गलबतावर पाठवून देत. या दोरींत आश्चर्य-कारक शक्ति आहे अशी त्यांची समजूत आहे. जपानी पुरुष काय, स्त्रिया काय—देशासाठीं सर्वस्वाचा त्याग करण्यास तयार असतात. जपानी लोकांची राजावर फार भक्ति. राजा मेला तर कित्येक लोक स्वतःची आत्महत्या करतात. या अशा कृत्यास 'हाराकिरी' म्हणतात. पाश्चात्य राष्ट्रें याला रानटी चाल म्हणतात.

जपानमध्यें शस्त्रास्त्रें तयार करण्याचे, लढाऊ गलबतें बांधण्याचे मोठमोठे कारखाने आहेत. कोणत्याहि बाबतींत परावलंबी राहावयाचें नाहीं असा

जपानचा बाणा आहे. जपानमध्यें क्यूरो या ठिकाणीं मोठमोठ्या गोद्या आहेत. क्यूरो येथें सर्व शस्त्रास्त्रें—टार्पेडो, तोफा, क्रुझरें सर्व होतें. जपानी लोकांनीं या सर्वांविषयीं ज्ञान करून घेतलें आहे. एक जपानी इंजिनीअर दहा वर्षें इंग्लंडांतील गोद्यांत शिकत होता व या दहा वर्षांत एकदांसुद्धां तो घरीं गेला नाहीं. हें, लढाऊ गलबतें वगैरे बांधण्याचें काम शिकून तो स्वदेशांत गेला व इतरांस तो शिकवूं लागला. याला म्हणतात ध्येयनिष्ठा. जपानांतील मजूरसुद्धां स्वदेशाबद्दल फार भक्ति धरतात. जपानी मजुरांचें पुढील वर्णन किती उदात्त आहे !

Surely no other People take such a conscientious interest in their work as the Japanese. The labourers are contented with their lot and are happy. You never see a sullen face such as is only too common among English and Continental workmen. Trade Unions are unknown, pay is small, and work is hard, but what does that matter if their Country is to benefit by their labours ? There are no private interests in Japan, at the time of national danger. All are content to work for the week. The humble coolie driving a nail into the plate of a torpedo-boat does not lose interest in the nail as soon as it is driven home; he follows each movement of the boat in the little sheets on which the war news is ditsributed, and when he sinks a battleship he goes to his friends and proudly tells them that he has contributed towards the acheivement; that is the spirit of the Japanese nation, and that is the spirit which will make them the paramount power.

**भावार्थ :**—जपानी लोकांप्रमाणें आपआपल्या कामांत मनापासून लक्ष घालणारे लोक दुसरे क्वचितच असतील. मजूर मिळेल त्यानें संतुष्ट असतात. त्यांच्या तोंडावर युरोपांतील मजुरांच्या चेहऱ्यावर असतात, तशा आंठ्या कधीं दिसणार नाहींत. पगार थोडा आणि काम पुष्कळ असें जरी असलें तरी जर आपल्या राष्ट्राचा त्यामुळें फायदा होत असेल तर सर्व कांहीं मिळालें असें त्याला वाटतें. राष्ट्रावर संकट आलें म्हणजे जपानी मनुष्याला स्वतःचें वैयक्तिक कांहींच दिसत नाहीं, सर्व राष्ट्रांचें त्याला दिसतें. टॉर्पेडो बोट तयार करतांना मजुरानें तेथें जो खिळा ठोकला तेवढ्यानेंच त्याचें काम संपत नाहीं. त्या बोटीनें काय काय केलें, लढाईंत काय पराक्रम केले हें तो वाचतो. आणि त्या टॉर्पेडो बोटीनें जर शत्रूचें गलबत वगैरे बुडवलें तर तो मजूर आपल्या मित्राकडे जातो व म्हणतो, "त्या टॉर्पेडो बोटींत मी खिळे ठोकण्यास होतों. राष्ट्राला विजय मिळाला त्यांत माझाहि भाग आहे!" जपानी लोकांची ही वृत्ति आहे. आणि तिच्यामुळें ते स्वतःचें राष्ट्र पहिल्या प्रतीचें करतील ह्यांत शंका नाहीं.

आपण बारीकसारीक कामें करूं किंवा मोठीं करूं तीं राष्ट्राच्या हितासाठीं, असें वाटणें हें आपणांस जपानपासून शिकावयाचें आहे.

—विद्यार्थी मासिकांतून.

## देशभक्ति १४

[ तत्त्वज्ञान मंदिराचे डायरेक्टर प्रो. जी. आर. मलकानी यांनीं विद्यार्थी मासिकासाठीं लिहून दिलेल्या इंग्रजी निबंधाचा अनुवाद.

स्वदेशाबद्दल प्रेम असणें याला वाईट कोण म्हणेल? आपल्या सुखदुःखाशीं निगडित असलेल्या भूमीबद्दल साहजिकच आपणांस आपलेपणा वाटतो, प्रेम वाटतें. जगांतील दुसरे भूप्रदेश जास्त सुपीक असतील, निसर्गदत्त देणग्यांनीं श्रीमंत असतील, तरी जेथें आपण लहानाचे मोठे झालों जेथें आपले वाडवडील नांदले त्याच भूमीबद्दल आपल्या मनांत भक्ति व प्रेम

असतें; तिच्याबद्दलच आपणांस उत्सुकता असते, उत्कंठा असते. आपल्या आईबापापेक्षां दुसऱ्याचे आईबाप कांहीं गुणांनीं अधिक आहेत, म्हणून आपले आईबाप आपणांस आवडत नाहींत का? दुसऱ्याच्या घरांप्रमाणें आपलें घर तितक्या सुखसोयींनीं संपन्न नाहीं म्हणून आपणांस आपलें घर कमी का प्रिय वाटतें? त्याप्रमाणेंच आपली मायभूमि दुसऱ्या देशांहून कांहीं बाबतींत कमी असली तरी आपणांस ती आवडणार नाहीं असें कधींच होणार नाहीं.

लहानपणीं आपल्या जन्मग्रामाबद्दलच कुतूहल व औत्सुक्य असतें. परंतु जसजसे आपण मोठे होतों तसतसें आपला जन्मग्राम म्हणजे एका मोठ्या प्रदेशाचा अल्प भाग आहे असें दिसतें. हा मोठा भाग म्हणजेच राष्ट्र. राष्ट्र किंवा देश याचाच आपला गांव हा एक भाग आहे असें समजून येतें. आपणां सर्वांचीं सुखदुःखें, आपल्या सोयी गैरसोयी; आपले राजकीय हक्क व गाऱ्हाणीं; आपली संस्कृति व सुधारणा या सर्व एक असतात. या समानत्वामुळें एके ठिकाणीं येणाऱ्या जनसमूहालाच राष्ट्र असें म्हणतात. आपला मोठेपणा तो सर्वांचा आहे व सर्वांचा तो आपला आहे. अशा रीतीनें राष्ट्रीय ऐक्याची भावना उद्भूत होते. आपण अतःपर इतरांपासून विभक्त व अलग न राहतां, सर्व एकाच संस्कृतीच्या जनसमूहामधील आहोंत असें समजून वागतों. सर्वांचा फायदा, सर्व राष्ट्राचें हित हीच गोष्ट डोळ्यांसमोर राहते. वैयक्तिक व खाजगी फायदे दूर राहतात. ज्यामुळें व्यक्तीचा फायदा होतो, पण राष्ट्राचा होत नाहीं ती गोष्ट अंतीं त्या व्यक्तीसहि अहितकारक होते; पण याच्या उलट राष्ट्राचा जो फायदा होतो, तो व्यक्तीचाहि होतो. कारण व्यक्ति ही राष्ट्रांतर्गतच असणार. आपणां सर्वांस हें समजतें, तरीपण आपणांस उमजत नाहीं. व्यक्तिविषयक स्वार्थांतून आपण बाहेर पडूं शकत नाहीं. आपलें स्वतःचें कोटकल्याण करून घेणें हेंच जणूं आपलें ध्येय या रीतीनें आपण वागतों. विशेषतः आपण हिंदु या देशप्रीतीच्या बाबतींत फार मागें आहोंत. आपलीं अंतःकरणें देशभक्तीच्या भावनेनें उचंबळून जात नाहींत, वेडीं होत नाहींत. याचें कारण काय बरें असावें? जरा आपण कारणमीमांसा करूं या.

प्रत्येक देशांत—स्वतंत्र देशांत—तरुणांना जें शिक्षण देण्यांत येतें तें देश-

भक्तीस पोषक असें असतें. विशेषतः देशाचा जो गतेतिहास शिकवावयाचा त्या वेळेस मुलांच्या मनांत देशभक्ति उत्पन्न होईल, देशाबद्दल अभिमान वाटेल अशा रीतीनें शिकविण्यांत येतो. बहुतकरून प्रत्येक देशाच्या सभोंवतीं दुसरे देश असतात. दुसऱ्या देशांशीं समान अशी त्यांची सरहद्द असते. देशाचा इतिहास म्हणजे या शेजारच्या राष्ट्राशीं आपल्या झालेल्या घडामोडी होत. इतिहासांत महत्त्वाचा भाग हाच असतो. बहुतेक स्वतंत्र राष्ट्रांतील शिक्षणाधिकारी हा इतिहास अशा रीतीनें मांडला जाण्याची खटपट करतात कीं त्यामुळें तरुणांच्या मनांत पूर्वजांच्या मर्दुमकीबद्दल प्रेम व अभिमान उत्पन्न होईल. ज्यानें ज्यानें देशाचा मोठेपणा वाढविला, त्याला त्याला विभूति समजण्यांत येतें व ही विभूतिपूजा सुरू होते. त्या त्या कर्तबगार पुरुषाचें नांव उच्चारतांच एक प्रकारचा आवेश उत्पन्न होतो. राष्ट्रभक्ति निर्माण करावयाची असेल तर ही राष्ट्रांतील विभूतींची जी पूजा आहे तिला शिक्षणांत महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. आपलें राष्ट्र हें वीरांचें, मर्दांचें राष्ट्र व्हावें•अशी इच्छा असेल तर विभूतिपूजा हें महत्त्वाचें साधन आहे—मनुष्य हा स्वभावतः अनुकरणशील आहे. तो दुसरा सूचना करील तदनुसार वागतो. त्याच्या समोर जो आदर्श ठेविला जाईल, जें ध्येय मांडलें जाईल, त्याप्रमाणें वागण्याची त्याला स्फूर्ति होईल हें साहजिक आहे. परंतु परदास्यांत पडलेल्या राष्ट्रास राष्ट्रीय पुरुषांची स्मृति कोण देणार ? पारतंत्र्यांत खितपत पडलेल्या राष्ट्रास आपला गतेतिहास स्फूर्तिहीन वाटतो, निस्तेज वाटतो; त्यांत हृदय हलविणारें असें कांहीं असेल ही कल्पनाच त्यांच्या मनांत येत नाहीं.

कोणतेंहि राष्ट्र सतत वैभवाच्या शिखरावर आरूढ आहे असें कधीं झालें नाहीं. चढलेलें पडलें व पडलेलें चढलें असेंच आपणांस दिसून येतें. कधीं पराजय सोसावे लागले, कधीं मुत्सद्देगिरीचें वाटोळें झालेलें दिसून आलें; कधीं शूरपणाऐवजीं भ्याडपणाचें प्रदर्शन झालें असें प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांत आहेच. प्रत्येक राष्ट्राचा इतिहास म्हणजे गुणांदुर्गुणांनीं विणलेला पट आहे. त्यांत सद्गुणांच्या सोनेरी सूत्रांची जशी मौज आहे, तशी दुर्गुणांच्या काळ्या तंतूंची पण खिन्न छटा आहे. परंतु असें असलें तरी अशाहि इतिहासापासून स्फूर्ति निर्माण करतां येते, तो इतिहास तेजस्वी दाखवितां

येतो. आपल्या देशाच्या इतिहासांतील कमीपणाचे, मानहानीचे, पराजयाचे प्रसंगहि मुलांच्या समोर देशभक्तीच्या दृष्टीनें मांडतां येतात. मोठमोठे पराजयहि तसे महत्त्वाचे नव्हते, त्यांत देशाचें विशेष नुकसान नव्हतें असें दाखवावें; मुत्सद्यांच्या झालेल्या चुका ह्यांवर विरजण घालावें—व तसें कधीं कधीं सर्वांचेंच चुकतें असें सांगावें. सारांश, कमीपणाच्या गोष्टींस कमी महत्त्व देऊन उज्ज्वल प्रसंगच उठावदार रीतीनें पुढें मांडावे. कधीं देशाचें दुर्दैव असें सांगून तर कधीं शत्रूची सद्दी जोरावर व त्यास नशीब अनुकूल असें सांगून आपला कमीपणा झांकाळून घ्यावा; शत्रु हा कपटी होता, मोठा कारस्थानी होता असें दाखवावें. सारांश, देशाच्या पराजयांतहि मोठेपणा दिसावा व शत्रूच्या जयांतहि हीनपणा दिसेल अशा तऱ्हेचें स्वरूप स्वतंत्र देशांत मुलांना इतिहास शिकवितांना इतिहासाला देतात. या सर्व गोष्टींमुळें देशाबद्दल, आपल्या थोर पूर्वजांबद्दल मुलें अभिमान बाळगण्यास शिकतात व आपल्या शत्रूचा द्वेष करण्यास शिकतात.

हिंदुस्थानच्या सभोंवतीं विशिष्ट अशी जमिनीची सरहद्द नाहीं. त्याच्या तिहीं बाजूस समुद्र पसरलेला आहे. चौथ्या बाजूस प्रचंड हिमालय पसरला आहे. हिंदुस्थानावर ज्या स्वाऱ्या झाल्या त्या फक्त वायव्य दिशेच्या खिंडींतून झाल्या. हिंदुस्थानच्या सरहद्दीचा हिंदुस्थानच्या इतिहासावर फार परिणाम झाला आहे. वायव्यसरहद्दीकडून येणाऱ्या शत्रूंनीं येथील राजे जिंकले, तेथें सिंहासनें स्थापिलीं. परंतु गंमत ही कीं बाहेरून येणारे परकीय लोक येथें स्थायिक झाले व येथील जनसागरांत मिळून गेले. हिंदु-समाजानें सर्वांना आत्मसात् करण्याचें काम इतकें पूर्ण झालें कीं या परकीय लोकांतीलच कांहीं लोकांना आम्ही विभूति मानून पुजूं लागलों. ते हिंदु-स्थानांतील रहिवाश्यांचें कल्याण पहात, देशाच्या हिताहिताशीं ते समरस होत.

दुसरी एक गोष्ट अशी कीं सर्वसाधारण हिंदुस्थानापासून ही वायव्य सरहद्द पुष्कळ दूर आहे. स्वतः हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत इतक्या जमाती व राजकीय विभाग होते कीं वायव्य सरहद्दीवरून येणारे नवीन परकी हे विशेष असे वाटलेच नाहींत. दहा राजकीय विभागांत अकरावा एक असें ते मानीत, झालें. हिंदुस्थानचा म्हणून राष्ट्रीय इतिहास असा नाहीं. प्रांतिक इतिहास आहे. पण अखिल राष्ट्रीय नाहीं. हल्लीं ब्रिटिशांचे

अमदानींत हिंदुस्थान एक-राष्ट्र दिसतें आहे; तरी तें खरें एक-राष्ट्र नाहीं. ज्या राष्ट्रानें स्वतःच्या प्रयत्नानें राष्ट्रैक्य साधिलें आहे, सर्वांनीं मिळून संकटांशीं, सामान्य शत्रूशीं टक्कर दिली आहे, त्याच राष्ट्राचें ऐक्य खरें समजावयाचें. तेंच ऐक्य. हृदयांत गेलेलें कार्य साधक समजावयाचें. बाह्य परिस्थितीमुळें सर्वच गुलामगिरींत येऊन पडलों व सर्वांवर एकाच सत्तेचें राज्य आहे यामुळें वाटणारी एकता ही खरी नाहीं. ही तात्पुरती दिखाऊ व भंगूर आहे. हिंदुस्थानचा म्हणून राष्ट्रीय असा इतिहास नाहींच म्हटलें तरी चालेल; आणि म्हणून जो इतिहास आहे तो सर्व प्रांतीयांच्या मनांत देशभक्ति, अखिल राष्ट्रभक्ति, स्फूर्ति निर्माण करूं शकणार नाहीं. भूतकाळांत एकराष्ट्र बनविण्याच्या चळवळी झाल्या नाहींत असें नाहीं; त्या चळवळींत थोर महात्मे निर्माण झाले, वीर चमकले; मुत्सद्दी गाजले. त्यांच्यापासून आपणांस स्फूर्ति मिळवितां येईल. परंतु या चळवळी एकंदर अवाढव्य इतिहासांत क्षुद्र वाटतात. अनंत आकाशांत एकादा जलधर मेघ कोठें असावा, एकादी वीज कोठें चमकावी तसेंच हें आहे. यामुळें हिंदुस्थानचा इतिहास शिकवितांना देशभक्ति उत्पन्न करण्याचा जो हेतु तो, तो विषय शिकविणारांच्या मनांत येत नाहीं; कारण त्यांत त्यास कांहीं वाटत नाहीं.

तरुणांच्या मनांत देशभक्ति उत्पन्न न होण्याचें तिसरें कारण म्हणजे लष्करी शिक्षणाचा अभाव. प्रत्येक स्वतंत्र राष्ट्रांतील तरुणांस असें वाटतें कीं मी माझ्या राष्ट्रासाठीं वेळ आली तर लढेन, मरेन. राष्ट्रासाठीं सर्व तरुण मरण्यास, लढण्यास तयार होतील अशी अपेक्षा स्वतंत्र राष्ट्रांतील तरुणांबद्दल केली जाते. परन्तु आम्हांस तशी संधि कोठें आहे? आमच्या देशावर स्वारी आली तर इंग्रज बहाद्दर रक्षण करण्यास तयार आहे. त्यांनीं आम्हांस शस्त्रास्त्रांस पारखे, नामर्द व षंढ बनाविलें आहे. ज्या राष्ट्रासाठीं आपण लढूं शकत नाहीं, ज्या आपल्या देशासाठीं आपण मरूं शकत नाहीं, त्याबद्दल आपणांस प्रेमहि तितकें वाटत नाहीं. ज्या वस्तूवर आपण प्रेम करितों, तदर्थ स्वार्थत्याग करण्याची संधि सदोदित यावी अशी आपण आशा करितों. आणि जर अशी संधि न लाधली तर तें त्या वस्तूवरील प्रेमहि कमी होतें. ज्या प्रमाणांत देशार्थ मरण्याची संधि कमी, त्या मानानें देशभक्ति व

देशप्रीति पण कमी असते; जी कांहीं असते तीहि परिणामहीन व काल्पनिक असते, तिच्यांत जोर व तेज नसतें.

अशी ही हिंदी तरुणांची स्थिति आहे. उज्ज्वल ध्येय, साहस याच्या कल्पनाच त्यांच्या मनांत येत नाहींत; ज्याच्यासाठीं आपण जगूं, ज्याच्यासाठीं मरूं असें त्यास दिव्य व उत्कट कांहीं दिसत नाहीं. त्याची दृष्टि फार संकुचित होते. स्वतःच्या देशासाठीं कांहीं करावें हें त्याच्या मनांत येत नाहीं. परिस्थितीच्या बागुलबुवानें तो कायमचा पछाडला गेलेला असतो. पोटाला कसें मिळवावें, जीवित सुरळीत कसें चालेल हेंच सारखें त्याच्या मनांत रात्रंदिवस असतें. स्वतःच्या पोटापलीकडे त्याला कांहीं दिसत नाहीं. आपल्या देशाची सेवा करावी हे विचार त्याच्यापासून फार दूर असतात. त्याचें ध्येय मर्यादित असतें. स्वतःच्या वैयक्तिक गरजांपलीकडे तो पहातच नाहीं. मोठमोठ्या गोष्टी करण्यास लागणारें शारीरिक, मानसिक व नैतिक बल याचा त्याच्या ठायीं अभाव दिसून येतो. असें म्हणतात कीं— इंग्लडच्या ऑक्सफर्ड, केंब्रिजसारख्या विद्यापीठांतून बाहेर पडणारा तरुण आपणांस जगांतील कोणत्याहि गोष्टींत लायक समजतो, कोणतीहि गोष्ट आपणांस अशक्य आहे, हें त्याच्या मनांतहि येत नाहीं. लाथ मारीन तेथें पाणी काढीन ही त्याच्यांत धमक असते व ही आपली धमक जगानें ओळखावी, मान्य करावी अशी त्याची इच्छा असते; त्याच्या डोळ्यांसमोर मोठमोठ्या कल्पना, मोठमोठीं ध्येयें असतात; आत्मविश्वास त्याच्या रोमरोमांत भरलेला असतो. परंतु आमचे तरुण अल्पसंतोषी आहेत. त्यांच्या दृष्टीसमोर उत्कट, भव्य, मोठें असें कांहीं नसतें. गवतांत सरपटणारे ते किडेच आहेत. महिन्याचीं दोन्ही टोकें कशीं मिळवितां येतील हीच विवंचना सध्यांचें शिक्षण तरुणांस लावीत असतें. आपणांस राष्ट्रासाठीं लढण्याची संधि पण नाहीं, आणि अशी संधि आली तरी आपण तयार नाहीं. हिंदी तरुणांची सर्व दृष्टीच अशी खिन्न, निराश दिसते. अशा तरुणांची देशभक्ति काय किंमतीची असणार हें उघडच आहे. केव्हां तरी आपल्या देशास सुस्थिति येईल, बरे दिवस येतील हें स्वप्न मनांत घोळविणें एवढेंच फक्त त्यांचें काम. शिक्षणाचा हेतु पुरुषार्थ साधणारे पुरुष निर्माण करणें हा आहे. Education makes the man परंतु

सामाजिक किंवा राजकीय कार्यक्षेत्रांत धडाडीनें, उज्वल ध्येयानें आमचे तरुण पडतील असें सध्यांचे शिक्षणांत कांहीं एक नांहीं, तें शिक्षण नसून राष्ट्र मारणारें विष आहे.

सध्यांचें जें राजकारण त्याचाहि तरुण विद्यार्थ्यांस संपर्क न होऊं देण्याबद्दल खबरदारी घेण्यांत येते. विद्यार्थ्यांनीं ठरींव पुस्तकें वाचावीं, ठरलेल्या परीक्षा द्याव्या आणि देशांत काय चाललें आहे ह्याबद्दल त्यांनीं लक्ष देऊं नये, आपला अभ्यास बरा कीं आपण बरे असें त्यांनीं करावें असें कांहीं सरकारी अधिकाऱ्यांकडून व सरकारच्या कच्छपीं लागलेल्या स्वार्थी लोकांकडून सांगण्यांत येतें. मोठा साळसूदपणाचा आव आणून बेटे वरील उपदेश करतात. खरोखरच विद्यार्थ्यांच्या हितासाठीं जर हा उपदेश असेल तर तो चांगला म्हटलाच पाहिजे. परंतु तारुण्याच्या उदार भावना; उष्ण रक्त ज्याच्यामध्यें आहे, अशा तरुणाचें शिक्षण चार रद्दी क्रमिक पुस्तकें वाचल्यानें पूर्ण झालें असें मानणें म्हणजे मूर्खपणा आहे. ज्या राष्ट्राचा तो एक घटक आहे, अशा राष्ट्राचें हिताहित, यशापयश ज्या सद्यःकालीन गोष्टींवर अवलंबून आहे, ज्या गोष्टींवर त्याचा सर्व भविष्यकाळ अवलंबून आहे, त्या गोष्टींचा त्यास स्पर्श होऊं न देणें याहून मूर्खतर व आत्मघातकीपणाची कोणती गोष्ट आहे ?

निःस्वार्थ सेवा जर कोणी करूं म्हणेल, जर कोणीं करणें शक्य असेल तर तो तरुण होय. राष्ट्रासाठीं पवित्र व निर्मळ भावना त्याच्या मनांत असतात; मोठमोठ्या गोष्टींबद्दल, उज्ज्वल ध्येयाबद्दल तो पूज्यबुद्धि बाळगतो, स्वार्थत्याग करण्यास सन्मुख असतो. अशा तरुणाच्या मनांत देशाबद्दल, थोर गोष्टींबद्दल प्रेम उत्पन्न करणें व त्या प्रेमार्थ सर्वस्व देण्यास त्यास शिकविणें, तयार करणें, हाच शिक्षणाचा खरा हेतु होय; हेंच कार्य होय. सर्व देशांतील स्वातंत्र्य चळवळींचा परिणाम प्रथम तरुणांच्या निर्मळ मनावर झाला; त्यांनींच त्या चळवळींचा पुढाकार घेतला. चीन, ईजिप्त वगैरे देशांत तरुणांनींच चळवळी चालविल्या आहेत. हिंदुस्थानांतलि तरुणच या गोष्टीस अपवाद कसे होतील ? त्यांनींहि राजकीय, सामाजिक चळवळींत लक्ष घातलें पाहिजे.

सध्यांचे शिक्षणांत मुलांस त्यांच्या भावनांस पोषक असें शिक्षण मिळत

नाहीं. ज्या ज्या वेळीं राष्ट्रीय चळवळी निघतात, त्या त्या वेळेस तरुणांचीं मनें संस्फूर्त होतात व त्या चळवळींत ते जातात. शाळांमधून जें शिक्षण देण्यांत येतें त्या शिक्षणांतच राष्ट्रोद्दीपक भाग असेल, राष्ट्रप्रेमाला पोषक परिस्थिति निर्माण करण्यांत येईल तरच अलीकडे निरनिराळ्या शाळा-कॉलेजांतून चालक-विद्यार्थी यांमध्यें होणारे तंटे-बखेडे शमतील, तरुणांच्या तरुण वृत्ति मारून त्यांस कोंडून ठेवूं पाहणें याहून घोरतर पातक कोणतें आहे; परंतु ज्या राष्ट्राला स्वातंत्र्य नाहीं तें राष्ट्र आपल्या शिक्षणांत मुलांच्या देशभक्तीस वाव देऊं शकणार नाहीं; कारण सरकार तो अंकुर मारावयासच पाहणार !

अशी सर्व बाजूंनीं हलाखीची व निराशेची जरी स्थिति आहे; तरीहि आपल्या देशासाठीं थोडें फार आपणांस करितां येईल. इच्छा असेल तर मार्ग हा सांपडतोच. जर हिंदुस्थानासाठीं, आपल्या प्रिय भारतभूमीबद्दल तुमच्या मनांत खरें जिव्हाळ्याचें प्रेम असेल तर तुम्हांस खरोखर कांहीं तरी करतां येईल. आपणांस मोठमोठ्या गोष्टी करतां येणार नाहींत. आणि आपण सर्वच मोठे होण्यासाठीं जन्मलेलों नाहीं. तरी लहान गोष्टींचेहि मोठे परिणाम होतात. प्रत्येकानें थोडथोडें केलें तरी काम उठेल. जें राष्ट्र आर्थिक बाबतींत स्वावलंबी आहे; जें दुसऱ्याच्या तोंडाकडे हरघडी लागणाऱ्या वस्तूंसाठीं पहात नाहीं, तें राष्ट्र सुखी व संतुष्ट असतें. याचा अर्थ हा कीं आपल्या जीवनाच्या रोजच्या आवश्यक गरजा त्या आपणच सर्व भागवल्या पाहिजेत. आपणांस लागणाऱ्या वस्तू आपण उत्पन्न केल्या पाहिजेत. ज्या वस्तू आपणांस उत्पन्न करतां येत नाहींत, त्यांची जरूरच आपण निर्माण करूं नये. आपल्या देशांतिल निरनिराळे पदार्थ उत्पन्न करणारे कारागीर, मजूर यांस आपण आधीं आश्रय दिला पाहिजे. मोडकें तोडकें असलें तरी तें माझें आहे, तें मला प्रिय आहे. मँचेस्टरचा मलमलीचा सदरा व तनु दर्शविणारें धोतर जर माझ्या देशांत होत नाहीं तर मी घेणार नाहीं; माझ्या देशांतील जाडी पासोडी हीच मला प्राणांहून प्रिय आहे. कैलासांत राहणारे भगवान् शंकर यांनीं विष्णूचा पीतांबर परिधान केला नाहीं, तर त्याच देशांत हिमालयांत होणारे कपडे परिधान केले. कोणते हे कपडे ? व्याघ्रचर्म. श्री शंकरांनीं कोणतीं भूषणें

परिधान केलीं तर सर्प. कैलासाहून तो भगवान् पशुपति सर्व हिंदुस्थानास सांगत आहे : 'माझ्याजवळ असणारे सापहि मला प्रिय आहेत, परंतु परकीयांचे माणिक मोत्यांचे हार नकोत. सर्पाच्या विळख्यापेक्षां परकीयांच्या दास्याचा, परावलंबनाचा विळखा नको.' पण भगवान् शंकराचा हा कृतिमय उपदेश कोण ऐकतो ? आपल्याच देशांत झालेलें आपण प्रथम घेतलें पाहिजे. आपणां सर्वांनाच शेतांत, कारखान्यांत कामें करणें शक्य नाहीं. परंतु जे काम करतात त्यांना उत्तेजन देणें, ते जें निर्माण करतात तें खपविणें हें आपलें काम नाहीं का ? सरकारी नोकरी, वकिली, डॉक्टरी, शिक्षकी हे कांहीं उत्पादक धंदे नाहींत. म्हणून नोकरी हें ध्येय ठेवणें फारसें स्तुत्य व स्पृहणीय नाहीं. वरील सर्व लोक मजुरांच्या, शेतकऱ्यांच्या श्रमावर जगतात. जे शारीरिक श्रम व कष्ट करून प्रामाणिकपणें जगण्याचा प्रयत्न करतात, त्यांना उत्तेजन देणें, मदत करणें हें आपलें कर्तव्य आहे.

हिंदुस्थान स्वतःच्या लेंकरास धान्य देण्यास समर्थ आहे. लागणारा कपडा मात्र आज हिंदुस्थान सर्व निर्माण करूं शकत नाहीं. हें कापड आज इंग्लडमधून येत आहे. परंतु ही जरूरी आपण मनांत आणलें तर सहज भागवूं शकूं. हिंदुस्थानांतलि गिरण्या व हातमाग यांनीं सहकार्य केलें तर हें काम होण्यासारखें आहे; परंतु सहकार्याशिवाय हें शक्य नाहीं. आपल्या देशांतील हातमाग सुरू झाले पाहिजेत; व या कारागिरांना उत्तेजन देणें हें श्रीमंतांचें व सुशिक्षितांचें आद्य कर्तव्य आहे. इंग्लंड, अमेरिका वगैरे देशांतहि खेड्यांतून सूत विणण्याचे व कापड करण्याचे हातमाग अजून आहेत. हें कापड महाग पडतें. परंतु इंग्लंडमधील गिरणीवाले, कारखानदार हें हातमागावरचें महाग कापड विकत घेऊन खेड्यांतील बायाबापड्यांचा हा Cottage Industry मारूं देत नाहींत. याची आमच्या सुशिक्षितांस व श्रीमंतांस लाज वाटली पाहिजे. जो जो कांहीं हस्तकौशल्यानें जगण्याचा प्रयत्न करतो त्या त्या माणसास आपण आधीं सहाय्य करण्यास, त्याचा माल विकत घेण्यास तयार राहिलें पाहिजे. आपल्या शेजाऱ्याचें कल्याण आधीं चिंतिलें पाहिजे. आपल्या जवळील कारागिरांना, मजुरांना व उत्पादकांना सहाय्य करणें म्हणजे पर्यायेंकरून देशाचीच सेवा करणें होय. या प्रकारें देशाची आर्थिक परिस्थिति आपण

हरप्रयत्नानें सुधारूं शकूं, आणि परावलंबनाला परागंदा करूं. परंतु खरी तळमळ व इच्छा असेल तर ना!

दुसरी गोष्ट तरुणांनीं लक्षांत ठेवावी. आपण गरीब असूं, आपण शरीरानें दुर्बळ असूं; तरी आपण आपलें राष्ट्रशील उत्कृष्ट राहील अशी खबरदारी घेतली पाहिजे. आपलें चारित्र्य निष्कलंक ठेवणें हें आपणां सर्वांस शक्य आहे. स्वाभिमानी व उदार होण्यास आपणांस कोण अडवूं शकेल? जर आपण स्वतःस किंमत दिली तर जगहि आपणांस किंमत देईल. तुम्ही स्वाभिमानी व्हा. म्हणजे जगहि तुम्हांस मान देईल. आपली इभ्रत, आपला स्वाभिमान राखण्यास शिकणें हीच स्वराज्याची पहिली पायरी आहे. खरा विजय, खरा मोठेपणा हा चारित्र्यावर आहे. तेंच राष्ट्र खरोखर मोठें आहे, ज्या देशांत नेकीचे, उदार, मानधन लोक पुष्कळ आहेत. हिंदुस्थानावर तुमचें खरें प्रेम असेल तर हिंदुस्थानास शोभेल असें वर्तन ठेवा. आपल्या वर्तनानें हिंदुस्थानची सर्वत्र नाचक्की होऊं देऊं नका. तुमचें शील उदात्त असेल तर देशविघातक कोणतीहि गोष्ट करण्यास मोहानें तुम्ही तयार होणार नाहीं. कपटपटु लोक तुमच्या समोर पैशाच्या राशी ओततील, सन्मानदर्शक पदव्या देतील, पण तुम्ही खरें नाणें असाल, चारित्र्यवान असाल तर ते पैसे व पदव्या यांवर लाथ माराल. तुम्ही कसे वागतां व कसे आहांत, तुम्ही काय करतां, यावरच खरी देशभक्ति अवलंबून आहे, तुमच्या अधिकारावर व श्रीमंतीवर नाहीं तर आपलें चारित्र्य निर्दोष असेल तरच आपल्या आयुष्याचा नीट हिशेब आपणांस देतां येईल, कांहीं केलें असें दाखवतां येईल. उत्कृष्ट शील संपादन करा म्हणजेच देशाची तुम्ही खरी सेवा केली असें होईल, मगच तुम्ही भारताचे सत्पुत्र शोभाल व सत्पुत्राची जननी भरतभूमि जगांत मिरवत राहील.

—विद्यार्थी मासिकांतून.

# बालदिन १९

‘ मूल म्हणजे जिवंत काव्य ’ —अमेरिकन कवि लॉंगफेलो.

आज हजारों ठिकाणीं बालदिन साजरा होईल. संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशीं बालदिन पाळण्याची पद्धत सुरू आहे. तिळगूळ घ्या, गोड बोला, असें सांगितल्यावर दुसऱ्या दिवशीं सर्व संसाराला गोडी देणारीं जीं मुलें त्यांची पूजा करावयाची. जगांत जर खरोखरीच सुख यावयास हवें असेल, तर उद्यांची जी पिढी, ती पिढी तनानें व मनानें सुंदर व निर्मळ होईल याची काळजी घेतली पाहिजे.

हसणारें खेळणारें मूल म्हणजे केवढा आनंद. आईला मूल म्हणजे कल्प वृक्षाचें फूल वाटतें. बायकांच्या ओव्यांत मुलाचें वर्णन करतां करतां बायकांची प्रतिभा किती उंच जाते तें पहावें. मातींत खेळून मूल आलें तर आईला ती माती पवित्र वाटते. ती म्हणतेः—

> माती का लागली माती ना तो रे बुका ।
> चुंबीन तुझ्या मुखा तान्हेबाळा ॥
> माती का लागली माती ना ती कस्तुरी ।
> सोन्याच्या शरीरीं तान्हेबाळाच्या ॥

असें हें मूल, आईबापांचें सर्वस्व. कामधाम करावें, दमून भागून जावें; परन्तु मुलांचीं हंसरीं मुखें पाहून सारें विसरावें. तें मूल कांहीं करीत नाहीं, नुसतें हंसतें. परन्तु हंसण्यानें श्रमपरिहार होतो. अकिंचिदपि कुर्वाणो सुखं दुःखान्यपोहति. प्रिय वस्तू कांहीं न करतांहि सहज दुःख दूर करते. लहान मूल म्हणजे संसारांतील मधुरता व कोमलता. अजून मानवजातीस मी विटलों नाहीं, असा देवाचा संदेश घेऊन तीं संसारांत येतात. फुलांप्रमाणें ताजीं, सुगंधी, घवघवीत व गोड. परन्तु या मुलांची काय दशा होत असते?

आज आपण मुलांच्या मिरवणुका काढून चांगल्या बाळसेदार मुलांना, घाटदार मुलांना बक्षिसें देऊं. मुलांचें महत्त्व वर्णूं. आई-बापांनीं मुलांची काळजी घ्यावी म्हणून सांगूं. मुलांना एक दिवस खाऊ वाटूं. मुलांचें

महत्त्व वर्णिणारीं ब्रीदवाक्यें मिरवूं. सारें करूं. परंतु एवढ्यानें, खरोखर एवढ्यानें हा प्रश्न सुटेल काय?

लाखों आई-बापांना आपल्या मुलांची काळजी घेतां येत नाहीं. त्यांच्या जवळ ज्ञानाचा अभाव असतो व द्रव्याचा अभाव असतो लाखों आई-बापांना मुलांची काळजी कशी घ्यावी हें माहीत नसतें. मुलांना मारहाण होते. त्यांची आबाळ होते. आई-बाप अडाणी. मुलांना कोठून ज्ञान मिळणार? मी येथील मिलमधील कामगारबंधूंच्या मुलाच्या बारशास गेलों. त्या घरांत अंधार. लहानसें घर? त्या बाळाला कोठून मिळणार चांगलें घर? त्याच्या गरीब आई-बापांनीं काय करावें? प्रेमाचा प्रकाश फार तर देतील. देतील कोठलीं पुस्तकें, कोठलीं खेळणीं, कोठला आराम? लहान मुलांची समाजांत काळजी घेतली जावी असें वाटत असेल तर समाजरचना बदलली पाहिजे.

ज्या समाजांत सारे आईबाप सुशिक्षित असतील, ज्या समाजांत सर्वांना पोटभर खायला, अंगभर ल्यायला, रहावयाला स्वच्छ लहानसें का होईना पण सोयीस्कर घर असेल, असा समाज आपण निर्मिला पाहिजे. आसन्न-प्रसवा मातांस श्रम करावे लागणार नाहींत, त्यांना कारखान्यांत रजा मिळेल, बाहेर भत्ता मिळेल असें केलें पाहिजे. शास्त्रीय प्रसूतिमोचनाचें ज्ञान असणाऱ्या प्रेमळ दाया ठायीं ठायीं सेवेस वाहिलेल्या पाहिजेत. आईबाप कामावर गेल्यावर जेथें सर्व मुलांची काळजी घेतली जाईल अशीं बाल-संगोपनगृहें सर्वत्र पाहिजेत. तेथें खेळ, फुलें, बुद्धीचा, शरीराचा व हृदयाचा विकास करणाऱ्या नाना वस्तू असतील, तेथें मुलांत मिसळतील, खेळतील असे सहृदय शिक्षक हवेत. हें सारें कधीं होणार? समाजरचना बदलेल तेव्हां.

मुलांच्या शरीराची काळजी घेतली पाहिजे, मनाची घेतली पाहिजे. सारे समान, सारे सुखी होऊं दे. सारीं देवाचीं लेंकरें, अमुक एक जात, अमुक एक धर्म, वाईटच असें नका त्याला शिकवूं. गारुडी मुलाच्या शरीराला नाना वळणें लावून त्याच्या घड्या घालतो त्याप्रमाणें आपणहि मुलांच्या मनांस संकुचित विचारांत अडकवतां. ही हत्या आहे. मी कोंकणांत नुकताच गेलों होतों. लहानपणच्या एका मित्राच्या घरीं गेलों. त्या मित्राच्या लहान

मुलाला ड्राइंगचा नाद. बाप कौतुकानें मुलास म्हणाला, 'यांना दाखव रे कांहीं काढून.' त्या लहान निष्पाप बाळानें सूर्य काढला, चंद्र काढला. बाप पाहून म्हणाला, 'हा मुसलमानांचा चंद्र कशाला रे गाढवा?' त्या मुलाला काय माहीत कीं चंद्र मुसलमानांचा असतो. 'चांदोबा चांदोबा भागलास कां' असें म्हणत तो नाचतो. मी दुःखी झालों व त्या मित्राला म्हणालों, 'अरे, आपल्या बायका सडा घातल्यावर रांगोळीनें चंद्रसूर्य काढतात. चंद्रसूर्य स्वर्गांत नसून माझ्या अंगणांत आहेत. स्वर्ग माझ्या घरीं आणीन, आनन्द मिळवीन.' मित्र हंसला.

आई–बापांनो, लहान मुलांचें महत्त्व वाटत असेल तर त्यांना प्रेम शिकवा. या हिंदुस्थानांतील सर्व धर्मांच्या व सर्व जातींच्या मायबापांनीं आपल्या मुलास माणुसकी शिकवावी. मुलांचीं मनें द्वेष, मत्सरानें भरूं नयेत असें हात जोडून सांगणें आहे. ती सर्वांत मोठी बालसेवा होईल.

आपल्या देशांत स्वावलंबन कमी. मुलांना निर्भयता व स्वावलंबन यांचे धडे दिले पाहिजेत. त्रिचनापल्ली जेलमध्यें असतांना तेथील आयरिश सुपरिंटेंडेंट एक दिवस म्हणाला, "युरोपांत मुलांना निर्भयतेचें शिक्षण मिळतें. लहान मुलें एकटीं बाहेर जातील." परन्तु आपल्याकडे म्हणतील, "एकटा जाऊं नकोस; चुकशील; अंधार आहे गाडी घोडे येतील. मुलांना असें पंगू नका बनवूं. तसेंच त्याच्या गोष्टि त्याला स्वतः करूं दे. त्याला श्रमाची महतीहि पटवा. जो श्रमतो, राबतो तो माणूस. बाकी शेणगोळे. हा सिद्धांत त्याच्या मनावर बिंबवा. बालदिन साजरा करणें म्हणजे सर्व मुलांची जेथें काळजी घेणें शक्य होईल असा समाज निर्मिण्याची जबाबदारी अंगावर घेणें. त्यांचीं मनें प्रेमळ, स्वाभिमानी व निर्भय बनविणें. त्यांच्यामध्यें ज्ञानाची जिज्ञासा वाढविणें, व शरीरश्रमाची आवड उत्पन्न करणें. शरीरानें, बुद्धीनें व हृदयानें त्यांना वाढविणें शिक्षक व आईबाप यांचेवर ही जबाबदारी आहे. सुंदर क्रीडांगणें, सुंदर फुलबागा ठायीं ठायीं असाव्यात. मुलांना फुलाशेजारीं वाढवावें, म्हणजे फुलाप्रमाणें रसमय, पवित्र, निर्मळ, सुंगंधी त्यांचीं जीवनें होतील.

—वर्ष २, अंक ४०.

## राष्ट्राची मुंज होऊं दे १९

उपनयन म्हणजे गुरूजवळ नेणें. ज्ञानाजवळ नेणें. वास्तविक मूल जन्माला येतें तेव्हांपासून त्याचें ज्ञानग्रहण सुरू होतें. तरीपण आपण हा एक संस्कार करतों. हा संस्कार झाल्यावर द्विज म्हणतात. द्विज म्हणजे पुन्हां जन्मलेल्या पक्षालाहि द्विज म्हणतात. पक्ष्याला अंड्याची कवची फोडून अनंत आकाशांत उडण्याची प्रबळ इच्छा असते. ती कवची फोडून तो पक्षी उडतो. मुंज म्हणजे काय ? गुलामगिरीची कवची फोडून ज्ञानसूर्याला मिठी मारायला जाणें. गुलामगिरींत ज्ञान नाहीं. ना विज्ञान ना अध्यात्मिक ज्ञान. आपणांजवळ कोणतेंच ज्ञान नाहीं. भांडत बसलों आहोंत. हिंदुस्थानांतील सारे एक हें आध्यात्मज्ञान अंगीं नाहीं व नेटका प्रपंच करण्याचें शास्त्रीय ज्ञान नाहीं. दोन्ही डोळे फुटले आहेत.

ज्ञान ही कोणास मिरास असतां कामा नये. ज्ञान सर्वांना हवें, ज्याप्रमाणें भाकर सर्वांना हवी. परन्तु आपण सर्वांस ज्ञान दिलें नाहीं, तें सांचवून कोंडून ठेवलें, म्हणून तें मेलें. अतःपर इच्छा करूं या कीं सर्वांना ज्ञान मिळेल.

पारतंत्र्यांत सर्वांना ज्ञान मिळत नाहीं. ज्ञान आज फार महाग आहे. शाळेंत श्रीमंत व गरीब दोघांना सारखीच फी. श्रीमंताला गरीबांइतकीच फी देण्यांत कमीपणा वाटला पाहिजे. पूर्वी आश्रमांतून जो तो आपापल्या ऐपतीप्रमाणें मदत देई. मोठमोठे आश्रम असत. तेथें राजे लोक, श्रीमंत लोक देणग्या देत. परन्तु पैसे देत म्हणून आपलें मत लादीत नसत. कण्वऋषींच्या आश्रमांत शिरतांना दुष्यन्त म्हणतो,

‘ आश्रमांत नम्रपणें मी प्रवेश केला पाहिजे. ’

विक्रमोर्वशीय नाटकांत राजाचा मुलगा नीट वागत नाहीं म्हणून कुलपति त्याला हांकून देतो. असें स्वातंत्र्य शिक्षणसंस्थांत हवें. आज तें कोठें आहे ?

शिक्षणसंस्थांतील गुरूजवळ भेदाभेद नकोत; हिंदु–मुसलमान, ब्राह्मण

ब्राह्मणेतर भेद नकोत; गुरु व शिष्य भेदातीत हवेत. गुरूनें शिष्याला सर्व प्रश्न समजावून दिले पाहिजेत. त्याला तयार करून जगाच्या समुद्रांत निर्भयपणें लोटलें पाहिजे.

मुंज एकाद्या मोठ्या दिवाणखान्यांत व्हावी तेथें जगांतील सर्व शास्त्रांतील महर्षींच्या तसबिरी असाव्यात. तेथें त्या बाळाला नेऊन म्हणावें, ' बाळ या ज्ञानाचा तूं वारसदार. हें घे, यांत भर घाल व या थोरांच्या खांद्यावर उभा राहून तूं आणखी दूरचें पहा.

आज शेंकडा ९० लोक अडाणी आहेत. ज्याला जो गुणधर्म देवानें दिला, त्याचा आज विकास होत नाहीं. याला पारतंत्र्य कारण आहे. राष्ट्राची मुंज व्हावयास हवी असेल तर लोकमान्यांप्रमाणें हें पारतंत्र्य दूर करण्यास सर्वांनीं उठलें पाहिजे.

नम्रतेशिवाय ज्ञान मिळत नाहीं. हातीं दंड घेऊन ब्रह्मचारी ज्ञानार्थ निघतो. हा दंड दुसऱ्याच्या डोक्यांत घालण्यासाठीं नसून स्वतःच्या कामक्रोधांचें दंडण करण्यासाठीं आहे. हातांतील दंड अंतर्दृष्ट करा. हृदयांतील घाण दूर करा. भारताला मुक्त करणारें, थोर करणारें ज्ञान मिळवा. द्वेषाचें ज्ञान नको आहे; द्वेष भरपूर आहे. जा बटो, निर्मळ होऊन, तेजस्वी होऊन देशाला सुखी करणारे विचार आपलेसे करून घे व ते कृतींत आण. या बटूला सूर्याचे, अग्नीचे स्वाधीन करायचें असें मंत्रांत म्हटलें आहे. अग्नि व सूर्य यांचेजवळ मालिन्य नाहीं, प्रखर तेज आहे. भूमीवरील अग्नि व सूर्य कोणते ? " तं धीरासः कवयः उन्नयंति. " त्या बटूला धीरवान् थोर माणसें उन्नतीप्रत नेतील. अधीर व उल्लू अशा गुरूजवळ कोठला विकास ? हाणा, मारा, ठोका सांगणाऱ्या गुरूजवळ कोठलें खरें माणुसकीचें संसाराला सुंदर करणारें ज्ञान ?

—वर्ष २, अंक ४६.

# चीनमधील क्रान्ति; हुतात्मा हॅन १७

दहा वर्षांपूर्वीची ती गोष्ट. तें एक लहानसें गांव होतें. जमीनदारांचें तेथें प्रस्थ होतें. लालसेना या गांवीं येणार असें कळतांच कित्येक किसानांचा जमिनदारानें शिरच्छेद केला. जमिनदाराचें किल्लेवजा प्रचंड घर होतें. गांवाला जमिनदाराच्या वंशाचें नांव होतें. शेतकऱ्यांचा छळ करावा, त्यांना गुलामाप्रमाणें वागवावें; संशय येईल त्यांचे हालहाल करावे असें चाललें होतें.

लालसेना येणार असें वारे म्हणत. जमिनदारानें पलटणींची मदत मागितली. पिस्तुलें बरोबर घेतल्याशिवाय जमिनदारांची मंडळी बाहेर पडत नसे. एके दिवशीं जामिनदाराचा मुलगा पिस्तुल घेऊन गांवांत हिंडत होता. एके ठिकाणीं शेतकरी जमून हळुहळू बोलत होते. परन्तु सैतानाला पाहतांच त्यांचीं तोंडें थांबलीं. जामिनदाराच्या मुलानें टवकारून पाहिलें व तो पुढें गेला. शेतकरी पुन्हां बोलूं लागले. तो राक्षस माघारा वळला. त्यानें त्या लोकांकडे पुन्हां पाहिलें. त्यांतील एकाकडे तो दुष्ट डोळयांनीं पहात होता. त्या शेतकऱ्याचें नांव होतें हॅन. हॅन नेहमीं स्वाभिमानानें वागे. जामिनदारापुढें तो गोंडा घोळीत नसे. सहा शेतकरी हॅनप्रमाणें गोळी घालून ठार केले गेले. तरीहि हॅन डरला नाहीं; हॅनचा स्वाभिमान चिरडला गेला नाहीं.

वांकड्या नजरेनें मारक्या हेल्याप्रमाणें पाहून, जमिनदाराचा मुलगा निघून गेला. कांहीं वेळ हिंडून तो पुन्हां एके ठिकाणीं आला. तों तेथें पुन्हां हॅन त्याला दिसला. कांहीं मजूर व शेतकरी तेथें होते. हॅनचें म्हणणें उत्कंठेनें सारेजण ऐकत होते. त्यांत जमिनदाराचीं कुळेंहि होतीं. तो जमिनदाराचा मुलगा आंत शिरला आणि तेथें त्यांच्यांत बसला. सर्वांच्या मनांत काळें आलें. सर्वांना भीति वाटली.

तें चहाचें दुकान होतें. दुकानाचा मालक व मालकीण तेथें होती. मालकिणीनें चहा ओतून जमिनदाराच्या मुलासमोर ठेवला. चहा ओततां ओततां ती म्हणाली, 'गरिबांचे फार हाल आहेत. दिवस वाईट आहेत. गरिबांपासून श्रीमंतांनीं एवढें घेऊं नये.' जमिनदाराचा मुलगा कर्कशपणें

म्हणाला, 'दिवस कठीण येत आहेत, कारण हे लाल दरवडेखोर पिसाळलेले आहेत. आणि शेतकरी आळशी झाले आहेत. त्यांना कर्ज द्यायला नकोत.' समोरच्या डोंगराकडे पहात एका मजुरानें विचारलें, 'लाल दरवडेखोर खरो-खरच जवळ आले आहेत कीं काय?' तो म्हणाला, 'होय. तुम्हांलाहि ते माहीत आहेत. हे दरवडेखोर मालमत्ता लुटतात. मोठमोठ्या घरांची अब्रू घेतात, खून करतात.' चहा ओतणारी बाई दचकून म्हणाली, 'अय्या इतके का क्रूर आहेत ते लोक?'

क्षणभर कोणी बोललें नाहीं. चहा न पितां तो जमिनदाराचा मुलगा म्हणाला, 'आपल्या गांवाकडे लाल दरवडेखोर येणार आहेत. परन्तु त्यांतील आपण एकहि जिवंत जाऊं देणार नाहीं. सरकारी पलटणी आमच्या मदतीस येत आहेत. लाल दरवडेखोरांस जो मदत करील त्यानें सांभाळून राहावें. गांवांतील सर्व सभ्य पुरुषांनीं गांवाचें रक्षण करावें. आमचा वाडा सांभाळावा. आमची लूट होऊं देऊं नये.

असें म्हणून त्यानें हॅनकडे तीक्ष्ण दृष्टीनें पाहिलें. सर्व शेतकऱ्यांकडे, मजुरांकडे पाहिलें. त्यांनीं त्याच्या डोळ्यास डोळा भिडविला. ते दिपले नाहींत. इतक्यांत कोपऱ्यांतून कोणी म्हटलें, 'आमचें गमवावयास आमच्या जवळ आहे काय? आमच्याजवळ फक्त कर्ज आहेत, तीं कोणी लुटून नेईल तर आम्ही कर्जमुक्त होऊं.' जमिनदारानें कोपऱ्याकडे पाहिलें. परन्तु त्याला कोण बोललें तें कळलें नाहीं. परन्तु निर्भयमूर्ति हॅन समोर होता. त्यानें जमिनदाराच्या मुलाकडे पाहिलें व सांगितलें. 'ज्या वाघानें अनेकांचें रक्त चाखलें तोहि शेवटीं मरेल.'

जमिनदाराच्या मुलाचे हात पिस्तुलाकडे गेले. परन्तु तो पुन्हां थांबला. एक आणा काढून त्यानें तेथें फेकला. चहा न पितां तो रागानें थरथरत निघून गेला.

त्या दिवशीं रात्रीं हॅनला त्याच्या झोपडींत जमीनदाराच्या शिपायांनीं पकडलें. हॅन्नें धडपड केली. परन्तु त्यांनीं त्याला ओढीत नेलें. त्या किल्ल्यांत, त्या गढींत त्याला नेण्यांत आलें. तेथून तो पुन्हां जिवंत बाहेर आला नाहीं. जमिनदाराच्या घरांत जाऊन अदृश्य होणारा हा त्या गांवां-तलि सातवा किसान होता.

या गोष्टीला ३ दिवस झाले. चौथ्या दिवशीं रात्रीं दुसऱ्या एका दूरच्या खेड्यांतील जमनिदार त्या गांवीं पळून आले. लाल दरोडेखोर आले, पळा, पळा असें ते सांगूं लागले. जामिनदार व त्यांचीं मुलेंबाळें या आलेल्या लोकांबरोबर पळून जाऊं लागलीं. सरकारी पलटणी कापल्या गेल्या. दोन जमिनदार व एक सावकार गोळी घालून ठार मारले गेले. अशा बातम्या होत्या. 'ती लाल सेना मरणास भीत नाहीं. ते भयंकर लोक आहेत.' पळून आलेले जमीनदार सांगत होते.

जमिनदारांचा तांडा निघाला. गुलामांच्या पाठीवर मोलवान् मालाच्या पेट्या दिल्या गेल्या. शिपाई त्यांना हाकलूं लागले. जमीनदारानें पोबारा केला आणि ती विजयी लाल सेना आली. टेंकडीवर बिगुलें वाजलीं. गांवांतील स्त्रीपुरुष सामोरे गेले. लाल सेनेनें किल्ला ताब्यांत घेतला. हॅन्‌ला शोधूं लागले. परन्तु हॅन्‌च्या शरीरांतील मांसाचा कोथळा तेथें पडला होता. हॅन्‌चे डोळे फोडले होते, कान तोडले होते; जीभ कापली होती. तेथें बांबूचें तरवारीच्या धारेसारखें केलेलें फटके मारणारें आसूड पडलें होतें. त्याच्यावरचें रक्त वाळून तें काळें पडलें होतें. हुतात्म्याचें तें छिन्नभिन्न शरीर बाहेर नेण्यांत आलें. प्रचंड सभा भरली. लालबावट्यांत त्या शूराचा तो देह गुंडाळून ठेवण्यांत आला. त्याचा सत्कार करण्यांत आला. त्या गांवाचें नांव हॅन ठेवण्यांत आलें.

किसान कामगार अशीं बलिदानें लाखोंनीं जेथें देतात, तेथें आज उद्यां त्यांचें राज्य स्थापलें जाईल. हिंदुस्थानांतील किसान कामगारांनीं धडा घ्यावा. आपसांतील भांडणें मिटवून किसान तेवढा एक, कामगार तेवढा एक, अशी घोषणा करावी. बावळटपणा सोडून द्यावा. खेड्यांतील स्वार्थी पक्षोपपक्ष नाहींसे करावे. खेड्यांतून किसानांची सत्ता स्थापन करावी. त्यांच्या निश्चयाला कोण मारील? श्रमतो त्याचा हक्क, त्याचा पहिला हक्क, असा कायदा निर्माण झालाच पाहिजे. ज्यांच्या घामांतून धनधान्य निर्माण होतें, त्याला आधीं हक्क, त्याला पोटभर खायला, अंगभर ल्यायला, असे कायदे झालेच पाहिजेत. असें होईल तेव्हांच खरा धर्म येईल. तोंवर सारा अधर्म राहील.

—वर्ष २, अंक १९.

## एका फुलाची इच्छा ( हिंदी कवितेवरून ) १८

तो एक हरिजन होता. त्याची एकुलती मुलगी होती. तिचें नांव सुखिया. मोठी खेळकर होती ती. बाप काम करून आला म्हणजे सामोरी यायची. त्या गांवाला तापाची सांथ आली. बाप सुखियाला म्हणे "बाहेर नको जाऊं. घरींच खेळ." परन्तु पांखराला का पिंजरा आवडेल? सुखिया इकडे जाई, तिकडे जाई. एक दिवस बाप घरीं आला तों सुखिया अंथरुणावर होती. तिला ताप आला होता. बाप म्हणाला, "मृत्यो, तुला भूक असेल तर मला ने. या कळीला नको नेऊं." बाप उशाशीं बसे. मुलीच्या केसावरून हात फिरवी. एकदम मुलगी म्हणाली "बाबा, देवीच्या देवळांतील प्रसादाचें मला एक फूल द्या ना आणून. जा ना बाबा!"

तो हरिजन देवीच्या मंदिरांत कसा जाणार? त्यानें इतर फुलें सुखियाजवळ आणलीं. तिनें तीं कुसकरून फेंकून दिलीं. "बाबा, देवीच्या प्रसादाचें द्या ना फूल" ती म्हणाली. सुखियाचा ताप कमी होईना. ती ना बोले, ना डोळे उघडी. निपचित पडली होती. सारी खोली, सारें वातावरण "देवीच्या प्रसादाचें फूल द्या" असें जणुं मूकेपणानें गर्जत होतें. एके दिवशीं बाप पहांटे उठला. आणि आंघोळ करून आला. पूजासाहित्य हातांत घेतलें. सुखियेजवळ उभा राहिला. तिच्या तोंडावरून हात फिरवावा, तिचा पापा घ्यावा त्याला वाटलें. परन्तु ओवळा झाला असता. तो मंदिराकडे निघाला. टेकडीवर होतें मंदिर. एक प्रवाह मंदिराला जणुं प्रदक्षिणा घालीत डोंगरांतून वहात होता. भक्तजनांची गर्दी होती. "पतित तारिणी अंबे" जयघोष होत होते. तो हरिजन उभा राहिला. जगन्मातेचें मुख-कमल पाहून उचंबळला. गर्दीबरोबर पुढें ढकलला गेला. त्यानें पूजा दिली. पुजाऱ्यानें फुलांचा प्रसाद दिला. तो प्रसाद घेऊन झटकन् निघून जाण्याचें तो विसरला. आज कृतार्थ झालों असें त्याला वाटलें. हळुहळू भावनांनीं ओथंबलेला असा तो निघाला. सिंहद्वाराजवळ गेला नाहीं तों त्याला कोणी ओळखलें. 'अरे अस्पृश्य, पकडा, ओढा, भ्रष्ट केलें मंदिर, मारा धक्के

आवाज झाले. त्याला धक्के बुक्के देत निघाले. तो म्हणाला, " मातेच्या पावित्र्यापेक्षां का माझें पाप मोठें आहे ? मातेच्या महिम्यापेक्षां का माझा महिमा मोठा ? तुम्हीं जगदंबेचा हा अपमान करतां. " परन्तु भक्तांचें रक्त सळसळत होतें. त्यांनीं ढकललें त्याला. तो पडला पूजेचीं फुलें धुळींत गेलीं. त्याला न्यायासनासमोर नेलें. एकदम अटक व ७ दिवसांची कैद. शिक्षा झाली. तुरुंगाच्या कोठडींत तो रडे, रडे. कोणी त्याला म्हणे, 'देवळांत जायचें काय अडलें होतें ? जवळ मशीद होती, जवळ चर्च होता. तेथें कां नाहीं गेलास ?' परन्तु मुलीची इच्छा त्यांना काय माहीत ? तो सुटला. जड पावलें घराकडे वळत ना. घराशीं येतो तों सामसूम. हंसरी सुखिया दिसली नाहीं. तो स्मशानांत गेला. सुखियेची माती तेथें होती. 'या मातीवर मला ठेवूं दे फूल. द्या रे एक देवाचें फूल. सुखियेच्या आत्म्याला तें मिळेल.' तो अश्रुपूर्ण वाणीनें म्हणाला. परन्तु कोण ऐकणार ?

—वर्ष २, अंक २४.

## एक सुंदर कविता १९

[ इक्बाल हा पंजाबमध्यें कवि होऊन गेला. मागील वर्षीं तो मरण पावला. त्याच्या एका सुंदर कवितेचा गद्य अनुवाद इंग्रजीवरून देत आहें.]

उंट सेवा करतो, हालअपेष्टा भोगतो. सहनशीलता आणि सतत परिश्रम हा त्याचा धर्म आहे. वाळूंतून मुकाट्यानें तो मार्ग काढीत जात असतो. वाळवंटांतून प्रवास करणाऱ्यांची ती नौका आहे. प्रत्येक कांटेरी झुडपांना त्याचीं पावलें माहीत आहेत. तो फ़ार थोडें खातो, फार थोडी झोंप घेतो. श्रमाची त्याला संवयच झाली आहे. तो पाठीवर कितीतरी सामान सुखानें घेतो. बसणारा, त्याचें ओझें सारें कांहीं पाठीवर घेतो. मुक्काम येईपर्यंत न थांबतां तो सारखा जातच असतो. वरचा बसणारा कंटाळतो परन्तु उंट कंटाळत नाहीं.

त्या उंटाप्रमाणें कर्तव्याचा भार शिरावर घे; कुरकुर करूं नको. अशानेंच देवाजवळ जाशील. हे निष्काळजी मनुष्या, नीट लक्ष दे. आज्ञापालन शीक. स्वातंत्र्य बंधनांतून जन्मतें. संयमांतून मोक्ष मिळतो. आज्ञाभंगानें माणसांतील तेजस्विता धुळींत जाते. धर्माची आज्ञा मान. आज्ञापालनानें नालायक लायक होत जातो. सूर्यचंद्रावर ज्याला स्वामित्व मिळवायचें आहे त्यानें स्वतः धृतवत् झालें पाहिजे. वारा स्वतःला फुलांच्या सुगंधानें बांधून घेतो. कस्तुरी मृगाच्या नाभींत स्वतःला कोंडून घेते, आकाशांतील तारे नम्रपणें बांधल्यासारखे वागत असतात. उत्पत्तीच्या नियमानुसार गवत वाढतें. गुलाबाचें लाल फूल स्वतःचा नियम मानतें आणि म्हणून सारें रक्त त्याच्या नसानसांतून नाचतें. पाण्याचे बिंदू ऐक्याच्या नियमानें एकत्र येतात व सागर होतो. वाळूचे कण ऐक्याच्या नियमानें एकत्र येतात व सहारा वाळवंट होतें. नियमपालन हें सामर्थ्याचें साधन. या साधनाची तूं कां उपेक्षा करतोस? धार्मिक बंधनें न पाळून अनिर्बन्ध होणाऱ्या पुन्हां धार्मिक बंधनें पाळ. ते नियम कठीण आहेत म्हणून कुरकुर नको करूं. पैगंबरांचे आज्ञेचें उल्लंघन नको करूं.

तूं वासनांचा गुलाम नको होऊंस. वासनांना लगाम घाल. आपलें मन आपल्या ताब्यांत घे. तूं माती असलास, तरी संयमार्गीत स्वतःला घालशील तर मोती होशील. जो स्वतःच्या वासनांवर सत्ता चालवूं शकत नाहीं, त्याच्यावर सारी दुनिया सत्ता चालवील. जो स्वतःचा गुलाम, तो जगाचाहि गुलाम होतो. भीति व आसक्ति जन्मतःच तुझ्यांत शिरली आहेत. तुला मरणाची भीति वाटते पण ‘ एक ईश्वर सत्य आहे, बाकी कांहीं नाहीं ’ या मंत्राचा दंड हातांत घे म्हणजे सारी भीति नाहींशी होईल. प्रभु जणुं तुझा प्राण होऊं दे. ज्याच्या जीवनांत देव रहावयास आला, त्याची मान मोहमायेसमोर वांकत नाहीं. एका ईश्वराशिवाय तो कोणाला भीत नाहीं. जो खरा मुसलमान असेल त्यास कर्तव्य श्रेष्ठ वाटतें. त्यासाठीं घरदार, बायकामुलें यांचे बंधहि तो तोडतो. एका ईश्वराकडे तो दृष्टि वळवितो. त्याच्या डोळ्याला दुसरें तिसरें दिसत नाहीं. अब्राहामप्रमाणें प्रभूच्यासाठीं स्वतःचा प्रिय मुलगा मारावयास तो तयार होतो. ज्याच्या हृदयांत प्रभु आहे, तो जरी एकटा असला तरी लाखों शत्रूंना तो भारी आहे. तो एक नसून अनंत

होतो. तो जीवन कःपदार्थ मानतो व कर्तव्यासाठीं तें फेंकून देतो. धर्माच्या शिंपल्यांत प्रार्थनेचें मोतीं आहे. हें मोतीं हृदयाशीं धर. मुसलमानांच्या हातांत प्रार्थना हेंच शस्त्र आहे. प्रार्थना हें त्यांचें बळ आहे. प्रार्थनेनें पाप मरतें, चुका गळून जातात, वेडेंवांकडें केलेलें सरळ होतें. प्रार्थना करावी. आणि उपवास ? उपवास म्हणजे क्षुधा-तृषांवर हल्ला आहे. कर्तव्याचा पंथ आक्रमीत असतां तहानेनें वा भुकेनें खचून जाऊं नये म्हणून उपवासाची संवय करावयाची. उपवास म्हणजे विषयभोगांच्या किल्ल्या-वरचा जोरदार हल्ला आहे. आणि यात्रा ? आणि यात्रा त्यासाठीं करावयाची कीं, त्यामुळें श्रद्धावंतांचें मन उत्पन्न होतें. यात्रेला जातांना घरदार, प्रेमळ मुलें-बाळें, सर्वांचा वियोग सहन करावा लागतो. यात्रा संसारांतून थोडें अनासक्त रहावयास शिकविते. घरदाराच्या बंधनांतून थोडा वेळ मोकळें करते. यात्रेंत लाखों लोक एके ठिकाणीं येतात व आपण सारे एक ही भावना बळावते. धर्मग्रंथाचीं विस्कळित पानें यात्रेंत बांधलीं जातात. आणि दान कां करावें ? दान केल्यानें पैशाचा मोह कमी होतो, समानतेचा परिचय होतो; हृदयाला पावित्र्य लाभतें. दानानें संपत्तीची आसक्ति कमी होईल, संपत्ति नाहीं कमी होणार. प्रार्थना, उपवास, यात्रा, दान हीं सारीं आत्म्याला बलवान् करण्यासाठीं आहेत. असा तुझा धर्म बलवान् असेल तर तूं आजिंक्य होशील. स्वतःच्या मनाचा मालक हो आणि त्यासाठीं 'हे सर्व शक्तिमान प्रभो' अशी हांक मार म्हणजे शक्ति मिळेल.

तूं देहावर स्वामित्व मिळवलेंस, म्हणजे दुनियेवर स्वामित्व मिळवशील. जगांत अंतापर्यंत तुझी कीर्ति राहील. या जगांत देवाचें राहणें फार गोड आहे. तो पंचमहाभूतांवर सत्ता चालवील. तो दुनियेचा जणूं जीव होईल. जो प्रभूच्या छायेप्रमाणें होतो, त्यास सारीं रहस्यें कळतात. या जगांत जो जन्मतो व जगाचा इतिहास बदलूं लागतो, त्याच्या जीवनांत चैतन्याचा सिंधु उसळतो व तो अनंत कर्मद्वारा प्रकट होतो. तो नवसृष्टी जणूं निर्माण करतो. त्याच्या कल्पनेंतून गुलाबांच्या फुलाप्रमाणें अनंत विश्वें प्रकट होतात. तो कच्चाला पक्कें करतो, अपूर्णाला पूर्ण करतो. तो बाह्य आकारांना नष्ट करून आत्म्याची भेट करवितो. त्याचा स्पर्श होतांच प्रत्येक हृदयवीणा निनादूं लागते, गोड संगीत स्रवतें. तो देवासाठीं जागृत असतो. देवासाठींच

झेंप घेतो. तो वृद्धांना नवजवान बनवतो, सर्वांना तारुण्यानें व उत्साहानें फुलवतो. मानव जातीला तो आनंदाचा महान् संदेश देतो, त्याबरोबर धोक्याची घंटाहि वाजवितो. तो शिपाई असतो, सेनापति असतो, सम्राट असतो. जो देवाचा झाला, तो जन्मतांच काळाचा वारू झपाट्यानें दौडूं लागतो, त्याच्या रागानें तांबडा समुद्र कोरडा होतो. तो हांक मारतो, आणि मेलेले खडबडून जागे होतात. साऱ्या जगासाठीं तो स्वतः प्रायश्चित्त घेतो. त्याच्या दिव्यतेनें दुनिया बचावते. स्वतःच्या छत्राखालीं घेऊन घुंगुरट्याला तो सूर्याची भेट घडवतो. तो आपल्या संपन्न अस्तित्वानें सारा संसार सारमय करतो. आश्चर्यकारक रीतींनीं तो चैतन्य निर्मितो, कामाची नवीनच दिशा दाखवतो. त्याच्या पायाच्या धुळींतून भव्य स्वप्नें निर्माण होतात. जीवनाला तो नवीन अर्थ देतो. अशांचें जीवन म्हणजे महान् जीवन, वेणूचें संगीत आहे. अशी महान् विभूति निर्मिण्यासाठीं, जीवनांत नव संगीत निर्माण करणाऱ्या अशा थोर विभूतींच्या जीवनाचा मेळ जमविण्यासाठीं सृष्टि शतकानुशतकें आटापीट करीत असते. असा पुरुष या संसारवृक्षाचें गोड फळ आहे. एक दिवस उजाडेल व असा महापुरुष जन्माला येईल. आजच्या मातींत उद्यांची जग दिपविणारी ज्योति सुप्त राहिली आहे. कळींतून गुलाब फुलेल. उद्यांच्या उषःकालानें आमची दृष्टि सतेज झाली आहे.

हे काळावर स्वार होणाऱ्या दैवी पुरुषा, प्रकट हो. बदलणाऱ्या अंधारांतील प्रकाशा, ये. या संसाराला प्रकाशित कर. राष्ट्राचा गलबला बंद कर. आमच्या बुबुळांत तूं येऊन रहा. तुझ्या संगीतानें आमचे कान भर. बंधुभावाची वीणा नीट लाव व वाजव. प्रेमाचा पेला आम्हांला पुन्हां भरून दे. जगाला पुनः शांतीचे दिवस दे. युद्धपिपासू लोकांना शांतीचा संदेश दे. मानवी समाज म्हणजे शेतें व त्या शेतांतील तूं अमोल दाणा. तूं मानवी समाजाच्या मुसाफरीचें ध्येय. हिंवाळा येऊन सारीं पानें गळून गेलीं आहेत. तूं वासंतिक वाऱ्याप्रमाणें ये व जीवनाची बाग पुनः हंसव, फुलव. आमच्या माना आज खालीं आहेत. अधोवदन दुनियेचा हा प्रणाम घे. तूं समोर उभा राहिलास म्हणजे मग आमच्या माना वर करूं; या जगांतील सारी आग मग आनंदानें सहन करूं. तूं ये, ये.

—वर्ष २, अंक २४.

# मननीय विचार २०

‘ विधायक सेवा म्हणजे सत्याग्रहाचें सामर्थ्य ’

—महात्मा गांधी

## कॉंग्रेस व हैद्राबाद लढा

हैदराबाद संस्थानांत स्टेट कॉंग्रेस लढा लढवीत होती. शेंकडों कॉंग्रेस सेवक कारागृहांत गेले होते. परंतु पुढें तो लढा स्टेट कॉंग्रेसनें थांबविला. निजामसरकार सुधारणांचा विचार करीत होतें. त्या सुधारणा एकदां बाहेर पडल्या म्हणजे मग पुढचें धोरण काय तें स्टेट कॉंग्रेस पुन्हां ठरविणार होती. स्टेट कॉंग्रेसनें सत्याग्रह थांबविला; आर्य समाज व हिन्दुमहासभा यांनीं थांबविला नाहीं. स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह व हा दुसऱ्या संस्थांचा सत्याग्रह यांत फरक आहे. स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह व्यापक ध्येयासाठीं होता. नागरिक स्वातंत्र्य व इतर राजकीय सुधारणा यांसाठीं तो होता. आर्य समाज व हिन्दुमहासभा यांचा सत्याग्रह धार्मिक पूजाविधी वगैरेंच्या स्वातंत्र्यासाठीं होता. दे. भ. श्री. अणासाहेब भोपटकर यांनीं आपल्या पत्रकांत ही गोष्ट मांडली आहे. नागरिक स्वातंत्र्यांत धार्मिक स्वातंत्र्य ही गोष्ट येऊनच जाते. स्टेट कॉंग्रेसच्या व्यापक लढ्यांत ती गोष्ट येतच होती. ही एकच गोष्ट घेऊन स्टेट कॉंग्रेस लढत नव्हती; जीवनाचें व्यापक स्वरूप घेऊन ती लढत होती. हिन्दुमहासभेचे एक चहाते मला म्हणाले, “ आर्य-समाज व हिंदुमहासभा ह्यांच्या सत्याग्रहांत कॉंग्रेस नाहीं हें योग्यच आहे. कारण कॉंग्रेस ही प्रामुख्येंकरून राजकीय संस्था आहे. राजकीय स्वातंत्र्यार्थ तिचा झगडा आहे.” मी त्यांना म्हटलें, “ तुम्ही असें म्हणतां; परन्तु सर्व हिंदुमहासभावादी असें म्हणत नाहींत. डॉ. कुर्तकोटी हेंच सांगत होते. हिंदुमहासभा धार्मिक संघटनेपुरती राखा असें ते सांगत. परन्तु कुर्तकोटींची चेष्टा झाली. हिन्दूंच्या राजकीय स्वातंत्र्यासाठीं झगडणारी हिंदुमहासभाच असें घोषित होऊं लागलें. त्या मित्रांस माझें म्हणणें पटलें नाहीं. तें कांहीं

असो. हिंदुमहासभा व आर्यसमाज यांचा सत्याग्रह मर्यादित आहे ही गोष्ट खरी. स्टेट कॉंग्रेसचा व्यापक होता. तिच्या ध्येयांत धार्मिक स्वातंत्र्य येऊनच जात होतें.

संस्थानचा शेवटचा सुधारणांचा खर्डा बाहेर पडेपर्यंत स्टेट कॉंग्रेस थांबली आहे. सत्याग्रहाची ही नीति आहे. प्रतिपक्षी आपलें म्हणणें स्पष्ट करूं इच्छित आहे; त्याला अवसर दिला पाहिजे. निर्मळ वातावरण व विश्वास उत्पन्न केलीं पाहिजेत. चांगल्या हवेंत चांगल्या गोष्टी निर्माण होतात. विषारी हवेंत रोगजंतूच फैलावयाचे. म्हणून स्टेट कॉंग्रेसला सत्याग्रह थांबवावा असा सल्ला महात्माजींनीं दिला. यांत ना भीति, ना मनधरणी. सत्याग्रह बंद करून विधायक काम करा असें महात्माजींनीं सांगितलें; घरांत बसावयास त्यांनीं सांगितलें नाहीं. गांवोगांव जाऊन खादी खपवा, स्वच्छता निर्माण करा असें त्यांनीं सांगितलें.

हैद्राबादमधला सत्याग्रह जनतेपर्यंत गेला नाहीं, आर्यसमाज व हिंदुमहासभा यांचे जथे शहरांत जातात व पकडले जातात. संस्थानांतील हजारों खेड्यांना ना दाद ना फिर्याद. स्टेट कॉंग्रेसच्या कांहीं कार्यकर्त्यांनीं सांगितलें ' आमच्या सत्याग्रहाचा खेड्यांत प्रचार कसा करावा हें समजेना. ' विधायक कार्यानें हा प्रचार होईल. ३० सालीं हिन्दुस्थानांत कायदेभंग सुरू झाला. त्याचा प्रचार विधायक कार्यकर्त्यांच्या झाडूंतून व खांद्यावरील खादींतून आधीं झाला होता. खादी आपल्या बरोबर राजकारण घेऊन जाते. खादी हें मृत वस्त्र नाहीं; तें मृतांस जिवंत करणारें जिवंत वस्त्र आहे.

निःशस्त्र सत्याग्रहांत आमची जनता सामील झाली तरच त्यांत अर्थ असतो. बाहेरच्या जथ्यांनीं खरें कार्य होणार नाहीं. ज्याप्रमाणें स्टॅलिन म्हणतो, " इतर देशांत आम्ही जाऊन क्रांति करणार नाहीं. परन्तु तेथील जनता जर उठली, संघटित झाली, त्यागाला तयार दिसली, तर मग त्यांना आम्ही सहाय्य करूं. तोंपर्यंत आम्ही वाट पाहूं, स्वतःचें बळ वाढवीत राहूं. " रशिया पदोपदीं दुसऱ्या देशांत लुडबूड करील, असंघटित, स्वतःच्या पायावर उभें न राहणाऱ्या पंगू राष्ट्रास सावरूं पाहील तर रशिया दोहोंकडे फसेल,

काँग्रेसचें हेंच धोरण आहे. संस्थानें जागीं होऊं देत. संस्थानी सेवक विधायक कामें करीत फिरूं लागूं देत. हालचाल किसानांत सुरू होऊं दे. संस्थानी तमाम जनता उठाव करूं दे. मग काँग्रेस आपलें बळ त्यांत ओतील. स्टेट काँग्रेसला हा सल्ला महात्माजींनीं दिला. त्यांनीं सांगितलें, "खादी खपवितांना अटक झाली तर खटला लढवा. विधायक काम फुकट जाणार नाहीं. पुढें सत्याग्रह करावा लागला तर तो शतपटीनें जोमदार होईल. आमची जनता त्यांत भाग घेईल. खेडोपाडीं जागृत होऊन त्यांत उड्या घेतील."

कांग्रेसची ही अशी दृष्टि खोल आहे. त्यांत खोलपणा आहे, मूलग्राहीपणा आहे. क्षणभर दिपवणारा विजेचा लखलखाट तिला नको. विजेचा चकचकाट आकाशांत होतो. परन्तु पाऊल टाकावयास प्रकाश मिळत नाहीं. असला झकपक प्रकाश काय कामाचा?

भारतीय जनता काँग्रेसचा आत्मा ओळखते. काँग्रेस तात्पुरत्या स्वार्थासाठीं कांहीं करीत नाहीं. उद्यां निवडणुकींत आपलें काम होईल अशा क्षुद्र काळजीनें ती बुद्धीस न पटणारी गोष्ट करणार नाहीं. पुढें निवडणुका आल्या तर महाराष्ट्रांत काँग्रेस टिकणार नाहीं, असें कोणी म्हणतात. परन्तु महाराष्ट्र म्हणजे पुणें, नाशिक, नगर नव्हे; महाराष्ट्र म्हणजे महाराष्ट्रांतलि हजारों खेडीं. हीं खेडीं ह्या गोष्टींपासून अलिप्त आहेत." खेड्यांत काँग्रेसनिष्ठा वाढतच आहे. जनतेला स्वातंत्र्य मिळवून देणारी काँग्रेस कोणास भीत नसते. ती योग्य वेळीं योग्य तें करीलच करील. जनतेची ही खात्री आहे कीं, "कोणी कांहीं अधिकांत अधिक आपलें हित करील तर ती काँग्रेसच करील."

हिन्दुमहासभेला पुढील निवडणुकीचीं का स्वप्नें पडत आहेत? परन्तु त्याच्या आधीं भारतांत सत्याग्रहाचा प्रचंड झगडा सुरू होण्याचा संभव आहे. असेंब्लीच्या ऐवजीं लाठीमार, गोळीबार, लष्करी कायदा, फांस यांतून जावें लागेल. त्या वेळेस महान् काँग्रेससंस्था उभी राहील. तिचें लक्ष खुर्चीवर, मतावर नाहीं. तिचें लक्ष फांसावर आहे. राष्ट्र नेहमीं मला मत देईल ही तिची श्रद्धाच आहे; कारण राष्ट्रसभेनें अनंत बलिदान केलें आहे व पुढें करावयास ती उत्सुकतेनें तयारच आहे!

—वर्ष २, अंक ५.

# चीनमधील जागृत विद्यार्थी २१

चीनमधील विद्यार्थी सारा देश जागवीत आहेत. प्रचाराचें प्रचंड काम ते करीत आहेत. कोठेंहि जा. तेथें तुम्हांला असें दिसेल कीं शेकडों शेतकरी जमले आहेत. लहानसें तात्पुरतें स्टेज उभारलें आहे. साधे पडदे सोडले आहेत. चिनी विद्यार्थी नाटकें करीत आहेत. साधीं अर्धा पाऊण तास टिकणारीं नाटकें. एक चिनी मुलगी येते. तिच्या कपाळावर मांचुरिया असें लिहिलेलें असतें. नंतर एक क्रूर जपानी येतो. दांत ओठ खात येतो. त्या मांचुरियाचें सोंग घेतलेल्या मुलीला तो मगराप्रमाणें झडप घालून पकडतो व पडद्याआड घेऊन जातो! नंतर दुसरी मुलगी येते. दुसऱ्या एका चिनी प्रदेशाचें नांव तिच्या कपाळावर असतें. पुन्हां पहिलें भक्ष्य पचवून, लठ्ठ झालेला जपानी राक्षस येतो व नवीन भक्ष्य गट्ट करतो. असें चालतें. शेवटच्या प्रसंगीं जपान हल्ला करीत आहे. अशा वेळेस एक नवतेजाचा चिनी नवयुवक येतो. तो जपानला लाथ मारतो. जपानच्या छातीवर बसतो व चीनची सुटका करतो. टाळ्यांचा कडकडाट होतो. संपतें नाटक. तरुण मंडळी सामान आटोपून दुसऱ्या गांवीं जातात! २० वर्षांच्या आतलि ही सारी तरुण मंडळी असते.

नाटकें, मेळे, संवाद यांच्या द्वारा चीन जागृत केला जात आहे. त्याच प्रमाणें चित्रांच्या द्वारा चीनमधील सारे चित्रकार आज राष्ट्रजागृतीचें काम करीत आहेत. राष्ट्राची जपानविरुद्ध अढी वाढेल, स्वातंत्र्यप्रीति बळावेल अशीं चित्रें सर्वत्र काढण्यांत येत आहेत. भिंतीवरून सासांपरिल्याची जाहिरात नसून जपानी मालावर बहिष्कार घातल्याचें चित्र आहे.

बोलपट तेंच काम करीत आहेत. सचित्र मुके चित्रपटहि तेंच काम करीत आहेत. नाटकें, चित्रें, सिनेमा याद्वारें डोळ्यांना राष्ट्रीय प्रेम शिकवलें जात आहे. आणि कानांना? आज चीनभर राष्ट्रगीतें गायलीं जातात. रणसंचार व रणावेश उत्पन्न करणारीं नवीन नवीन गाणीं गात

पथकें हिंडत असतात. लहान लहान मुलें-मुली गल्ली गल्लींतून हीं नवीन गीतें आवेशानें गात असतात.

आणि हस्तपत्रकें, वार्ताफलक, व्याख्यानें यांच्या द्वाराहि अपरंपार प्रचार केला जात आहे. या सर्व प्रचार-कामांत तरुण विद्यार्थी मोठा भाग उचलीत आहेत. २० वर्षांचे तरुण लढाईंत गेले. २० वर्षांखालचे अशी भूमिका तयार करीत आहेत.

आपल्याकडील विद्यार्थ्यांसाहि सुटीच्या दिवशीं मेळे घेऊन खेड्यांत जातां येईल. लहान लहान नाटकें करून दाखवतां येतलि. तद्द्वारा कां. प्रेम, स्वातंत्र्यप्रेम, खादीप्रेम, हिंदुमुस्लीम ऐक्य, ब्रिटिशांचें स्वरूप, संघटना, किसान कामगारांची स्थिति, अस्पृश्योद्धार, सारें दाखवतां येईल; शिकवितां येईल. परंतु विद्यार्थी तयार झाले तरी शिक्षक तयार हवेत. आमचे साहित्यिक असें छोटें परंतु परिणामकारक साहित्य लिहून देण्यास तयार झाले पाहिजेत. चीनपासून आम्हांस पुष्कळ शिकतां येईल. परंतु इच्छा व तळमळ हवी.

—वर्ष २, अंक ८.

## चीनमधील क्रांतिकारक स्त्रिया २२

जपान व चीन यांचा झगडा बरेच दिवस चालला आहे याचा शेवट काय होईल तें सांगतां येत नाहीं. शेवटीं चीन जपानला चीत करील अशी आशा वाटते. परंतु तें कांहीं असो. चीन आज खडबडून जागा झाला आहे. सारें राष्ट्र आज आत्मरक्षणासाठीं झटत आहे. लहान असो, वृद्ध असो, स्त्री असो पुरुष असो, सारे कामांत आहेत. या लढ्यांत चिनी स्त्रिया फार महत्त्वाचें कार्य करीत आहेत.

आजच्या नव चीनमधील स्त्रियांचें कार्य आश्चर्यकारक आहे. जपानचा हल्ला आला आणि चिनी स्त्रियांनीं रूढींचे सर्व किल्ले पाडून राष्ट्रीय सेवेस वाहून घेतलें, आई-बाप, नातलग, अधिकारी यांची पर्वा न करतां राष्ट्-

धर्माची त्यांनीं दीक्षा घेतली. १९३७ च्या ऑगस्टच्या १ तारखेस 'राष्ट्रीय संरक्षण नारीमण्डळ' स्थापण्यांत आलें. चीनभर या मण्डळाच्या शाखा निघाल्या. शाखांच्या स्त्री सभासदांनीं पैसे, कपडे, औषधें गोळा केलीं. अनाथ मुलांची काळजी घेतली. गरजू कुटुंबांना मदत केली. निराश्रितांना आधार दिला. १९३८ च्या मे महिन्यांत चीनमधील सर्व प्रमुख स्त्रियांची एक सभा भरली. घरगुती धंद्यांना उत्तेजन देण्याचें ठरलें. घरोघर खादी, हातमाग सुरू करून भरपूर कपडा निर्माण करण्याचें ठरलें.

बहुतेक मोठ्या शहरांतून सुविद्य घराण्यांतील तरुणींनीं प्रथमोपचार पथकांतून नांवें दिलीं. या सेविका वैमानिक हल्ल्यांत जखमी झालेल्यांस मदत करितात. त्यांना करमणुकीसाठीं वाचून दाखवतात. त्यांचीं पत्रें लिहितात. परन्तु चिनी तरुणी इतकेंच करून थांबल्या नाहींत. त्या आघाडीवर लढण्यासाठींहि निघाल्या. क्वांग्सी प्रांतांतील ५०० स्त्रियांचें पथक रणांगणावर लढण्यासाठीं गेलें. कांहीं स्त्रिया आघाडीवर जाऊन रणगीतें गात शिपायांस स्फूर्ति देत तर हजारों स्त्रिया आपापल्या घरांतून फाटके कपडे शिवणें, नवीन कपडे तयार करणें अशा कामांत असत.

आघाडीवर काम करणाऱ्या स्त्रियांचें पहिलें पथक कुमारी टिंग्‌लिंग् या उत्कृष्ट लेखिकेनें काढलें. १९३८ च्या मे महिन्यांत या पथकाचे फक्त आठ हजार स्त्री-सभासद होते. हे सभासद वाढतच गेले. पांच हजार भगिनी शिपायांचे कपडे धुण्याचें काम करीत, सहा हजार कपडे शिवण्याचें काम करीत. साडे आठहजार स्त्रिया नर्सिस होऊन शुश्रूषेचें काम करीत. दहा हजार भगिनी पोलिसांचा गणवेष करून पोलिसांचें काम करीत. २५०० भगिनी अठरा वर्षांखालील मुलींना नवीन राष्ट्रसेवेचें शिक्षण देण्यांत गुंतल्या. ३६ हजार भगिनी पडित जमिनी लागवडीस आणण्याचें काम करूं लागल्या. प्रत्येक खेड्यांतील अशिक्षितांचे वर्ग घेणें, त्यांना वाचून दाखवणें, वगैरे कामीं शेंकडों स्त्रिया लागल्या. कम्युनिस्ट भगिनी तर पुरुषांबरोबर प्रत्यक्ष रणांगणांत आगीच्या वर्षावांत उभ्या रहात.

अफाट पसरलेल्या चीन देशांत अद्याप हा आरंभच आहे. परंतु स्त्रियांचा आत्मा झपाट्यानें जागा होत आहे. स्त्रिया प्रत्यक्ष रणभूमीवर लढत आहेत, एवढेंच नव्हे तर गनिमी पद्धतीचे हल्ले करून जपानी शिपायांना

सळो का पळो करून सोडण्याचें कामींहि त्या पुढाकार घेत आहेत. चिनी स्त्रिया मागें आहेत असें आतां कोण म्हणेल ? स्पेनमधील शूर स्त्रियांप्रमाणें चीनमधील स्त्रियाहि स्वातंत्र्याचे व संस्कृतीचे संरक्षणासाठीं जीवनें देत आहेत, अहोरात्र झटत आहेत, शिस्तीनें अखंड काम करीत आहेत.

जसजसा जपानचा राक्षसीपणा वाढत आहे, क्रूरपणा वाढत आहे, तसतसा स्त्रियांचा राष्ट्रीय निश्चय अधिकच गंभीर होत आहे. एका युनान प्रांतांतून ७ हजार स्त्रिया रणांगणांत मरण्यासाठीं निघाल्या. त्या ७ हजारांतून निवडक स्त्रिया घेतल्या गेल्या. आईबापांचा विरोध त्यांनीं जुमानला नाहीं. शेंकडों मैल त्या पायीं चालत गेल्या. त्यांचें एकच ब्रीदवाक्य होतें, " भगिनींनो, लढाईच्या वेळीं कुटुंबाचा विचार करावयाचा नसतो. पलटणींत नांवें नोंदवा आणि देशासाठीं मरा. "

स्त्रिया ठिकाठिकाणीं सेनापति होत आहेत. पलटणींना हुकूम देत आहेत; अभिनव असा हा देखावा आहे. मुलांना जन्म देणाऱ्या माता आज नवचीनला जन्म देत आहेत. आणि या नवचीनचा भव्य दिव्य प्रभावी जन्म व्हावा म्हणून आज आगींतून जाण्याच्या वेदना सहन करीत आहेत.

या चिनी स्त्रियांच्या त्यागमय जीवनापासून भारतीय स्त्रियांना शिकण्यासारखें कांहींच नाहीं का ? भारतासहि स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे. स्वातंत्र्याचा लढा चालला आहे. या लढायांतील आपलें स्थान भारतीय स्त्रिया कधीं घेतील.

— वर्ष २, अंक ७.

## सामर्थ्य व शुद्धी २३

राजबंदी दिन हिंदुस्थानभर साजरा झाला. ठायीं ठायीं भाषणें झालीं. कांहीं ठिकाणीं भाषणांतून असा सूर निघाला कीं, आज कॉंग्रेसचें सामर्थ्य कमी झालें आहे. यामुळें पंजाब व बंगाल सरकार या बाबतींत कांहीं करूं

इच्छित नाहींत. आज आपणांत ऐक्य नाहीं. वर्ष दोन वर्षांपूर्वी कांग्रेसची जी शक्ति होती ती आज उरली नाहीं.

कांग्रेसचें बळ कां कमी झालें ? बळ जनतेच्या पाठिंब्यांतून येतें. बहुजन-समाजाचा पाठिंबा म्हणजे पक्का खडक. या खडकावर कांग्रेस उभी राहील तरच तिचें बळ टिकेल. त्रिपुरी कांग्रेसच्या मंडपांत शेतकऱ्यांच्या पुतळ्या-च्या आधारावर कांग्रेस व्यासपीठ उभारलें होतें.

परंतु बहुजनसमाजाचे प्रश्न अत्यंत उत्कटतेनें घेतले जात नाहींत. महत्त्वाचे प्रश्न आधीं घ्यावयाचे सोडून दुसरेच घेतले जातात. किसान व कामगार म्हणजेच राष्ट्र. राष्ट्राचा वांकलेला कणा आधीं सरळ करणें म्हणजेच कांग्रेसचें बळ वाढविणें.

पंजाब व बंगालमधील राजबंदी कां सुटावेत ? राजबंदी सुटले म्हणजे ते बहुधा किसान कामगारांचे चळवळींत पडतात. दहशतवादाची चूक त्यांना कळली. एक साहेब मारून स्वराज्य मिळणार नाहीं, हें त्यांस उमजलें. परंतु दुसरा मार्ग कोणता ? शास्त्रीय क्रांतीचा पंथ कोणता ? किसान व कामगार यांची संघटना हा तो मार्ग. बंगालमधलि राजबंदी सोडण्यांत आले, व जर ते किसानांत व कामगारांत काम करूं लागले तर ?

कांग्रेसप्रांतांतहि किसान व कामगार कार्यकर्ते साशंकतेनें पाहिले जातात. आज पेशावर प्रांतांत मुख्य प्रधानांनीं आपल्या पुत्रास अटक केली. अपराध काय ? तर तो सच्चा सेवक कुळांची बाजू घेऊन लढत होता. पेशावर प्रांतांत जमीनदार आहेत. कुळांचे हाल अपार आहेत. मुंबई इलाख्यांत कामगार कार्यकर्त्यांस शाश्वति वाटत नाहीं. बंगालमधील हक्क व पंजाबांतील सर शिकंदर म्हणतील, 'राजबंदी मुक्त केल्यावर त्यांना पुन्हां तुरुंगांत घालावें लागेल. कांग्रेस प्रांतांतहि किसान कामगारांच्या कार्यकर्त्यांच्या नशिबाचा तुरुंग कोठें पूर्णपणें सुटला आहे ?'

किसान व कामगारांना वगळाल तर बळ वाढणार कसें ? किसानांच्या व कामगारांच्या संघटना आम्हांस बघवत नाहींत. ते मोर्चे काढूं लागले, प्रचंड मिरवणुकी काढूं लागले तर आम्हांस आनंद होण्याऐवजीं दुःख वाटूं लागतें.

किसान व कामगार कार्यकर्ते कांग्रेस संस्थेंत येऊं नयेत म्हणून कोण

आटाआटी! म्हणे ते हिंसक आहेत. म्हणे ते खादीचें व्रत नीट पाळीत नाहींत. मुंबई शहर कां. कमिटीनें ऑफिसांत येऊन सभासद व्हावें असा ठराव केला आहे. कामगारांनीं ९।९ तास काम करून तुमच्या ऑफिसांत केव्हां यावें? भुलाभाईंनीं उत्तर द्यावें. ज्यांच्या हातांत ऑफिस आहे ते सभासद ऑफिसांतच नोंदवतील याला प्रमाण काय? आपल्या ओळखीच्यांत द्यावीं पुस्तकें, म्हणावें ऑफिसांत झाले. कामगारांचें मात्र मरण.

खरा गांधीवादी तरी कोण? त्यांतल्या त्यांत अधिक अहिंसक कोण?

गांधीवाद म्हणजे दरिद्री माणसाला सुखी करण्यासाठीं स्वतः फकीर होणें. गांधीवाद म्हणजे अपार त्याग. खादी पेहरून अहिंसेचीं व्याख्यानें देणारे ठायींठायींचे सावकार, कारखानदार व त्यांचे हस्तक पाहिले म्हणजे त्या खादीची कींव येते. हे खादी वापरून भरमसाट व्याजें घेणारे, खादीचा साधेपणा मिरवून शेतकऱ्याच्या इष्टेटी जप्त करणारे, खादीचीं वस्त्रें नेसून कामगारांस भिकेस लावणारे, हे का गांधीवादी? हे का अहिंसक? खादी घालून व्याजासाठीं तहानलेल्या बगळयांस मी दूर फेंकीन व खादी नसलेल्या परंतु किसान कामगारांसाठीं तळहातीं शिर घेणाऱ्याच्या मस्तकाची धूळ मी मस्तकीं लावीन.

कॉंग्रेसमध्यें शुद्धि हवी आहे. परन्तु ती खादीची नसून हृदयाची हवी आहे. कॉंग्रेसमध्यें बगळे नकोत, राजहंस असूं देत. स्वातंत्र्याचें प्रतीक म्हणून खादीची अट ठेवा. परन्तु तेवढ्यानें कॉंग्रेसची शुद्धि झाली असें समजूं नका. कॉंग्रेस मंत्रिमंडळांना भराभर किसान कामगार कार्यक्रम कां उचलतां येत नाहीं? कोण बरें आड येतें?

आपल्या इस्टेटींना जपणारे परन्तु खादी घालणारे लोक आज कॉंग्रेसचें बळ कमी करीत आहेत. कॉंग्रेसचे उपासक म्हणून दावा करणारे, सत्य व अहिंसा यांचे स्वतःला पूजक समजणारे, स्वतःच्या जीवनांत खादी वापरण्यापलीकडे कांहीं करतात का? वर्षानुवर्षे हे खादी वापरीत आहेत. परंतु सालदाराजवळ नीट वागणार नाहींत, घरांतील गड्याला दूध देणार नाहींत. कुळाला आजारांत औषध देणार नाहींत. काय करायची ती खादी? जी खादी तुम्हांला प्रेमळ, उदार, त्यागी बनवीत नाहीं ती काय कामाची? अशा लोकांना पाहून कांग्रेसबद्दलचें प्रेम का

वाटेल ? किसान कामगार कांग्रेसमध्यें आतां घुसणार असें दिसतांच या सर्वांचें धाबें दणाणलें. इंग्रज सेनापति वेलिंग्टन इंग्लंडमध्यें सुधारणा कायदा होतांना म्हणाला, 'आतां पार्लमेंटची प्रतिष्ठा जाईल. न्हावी, धोबी किसान कामगार तेथें येऊन बसतील. घरंदाज, संस्कृतिपूजक अमीर-उमराव दिसणार नाहींत. आमच्यांतील कांहीं लोकांना हीच अडचण पडली आहे. कांग्रेस श्रमजीवींच्या हातीं गेल्यावर कसें होणार याची त्यांना भीति वाटूं लागली आहे.

अधिकांत अधिक किसान व कामगार कॅांग्रेसमध्यें कसे येतील याची आम्हांस तहान हवी. लब्धप्रतिष्ठित लोक कांग्रेसमधून कसे जातील हें आम्ही पाहिलें पाहिजे. खादी वापरण्याचे अटीऐवजीं तुझ्या उत्पन्नाचा शतांश कांग्रेस—कामास दरसाल देत जा अशी म्हणावें अट घाला. व्याज शें. ३ टक्केच घेईन, कुळांना आधीं खायला ठेवीन, कामगारांना नीट वागवीन अशा अटी घाला परंतु या प्राणमय अटी कोण घालतो ?

खादीची शुद्धि बहुजन समाजांत कमी असेल. परंतु श्रम करून करून ते पवित्र झालेले आहेत. जे संपत्ति श्रमून निर्माण करतात त्यांच्याइतकें पवित्र कोण ? अंगावर खादी घालणारे परंतु कधीं संपत्ति निर्माण करण्या-साठीं न श्रमणारे अशानीं अंगावर खादी नसलेल्याहि किसान कामगारांच्या पायां पडावें. आपण खादीधारी—पांढरपेशे, शेट सावकार, कारखानदार अशुद्ध आहोंत, बेशुद्ध आहोंत, मेलेले आहोंत. आपण दुसऱ्यास कोणत्या तोंडानें अशुद्ध म्हणावें ?

महात्माजी पुरुषसिंह बॅ. अभ्यंकरांस नागपूरच्या सभेंत म्हणाले होते, "अभ्यंकर, तुम्हांला अजून जेवावयाला मिळत आहे. ज्या दिवशीं तुम्हांला खाण्याची ददात पडेल त्या दिवशीं मी आनंदानें नाचेन." खाण्याची ददात किसान कामगारांस नेहमींच आहे. परंतु त्यांची ही ददात मिटावी म्हणून सेवा करावयास निघालेले धनिक किती उपाशी राहूं लागले ? शेत-कऱ्यांच्या झोंपड्या पाहून यांना इतकें दुःख होतें कीं, यांचे रंगीत बंगले नवीन उठूं लागतात ! किती जीवनांतील शुद्धि !

महात्माजींच्या मुखीं सत्य अहिंसा शोभते. परंतु ज्यांच्या जीवनांत सत्य अहिंसेचा पत्ता नाहीं, अधिकार व सत्ता हातीं असण्यासाठीं कारस्थानें

करण्यांत ज्यांच्या बुद्धीची कृतार्थता, दुसऱ्याला पैशानें मिंधे करून त्यांचें मत-स्वातंत्र्य नष्ट करणें असे ज्यांचे खेळ, त्यांनीं आम्हांस सत्य अहिंसेचे डोस पाजावे हें कसेंतरी वाटतें.

सारांश, सामर्थ्याचा झरा जनता-जनार्दनाजवळ आहे. जनता-जनार्दनास कांग्रेस दूर लोटील तर ना उरेल तिच्याजवळ सत्य, ना उरेल अहिंसा. श्रीमंताच्या डुरकावणीस भीक न घालतां आम दुःखी जनतेच्या सुखासाठीं कांग्रेस निश्चयानें उभी राहील तेव्हांच ती विशुद्ध स्वरूपांत अतुल तेजानें व अपार सामर्थ्यानें शोभेल; खरें स्वातंत्र्य जवळ येईल.

—वर्ष २, अंक ८.

## हिन्दुमुसलमान एकी २४

गेल्या पंधरवड्यांत कॉंग्रेसचे पुढारी, जनाब जिना व व्हाईसरॉय यांची पुनः भेट होऊन त्यांतून कांहीं निष्पन्न होऊं शकलें नाहीं. महात्माजी व राजेंद्रबाबू यांनीं कॉंग्रेसची नेहमींचीच भूमिका पुनः ठासून सांगितली कीं तुम्हांला आमच्या हिंदु-मुसलमानांच्या भांडणाची चांभार चौकशी करायची जरूर नाहीं, जें कांहीं द्यायचें असेल तें ताबडतोब द्या. दिल्यानंतर आम्हीं हवें तसें वांटून घेऊं.

हिंदुस्थानचें स्वातंत्र्य शत्रूच्या कमजोरीवर मिळायचें नसून आपल्या सामर्थ्यावर कमवायचें आहे. आपण कमज़ोर असूं तर स्वातंत्र्य मिळाल्या-वरहि तें टिकवूं शकणार नाहीं. महात्माजींच्या कल्पनेप्रमाणें स्वातंत्र्य मिळा-ल्यानंतर परचक्रापासून अहिंसेनें संरक्षण कसें करतां येईल हा प्रश्न जरी सोडून दिला तरी हिंदुस्थानांतील सर्व पक्षांची आतां खात्री झाली आहे कीं अहिंसेशिवाय स्वातंत्र्याचें दुसरें अनुकूल साधन नाहीं. व आपसांतील दुही नाहींशी झाल्याशिवाय अहिंसेचा मार्ग यशस्वी होणार नाहीं.

हिंदुमुसलमान हे भेद ही आपल्या स्वातंत्र्यामध्यें मोठी धोंड आहे. हे काल्पनिक भेद ब्रिटिशांचें राज्य हिंदुस्थानांत आल्यावरच आपल्यामध्यें

दिसूं लागले व ब्रिटिशांचें अस्तित्व या दुहीवरच अवलंबून आहे. हे भेद धार्मिक असून त्यांचा हिंदी स्वातंत्र्याशीं कांहीं संबंध नाहीं. हिंदी स्वातंत्र्य हा राजकीय,आर्थिक प्रश्न आहे. जकात–इन्कमटॅक्स व कुळकायदे,मजुरांचे संबंधीचे कायदे, विम्यासंबंधीं कायदे, दारुबंदी, सडका, विहिरी, कालवे बांधणें वगैरे नागरिकांच्या हक्कांमध्यें हिंदू–मुसलमान हा भेद येतो कुठें? मुसलमानांसाठीं किंवा फक्त हिंदूंसाठीं दारुबंदीचा का फायदा मिळणार आहे किंवा कालव्याचें पाणी असुक धर्माचे लोकांनाच का देण्यांत येणार आहे? हिंदूंकरतां अमुक सडक राखून ठेवण्यांत का येणार आहे? हा का स्वातंत्र्याचा अर्थ? हरिजनमध्यें आलेल्या एका अलिगडच्या एम. ए. च्या पत्रांत तो म्हणतो, 'हिंदुस्थानांत दोन राष्ट्रें आहेत; हिंदु व मुसलमान.' धर्म व राष्ट्र एक असेल तर जगांत फारच थोडीं राष्ट्रें दिसायला हवीं. तुर्कस्थान,अंगोरा,अफगाणिस्थान, इराण हीं मुसलमान राष्ट्रें वेगवेगळीं कशाला हवींत? युरोपांतील व पश्चिम गोलार्धांतील इतक्या खिश्चन राष्ट्रांचा बुजबुजाट कां? आणि मग रशिया, जर्मनी व इतर दोस्त राष्ट्रें भांडतात तरी कां? ज्या लोकसमूहाचे आर्थिक व राजकीय हितसंबंध एकत्र निगडित केले आहेत तें राष्ट्र. मुसलमानांनाहि स्वातंत्र्य हवें आहे. हिंदी मुसलमान हें जर एक राष्ट्र तर बाबांनो, तुम्ही एकटे तरी स्वतंत्र होण्याचें पुण्य घ्या ना. म्हणून हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे व आपल्या स्वातंत्र्याआड धर्म येऊं शकत नाहीं.

व्हाइसराय, सेक्रेटरी यांचीं निराशाजनक उत्तरें ऐकल्यावर महात्माजींनीं हिंमत खचूं न देतां साऱ्या जगाचें हंसें होणाऱ्या हिंदुस्थानला एकदम कायदेभंगाचा आदेश दिला नाहीं. आपलीं छिद्रें शत्रूपेक्षां आपणांस माहित असायला हवीं. एकट्या हिंदूंनीं अगर एकट्या मुसलमानांनीं आपल्या प्रतिपक्षाशीं लढून फायदा नाहीं. पं. जवाहरलाल यांनीं परवां सं. प्रां. कां. कमिटीपुढें जमलेल्या शेतकऱ्यांपुढें बोलतांना सांगितलें, ब्रिटिश सरकार आणि हिंदुस्थान यांच्यांतील मतभेद आतां आकाश आणि पृथ्वी यांच्यांतील अंतराप्रमाणेंच चिरंतन झाले आहेत. कॉंग्रेसनें सतत तडजोडीचें धोरण ठेवलें. ब्रिटिशांनीं साम्राज्यशाही वृत्ति सोडली नाहीं. सरकार कॉंग्रेसविरुद्ध दडपशाहीचा लोखंडी पंजा लवकरच उभारील असा संभव वाटतो. विलंब लावल्यानें नुकसान नाहीं. अहिंसा-

त्मक संघटणा करा. सरकार जातीय दंगे चळवळीच्या वेळीं चेतवील, अशा गुंडांपासून सावध रहा. मला आशा आहे कीं मुस्लिमलीग मुसलमानांमध्यें एक नवी वृत्ति, नवा दृष्टिकोन निर्माण करील. व आजच्या पेक्षांहि मुसलमानांत, आपसांत जातजितीत परस्पर समजूत आणि विश्वास निर्माण होऊं शकेल.

गेल्या ८।१० दिवसांत पंडितजींच्या मेहनतीनें अनुकूल वातावरण निर्माण होत असल्याचें सुचिन्ह दिसत आहे. जिना—जवाहरलाल यांचीं बोलणीं पुन्हां डिसेंबरमध्यें सुरू व्हावयाचीं आहेतच. परंतु जिनांनीं आतांपर्यंत झालेल्या कामावरून व पं. जवाहरलाल यांचे वागणुकीबद्दल चांगले शब्द काढले आहेत. व त्यानंतर रमजान ईदला त्याचें मुंबईला झालेलें भाषणहि थोडें उत्साहजनक आहे; जनाब जीना म्हणतात, आज रमजान ईदच्या दिवशीं उपासाच्या शेवटीं आपण मनावर ताबा ठेवायला शिकलों नाहीं तर आजची प्रार्थना फुकट आहे. खाजगी अगर सार्वजनिक जीवनांत स्वार्थ सोडून, देशाचें अंतिम हित डोळयांपुढें ठेवूं या. दुसऱ्या जातींना व धर्मांना न दुखवतां वागूं या. माझ्या तरुण मुसलमान बंधूनो, तुमचे विचार जिवंत, बदलणारे आहेत. आपणांस राजकीय हक्क जास्तींत जास्त मिळवायचे आहेत खरे, परंतु आपले देशबांधवांना न दुखवितांना. बंधुप्रेम व परमतसहिष्णुता हीं आचरणांत आणा. तोच खरा इस्लाम धर्म! दुसऱ्यांच्या हक्कांवर अतिक्रमण न करतां जेवढें मिळेल त्यांतच समाधान माना.

अशा रीतीनें यंदाचे दिपवाळीच्या मुहूर्तावर हिंदूंनीं व रमजान ईदच्या मुहूर्तानें मुसलमान बांधवांनीं परस्परांविषयीं आदर बुद्धि ठेवून आपला स्वातंत्र्यमार्ग गळयांत गळा घालून, हातांत हात घालून आक्रमूं या. आपसांतील मतभेद नाहींसे करून घटना परिषद बोलावण्यासाठीं ब्रि. सरकारला भाग पाडण्याची ताकद येऊं दे. कारण तिसरी परकीय सत्ता आहे तोंपर्यंत जातीय शक्यता निर्माण झाली कीं कोणत्या तरी पक्षाशीं सौदा करून कोणाला तरी कांहीं तरी जास्त देऊन हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दूर ढकललें जातें हें आपण ओळखून जनतेच्या प्रतिनिधींची घटना परिषद भरवून कायमची तडजोड केली पाहिजे. तरच राजाजी म्हणतात, " आपण विश्वस्त

असल्याच्या व संस्कृतिप्रसारच्या वायफळ गप्पा मारूं नका. हिंदुस्थानांतील हितसंबंधाची कमींत कमी किती पौंड शिलिंग पेन्स किंमत होते ती घेऊन पहिल्या बोटीनें इंग्लण्डांत जा, जातीजातींत शांतता राखण्याचें ढोंग नका करूं." याप्रमाणें उत्तर देतां येईल. देव करो व जिना–जवाहरलाल तडजोडीची पूर्णता होवो.

—वर्ष २, अंक ३२.

## हेला मारणें २५

विजया दशमी दिवशीं नगरदेवळें येथें श्री. अण्णासाहेब दास्ताने यांचें व्याख्यान झालें. मी समारोपाला गेलों होतों. परन्तु त्या दिवशीं तेथें हेला मारला जावयाचा होता. दरवाज्यामध्यें एक खळगा खणलेला होता. त्यांत त्या हेल्याचें मुंडकें पुरावयाचें होतें. मी खिन्न होऊन बसलों. मंडळी मला म्हणाली, 'शिलांगणाला येतां?' मी 'नाहीं' म्हटलें. माझ्या डोळ्यांसमोर कारुण्यसिंधू भगवान बुद्ध आले. यज्ञांत बकरे, बोकड बळी दिले जाऊं नये, म्हणून बुद्ध त्या राजाच्या यज्ञांगणांत उभे राहिले व म्हणाले, 'मला मार. त्या बोकडाला नको मारूं.' माझ्याजवळ कोठून येणार तें धैर्य, ती अपार भूतदया! मी म्हटलें, 'आपली शक्ति आपण ओळखावी. माझ्या सांगण्यानें काय होणार? हंसतील झालें.'

ही हेला मारण्याची पद्धत कां निघाली? काय हेतु? नवरात्रांत नऊ दिवस महिषासुराजवळ देवीनें युद्ध केलें व दहाव्या दिवशीं महिषासुरास तिनें ठार मारिलें. देवीला विजय मिळाला. त्याची आठवण म्हणून महिष मारतात. महिषासुर दिसत नाहींत, किंवा दिसत असून ते दूर करण्याची ताकद नाहीं, म्हणून हेला पकडतात व त्याला ठार मारतात.

पूर्वी एकदां महिषासुर झाला कीं नाहीं मला माहीत नाहीं. परन्तु महिषासुर हा दोन प्रकारचा आहे. एक मनांतील व एक बाहेरील. या दोघांना दूर करून माणसानें विजय मिळवावयाचा असतो. हृदयांतील

महिषासुर म्हणजे काम, क्रोध, लोभ, मत्सर यांचा संघ. ज्याच्या हृदयांत कामक्रोधांनीं ठाणीं बसलीं, त्याच्या हृदयांतून आत्मारामाची सुखदायी सत्ता नष्ट होते, कामक्रोधांची साम्राज्यशाही सुरू होते. सर्व इंद्रियांना एक दिवस मनुष्य मारतो. व आत्म्याचें राज्य स्थापतो. भगवान् बुद्धांचा विजयादशमीलाच जन्म झाला. कामक्रोधांवर विजय मिळविणारे बुद्ध या दिवशीं जन्मले. त्यांनीं हा एडका मदन, हा हेलामदन ठार केला. आत्म्याची सत्ता स्थापिली. तुकाराम महाराजांनीं म्हटलें आहे :

रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग
अंतर्बाह्य जग आणि मन ॥ १ ॥

रात्रंदिवस युद्ध आहे. गरिबाला पिळणारी बाहेरची दुष्ट राजकीय सत्ता हा हेला, हृदयांतील कामक्रोध हा दुसरा हेला. या दोन्ही हेल्यांशीं संत झगडतात. समाजांतील अस्पृश्यतेसारख्या गुलामीच्या चाली. त्यांच्या विरुद्ध संतांनीं बंड केलें. मिरासदारांची मिरासी, वरिष्ठ वर्णीयांची खोटी घमेंड व आसुरी वृत्ति असा हा रूढीचा दुष्ट हेला संत मारायला उठले. त्याचबरोबर हृदयांतील हेलाहि मारावयास ते झटत.

बंधूंनो, तो म्हशीचा हेला नका आतां मारूं; हृदयांतील व समाजांतील हेले दूर करा. ज्यानें मनांतील लोभ दूर केला तोच निर्लोभ व निर्भय वीर बाहेरचा हेलाहि दूर करूं शकतो. महात्माजींनींहि मनांतील हेले मारीत मारीत बाहेरचे सामाजिक व राजकीय पद्धतींचे हेले दूर करण्याचें बळ मिळविलें.

जगांतील साम्राज्यशाह्या म्हणजे बाहेरचा हेला. गरिबांवर या साम्राज्यशाह्या डोळे वटारतात, शिंगें उगारतात; गरिबांचे संसार धुळींत मिळवितात. तसेंच भांडवलशाही, अमुक वर्ण श्रेष्ठ तमुक श्रेष्ठ असली भांडवलशाही, याहि हेले पद्धतीच. या नष्ट करण्यासाठीं जो उठेल त्याला हेला मारण्यांतील अर्थ समजला. हिंदी जनतेला हे आसुरी पद्धतींचे राजकीय व सामाजिक हेले दूर करावयाचे असतील तर मनांत निर्भय व निःस्वार्थ होऊन उठावें. आपसांतील भांडणें दूर करून उठावें. निःस्वार्थ वीरांचाच संघ विजयी होऊं शकतो.

जहागिरदार संस्थानिक हे हेले मारतात. परंतु स्वतःच्या प्रजेला ते छळतील तर त्यांची राजवट, म्हणजेच हेल्यासारखी होते. या संस्थानिकांनीं

श्रीमंतांनीं म्हशीचे हेले न मारतां, आपली जुलमी सत्ता नष्ट करावी, किसान कामगारांचें कल्याण करावें, स्वतःचे कामक्रोध, लोभ, मत्सर कमी करावे. असें ते करतील तरच खरी विजयादशमी, तरच खरें सीमोल्लंघन. सीमोल्लंघन केल्याशिवाय विजय नाहीं. प्रांतांनीं प्रांताबाहेर, देशांनीं देशाबाहेर पाहिल्याशिवाय जगांतील परिस्थिति, विचार-वारे समजल्याशिवाय कसा विजय मिळेल? दुसरें पहावयास शिकलें पाहिजे. मनुष्य आपलें घर, आपला देह, आपला संसार, स्वतःचीं सुख–दुःखें यांच्या पलीकडे न पाहील तर कोठला विजय?

मी माझ्या लहानग्या संसाराची सीमा ओलांडून पलीकडे असणारे लाखो बंधू–भगिनींचे संसार पाहिले पाहिजेत. माझ्या डबक्यांतून मी मधून मधून नदींत व मधून मधून सागरांत गेलें पाहिजे; विशाल दृष्टीचें झालें पाहिजे. हिंदूंनीं हिंदुत्वाची सीमा ओलांडून मुसलमान बंधूंशीं जावें; स्पृश्यांनीं अस्पृश्यांजवळ जावें, जरा सीमा ओलांडा. दुसऱ्याला हृदयाशीं धरा. माझे दोन भाऊ आहेत. मरतांना या दोहोंचे २०० तरी मी केले असतील, माझें बंधुत्वाचें नातें अनेकांशीं जोडलें असेल तर मी सीमा ओलांडली. आपल्या जातीबाहेरचे; या आपल्या धर्माबाहेरचे किती नवीन मित्र जोडले, किती सीमा ओलांडली, तें दर वर्षीं माणसानें पहावें. ज्याच्या ज्याच्याबद्दल दुजाभाव वाटतो, त्याचेजवळ जाऊन म्हणावें " सहनाववतु सहनौ भुनक्तु " ये एकत्र राहूं, एकत्र खाऊं, एकत्र शिकूं, जगांत खरी शांति आणूं. जीवनाची संकुचित सीमा ओलांडून जो असा दरसाल, दरदिन, दरघडी पुढें जातो, तो विजयी होतो. त्याला शत्रूच शेवटीं रहात नाहीं. त्याला व्यक्ति शत्रु नाहींत. सामाजिक, राजकीय जुलमी पद्धति एवढाच मग त्यास शत्रू उरतो व त्यांवरहि तो विजय मिळवितो. हें खरें सीमोल्लंघन करूं या, विजय मिळवूं या. विजयादशमीसच कॉंग्रेसनें लढा पुकारण्याचें ठरविलें आहे. कॉंग्रेसमंत्री राजीनामे देणार. पुढें लढा पेटला तर सारे तयार रहा. भांडणें मिटवून, स्पृश्यास्पृश्य भेद दूर करून, हृदयांतील स्वार्थ–मत्सर कमी करून या जगांतील साम्राज्यशाहीरूप हेले दूर करण्यासाठीं तिरंगी झेंड्याखालीं एक आवाजानें उभे राहूं या.

—वर्ष २, अंक ३०.

## 'साक्षरता प्रदर्शन' २६

अंमळनेरच्या साक्षरता-प्रदर्शनांत जळगांवच्या साक्षरता समितीचें चित्र व अंमळनेरच्या श्री. टिल्लू व श्री. सोनार या शिक्षकांनीं काढलेलीं एकूण ५०।६० चित्रें होतीं. हीं चित्रें समजावून सांगतांना जवळ जवळ व्याख्यानेंच द्यावीं लागत. लोक किती शिकतात तें पाहूं. परन्तु ३।४ हजार बायामाणसांच्या कानांवर प्रदर्शनाच्या निमित्तानें निर्भय व निर्मळ विचार गेले, हेंहि एक मोठेंच काम झालें. चित्रें काय होतीं, आम्हीं कसें सांगत असूं याची कल्पना खालील वर्णनावरून थोडी होईल.

**चित्र** :—एक शेतकरी कर्जाच्या बोज्याखालीं वांकला आहे, त्याच्या हातापायाच्या काड्या झाल्या आहेत. कोंपऱ्यांत एक कामगार क्षयरोगानें पडला आहे. एका बाजूस भटजी शनिमाहात्म्य वाचिताहेत.

असें हें चित्र होतें. आम्ही सांगत असूं :

हा पहा शेतकरी. हा दुनियेला पोसतो. खंडोगणती धान्य निर्माण करतो. परन्तु त्याच्या पोटाला भाकर नाहीं. त्याचीं मुलेंबाळें उपाशी. त्याच्या बायकोला नीट वस्त्र नाहीं. कां हें असें? हा अन्याय नाहीं का? त्याला असो नसो, सावकार जप्ती आणतो. त्याला असो नसो तहशील चुकत नाहीं. त्याच्या धान्यावर दुनियेचा हक्क; परन्तु तो उपाशी आहे. त्याचें धान्य विकून व्यापारी हवेल्या बांधतात; परन्तु त्याचें घर पावसांत गळतें. जगाला हा सुखाच्या स्वर्गांत ठेवतो, परन्तु स्वतः उपासमारीच्या, गुलामगिरीच्या, अपमानाच्या, नरकांत राहतो. असें कां? आणि हा पहा कामगार. त्याच्या अंगावर कपडा नाहीं. त्याचे गाल बसले आहेत. क्षयी आहे तो. त्याच्या भोंवतीं डांस गुणगुणत आहेत. हा कामगार हजारों वार कपडा तयार करतो; परन्तु त्याच्या अंगावर चिंधी नाहीं. त्याला पगारी रजा नाहीं. कोठला दवा, कोठली चांगली हवा? असें कां? शेतकरी, कामकरी दैवाला बोल देतात. भटजीकडे जाऊन म्हणतात, 'कुंडली पहा. ग्रहमान बघा. साडेसाती आहे का बघा.' हे कुड-

बुड्ये जोशी म्हणतात; ‘ शनि वांकडा आहे. दान करा, अभिषेक करा.’ शनि हा सूर्यचंद्रासारखा एक ग्रह आहे. भिंगांतून पाहूं तर त्याचें रूप दिसेल. तो वांकडें पहात नाहीं. तो कंदिलासारखा जळत आहे. वांकडें जर बघत असेल कोणी तर तो मालक बघतो. गिरणीचा मालक पगारी रजा देईल, हवेशीर चाळी बांधील, तर कामगार जगेल. सावकार छळणार नाहीं. सरकार तहशील कमी करील, तर शेतकरी जगेल. शनि नाहीं, मंगळ नाहीं. साडेसाती नाहीं, कांहीं नाहीं. आपण विचार केला पाहिजे. जगांत काय चाललें आहे, ही अशी स्थिति कां हें समजून घेतलें पाहिजे, संघटना केली पाहिजे. यासाठीं शिकलें पाहिजे.

**चित्र** :—गाडींत एक ढब्बू गृहस्थ आहे. त्याची गाडी मरतुकडा मजूर ओढीत आहे. ढब्बू त्याला जोरानें ओढ असें हात लांब करून सांगत आहे. .

हें पहा चित्र. श्रीमंतांचे संसार तुम्ही चालवले आहेत. त्यांचे गाडे तुम्ही ओढीत आहांत; परन्तु तुम्ही मेलेत तरी त्यांना पर्वा नाहीं. त्या मजुराचें पोट पाताळांत गेलें आहे. या ढब्बूचें पोट बघा. तरीहि गाडी जोरानें ओढ म्हणून म्हणतच आहे. तेलाच्या गिरण्यांतून १२।१२, १४।१४ तास काम करून घेतात. मेलेत तर दुसरे मिळतील म्हणतात. तुम्ही हें ओळखून घेतलें पाहिजे कीं, सारी दुनिया आपल्यावर जगते. आपण नांगरलें नाहीं तर हे का माती खातील ? गाडा खालीं ठेवूं या. संप पुकारूं या. मग हे मरूं लागले म्हणजे ताळ्यावर येतील. परन्तु आपली एकी हवी. इतर देशांत किसान, कामगार, कसे पुढें आले तें वाचलें पाहिजे.

**चित्र** :—तीन फणांचा एक सर्प. मधली फणा साम्राज्यसरकारची. एका बाजूची भांडवलवाल्यांची, दुसऱ्या बाजूची धर्माच्या गप्पा मारणारांची.

हें पाहा भयंकर चित्र. हा विषारी साप फुस्फुस करीत आहे. कोणावर फूत्कार करतो ? गरिबांवर, श्रमणाऱ्या जनतेवर. हा मधला साप म्हणजे कलेक्टर, गव्हर्नर वगैरे. हा सरकारी साप. परन्तु या सापाला दुसरे साथ देतात. ही भांडवलवाल्यांची फणा. हे सरकारच्या पाठीशीं असतात. कलेक्टर, प्रांत यांना ते पानसुपाऱ्या करतील. कोणा सावकारानें शेतकऱ्याला केली का पानसुपारी ? कामकऱ्यांनीं संप केला कीं, मालकाचें संरक्षण

करायला साऱ्या फौजा उभ्या राहतील. मालकहि सरकारला कर्ज देतो, मदत करतो. आणि ही तिसरी फणा धर्माच्या नांवानें भुलवणाऱ्यांची. हे सांगतात, 'श्रीमंतानें पूर्वजन्मीं पुण्य केलें म्हणून तो गादीवर, तूं पाप केलेंस म्हणून दुःखांत.' असला चावटपणा हे चालवितात. रात्रंदिवस उन्हातान्हांत कष्ट करणारा तो का पापी? त्याच्या घामाचा एक थेंब या सर्व शेठजींना उद्धरील. परन्तु ही पवित्र धर्मगंगा त्यांना पापाची वाटते. गादीवर लोळणारा ऐतोबा पुण्यवान आणि श्रमानें जगणारा म्हणे पापी! असा हा तीन फणी साप आहे. या सापाला पकडावयाचें असेल तर शहाणे व्हा. जगाचा इतिहास शिका. लिहा, वाचा. तुमच्या हातांत ज्ञान आलें म्हणजे हा साप पकडतां येईल. मग त्याचे विषारी दांत काढून घेऊं. गारुडी सापाला निर्विष करून त्याचा खेळ करतो. आपणांस साप मारावयाचे नाहींत. त्यांना निर्विष करावयाचें आहे. समजलें ना?

**चित्र :**—एक उंसाच्या गुऱ्हाळासारखें चित्र. चरकांतून माणसें चिपाडाप्रमाणें होऊन बाहेर पडत आहेत.

हें चित्र पहा व रडा. हें गोड गुऱ्हाळ नव्हे. हें जीवन-मरणाचें गुऱ्हाळ आहे. यांत माणसें पिळलीं जातात. शेतकऱ्यांत, कामकऱ्यांत त्राण राहिलें नाहीं. आपल्यामधील एक चांभार कामगार रक्त ओकला. पुन्हां दोन दिवस गेल्यावर कामावर गेला. पुन्हां रक्ताची गुळणी. कोठें जाणार तो? कामावर न जाईल तर खाईल काय? कामगारांनीं युनियनमार्फत २५ रु. देऊन त्यास नाशिकला जा सांगितलें. परन्तु गरीब कामगार किती देणार? हें मालकाचें काम आहे. कामगारांचे मायबाप त्यांनीं झालें पाहिजे. ती कृतज्ञता आहे. परन्तु आज कोण लक्ष देतो! हिंदुस्थानांत अशी ही भेसूर हिंसा चालली आहे. ही केव्हां थांबणार?

**चित्र :**—एक मुलगा पतंग उडवूं बघत आहे. परन्तु त्याला एक भलें मोठें वजन त्यानें बांधलें असल्यामुळें पतंग उडत नाहीं.

या चित्राचा समजला का अर्थ? मुलग्याचा पतंग उडेल का? पतंगाला रंगीत कागद, नीट मांजा, सारें आहे. परन्तु हें अदमणाचें वजन जर त्याच्या शेंपटीला बांधलें तर पतंग कसा उडेल? त्याप्रमाणें आपल्या देशाची मान उंच व्हावी, देश वर जावा, म्हणून कितीहि खटपटी केल्या

तरी अज्ञानाचें दडपण जोंपर्यंत प्रत्येकाच्या मानेवर आहे, तोंपर्यंत देश कसा वर जाईल ?

**चित्र** :—सुखाचा व स्वातंत्र्याचा सूर्य वर आहे. परन्तु अज्ञानाचे ढग घराभोंवती असल्यामुळें त्याचा प्रकाश मिळत नाहीं. मशिदी, मंदिरें, चर्च, त्या चित्रांत आहेत, ढगांत गुरफटलेलें गांव आहे.

हें चित्र नीट समजून घ्या. देवाची अशी का इच्छा असेल कीं तुम्हीं दुःखांत असावें ? आईला कधीं वाटतें का, आपलीं लेकरें दुःखी असावीं ? परमेश्वर जगन्माउली आहे. त्यानें आपल्या सुखाचा सूर्य सर्वांसाठीं तळपत ठेवला आहे. परन्तु ढग आड आले तर ? हें आपलें अज्ञान आड येतें, व सुखाचा किरण घरांत येत नाहीं. येथें हीं मंदिरें, मशिदी, चर्च दाखवले आहेत. याचा अर्थ हा कीं हिंन्दुस्थानांत नाना धर्म आहेत. मशिदींत, मंदिरांत, चर्चमध्ये जाणारे आहेत. साऱ्यांनीं शिकलें पाहिजे. हे सारे हिंदुस्थानचेच लोक. ते आतां कोठें जाणार ? मलबार किनाऱ्यावरचे ख्रिश्चन येथेंच राहणार. या सर्वांनीं शिकावें. या मंदिरांतून, मशिदींतून सुंदर ज्ञान देणाऱ्या शाळा निघाव्यात. तेथें ज्ञानाचा प्रकाश मिळावा असा हेतु आहे. कांहीं लोकांनीं शिकून भागणार नाहीं. सारे शिका.

**चित्र** :—म्यु. टीचा मनुष्य शिडी घेऊन कंदील लावीत आहे.

तुम्ही म्हणाल या चित्रांत काय आहे मोठेंसें ? परन्तु त्यांत फार अर्थ आहे. म्यु.टीस सांगाल का कीं, एका गल्लींत दिवा लावला म्हणजे सर्व शहराला पुरे ? नाहीं. असें म्हणणार नाहीं. दिवा प्रत्येक गल्लींत हवा. गल्लींत दहा दहा दिवे हवेत. ज्ञानाचें असेंच आहे. आपण म्हणतों, “ बामणांनीं शिकावें, कुणब्यांनीं कशाला ? ” परन्तु तुम्ही म्हणाल का, “ बामणांच्या गल्लींत म्युटीनें दिवा लावावा. किसान कामगारांच्या गल्लींत नको ? ” तुम्ही म्हणणार नाहीं. त्याप्रमाणें ज्ञानाचा दिवा सर्व जातींत गेला पाहिजे. जो जो माणूस म्हणून आहे, त्याला ज्ञान हवें; लिहितां वाचतां आलें पाहिजे. खरें ना ?

**चित्र** :—शेताच्या बांधावर एक सुखी शेतकरी बसला आहे. दुसरा एक दुःखी शेतकरी त्याच्या समोर उभा आहे.

हें चित्र शेतकऱ्यांनीं नीट बघावें, हा शेतकरी आनंदी आहे. हा

दुसरा रडत आहे. कां बरें असें ? तो दुःखी शेतकरी त्या सुखी शेतकऱ्याला विचारतो, " तूं कां सुखी, मी कां दुःखी ? तूं काय पुण्य केलेंस, मी काय पाप केलें ? " त्या सुखी शेतकऱ्याच्या हातांत ती पहा वही आहे. ती जमाखर्चाची वही आहे. तो सांगतो. " मी जमाखर्च नीट ठेवतों. हिशोब ठेवतों. सावकार, सरकार ह्यांचे जवळून पावती घेतों. यंदा पीक आलें नव्हतें. मामलेदाराला हिशोब दाखविला. त्यानें सारा सूट दिली. तूंहि गेला होतास सारा-मांफी मागायला. मामलेदार म्हणाले, " जमाखर्च दाखव. " तुला दाखवतां आला नाहीं. ज्ञान हवें, लिहिणें वाचणें आलें पाहिजे. माझ्याप्रमाणें शीक. रात्रीच्या कॉंग्रेसनें काढलेल्या वर्गांमध्यें जात जा.

**चित्रः**— तुरुंगांत कैदी शिकत आहेत. त्यांना कॉंग्रेसचे मंत्री शाबासकी देत आहेत.

हा तुरुंगाचा देखावा आहे. पूर्वीं कैद्यांचे फार हाल होत. त्यांना तेथें माणुसकी नसे. परन्तु चोर तरी चोरी कां करतो ? त्याला खायला नसतें, धंदा मिळत नाहीं. कॉंग्रेसच्या लक्षांत हें सारें आहे. तुरुंगांत हाल न करतां या पहा शाळा काढल्या आहेत. सारे कैदी शिकत आहेत. हे कॉंग्रेस मंत्री या कैद्याला शाबासकी देत आहेत. तुरुंगांतहि शाळा निघाल्या, मग तुमच्या घरीं नाहीं का शाळा सुरू करणार ! मुलांबाळांजवळ शिका. तुरुंगाहून घरें नीच करूं नका.

**चित्रः**— या एका चित्रांत दोन भाग आहेत. या इकडे बाजारांत माळणी भाजी विकण्यास बसल्या आहेत. एक पोलिस येऊन त्यांची भाजी खुशाल उचलीत आहे. परन्तु या दुसऱ्या चित्रांत बघा. एक माळीदादा हातांत कागद–पेन्सिल घेऊन उभा आहे. तो पोलिसास नांव विचारीत आहे. पोलिस हात जोडीत आहे. ही खरी गोष्ट आहे. पोलिस पुन्हां माळणीस त्रास द्यायला आला नाहीं. त्या माळणी माळ्याला म्हणाल्या, ' तूं काय मंत्र म्हटलास ? तें भूत आतां येत नाहीं. ' माळी म्हणाला, ' ज्ञानाचा मंत्र. नांव टिपतो म्हणतांच पळाला. ' तुम्हीहि लिहायला शिका. ज्ञान म्हणजे देव. तो जवळ असला म्हणजे भीति नाहीं. शिकलेला मनुष्य सर्वत्र जाईल. आपणांला सर्वत्र भीति. शिका म्हणजे निर्भय व्हाल.

**चित्रः**— या चित्रांत ही बाई आहे. ती घरचें पत्र दुसऱ्याकडून वाचून घेत आहे. मग ओशाळली आहे. आपल्या घरांतील भानगडी दुसऱ्यास कळल्या म्हणून तिला लाज वाटत आहे. परन्तु तिला स्वतःला लिहितां वाचतां येत असतें तर घरची अब्रू घरांत राहती. अडाण्याची अब्रू जगांत रहात नाहीं. अब्रूसाठीं तरी शिका.

**चित्रः**— ही बाई दुःखी आहे. तिचें मूल डोळे चोळून ओरडत आहे. कां बरें ?

या पहा दोन बाटल्या. एकींत जखमेवर लावावयाचें औषध आहे. त्याला ऑयोडिन म्हणतात. दुसऱ्या बाटलींत डोळ्याचें औषध आहे. बाटल्यांवर चिठ्या आहेत. परन्तु बाईला वाचतां येत नाहीं. तिनें ऑयोडिन डोळ्यांत घातलें. डोळ्यांची आग होऊन मुलगा रडत आहे. मुलाचा डोळा फुटला तर कोण जबाबदार ? पदोपदीं लिहिण्यावाचण्याविना अडतें.

**चित्र :**— एका खेड्यांतील शेतकऱ्याकडे हा पोष्टमन् मनिऑर्डर घेऊन आला आहे. तो त्याला विचारतो, 'सही येते का ?' शेतकरी म्हणतो, 'नाहीं' 'मग साक्षीदार आण.' पोष्टमन् म्हणतो, साक्षीदार त्यावेळेस मिळत नाहीं. पोष्टमन् त्यावेळेस मनिऑर्डर देत नाहीं. पुन्हां आठ दिशीं येईन म्हणतो. घरांत बायको आजारी असते. मुलगा पोष्टमन्‌ला हात जोडतो, म्हणतो. 'आईसाठीं दे.' परन्तु पोष्टमन् जातो. पहा हा परिणाम. पैसे येऊनहि मिळत नाहींत. अज्ञान दूर करा.

**चित्र :**—रेल्वे स्टेशनचा देखावा. हे पंढरपूरला जाणारे एका खेड्यांतील शेतकरी. एक शेतकरी एका सुशिक्षितास हें तिकिट पंढरपूरचें का विचारतो आहे, तो होय म्हणतो. शेतकरी विचारतो, 'किंमत काय ?' तो म्हणतो '४॥ रुपये.' शेतकरी म्हणतो, 'आमच्याजवळून ४ रुपये ११ आणे घेतले. आम्हीं मास्तरला विचारलें, तिकीट का वाढलें ? तो म्हणाला तिकीटाचे पैसे आषाढी एकादशीस वाढतात.' तो सुशिक्षित म्हणाला, 'एकादशीला रताळीं, शेंगा, खजूर, यांचा भाव वाढतो. रेल्वे तिकिटाचा कसा वाढेल ?' शेतकरी म्हणतो, 'आम्हांला काय कळे ?' अशी अज्ञानानें फजीति होते. स्टेशन कोणतें आलें कळत नाहीं. तिकिट कोठलें आहे, त्याची

किंमत काय आहे, तें समजत नाहीं. गाडी कोठें जाणारी हें वाचतां येत नाहीं. अज्ञानामुळें मनुष्य परावलंबी होतो. फजित होतो.

तुकाराममहाराजांनीं म्हटलें आहे :

'अवगुणां हातीं । आहे अवघीची फजीती.'

गुणीं राष्ट्रें सुखी होतात. अडाणी राष्ट्रें दुःखी होतात.

**चित्र** :—ही ज्ञानाची ज्योत आहे. हे सारे हात जोडून उभे आहेत. याचा अर्थ कळला का? तुम्ही दिवा देखून नमस्कार करतां. परन्तु खरा दिवा कोणता? रॉकेलचा नाहीं, गोडे तेलाचा नाहीं, बॅटरीचा नाहीं, खरा दिवा ज्ञानाचा. समजा, तुम्ही हातांत बॅटरी घेऊन चाललेत, रस्त्यावर पाटी आली, खांब आला. हा धुळ्याचा रस्ता असें त्यावर लिहिलें आहे. परन्तु तुम्हांला वाचतां येत नाहीं. तुम्ही दुसऱ्या रस्त्याला गेलांत, तिकडून कोणी येऊन विचारलें 'कोठें चाललेत?' सांगितलें धुळ्याला चाललों. तर तो हंसेल व म्हणेल 'हा रस्ता पारोळ्यास चालला.' हातांतील बॅटरी कांय कामाची? ती विंचू कांटा फार तर दाखवील. परन्तु मुक्कामास नेणार नाहीं. म्हणून ज्ञानाचा दिवा हवा. तरच मुक्कामावर पोंचाल. नाहीं तर स्वातंत्र्याकडे जाण्यास निघून पारतंत्र्याकडे जाल. ध्यानांत धरा कीं ज्ञान म्हणजे परमेश्वर. त्याची पूजा करा. हा ज्ञानाचा दिवा घरोघर आणा व म्हणा 'हे ज्ञानदेवा, आजपर्यंत आम्ही हयगय केली. आतां तसें करणार नाहीं. मुलें-मुली, बाया-माणसें, तरुण, वृद्ध, सारे शिकूं. देशाची मान खालीं होऊं देणार नाहीं.'

अशीं अनेक प्रकारें चित्रें व त्यांतील अर्थ आम्ही समजून देत असूं. यावरून कल्पना येईल. शेतकरी, कामकरी, स्त्री-पुरुष यांना बरोबर पटे. आम्हीं शिकूं म्हणत. शिकून नोकऱ्या-चाकऱ्या नाहीं मिळवावयाच्या, मामलेदारी नाहीं मिळवायची. माणुसकीसाठीं शिकायचें. पोटाला धान्याची भाकर, तशी बुद्धीला ज्ञानाची भाकर. जर डोकें खोकें राहिलें तर आपल्या संसाराला शेंकडों भोकें पडतात. हातीं रहात नाहीं कांहीं. सर्वत्र फजीति व अपमान हें सारें त्यांना पटे.

गांवोगांवच्या बंन्धुभगिनींनो, घरोघर लिहिणेंवाचणें शिका. शाळेंत जाणाऱ्या मुलांपासून शिकून घ्या. दीडशें वर्षे इंग्रजानें राज्य करून शेंकडा १० लोक साक्षर! आपण कॉंग्रेस मंत्र्यांच्या कारकीर्दींत ९० साक्षर व १०

निरक्षर अशी उलटापालट करूं या. १९४० सालीं म्हणजे पुढील वर्षी खानेसुमारी होईल. त्या वेळेस हिंदुस्थानांत सारे साक्षर असें लिहिलें जाऊं दे. म्हणजे इंग्रज येथें राज्य करण्यास नालायक आहे हें सिद्ध होईल. हिंदुस्थानचें तोंड येत्या खानेसुमारींत साक्षरतेच्या बाबतींत तरी उजळ करूं या. लागा या कामास गल्लीगल्लींतून, घराघरांतून, रात्रीं–पहाटे तास अर्धा-तास सारे शिका. प्रचंड मोहीम सुरू करा. येत्या विजयादशमीस प्रत्येक घर सुशिक्षित आहे, साक्षर आहे, असें आपण दाखवूं या. ज्ञानाचा झेंडा प्रत्येक घरावर फडकवूं या.

—वर्ष २, अंक १९.

## विद्यार्थी परिषद २७

वरील विद्यार्थी परिषद् ठाणें येथें ता. ३ व ४ नोव्हेंबर रोजीं कॉ. मीनाक्षी कऱ्हाडकर यांचे अध्यक्षतेखालीं पार पडली. सभेचें उद्घाटन श्री. साने गुरुजी यांनीं केलें. उद्घाटन प्रसंगीं साने गुरुजी यांनीं केलेलें भाषण खालीं दिलें आहे :

विद्यार्थ्यांनो, तुमच्या या परिषदेचें उद्घाटन करण्यासाठीं तुम्ही मला बोलावलें आहे. शाळा व विद्यार्थी यांचा संबंध सोडून मला बरेच दिवस झाले. मी अलिकडे खानदेशांत शेतकऱ्यांमध्यें व कामगारांमध्यें काम करीत असतों.

शेतकऱ्यांत हिंडणाऱ्या माणसाला तुम्ही आज विद्यार्थ्यांच्या या मेळाव्यांत बोलावून आणलें याचा अर्थ काय ? याचा अर्थ हाच कीं, विद्यार्थी व किसान हे राष्ट्राचे महत्त्वाचे दोन घटक कांहीं तरी तसाच महत्त्वाचा संबंध असल्यामुळें एकत्र जोडले आहेत. दोघांच्या ऐक्याचा, एकजुटीचा सांधा आज दाबला जात आहे.

आजची वेळ मोठी आणिबाणीची आहे. आज महत्त्वाचे प्रश्न आपल्या समोर उभे राहिले आहेत. विद्यार्थी चळवळ व विद्यार्थी संघ अजून बाल्या-

वस्थेंत आहेत. १९३३ नंतर हिंदुस्थानांत ही चळवळ सुरू झाली व आतां जिल्ह्यांत ऑ. इं. स्टू. फे. च्या शाखा पसरल्या आहेत व याचेंच प्रत्यंतर म्हणजे आजची ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची ही संयुक्त परिषद होय.

विद्यार्थी परिषदांवर नेहमीं आक्षेप घेण्यांत येतो कीं, या परिषदा म्हणजे विद्यार्थ्यांच्या मौल्यवान काळाचा व श्रमाचा अपव्यय होय. समाजाच्या प्रश्नांशीं आपला संबंध जोडणें हेंच खरें शिक्षण होय. शाळेंतील शिक्षण हें अपुरें शिक्षण आहे. जगांतील अत्यंत पुढारलेले विचार आज विद्यार्थ्यांपुढें येत नाहींत ते येणें अवश्य आहे. विद्यार्थी परिषदेचें महत्त्व या दृष्टीनें अतिशय आहे. खरें शिक्षण कोणतें या बाबतींत एका वंदनीय समाजसेवकानें दिलेलें उत्तर मी जन्मांत विसरणार नाहीं. त्रिखण्ड जगाचा प्रवास करून हिंदुस्थानांत आल्यावर गु. अण्णासाहेब कर्वे यांनीं मिठाच्या सत्याग्रहाचें एक दृश्य पाहिलें. ते म्हणाले, " आज माझ्या डोळ्यांचें पारणें फिटलें. शिक्षणाचें उद्दिष्ट म्हणजे आत्म्याची जागृति करणें. तें ह्या सामुदायिक सत्याग्रहानें सफळ झालें आहे ! " शिक्षण तेंच कीं जें आपणाला जनतेच्या सुखदुःखांत एकरूप करील. शाळेंतील शिक्षणांतून जेवढें घेतां येईल तेवढें घ्या आणि बाकीच्या शिक्षणासाठीं, आत्म्याच्या भुकेच्या समाधानासाठीं समाजाकडे पहा दुसऱ्याचीं सुखदुःखें जाणून घ्या. स्वतःच्या सुखदुःखांबरोबर दुसऱ्याच्या सुखदुःखांची कल्पना असणें हें विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. आणि ती कल्पना करून घेणें हें विद्यार्थ्यांच्या अशा मेळाव्यांत सुलभ आहे. बाकीच्या गोष्टी दूर ठेवा, समाजांत जास्तींत जास्त मिसळा. तुम्हांला नवे नवे अनुभव येतील. चोर देखील समाजाचा उपकारकर्ता आहे. तो श्रीमंताच्या घरचीं घाण चवाठ्यावर आणतो. श्रम न करतां सांठविलेलें धन ही घाणच नाहीं तर दुसरें काय ?

वर्गांत तुम्हीं इतिहास शिकत असाल, त्याचबरोबर जीवनाचें पुस्तक वाचायला, त्यांतले जगाचे व समाजाचे प्रश्न हाताळायला तुम्हीं शिकलें पाहिजे व तुमच्या शिक्षकांनीं तुम्हांला शिकविलें पाहिजे ! माझ्या एका शिक्षक मित्रानें आपल्या पेशासंबंधीं कुरकुर केली तेव्हां मी त्याला विचारलें कीं, तूं आपल्या विद्यार्थ्यांजवळ कधीं चौकशी केली आहे का कीं, प्रत्येकाला कपडे

किती आहेत, त्याच्या पालकाचें उत्पन्न किती आहे म्हणून ? त्यानंतर त्यानें मला तशी चौकशी करून सांगितलें कीं, एका मुलापाशीं २ डझन कपडे आहेत तर एकापाशीं अवघा एक शर्ट आहे. एकाच्या मालकीचे ३ बंगले आहेत तर एक ३ रु. च्या भाड्याच्या खोलींत आहे. या विषमतेचा विचार तुमच्या डोक्यांत कधीं येतो का ? बीजगणिताचे प्रश्न तुम्हीं वर्गांत नेहमीं सोडवतां पण असल्या विषमतेचे, दारिद्र्याचे प्रश्नांचा विचार कधीं करतां का ? हा प्रश्न कोण सोडवील ? अशी ही सामाजिक विषमता कां असावी याचा विचार करा ? वर्गावर्गांतले हे प्रश्न समजूं लागले तर समाजासंबंधींचे गहन प्रश्न सहज समजूं लागतील.

कोणी म्हणतील हें सारें लहानपणीं कां ? हें सारें भयाण आहे. मुलांच्या कोंवळ्या बुद्धीवर त्याचा ताण पडेल. पण माझ्या एका भाच्याची गोष्ट सांगतों ती ऐका. त्याला समुद्राची फार भीति वाटायची. मीं त्याला अलिबागला आल्यावर मुद्दाम समुद्रावर घेऊन गेलों. त्याला समुद्राचें सौम्य स्वरूप समजावून सांगितलें. लाटांमुळें व वाहत्या वाळूमुळें पाण्याला कशा गुदगुल्या होतात हें समुद्रांत पाय टाकल्याखेरीज समजणार नाहीं हें पटविलें. समुद्रांत नांव ढकलायची असेल तर आधीं ढोपरभर पाण्यांत शिरलं पाहिजे. कधीं गळाभर पाण्यांत डुबलं पाहिजे. जिवन-सागराचें असेंच आहे ! विद्यार्थ्यांना पुढें समुद्रांत यावयाचं आहे ना, मग त्यांना समुद्रापासून दूर ठेवूं नका. विद्यार्थ्यांनो, शाळेच्या परिक्षेंत ३३ टक्के गुण मिळविण्यापुरताच अभ्यास करा आणि बाकी वेळ इतर कामांत घालवा.

शाळेच्या चालकांच्या हरकती येतील पण त्याकरितां का आपण अडून बसायचं ? विद्यार्थ्यांना नित्य राजकारण नसेल पण नैमित्तिक राजकारण अवश्य आहे ! कॉंग्रेस प्रचार, किसान संघटना, कामगार संघटना, हीं कामें विद्यार्थ्यांनीं अवश्य हातीं घेतलीं पाहिजेत. विद्यार्थि जग व बाहेरील जग यांची फारकत करूं नका. समाजाचे प्रश्न हे सामाजिक स्वास्थ्याप्रमाणें आहेत. समजा, एखाद्या शहरांत कॉलरा आला तर हेडमास्तर 'बस इथं भूमिति सोडवीत' असं नाहीं ना सांगणार ? आग लागली तर स्वस्थ बसून शिस्त पाळायला नाहीं ना लावणार ? मग सामाजिक, राष्ट्रीय प्रश्न जर असे नैमित्तिक स्वरूपांत आले तर त्यांचें स्वागत विद्यार्थ्यांनीं अट्टाहासानें केलें पाहिजे.

आमच्या खानदेशांत कामगारांची सभा झाली, किसानांचा मोर्चा निघाला कीं, विद्यार्थी पुस्तकें टाकून आपल्या देशबांधवांकडे येतो.

अनेक मोठमोठाले प्रश्न समाजापुढें उभे ठाकले आहेत; त्यांना घाबरूं नका. तोंड द्या! जगाचे प्रश्न धाडसानें हाताळले पाहिजेत. शाळेंत तुमची शारीरिक तपासणी करतांना लॉंग साईट किंवा शॉर्ट साईट कशी काय आहे तें सांगतात. पण इनसाईट कशी काय आहे ह्याची परीक्षा होते का कधीं? ... आज राष्ट्राला एकच रोग झाला आहे. हार्ट डिसीज ... तुमच्या परीक्षा शाळा कॉलेजांतच नाहीं होत, बाहेरहि होत आहेत. भावना व विचार, डोकं व अंतःकरण हीं दोन्ही आवश्यक असतात. झाडाचीं मुळें उत्तरच दिशेला पसरलेलीं का कोणी पाहिलीं आहेत! घराच्या खिडक्या अमुक एका दिशेलाच असाव्या असें का कोणी म्हणतो? तसेंच विद्यार्थ्यांचें ज्ञान सर्व बाजूंनीं परिपूर्ण, निदान प्रयत्न-पूर्ण असावें याला काय हरकत असावी?

हिंदुस्थानांत शेंकडो जातिधर्म आहेत. पण एकच विषेश परंपरा दिसून येईल, शेंकडों प्रकारच्या जातींना त्यांच्या संस्कृति, धर्मांना एकत्र आण-ण्याचें, एकरूप करण्याचें परम कर्तव्य या देशानें आज शतकानुशतकें चाल-विलें आहे. पूर्वीं येथें अनार्य, द्रविड होते त्या नंतर आर्य आले. कांहीं दिवस भांडणें चाललीं, पण अखेर उभय संस्कृति एकरूप झाल्या. मंथनां-नंतर अमृत निष्पन्न झालें ना? तसेंच जातींजातींतील या आजच्या भांडणा-नंतर ऐक्याचें अमृत, एक नवीन समान संस्कृति निर्माण होईल. हिंदुस्था-नचा इतिहास हा अनेक संस्कृतींच्या मिलाफाचा इतिहास आहे. आम्हीं भांडलों भांडलों पण अखेर एक झालों. हिंदुमुसलमानांच्या मोठमोठ्या लढाया बऱ्याच झाल्या असतील, पण इतिहासांत हैदरअल्ली हिंदु देवतांना मोठमोठ्या देणग्या पाठवीत असे त्याचा उल्लेख कुठें आहे? हिंदुराजे मुसलमानांचे सण साजरे करीत तें कुठें लिहिलें आहे का? अकबरानें सर्व-धर्मीय संस्कृति एकरूप करण्याचा प्रयत्न केलाच होता ना? जुन्याच गोष्टी कशाला, आमच्या अमळनेरला सखाराम महाराजांच्या रथाला पहिली मोगरी मुसलमान अजूनहि देतात! कां रे बाबा? हिंदूंचा रथ आणि त्याला मुसलमान मोगरी देणार? पण ही भावना त्यांच्यांत नाहीं.

जळगांवच्या मशिदीपुढें हिंदूंना भजन करण्याची विनंति तेथील मुसलमान बांधवांनीं केली! कां? दोन्ही समाज एकाच देवाचीं लेंकरें ना! चला, करा आमच्याहि देवापुढें प्रार्थना! केवढी ही सहिष्णुता? काय हा मनाचा मोठेपणा? शिवाजी महाराज गोब्राह्मणांचे प्रतिपालक होते असें सांगण्यांत येतें. पण शिवाजी महाराज गोरगरिबांचे प्रतिपालक होते असें आपणांस इतिहास सांगेल. त्या काळीं प्रत्येक गांवीं एक गढिवाल असे. गढिवाल म्हणजे प्रत्येक खेड्यांतील सुलतान! लोकांनीं मेहनत करायची आणि त्या मेहनतीचें सर्व फळ या गढिवालानें लुबाडायचें. असले जुलमी गढिवाल दूर करण्यासाठीं शिवाजी महाराजांचा अवतार होता. अफजुलखान् म्हणजे तरी कोण? अनेक गांवांचा गढिवाल. अनेक गढिवालांचा एक गढिवाल. चंद्रराव मोरेहि तसाच. शिवाजीनें क्रांति केली पण कां केली व कशी केली हें पाहिलें पाहिजे. बहुजनसमाजाच्या सुख-दुःखनिवारणासाठीं बहुजन-समाजाच्या मदतीनें शिवाजी लढला—शिवाजीनें क्रांति केली. शिवाजीचें राजकारण धार्मिक नव्हतें, आर्थिक होतें. स्पेन दोन वर्षें असाच लढला. नादिरशहास हांकलून लावण्यासाठीं बाजीराव दिल्लीच्या बादशहाच्या मदतीस धांवला! कां? आपल्याच देशांत माळव्यांत तो बादशहाविरुद्ध झगडत नव्हता का? पण नादीरशहा परका—तिऱ्हाईत दरोडेखोर! त्याच्या विरुद्ध बादशहास मदत करण्यास तो दिल्लीस धांवला. त्यास नसतें का, दोन्ही मुसलमान आहेत. झगडूं दे आपआपसांत, असें म्हणतां आलें? पण नाहीं. परके लुटारूच आपले पहिले शत्रु! बादशहाचें उद्यां बघून घेऊं ही बाजीरावाची वृत्ति समंजसपणाची नव्हती काय? आज व्हाइसरॉय आपल्या जातीय मतभेदाकडे अंगुलीनिर्देश करतो आहे. ही संधि त्याला कां मिळावी? धर्माच्या प्रश्नामुळें समाजांत भेदभाव निर्माण झाले असतील, पण स्वातंत्र्याच्या प्रश्नापुढें बहुजन एक होतो. हिंदु आणि मुसलमान किंवा स्वजन आणि परजन अशी फाळणी करूं नका. भांडवलवाले आणि गरीब, सुजन आणि दुर्जन हेंच वर्गीकरण बरोबर आहे. लुटतो कोण? भांडवलवाले, पैसेवाले—लुटल्याखेरीज का कोणी श्रीमंत होतो? तेव्हां सुजन एक होऊं या! हे सारे प्रश्न तुम्ही पडताळून पहा. कोणत्या तत्त्वावर कोण

कसे एक होतात तें पहा. धर्मावर एक होत नाहींत. भाकरीच्या प्रश्नावर एक होतात.

आजच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितकिडे पाहूं या! आज रशियाखेरीज एकहि देश खरा लोकशाहीवादी नाहीं. इंग्लंड, फ्रान्स, अमेरिकेंत लोकशाही आहे म्हणे! पण कसली लोकशाही? बॉम्ब टाकणारी, नाहीं तर दुसरी कसली? आज पोलंडच्या स्वातंत्र्यासाठीं, लोकशाहीसाठीं इंग्लंड झगडा खेळतें पण हिंदुस्थानांत काय करतें? फ्रान्सनें आपला प्रजापक्ष हाणून पाडलाच ना? अमेरिका जपानला चीनविरुद्ध—एका स्वातंत्र्यरक्षणासाठीं झगडणाऱ्या राष्ट्राविरुद्ध लढाऊ विमानांची मदत करतेच कीं नाहीं? जगामध्यें आज लोकसत्ता नाहीं. श्रीमंत आणि गरीब यांचेमधील झगड्यावर आजवर जग चाललें आहे. समाजाचे हेच शास्त्रीय विभाग आहेत. बाकी विभाग कृत्रिम आहेत. जगांत विभागणी केव्हां व कुठें होते? चीन व जपान यांचे धर्म एकच आहेत, पण चीनविरुद्ध जपान उठलाच ना! अमेरिकाहि मिळाली त्याला! त्यांचा धर्म का एक होता? होय, आर्थिक धर्म मात्र एकच होता लुच्च्यांचा! लुटण्याचा! लुटणारे आज एक होत आहेत. संयुक्त प्रांतांत सारे जमीनदार मग ते हिंदु असोत, मुसलमान असोत, नाहीं तर दुसरे कोणी असोत एक होत आहेत. लुटणारे एक होत आहेत, तर आपण लुटले जाणारे एक होऊं या. रेडिओनें सारें जग एकत्र जवळ आलें आहे. तर आपणांस एक होण्याला काय अडचण आहे? आपणाला आघाडीवर राहायला हवें आहे. आपण आपसांत फाटाफुटीला वाव देतां कामा नये. खानदेशांत गिरणी कामगारांचा संप झाला तेव्हां मालकानें फाटाफुटीचा प्रयत्न कसा केला माहीत आहे? खानदेश व सोलापूर अशा दोन ठिकाणच्या कामगारांत तो तसला भेद माजविण्याचे त्यांचे प्रयत्न चालू झाले. पण कामगार कुठला कां असेना, काय फरक असतो त्याच्या राहणींत, त्याच्या दारिद्र्यांत, त्याच्या पिळवणुकींत? झगड्याझगड्यांतून नव संस्कृतीची निर्मिति ही हिंदुस्थानची परंपरा आहे. नदी पवित्र मानली जाते. कां? तर तिच्यांत निरनिराळ्या ठिकाणचे प्रवाह एकत्र वहात असतात. सर्व प्रवाहांचें एकरूप, एकजीव झालेला असतो नदींत. समुद्र नदीहून पवित्र मानला जातो. कां? तर त्यांत अनेक नद्यांचा सांठा एकत्र येतो,

एकत्र मिसळून जातो. मानव नदी, मानव समुद्रहि असाच पवित्र नाहीं का? निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या जातींचे प्रवाह अखेर एक. एका मानव-जातींत समावले जातात–तो मानव समुद्र महत्त्वाचा नाहीं का? पवित्र नाहीं का? या मानव समुद्रांत विद्यार्थ्यांनीं आलें पाहिजे.

हिंदी आपली राष्ट्रभाषा. पण तिच्या बाबतींतहि भांडणें चालू आहेत; तिलाहि विरोध होत आहे. ती उर्दूनिष्ठ असावी कीं, संस्कृतनिष्ठ असावी अशा भांडणांत काय अर्थ आहे! हिंदुस्थान हें एक मोठें राष्ट्र आहे. निरनिराळ्या लोकांना समजेल अशीच भाषा येथें बोलली गेली पाहिजे. हिंदु संस्कृतज्ञ माणसापुढें संस्कृतनिष्ठ भाषा बोला. मुसलमान उर्दू जाणणाऱ्यापुढें उर्दूनिष्ठ बोला. कुटुंबांत कांहीं भाऊ असले तर वडील भावाला मान मिळतो खरा सर्वांत अधिक, पण स्वार्थत्यागहि अधिक करावा लागतो. हिंदुस्थान हें मोठें राष्ट्र आहे. त्यालाहि जगांत पुढें येण्यासाठीं अधिक स्वार्थत्याग करावा लागेल, तो सहन केला पाहिजे.

आतांपर्यंत जनतेची धार्मिक विभागणी होऊं शकत नाहीं, आर्थिकच होते हें सांगितलें. तेव्हां कशासाठीं जगायचें व कशासाठीं मरायचें हें ठरवून टाका! दुःखी जनतेला सुखी करण्यासाठीं जगायचें कीं दुःखी जनतेच्या दुःखांत अधिक भर टाकण्यासाठीं? जगाचे दोन मोठे भाग आहेत. श्रीमंत दरिद्री! तुम्ही आपल्या मनाला विचारा. बाबा रे तूं कोठल्या बाजूचा?

आज आपली कॉंग्रेस साम्यवादी नाहीं तरी तिकडे जराशी झुकते आहे. तिला लाल रंग चढत आहे. राष्ट्रांत कुणीच दुःखी नको म्हणून ती उभी आहे. तिला पुढें नेण्याचें हें काम, तिला जोरानें हातीं घ्यायला लावण्याचें काम विद्यार्थ्यांनो, तुमचें आहे. कॉंग्रेसवर सर्वजण रागावतात पण म्हणून मला ती अधिक पूज्य वाटते.—ती सर्वांना सांभाळण्याचा प्रयत्न करते. वर्गसमन्वयाचा महात्माजींचा महान् प्रयत्न फसला तर कॉंग्रेसपाशीं दुसरा प्रयत्न सज्ज आहेच कीं–वर्गयुद्धाचा! महात्माजी कॉंग्रेसला थोपवून धरतील तर आपण तिला पुढें नेली पाहिजे. कॉंग्रेसवर रागावून कसें चालेल?

कॉंग्रेस मुसलमानधार्जिणी आहे म्हणे. अरे, कसली धार्जिणी नि काय घेऊन बसला आहांत रे! मुसलमान आमचेच ना? आपल्यांतलेच धर्मांतर करून गेले असें तुम्हीच म्हणतां ना? मग ते वाईट कसे रे? तुमचाच

भाग मग वाईट कां म्हणतां ? प्रार्थनेवरून आपसांत भांडूं नका. स्वातंत्र्यासाठीं परक्यांशीं—ब्रिटिशांशीं भांडा—प्रार्थनेसाठीं कुठेंहि तोंड करा पण स्वातंत्र्यासाठीं सर्वांचीं तोंडें एकाच दिशेकडे वळूं द्या ! केमालपाशानें स्वातंत्र्याच्या आणि प्रगतीच्या मार्गांत अडथळे होतात म्हणून धर्ममंदिरांचें उच्चाटन केलें तर अहरार पक्षानें सर्वांच्या अगोदर स्वातंत्र्य-संग्रामाचें रणशिंग फुंकलें.

ज्या खैबर खिंडींतून जुन्या काळीं परकी पारतंत्र्याचा हल्ला आला त्याच खिंडींतून आज देशभक्तीचा लोंढा येत आहे. १७ हजार पठाण १९३० च्या लढ्यांत मिळाले ते कां ? सत्याग्रहानें स्वराज्य कां मिळालें नाहीं म्हणून कांहींजण विचारतील. पण अंब्याचे झाडाची कोय लावून लगेच फळें येत नाहींत. ३५ कोटींच्या राष्ट्रालाहि तसाच कालावधि, झगड्यामागून झगडे करावे लागायचेच.

आज तुम्हीं मिरवणुकींतून सारेजण ‘ इन्किलाब झिंदाबाद भारतमें सैतानी राज, नामंजूर है हमको आज ’ असें क्रांतिगीत गात आलांत—हेंच गीत गात तुम्हीं खेड्यापाड्यांत जा, खेड्यांतील जनतेला भडकवा, भिंती रंगवा, एकहि भिंत रिकामी ठेवूं नका कीं, जिच्यावर ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नायनाट करा; हिंदी संपूर्ण स्वातंत्र्याचा विजय असो असें लिहिलेलें नाहीं. चीनमधील विद्यार्थ्यांनीं काय केलें ? त्यांनीं खेड्यांतील जनतेसाठीं नाट्यप्रयोग वगैरे कसले बसविले, त्याची माहिती करून घ्या आणि निदान दर रविवारीं तरी खेड्यांत जा. आतां बारीकसारीक मतभेद विसरा.

**खेड्यांतील निरक्षरता, अज्ञान, पिळवणूक, दारिद्र्य, दैन्य हातीं घेऊन तो प्रश्न धसास लावण्यासाठीं आतां विद्यार्थी संघ घसरावला पाहिजे—जगाचें चाक फिरत आहे. त्यांतून सुंदर समाजरचनेचें भांडें तयार होईल. गेल्या महायुद्धांतून रशिया निघाला; आतांचे महायुद्धांतून हिंदुस्थान निघेल !** सर्व जगाला प्रचंड आदर्श निर्माण होईल. याच क्रान्तिकारक कामासाठीं झटा ! तुमची परिषद यशस्वी होवो. नवी दृष्टी, नवा महाराष्ट्र, नवा हिंदुस्थान, नवें जग डोळ्यांपुढें ठेवा. नवी समाजरचना निर्माण करण्यासाठींच जगा. स्वातंत्र्याच्या नवीन

लढ्यांत तुम्ही संपूर्ण भाग घेऊन त्याला प्रचंड यश मिळवून द्याल अशीच माझी श्रद्धा आहे. वंदे मातरम् ।

—वर्ष २, अंक ३२.

## सडलेला समाज २८

हिंदुसमाज उच्चनीचपणाच्या कल्पनांनीं सडून गेला आहे. हें उच्च-नीचपणाचें पाणी झिरपत झिरपत खालपर्यंत गेलें आहे. साऱ्या समाजांत सर्वत्र शिवूं नको धर्म झाला आहे. परंतु शिवूं नको धर्माच्या आड आज केवळ आडदांडपणा उरला आहे. आपल्या हुकमतीखालीं अस्पृश्यांनीं राहावें असें स्पृश्यांना वाटतें. अस्पृश्यांनीं स्वाभिमानानें जगतां कामा नये, नीट-नेटकें राहतां कामा नये; पाटलांचे हुकूम ऐकले पाहिजेत. गांवांतील कोणी स्पृश्य सांगेल तें काम केलें पाहिजे. अशी अनंत गुलामगिरी आहे. अंमळनेर तालुक्यांतील अनेक गांवांच्या करुण कहाण्या कानीं येऊन स्पृश्य समाजाची झोटिंगशाही पाहून लाज वाटते. मुडी गांवीं दिपा महाराचा छळ स्पृश्यांनीं चालवला आहे. सारबेटें येथील पो. पाटलाच्या चुलत्यानें महार कामगाराला उशीर झाला म्हणून पायांतील जोड्यानें बेदम मारलें. कामगारानें फिर्याद केली आहे. एक अस्पृश्य फिर्याद करतो यानें चिडून तेथील पो. पाटलानें दडपशाही सुरू केली आहे असें कळतें. टाकरखेड्यास घरें बांधण्यासाठीं हरिजनांना प्लॉट्स मिळावे म्हणून केलेल्या अर्जास सरकारची मंजुरी आली. परंतु त्या नंबरावर मराठ्यांचीं खळीं असतात म्हणून त्यांचा हरिजनांवर म्हणे बहिष्कार. शिरूडला मेलेल्या ढोराचें कातडें स्पृश्य हक्कानें परत मागतात. तें न ऐकल्यामुळें आज ३॥ वर्षें बहिष्कार; सर्व बलुतीं बंद. मुडीच्या एका सुखी हरिजनाच्या शेतांत गुरें घालून मागील वर्षीं नुकसान करण्यांत आलें. त्यानें तक्रार केली तर त्याला मारहाण. केस चालली. त्यांत मराठ्यांना दंड झाले. म्हणून अधिकच छळ. हिंगणें खु॥ येथील पो. पाटलाच्या घोड्याची व्यवस्था परगांवाहून येऊन महारांना

ठेवावी लागते, नाहीं तर त्रास. कुऱ्हे येथील मुलकी पाटलानें गांवकामगारास त्यानें पाय दुखत होता म्हणून एक दिवस बिनमोबदला म्हैस चारण्याचें नाकारलें म्हणून घरांत शिरून मारलें म्हणतात. व तक्रार कोठें करशील तर मरशील अशी धमकीहि म्हणे दिली. आर्डीचे एका महार भगिनीचें शेत पाटलानें जबरीनें पेरलें. तिनें मामलेदाराकडे तक्रार केली. मामलेदारानें पाटलास निर्दोष सोडून शेत पिकांसह परत देवविलें. परन्तु या पाटलानें म्हणे माणसें लावून शेतांतील बाजरी खुडून नेली! ती महारीण काय करील बिचारी? मेहेरगांवाला महारांनीं "तुमचें घाण पाणी आमचे घराजवळून जातें" असें नम्रपणें सांगितलें, तर त्या महारांना मारहाण झाली. त्या महार बंधूची बायको 'मारूं नका' म्हणाली तर तिलाहि मार. कराई गांवीं तर हरिजनांवर पक्की गुलामगिरी लादली आहे हरिजनांनीं चांगले कपडे नाहीं घालतां कामा, दागिने नाहीं घालतां कामा, शेती नाहीं करतां कामा, घरें नाहीं बांधतां कामा! कोणी स्वाभिमान दाखविला तर जाच होतो. हिंगणें येथें रजपूत लोक आहेत. खाजगी कामें महारांकडून मोफत करवून घेतात. एकानें नाकारलें तर त्याचा छळ. जुनें खेडीं, पातोंडे येथें हरिजनांस पाणी नाहीं. डबकें आटलें म्हणजे स्पृश्यांजवळून पाणी विकत घ्यावें लागतें!

वरील हकिगती मजकडे लिहून आल्या आहेत. त्यांचेवर मी आरोप नाहीं करीत. त्या शंभर टक्के खऱ्या कदाचित् नसतीलहि. परंतु त्यांत कांहीं तरी तथ्य असलेंच पाहिजे. जुलूम होत असलाच पाहिजे. अशा गोष्टींना पुरावेहि नसतात. गांवांतील हरिजनहि पुरावा देण्यास भितात. कारण स्पृश्यांवर ते अवलंबून असतात बिचारे.

अशा प्रकारचा स्पृश्यास्पृश्य धर्म आपण शेंकडों वर्षें पोसला, हें पाप पोसलें; हें पाप दूर करावयास संत झिजले. परंतु त्यांचे फक्त तोंडी जयजयकार करीत हें पाप आपण उराशीं धरलेंच आहे. वर्णाश्रम धर्म म्हणजे स्पृश्यास्पृश्य धर्म नव्हे. वर्णाश्रम धर्म एवढेंच सांगतो : तुझ्या आवडीचें कार्य कर. तें सेवाकार्य कोणतेंहि असो, तें पवित्र आहे तें मोक्ष देईल. सजन कसाई उद्धरला. चोखा उद्धरला. सेना न्हावी उद्धरला, सांवतामाळी उद्धरला. कोणतेंहि सेवाकर्म तुच्छ नाहीं. वर्ण-धर्म, आश्रमधर्म म्हणजे ब्रह्मचर्य पाळ, मग गृहस्थाश्रम कर, मग वानप्रस्थ

होऊन पुढें केवळ जगाचें पहाणारा संन्यासी हो. वर्णाश्रम धर्माचीं आज नांवें उरलीं, आणि हा गुलामगिरीचा जुलुमाचा धर्म मात्र राहिला आहे.

आम्ही इंग्रजांजवळ न्याय मागतों आहोंत. कोठल्या तोंडानें मागावा? शेतकरी म्हणतात, सावकार छळतो. परन्तु खेड्यांतील स्पृश्य शेतकरी हरिजनांची साधी माणुसकीहि मातींत मिळवीत आहेत. श्रमणारा किसान आज कष्टी आहे. खंडोगणती ज्वारी निर्मिणारा आज कण्या खात आहे, उडीद खात आहे हें खरें. किसानांची कसायांच्या हातची मान वांचविली पाहिजे. परन्तु त्याबरोबर स्पृश्य किसानांनीं श्रमी हरिजनांची मान नको का उंच करायला? तुम्ही जगाला गुलाम कराल, तर ती गुलामी शतपट वाढून तुमच्या बोकांडीं बसते, हा अनुभव आपणांस येतच आहे.

लाखों खेड्यांतील किसानांना खरा धर्म कामगारांनीं नेऊन द्यावा. शेती वाडी जाऊन बेकार होऊन, घरांदारांस मुकून शेतकरीच शहरांत येऊन कामगार बनला. कामगार तेवढा एक हा मंत्र तो शिकत आहे. हिंदु—मुसलमान, स्पृश्यास्पृश्य कामगार एका झेंड्याखालीं येऊन माणुसकीसाठीं लढत आहेत. कामगारांनीं आपल्या खेड्यांतील बंधूंस हा समता धर्म नेऊन शिकवावा. त्यांचेंच ते ऐकतील. आमचें कोण ऐकतो? खरा धर्म एक दिवस माझे कामगार बंधूच जगाला देतील. धनधान्य निर्मिणारे, सुंदर वस्तु निर्माण करणारे कामगारच माणुसकीचा धर्महि निर्मितील.

हिंदुमहासभा लढायला हैद्राबादला गेली. ठीक. जेथें अन्याय आहे तेथें जा. परन्तु आपण हिंदूच हिंदूला ७ लाख खेड्यांत खात आहोंत. हरिजनांना माणेंस मानीत नाहीं. येथें कोण प्रचार करणार? तेजस्वी स्वातंत्र्यवीर सावरकरांचें तें थोर हरिजन-प्रेम किती जण उराशीं घेतील व खेड्यांतील स्पृश्यांचे शिव्याशाप व दगडधोंडे घेण्यास जातील?

आपणां सर्वांचेंच हें काम आहे. सारे प्रचारक, कीर्तनकार, प्रवचनकार, सर्वांचें हें काम आहे. पुण्याला मागें हिंदुमहासभा परिषद झाली होती. तेथें अस्पृश्यता नष्ट करा सांगणारीं शेंकडों व्याख्यानें खेड्यांतून देण्याचे संकल्प झाले. परन्तु किती जणांनीं संकल्प पार पाडले?

खेड्यांतील कष्टमूर्ति शेतकरी बंधो, नको हें पाप. हरिजनांना प्रेम दे,

माणुसकी दे. त्यांना जवळ घे, त्यांना छळूं नको; पिळूं नको. त्याचा स्वाभिमान राख. त्याला अशी मारहाण नको करूं. त्याला दिलेली शिवी परमेश्वराला लागते. त्याला मारलेली लाठी देवाच्या अंगावर उठते. हरिजनांच्या छळानें त्या देवाच्या हृदयाचीहि चाळणी झाली असेल. हरिजनांना पाणी दे. विहिरीवर बसूं दे, ओटीवर सुपारी खाऊं दे. ही गुलामगिरी दूर करशील तर तुझी गुलामगिरी दूर होईल. ऊठ गड्या, खऱ्या धर्माची कास धर.

पाणी फार गढूळ असेल तर त्यांत निवळ टाकावी लागते. या सडलेल्या समाजाला शुद्ध करण्यासाठीं हजारोंच्या प्राणार्पणाची का निवळ टाकिली पाहिजे? राष्ट्रांतील ही घाण पाहून महर्षि सेनापतींच्या हृदयाची कशी तगमग होत असेल याची कल्पना येते. हिंदु समाजा, जागृत हो. खेड्यापाड्यांतील स्पृश्य समाजा, स्वधर्म व स्वकर्तव्य ओळख; परन्तु लौकर न ओळखशील तर नवभारत त्यासाठीं अनंत बलिदानसुद्धां उद्यां करील!

—वर्ष २, अंक २७.

## सत्य सोपें नाहीं २९

या जगांत जें जें आहे तें तें देवाचें आहे. म्हणून त्यागबुद्धीनें वाग. गिधाडाप्रमाणें सारें एकटाच बळकावून बसूं नकोस.

—ईशावास्योपनिषद

येत्या ऑगस्ट महिन्यांत अत्यंत महत्त्वाचीं बिलें असेंब्लींत येणार आहेत. कुळकायदा, तहशील सुधारणा कायदा व कर्जनिवारण कायदा यासंबंधींचीं शेतकऱ्यांच्या जीवनाशीं अत्यंत संबंध असलेलीं बिलें येणार आहेत. आजच्या या लेखांत कर्जनिवारण या बिलासंबंधींच दोन शब्द मी लिहीत आहें. इतर बिलांसंबंधीं पुढें केव्हां लिहीन.

मुंबई कां. सरकार जशा प्रकारचें बिल आणीत आहे तशा स्वरूपाचें बिल गेल्या दीडशें वर्षांत कोणी आणलें नाहीं. कां. सरकार जनतेच्या हिता-

साठीं आहे. असें क्रांतिकारक बिल कांग्रेसच आणूं शकेल. प्रसिद्ध झालेला बिलाचा आराखडा क्रांतिकारक नाहीं. परंतु शेंकडों ठिकाणच्या सूचनांचा विचार होऊन सिलेक्ट-कमिटी बिलाला जें स्वरूप देईल तें क्रांतिकारक होईल अशी आशा आहे.

महाराष्ट्र प्रांतिक कां. कमिटीनें महत्त्वाच्या सूचना केलेल्या आहेत. परंतु त्या सूचनांत एका गोष्टीबद्दल उल्लेख नाहीं. बिलाच्या आराखड्यांत लिहिलें आहे कीं, १९३१ सालापूर्वीं व्याजाचा दर शेंकडा ६ धरावा व ३१ नंतर ९ धरावा. हिशेब करतांना असें व्याज धरावें असें मूळ बिल म्हणतें. हे व्याजाचे दर अन्याय्य आहेत. या दरांबद्दल म. प्रांतिक कमिटी मुकी आहे. परवां नाशिक जिल्ह्यांत जी व्यापारी व सावकार परिषद भरली तींत १२ रु. शेंकडा दर धरावा असा ठराव झाला !

ब्रि. सरकार ज्या वेळेस कर्ज काढतें त्या वेळेस शेंकडा ३ टक्यांहून कमी व्याजाचे दरानें कोट्यवधि रु. कर्ज त्याला मिळतें. पुणें म्यु. टीस शेंकडा ४ दरानें कर्ज मिळणार आहे. परंतु सर्वांत दरिद्री जो शेतकरी त्याला महाग व्याजाचा दर. वास्तविक उलट परिस्थिति हवी. शेतकऱ्यांस सर्वांत स्वस्त दरानें कर्ज मिळालें पाहिजे. ज्या प्रचंड संस्था आहेत, मोठमोठ्या म्यु. ट्या, मोठमोठे कारखाने, मोठमोठीं राज्यें, साम्राज्यें त्यांना महाग दर पाहिजे. आज त्याच्या उलट स्थिति आहे.

आजच्या समाजरचनेंत हाच अन्याय होत आहे. अधिक भुकेलेल्याची अधिक उपासमार. अधिक कष्ट करणाऱ्यास अधिक कष्ट, पैशाकडे पैसा जातो ही म्हण खरी आहे. एखाद्या दुकानांतून जो एकदम चार महिन्यांचा माल घेतो, त्याला स्वस्त भाव असतो. आतां ४ महिन्यांची रोख पैसे देऊन एकदम बेगमी श्रीमंताशिवाय कोण करूं शकेल ? आणि पै पैशाचा माल किंवा उधार माल गरिबाशिवाय कोण घेणार ? गरिबाला साऱ्या वस्तू महाग. श्रीमंताला सारें स्वस्त ! अशी विचित्र परिस्थिति जेथें दिसते तेथील सारी समाजरचनाच सडली आहे असें म्हणणें सत्याला धरून आहे.

बरें, ज्या गरिबाला हें सारें महाग पडतें, तो निरुद्योगी असतो का ? नाहीं. तो रात्रंदिवस श्रमतो, कष्ट करतो. त्याच्यामुळें जमांतील सर्वांची पत असते. आज ब्रिटिश साम्राज्याची पत आहे, व्यापाऱ्यांची पत आहे,

ही पत कोण टिकवतो? शेतकरी शेती करणार नाहीं व कामगार काम करणार नाहीं तर ही पत टिकेल का? घराचा पाया गेला, तो खचला, तर घर टिकेल का? ज्या श्रमणाऱ्या किसान कामगारांच्या घामानें दुनियेंतील सर्वांची पत टिकते त्या श्रमजीवी लोकांची मात्र आजच्या समाजांत पत नाहीं. त्याला महाग धान्य, त्याला घाणेरडा माल, त्याला भरमसाट व्याजाचा दर! केवढा अन्याय, केवढें असत्य!

ज्या धनिकांनीं शेतकऱ्यास कर्जें दिलीं ते पैसे धनिकांनीं कोठून आणले? सारी संपत्ति श्रमांतून निर्माण होते. जे १०० रुपये आज मी माझे म्हणून शेतकऱ्यास कर्ज देतों ते १०० रुपयेहि त्या शेतकऱ्याच्या श्रमांतूनच जन्मले होते. ते त्याचेच पैसे आहेत. ते पैसे तुझ्याकडे ठेव होती. ती ठेव नम्रपणें त्या शेतकऱ्यास परत कर. परंतु तसें करण्याऐवजीं त्या शेतकऱ्याचा अपमान. ते त्याला दारांत उभे करीत नाहींत. त्याला शिव्या देतात. शंभर देऊन दोनशें लिहून घेतात. व्याजाचे भरमसाट दर. आणि या प्रकारास न्याय व सत्य अशी पुन्हां संज्ञा दिली जाते. शिव शिव!

सर्व संपत्ति श्रमजीवींनीं निर्मिली आहे असें कबूल केलें तर कर्ज हा शब्दच शिल्लक राहाणार नाहीं. परंतु आज ही गोष्ट शक्य नाहीं. सारें कर्ज रद्द करा असें जर कोणीं म्हटलें तर त्यांत केवळ सत्यच आहे असें मला वाटतें. आज तसें करणें शक्य नाहीं. परंतु दुसऱ्या कांहीं गोष्टी मनांत आणूं तर करूं शकूं. त्यासाठीं प्रयत्न तरी व्हावा. मग गव्हर्नर आड आला तर बघतां येईल.

शेतकऱ्याच्या कर्जाचा विचार करतांना शें. ३ पेक्षां अधिक व्याजाचा दर धरणें पाप होईल. ज्याला तहशील भरतां भरतां मरण बरें वाटे, खंड भरतां भरतां डोळ्यांत पाणी आणावें लागे; ज्यास मुलाबाळाच्या तोंडचा घांस काढून ठेवावा लागे, बायकोच्या अंगावरचीं लक्तरें बघावीं लागत, त्याचे जवळून कसलीं मागतां व्याजें, कसले धरतां दर! परन्तु तेवढी उदारता, तेवढी न्यायप्रीति आज नसेल तर घ्या व्याज. परन्तु तें अत्यंत कमी घ्या. शेंकडा ३ दर पुरे. सावकारांनीं, कारखानदारांनीं आपण कोणावर जगतों हें ध्यानीं घ्यावें. कृतज्ञता दाखवावी. नाशिक जिल्ह्यांतील सावकारी व्यापारी परिषदेंत शेंकडा १२ दर सुचविण्याऐवजीं

बिलांतील ६ व ९ हे दर कमी करून ३ च दर धरावा, मोठमोठ्या साम्राज्यांपेक्षां शेतकरी अधिक संपन्नमान नाहीं, असें जर ठरलें असतें तर त्या परिषदेंत माणुसकी व कृतज्ञता असलेलीं माणसें जमलेलीं होतीं असें देवानें म्हटलें असतें. परंतु त्यांनीं बाराचा ठराव केला! गरिबांच्या संसाराचे बारा वाजण्याची बाबांनो वेळ आली. आतां बारा एके बारा न बोलतां, बे एके बे किंवा तीन एके तीन बोला. परंतु जगांत माणुसकी मोठ्या वर्गांत उरली नाहीं. जे स्वतःला कांग्रेसचे सेवक म्हणवतात, महात्माजींचे प्रामाणिक अनुयायी म्हणवितात, गरिबांशीं हृदयें जोडणारी खादी अंगावर घालतात, त्या श्रीमंतांनीं, त्या व्यापाऱ्यांनीं, त्या कारखानदारांनीं, तरी कांग्रेस सरकारला सांगितलें पाहिजे 'तीनच व्याजाचा दर धरा व हिशेब करा. ४ म्हणजे डोक्यावरून पाणी' महात्माजींचें होणें म्हणजे मरणाचें होणें, त्यागाचें होणें. ती गंमत नाहीं. सत्य व अहिंसा शब्द आज स्वस्त झाले आहेत. कांहीं व्यापाऱ्यांनीं व सावकारांनीं सत्य अहिंसेच्या पूजेसाठीं माझें हें कांग्रेस पत्र खेड्यांतून जात असे तेथिल शेतकऱ्यांना तें बंद करावयास लाविलें. ज्या सावकारांना सत्याची येवढी चाड ते कुळांना त्यांच्या जमिनी परत देतील का, हरिजनांना प्रेमानें घरांत घेतील का, व्याजाचे दर कमी व्हावे म्हणून मरतील का? कांग्रेसपत्र असत्य व हिंसा यांचे कांटे पेरीत असेल तर जगाच्या कल्याणासाठीं तें बंद करणें सेवाच ठरेल. परंतु तुम्ही तरी सेवेचे, सहानुभूतीचे, प्रेमाचे, माणुसकीचे जीवनदायी मेघ बना व संसार सुंदर करा.

कांग्रेस—प्रीति म्हणजे शेवटीं दरिद्रनारायणाची प्रीति. ती ज्याच्या जीवनांत उत्कटत्वानें प्रकट होईल तोच कांग्रेसचा सच्चा सेवक. कां. बद्दल जनतेंत तेव्हांच आदर व भक्ति वाढेल जेव्हां गरिबांचीं दुःखें दूर करण्याची शक्ति असलेले कांग्रेसमधील वरिष्ठ वर्ग गरिबांशीं यथार्थनें एकरूप होऊं लागतील. कांग्रेसमधील शेंकडो ठरावांनीं शुद्धि होणार नाहीं. कांग्रेसमधील वरिष्ठ वर्ग जेव्हां श्रमजीवी जनतेचीं दुःखें स्वतःचीं समजूं लागतील, त्यांच्या उपासमारीची, त्यांच्या मुलांबाळांची कल्पना मनांत येऊन या वरिष्ठ वर्गीयांना जेव्हां विंचू डसल्याप्रमाणें वेदना होऊं लागतील, व्याजाचा दर ३ च काय, २ हि चालेल असें आनंदानें म्हणूं लागतील, तेव्हां कांग्रेसमध्यें

शुद्धि येईल. कोट्यवधि कष्ट करणाऱ्या बंधुभगिनींच्या सुखासमाधानांत आमचें समाधान, त्यांना तोषवा; त्यांचा दुवा घ्या, असें कांग्रेसमधील सारे लोक जेव्हां म्हणूं लागतील, सत्ताधारी, सूत्रधारी याप्रमाणें वर्तू लागतील, तेव्हां कांग्रेसचें बळ हां हां म्हणतां वाढेल असें करणें, असें वागणें म्हणजेच सत्याचा साक्षात्कार आहे. असें करणें, असें वागणें म्हणजे अहिंसा जीवनांत आणणें होय. 'हें तर कठीण काम आहे' असें जर वरिष्ठ वर्ग म्हणतील तर त्यांना नम्रपणें सांगावेंसें वाटतें कीं 'सत्य अहिंसा स्वस्त नाहींत. संत काय सांगतात ऐका:—

तुका म्हणे व्हावी प्राणांसवें तुटी
नाहीं तरीं गोष्टी बोलूं नये ॥'

—वर्ष २, अंक १४.

## २६ जानेवारी स्वातंत्र्यदिन ३०

आपली तुरुंगाची भीति गेली आतां मरणाची दवडूं या.

—देशबंधु दास

ज्या एका शब्दानें कोट्यवधि लोकांचीं हृदयें उचंबळतील असा कोणता बरें शब्द? ज्या शब्दासाठीं आजपर्यंत अनंत लोकांनीं अमोल अशीं स्वतःचीं जीवनें हंसत हंसत अर्पण केलीं, तो कोणता बरें शब्द? कोणत्या शब्दासाठीं अशी कुर्बानी झाली, असें बलिदान झालें? कोणत्या शब्दासाठीं भविष्यकाळींहि असेच लाखों संसारांचे होम होतील? तो शब्द म्हणजे स्वातंत्र्य.

स्वातंत्र्य कोणाला नको? पशुपक्ष्यांनाहि स्वातंत्र्य आवडतें. झाडें-माडेंहि स्वातंत्र्य इच्छितात. दुसऱ्याच्या छायेंत शेतें-भातें पिकत नाहींत, झाडेंमाडें फुलतफळत नाहींत. स्वातंत्र्याशिवाय सुख नाहीं, विकास नाहीं, आत्म्याची भेट नाहीं. स्वातंत्र्य, स्वातंत्र्य! कोठें आहे तें स्वातंत्र्य? जगांत अद्याप खरें स्वातंत्र्य नाहीं. ज्या वेळेस एक राष्ट्र दुसऱ्याची, एक जात दुसऱ्या

जातीची, एक समाज दुसऱ्या समाजाची, एक वर्ग दुसऱ्या वर्गाची जेव्हां पिळणूक करणार नाहीं, तेव्हां स्वातंत्र्याची प्रभात येईल. जेव्हां एक राष्ट्र दुसऱ्या पिळवणूक करणाऱ्या राष्ट्रास कसलेंहि सहकार्य देणार नाहीं तेव्हां खरें स्वातंत्र्य येईल. आज इंग्लंड स्वातंत्र्याचें अभिमानी नाहीं, कारण त्यानें ३५ कोटींना गुलाम ठेवलें आहे. आज फ्रान्स स्वातंत्र्यप्रिय नाहीं. कारण हिंदी राष्ट्राला गुलाम करणाऱ्या इंग्लंडचें तें दोस्त आहे. आज अमेरिका स्वातंत्र्यभक्त नाहीं; चीनवर हल्ले करण्यासाठीं जपानला अमेरिका युद्धसामुग्री विकते. इटली, जर्मनी यांनाहि दुसऱ्याच्या वसाहती पाहिजे आहेत; म्हणजे स्वतःसाठीं दुसऱ्याची पिळवणूक करावयाची आहे. खरें स्वातंत्र्य अद्याप जन्मावयाचें आहे.

त्या स्वातंत्र्याचा जन्म कदाचित् पुरातन भारतवर्षांत होईल. त्यासाठीं महान् भारत अद्याप उभा आहे. जगाचे स्वातंत्र्याचे प्रयोग पाहून त्यांतून सार घेऊन, त्यांतून धडे घेऊन, भारत एक अभिनव प्रयोग करीत आहे. हिंदुस्थान स्वतंत्र होऊं पहात आहे. परंतु दुसऱ्याला गुलाम करण्यासाठीं नाहीं. जगांतील सारीं राष्ट्रें सुखानें नांदावींत, जगांत सर्वत्र सर्वांना विकासास अवकाश असावा असें भारत मानतो. हा स्वातंत्र्याचा लढाहि अनत्याचारी मार्गानें हिंदी जनता लढत आहे. दहा हजार वर्षांत न झालेली गोष्ट इतिहासांत लिहिली जात आहे. भारताची मान नम्र अभिमानानें आज उंच आहे. हिमालयाप्रमाणें तो धैर्यानें उभा आहे, सागराप्रमाणें नव आशेनें उचंबळत आहे.

महात्मा गांधींसारखा युगपुरुष मिळाला आहे. भगवान् आद्य शंकराचार्यांनीं तीन वस्तू दुर्लभ म्हणून सांगितल्या आहेत. मनुष्यत्व, मुमुक्षुत्व व महापुरुषसंश्रय. मनुष्य जन्म मिळणें कठीण, मुक्त होण्याची उत्कंठा लागणें दुर्मिळ व मुक्त होण्याचा मार्ग दाखविणारा महापुरुष भेटणें त्याहून कठीण. परन्तु आज या तीन गोष्टी आपणांजवळ आहेत. आपण निर्भय व स्वाभिमानी होऊन माणसें बनत आहोंत. स्वतंत्र होण्याची तळमळ आपणां सर्वांस लागली आहे. आणि स्वातंत्र्याचा पंथ दाखविण्यासाठीं सत्यावर, प्रेमावर, संयमावर, श्रद्धेवर उभा राहणारा महात्मा लाभला आहे. त्या महात्म्याच्या मार्गदर्शकत्वाखालीं आपण २० वर्षें अंधारांतून प्रकाशाकडे जात

आहोत. अद्याप प्रकाश दूर आहे. परन्तु तांबडें फुटूं लागलें आहे. आतां शेवटचें प्रयाण करूं या.

काँग्रेसनें मंत्रिमंडळें फेंकलीं आहेत. हिंदी राष्ट्राचा स्वयंनिर्णयाचा हक्क मान्य करा असें साम्राज्यसरकारला स्पष्टपणें बजावलें आहे. साम्राज्यसरकार काय करतें बघावें. मोघम वचनें आतां नकोत, आम्हांला निर्विवाद गोष्टी पाहिजे आहेत. काँग्रेसनें ब्रि. सरकारला बजावून, जनतेसहि स्वातंत्र्यार्थ सिद्ध राहण्याचा आदेश दिला आहे. आपण तयारी करूं या. । हरिजनांना जवळ करून त्यांना माणुसकी देऊं या. जातीय भावनांची तीव्रता कमी करून अल्पसंख्य समाजांचा विश्वास संपादण्याची पराकाष्ठा करूं या. सांगूं कीं, उद्यांचें स्वातंत्र्य सर्वांचें. भाषा, लिपी, संस्कृति यांचा उच्छेद होणार नाहीं.- कोणी कोणावर कुरघोडा करणार नाहीं. किसान कामगारांस सांगूं या तुम्हांला भले दिवस येतील. श्रमजीवींच्या खऱ्या स्वातंत्र्यास आधीं लक्ष दिलें जाईल. परन्तु आपण सर्वांना नांदवूं. सारे थोडें-थोडें मिळतें घेऊन कोणी कमी, कोणी अधिक झीज सोसून, स्वातंत्र्याचें अमर मंदिर उभारूं या.

आपला लढा अहिंसेचा. किसान कामगार संघटित झाले आहेत. तरुणांच्या संघटनेंत तेज चढत आहे. परंतु महात्माजी म्हणतात, 'हातीं टकली घ्या म्हणजे अहिंसा मनीं राहील. लढा पुकारावयास मला धीर येईल.' टकली म्हणजे अनत्याचाराचें जिवंत प्रतीक. तिरंगी झेंड्यावर चरका आहे. मग तो चरका आपल्या हृदयाशीं धरावयास काय हरकत? उद्यां स्वराज्य मिळाल्यावर खेडीं व शहरें यांचा आपण समन्वय करूं. आज हातीं टकली घेणें म्हणजे उद्यां स्वराज्यांत यांत्रिक उद्योगधंदे वाढविण्याची कबुली देणें नव्हे. स्वराज्य म्हणजे जें करतां येत नाहीं तें करण्याची शक्ति. उद्यां स्वराज्य मिळाल्यावर बहुमतानें गिरण्या वाढविण्याचें ठरलें तर तसें करूं. परन्तु आधीं तसें करण्याची सत्ता मिळवूं. आधीं परसत्ता दूर करूं. त्यासाठीं हा लढा आहे. तो लढा अहिंसक आहे. त्याची खूण म्हणजे टकली. खादी आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्याशीं एकरूप झालेली आहे. त्या निर्मळ सुताच्या धाग्यांत स्वातंत्र्याचा अतूट धागा मिसळलेला आहे.

स्वातंत्र्याच्या प्रतिज्ञेंत चरका व सूत आहे. परंतु तें बंधनकारक नाहीं,

ज्यांना त्याचा प्रामाणिकपणानें उच्चार करावयाचा नसेल ते तेवढा भाग वगळूं शकतात. कम्युनिस्टांनीं शिस्त म्हणून प्रतिज्ञा घेण्याचें ठरविलें आहे. पुरोगामी गट ३० सालची प्रतिज्ञा वाचील असें कळतें. परंतु निरनिराळ्या प्रतिज्ञांसाठीं पृथक् स्वातंत्र्यसभा घेणें बरें नाहीं. मुख्य सभांत सामील होऊन जो नवीन भाग नको तो म्हटला नाहीं म्हणजे झालें.

जग बदलत आहे व स्वातंत्र्य मिळविण्याचे निश्चयानें हिंदुस्थान उभा आहे. केवळ सत्तेची आम्हांस आसक्ति नाहीं, हें खुर्च्या क्षणांत फेंकून कॉंग्रेसनें सिद्ध केलें आहे. बॅ. जिना व इतरेजन यांचे आरोप निराधार आहेत. असें प्रांतिक गव्हर्नरांच्या सांगण्यावरून व्हाइसरायांनीं सांगितलें आहे. अधिकच प्रशांत व पवित्र तेजानें कॉंग्रेसचा यशश्चंद्रमा आज मिरवत आहे. कॉंग्रेस कोणाचेंहि अहित करणार नाहीं.

अवघाचि संसार सुखाचा करीन ।
आनंदें भरीन तिन्ही लोक ॥

ही तिची थोर प्रतिज्ञा आहे. अशी ही महान् निर्मळ कॉंग्रेसमाता २६ जानेवारीचा स्वातंत्र्यदिन पाळावयास सांगत आहे.

उद्यांचें स्वातंत्र्य सर्वांचें आहे. म्हणून गरीब श्रीमंत, हिंदुमुसलमान, स्पृश्यास्पृश्य सारे या; वृद्ध या, तरुण या; स्त्रिया या, पुरुष या; विद्यार्थी या, शिक्षक या; श्रमजीवी या, बुद्धिजीवी या. एक दिवस तरी एकजात या, तिरंगी झेंड्याखालीं येऊन महान् भारत मातेस प्रणाम करून तिला स्वतंत्र करण्याची आणभाक घेऊं या.

२६ जानेवारी म्हणजे येता शुक्रवार. त्या दिवशींच्या उगवत्या सूर्याचें घरोघर लाखों तिरंगी झेंडे उभारून स्वागत करा. हजारों इन्द्रधनुष्यांची भूतलावर प्रभा पसरून स्वर्गींचे देव सोहळा पहावयास खालीं येवोत. आधीं ४ दिवस गल्लीगल्लींतून घरोघर जाऊन २६ तारखेस राष्ट्रीय झेंडा लावा अशी हात जोडून प्रार्थना करा. २६ जानेवारीस सकाळीं प्रभातफेऱ्या काढा. हरिजनांस प्रेम द्या. स्नेहसंमेलनें भरवा. खादी खपवा. एकत्र येऊन सूत कांता. विद्यार्थी व कामगार यांनीं दहा दहाच्या तुकड्या करून तालुक्यांतलि ५० तरी गांवीं स्वातंत्र्यदिन साजरा करून यावें. तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं सभा ठेवावी. पोवाडे, संवाद

ठेवावे. स्वातंत्र्याच्या निनादानें हिंदुस्थान दुमदुमवा. महात्मा गांधीं फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यांत व्हाइसरॉयांकडे गेले तर २६ तारखेच्या या विराट सामर्थ्यानें जाऊं देत. ही २६ तारीख म्हणजे आपली शिस्त, संघटना व सामर्थ्य यांचें गंभीर दर्शन. ही गोष्ट लक्षांत ठेवून उठूं या सारे.

वन्दे मातरम्।

—वर्ष २, अंक ४१.

## साक्षरता-प्रसार ३१

भारताचें भवितव्य शिक्षणावर अवलंबून आहे. एकदां राष्ट्रांत शिक्षण फैलावलें म्हणजे सर्व शक्य होईल. सुशिक्षितांस सर्व साध्य आहे. अशिक्षितास सारें असाध्य आहे. शिक्षण अनेक प्रकारचें आहे. परन्तु सर्वांत महत्त्वाचें शिक्षण म्हणजे लोकशिक्षण. सर्व जनतेला शहाणें करून सोडावयाचें हें थोर कार्य करण्यासाठीं आज राष्ट्रानें कंबर बांधली आहे.

व्यक्तीला समाजाचें ऋण असतें, ही गोष्ट भारतीय संस्कृतीनें अनादि काळापासून सांगितली आहे. कितीहि दरिद्री भारतीय मनुष्य असला तरी तो भुकेलेल्यास आपल्या चतकोरांतील नितकोर देईल. अन्नदान करणें हें जसें सर्वांस बंधनकारक असें भारतीय संस्कृतीचें अंग आहे, त्याप्रमाणें दुसरेंहि एक अंग आपण निर्माण केलें पाहिजे. ज्ञानदानहि प्रत्येकानें केलें पाहिजे. ज्याच्याजवळ जें ज्ञान असेल तें त्यानें इतरांस देत राहिलें पाहिजे.

आपणांस भारताचें ऐक्य साधावयाचें आहे. हें ऐक्य साधावयास सारें राष्ट्र एका ध्येयासाठीं उठलें पाहिजे. एक विचार सर्वांच्या हृदयांत संचरला पाहिजे. शिक्षणाचा प्रचार व प्रसार केल्याशिवाय हें कसें होईल? सार्वत्रिक शिक्षण–प्रसारानें राष्ट्रीय बळ वाढेल, गोंधळ व अव्यवस्था कमी होईल.

भरतखंडांत ही जागृति उत्पन्न झाली आहे. मद्रास सरकारनें ५० लोकांची एक तुकडी अशा दहा तुकड्या करून त्या शिक्षणप्रसारार्थ पाठ-

विण्याचें ठरविलें आहे. तीन महिने एकेका केंद्राभोंवतीं काम होईल. तीन महिन्यांनीं केंद्रें बदलतील. तुकड्यांतील सेवकास पगार मिळणार आहे. ६५ रुपये मद्रास सरकार ह्यासाठीं खर्च करणार आहे. तिकडे बंगालमध्यें कलकत्ता विद्यापीठानेंच हें थोर काम अंगावर घेतलें आहे. बिहार प्रांतानें तर प्रौढशिक्षणांत आघाडी मारली आहे. सिंध प्रांतांतहि जिल्ह्याजिल्ह्यांत साक्षरता-प्रचार सुरू झाला आहे.

आपला मुंबई प्रांतहि मागें नाहीं. मुंबई शहरांत जवळ जवळ तीन हजार स्वयंसेवक व स्वयंसेविका शिक्षणप्रसार करीत आहेत. १०।२० हजार विद्यार्थी शिकत आहेत. ज्ञानाचा नवीन डोळा लाभत आहे. १ मे १९३९ हा दिवस भारताचे इतिहासांत सोन्याच्या अक्षरांनीं लिहिला गेला पाहिजे. या दिवशीं मुंबापुरीनें ज्ञानाची विराट ज्योत पेटवली व तिची प्रभा खेड्यापाड्यांतहि गेली. १ मे चे दिवशीं खेड्यापाड्यांतहि साक्षरतेच्या मिरवणुका निघाल्या.

आतां सर्वत्र साक्षरताप्रसारक मंडळें निघालीं पाहिजेत. हें संघटनेचें युग आहे. सामुदायिक रीत्या आज प्रश्न हातीं घेतले पाहिजेत. मी एकटा जगाला हलवीन या पोकळ घमेंडींत राहण्याचे हे दिवस नाहींत. एकाच ध्येयाच्या भक्तांनीं एकत्र यावें. कोणत्या तरी देशबांधवाच्या हिताच्या कामास वाहून घ्यावें. सांघिक उत्साहाची नवीन भावना आपणांस आपली करून घ्यावयाची आहे.

शिक्षणाच्या प्रसारार्थ आज आधीं संघ हवे आहेत. अज्ञानरूपी शत्रूच्या किल्ल्यावर हल्ले चढवूं या. हे हल्ले चढविण्यास कोण पुढें येणार ? विद्यार्थी, तरुण विद्यार्थी हेच राष्ट्राचे अरुण. ह्या तरुण अरुणांना आज आव्हान आहे. तरुणांनीं अग्रेसर झालें पाहिजे.

सभोंवतालच्या सामाजिक प्रश्नांचा विचार विद्यार्थ्यांनीं नाहीं करावयाचा तर कोणी ? आपल्या राष्ट्रासाठीं काय केलें पाहिजे, आपली स्थिति कशी सुधारेल, लोकांत तेज व बळ कसें येईल, संसार कसा सुधारेल ह्याचा विचार तरुण विद्यार्थ्यांनीं नको का करायला ?

शहरांतील वा खेड्यांतील प्रौढ विद्यार्थ्यांनीं आपल्या शहरांत वा खेड्यांत किती अशिक्षित आहेत याचा विचार करावा. ते कोठें राहातात, कोठल्या

गल्लींत राहतात तें पहावें. त्यांना मग ज्ञानाची भाकर घेऊन जावें. आपल्याच बंधु-भगिनींस आपण ज्ञानाच्या बाबतींत बुभुक्षित ठेवूं तर केवढा द्रोह! ज्या सवलती मला आहेत, जीं सुखें मला आहेत, त्यांत इतरांस भागिदार केव्हां करीन हा विचार नको का मनांत यावयास? आपल्या बांधवांसाठीं आपणांस कितीतरी गोष्टी करतां येतील परन्तु इच्छा हवी; तळमळ हवी.

शक्याशक्यतेच्या शंका काढूं नका. ज्यांना शाळेंत जातां येत नाहीं, शिक्षण घेण्याचीं साधनें ज्यांना नाहींत, अशांसाठीं निदान वर्षांत १२ तास देईन व शिकवीन अशी प्रतिज्ञा जर प्रत्येक प्रौढ विद्यार्थी करील तर भारतीय विचारांत केवढी क्रांति होईल! बारा धडे शिकविणें, तें का ओझें आहे? परन्तु शिकणाऱ्यांना ती केवढी मदत! हे बारा धडे कसलेहि चालतील. तुम्हांला व्यायामाचे प्रकार येतील तर ते शिकवा; चित्रकला येत असेल तर ती सांगा. परन्तु लिहिणें, वाचणें व अंकगणित ह्या तीन गोष्टी लोकशिक्षणांत हव्या. सर्वांत उत्कृष्ट गोष्ट म्हणजे इतिहास, भूगोल शिकविणें. भूगोलानें इतिहास घडतो. इतिहास भूगोलाच्या गप्पा मारा; तसेंच रोजच्या जीवनांतील शास्त्रीय गोष्टी समजूं द्या.

विचारांची थोडीशीहि पुंजी जवळ असेल तर जीवनाला कळा चढते. जीवनाला नवरंग येतो. एकादाच किरण परन्तु काळया ढगाला तो रमणीयत्व देतो! एखादाच पेरलेला विचार, एखादेंच वाचलेलें वाक्य जीवनांत कसें वाढेल, कसें रुजेल, जीवनाला कसें गंभीर करील ह्याची कल्पना आपण कधीं केली आहे काय? खरोखर ज्ञान हीच जीवनाची खरी भाकर आहे. ह्या भाकरीशिवाय जीवनांत रुचि नाहीं, रंग नाहीं, राम नाहीं, ज्ञानाशिवाय जीवनाला तेज नाहीं, अर्थ नाहीं. ज्ञानासारखें पवित्र कांहींहि नाहीं. म्हणून स्वत:पाशीं जें कांहीं असेल, जें जें कांहीं उत्कृष्ट असेल, तें तें घेऊन आपल्या आजूबाजूच्या बंधुभगिनींस देण्यासाठीं चला. भारतीय मनोबुद्धि पडित आहे. या भूमीस सुपीक करावयास चला. ही देवाघरची शेती आहे.

युरोपखंडांत सक्तीचें लष्करी शिक्षण असतें. शिक्षण संपल्यावर ३ वर्षें लष्करी शिक्षण घ्यावेंच लागतें. मग तो मोकळा होतो. आपण सक्तीचें शिक्षणप्रसाराचें व्रत घेऊं या. विद्यापिठानें विद्यार्थ्यांस एकेक वर्ष खेड्यांत साक्षरताप्रसार

केल्यावरच पदवीपत्र द्यावें. परन्तु असे सक्तीचे कायदे करण्यांत काय अर्थ? आपण प्रेमानें ही गोष्ट नाहीं का करणार? आपल्या सहजस्फूर्तीनें ही गोष्ट झाली पाहिजे. साक्षरताप्रसाराचा महान् विचार निर्माण झाला आहे. या विचारासाठीं किती जण आपलें सुखस्वास्थ्य बाजूस ठेवतात हा प्रश्न आहे. विचारासाठीं, ध्येयासाठीं कोणत्या लायकीचीं किती माणसें खपलीं, झिजलीं, बळी गेलीं, या गोष्टीला शेवटीं महत्त्व आहे. जीवनें अर्पिल्याशिवाय कोणताहि विचार वाढत नाहीं. भारतीय बंधु–भगिनींच्या शिक्षणासाठीं कितीजण सुखावर, स्वार्थावर, स्वास्थ्यावर पाणी सोडावयास तयार आहेत? बोला.

—वर्ष २, अंक ६.

## आपलीं राज्यें गेलीं व इंग्रजांचें कसें आलें? ३२

[ बालबोध मासिकांत पुष्कळ वर्षांपूर्वीं कै० ओक यांनीं पुढील आंग्रे यांची गोष्ट दिली होती, तिचा मी उपयोग केला आहे. ]

जगांतील कोणत्याहि व्यवहाराचा तुम्हीं विचार करा तुम्हांला असें आढळून येईल कीं, कारणांवाचून कोणतेंहि कार्य घडत नसतें. पुष्कळ वेळां कार्य स्पष्टपणें दिसतें, परन्तु कारण मात्र चटकन् ध्यानांत येत नाहीं. परन्तु यावरून त्या कार्यास कारणच नाहीं असें म्हणणें चुकीचें होईल. ज्याप्रमाणें एखादा मुलगा आजारी पडला म्हणजे तो म्हणतो ‘ कां बोवा आजारी पडलों काहीं समजत नाहीं. ’ परंतु हळुहळू अनेक कारणें जमत आलेलीं असतात, हें त्यास कोठें माहित होतें? कधीं जागरण केलें असेल, कधीं उणें अधिक खाल्लें असेल, कधीं उन्हांतून येतांच पाणी प्यायला असेल. या सर्व कारणांचा संमिश्र परिणाम म्हणजे तो आजार. प्रत्येक गोष्टीस पूर्वेतिहास आहे. हा इतिहास शोधावा, हीं कारणें शोधावीं व तीं दूर करावीं. उगीच दैवावर ढकलूं नये. दैवाचा अर्थ हाच कीं अज्ञान व अदृश्य अशा कारणांची मालिका.

आम्ही लोक या देशांतले. येथें आमचीं मोठमोठीं राज्यें होतीं,

आम्ही म्हणूं ती पूर्व दिशा पूर्वी येथें होती; तीं राज्यें कोठें गेलीं ? आज सर्व हिन्दुस्थानचा नकाशा तांबडा झाला आहे. याचीं कारणें काय ? सातां समुद्रांपलीकडून येणाऱ्या मूठभर लोकांच्या हातीं आम्ही गेलों कसे ? आम्ही राजे होतों, आतां गुलाम झालों. दुसऱ्यास पाणी पाजणारे आम्ही होतों; आज दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिणारे झालों आहोंत. केवढा हा चमत्कार आहे ! परन्तु या चमत्कारास कारणें नसतील का ? आहेत तर.

एकदां अलिबागेस आंग्रे ह्यांच्या वाड्याच्या तिसऱ्या मजल्याच्या खिडकीमध्यें बाबाजी आंग्रे व एल्फिन्स्टन साहेब हे उभे राहून गोष्टी करीत होते. खालीं वाळवंटांत उभय पक्षांचीं सैन्यें होतीं. आंग्रे ह्यांचा समुद्रांत किल्ला आहे. ओहटीच्या वेळेस किल्ल्याजवळचें पाणी अगदीं कमी होतें.

राजकारणाच्या गोष्टी चालल्या होत्या. बोलतां बोलतां बाबाजी आंग्रे यांनीं एल्फिन्स्टन यांस विचारलें ‘ आमच्या देशांतील आमचीं स्वतःचीं राज्यें नष्ट व्हावींत आणि त्यांच्या जागीं तुम्हां परकीयांचीं स्थापन व्हावींत असें होण्यांत तुम्हां-आम्हांत कमी जास्त काय आहे ? ’

एल्फिन्स्टन म्हणाला ‘ कमी-जास्त काय आहे तें दाखवतों. हीं आपलीं सैन्यें खालीं उभीं आहेत. थोड्याच वेळानें भरती येऊं लागेल. या उभय सैन्यांस आपण तेथें उभें राहाण्याविषयीं हुकूम करूं या आणि काय चमत्कार होतो तो पहा. ’

उभय सैन्यांस त्याप्रमाणें हुकूम झाले. भरती येऊं लागली व पाणी वाढूं लागलें. आंग्र्यांचें सैन्य मागें पळूं लागलें. परन्तु इंग्लिशांचें छातीपर्यंत पाणी झालें तरी हललें नाहीं.

हें दृश्य दाखवून एल्फिन्स्टन म्हणाला, ‘ बाबासाहेब, तुमचीं राज्यें नष्ट होण्यास आणि आमचीं स्थापित होण्यास मुख्य कारण काय हें तुमच्या लक्षांत आलेंच असेल. अंमलदाराचा हुकूम आमचे शिपाई प्राण गेला तरी पाळतात, परन्तु तुमचे लोक पळतात. ’

वरील गोष्ट खोटी आहे काय ? आम्ही युरोपियन लोकांप्रमाणें शिकलेलें सैन्य ठेवूं लागलों, तर ती शिस्त आपल्या सैन्यांत मुरली नव्हती. मैदानी लढायांची आमच्या लोकांस तितकी संवय नसे. शिपायांनीं जागा न सोडणें हा मैदानी लढ्यांतील महत्त्वाचा भाग असतो. समोरासमोरच्या लढा-

ईत सैन्य बेशिस्त झालें कीं, पराजय झालाच. अहमदशहा अब्दालीनें त्याचें सैन्य जेव्हां पळूं लागलें, तेव्हां त्या पळणारांचीं मुंडकीं मारण्याचा हुकूम केला. कारण एक पळूं लागला कीं सारे पळूं लागतात. पहिल्या बाजीरावानें वसईच्या हल्ल्याच्या वेळीं एका पत्रांत लिहिलें आहे, 'जे मागें फिरतील त्यांचीं डोकीं परिच्छिन्नपणें मारावीं.' सैन्य माघारीं न वळणें हें लढाईतील विजयाचें मोठें साधन आहे.

नेपोलियन आपल्या जयाची किल्ली सांगतांना म्हणतो 'शत्रुपक्षाची चलबिचल झाली आहे, असें मला दिसतांच मी त्यांच्यावर शिलकी सैन्यानें जोराचा हल्ला करीत असें.' अशी चलबिचल उत्पन्न होऊं न देणें हें मुख्य काम आहे. सैन्य पळूं लागल्यानें ही चलबिचल उत्पन्न होते.

वाटर्लू येथें १८१५ मध्यें इंग्लिश सैन्याचा तळ पडला होता. जर्मन सैन्याची वेळेवर मदत होण्याचें चिन्ह दिसेना. फ्रेंच तर चवताळून आले होते. फ्रेंचांच्या जोरदार हल्ल्यांसमोर आपला टिकाव कसा लागेल याची वेलिंग्टन या इंग्रजी सेनापतीस धास्ती होती.

वेलिंग्टन घोड्यावर बसून आपल्या शिपायांच्या रांगांतून हिंडला व म्हणाला, 'माझ्या शिपायांनो, धीर सोडूं नका, जाग्यावरून हलूं नका. आपणांस इंग्लंडांतील लोक काय म्हणतील याचा विचार करा.' ते शिपायी वेलिंग्टन यास म्हणाले, 'महाराज, आपण तिळमात्र काळजी करूं नका; आमचें कर्तव्य आम्ही जाणतों, तें आम्ही नीट पार पाडूं.' तें कर्तव्य म्हणजे कोणतें, तर सेनापतीनें सांगितल्याप्रमाणें वागणें. नेपोलियननें जर्मन मदत इंग्रजांस येऊन मिळण्यापूर्वी निकराचे हल्ले केले. परन्तु इंग्रज सैन्य मागें गेलें नाहीं; इंग्रजांची फळी फोडतां आली नाहीं. शेवटीं सायंकाळीं चारचे सुमारास जर्मन मदत आली व इंग्रज विजयी झाले.

आपलें सैन्य गैरशिस्त, सेनापति कमी दर्जाचे, शस्त्रास्त्रें हिणकस, आणि फंदफितुरी व ऐक्याचा अभाव, इत्यादि कारणसमूहांचा परिणाम म्हणजे आपलीं राज्यें जाणें व इंग्लिशांचें राज्य होणें होय! आपणांस शिस्त, आज्ञाधारकपणा व ऐक्य या सद्गुणांचें नीट संवर्धन केल्याशिवाय स्वराज्य कसें मिळेल, मिळालें तरी कसें राखतां येईल?

# दोन महात्म्यांची भेट ३३

गोलमेज परिषद आटोपल्यानंतर महात्मा गांधींना युरोपमध्यें थांबण्याची इच्छा नव्हती. तडक त्याच पावलीं परत हिंदुस्थानांत यावें असें त्यांचें ठरलें होतें. जर्मनी, फ्रान्स इत्यादि देशांतील अनेक मोठ्या आणि प्रसिद्ध लोकांनीं अत्यंत आग्रहाचीं आणि प्रेमाचीं बोलावणीं केलीं होतीं. त्या सर्वांचा महात्मा गांधींनीं मोठ्या कष्टानें अव्हेर केला. रोमन रोलंड यांच्या निमंत्रणाला मात्र त्यांना नाहीं म्हणतां येईना. त्यांना भेटण्याकरितां महात्मा गांधी मुद्दाम स्वित्झर्लंडमध्यें गेले.

रोमन रोलंड हे फार मोठे गृहस्थ आहेत आणि महात्माजींनीं हिंदुस्थानांत जें कार्य चालविलें आहे, त्याचाच प्रचार रोमन रोलंड हे युरोप-अमेरिकेमध्यें करतात. अशा माणसाच्या शब्दाला नकार देणें महात्मा गांधींना जड गेलें हें उघडच आहे. कदाचित् रोमन रोलंड आणि आपली गांठ पडल्यानें जगांतील कलह थोडे तरी कमी होण्याचा संभव आहे, अशी महात्माजींना आशाहि वाटली असेल! स्वित्झर्लंडसारख्या सृष्टिसौंदर्यानें फुलून गेलेल्या देशांत या दोन महात्म्यांची—एक पूर्वेचा आणि दुसरा पश्चिमेचा—भेट म्हणजे समसमांचा संयोग होयं. ‘ पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम; दोघांचा संयोग कधींहि होणार नाहीं. ’ असे उद्‌गार मदोन्मत्त झालेल्या किपलिंग या इंग्लिश ग्रंथकारानें काढलेले आहेत. रोमन रोलंड आणि महात्मा गांधी हे अशी कांहीं अपूर्व घटना घडवून आणतील कीं पूर्व आणि पश्चिम यांचाहि मिलाफ होईल!

गांधी आणि रोलंड या दोन महात्म्यांची भेट झाली तरी राष्ट्राराष्ट्रांमधील वैरें कशीं शमतील, जगांत शांतता कशी नांदेल याचा विचार करण्याकरितां कोणीहि जमत नाहींत. परन्तु सध्यां जगाला युद्धाची धडकी भरली आहे, आणि शांततेची दृढतर उत्कंठा लागली आहे. पुन्हां युद्धाची धुमश्चक्री सुरू झाली तर सबंध मनुष्य जातच रसातळाला जाईल अशी अनेक लोकांना भीति पडली आहे. या दोन महात्म्यांची भेट होऊन जगाची ही भीति

थोडीशी तरी कमी होईल काय? जगांत विश्वबंधुत्व पसरावें, सगळ्या लोकांनीं गुण्यागोविंदानें रहावें; सुधारलेले, मागासलेले, पाश्चात्य, पौरस्त्य इत्यादि सर्व लोकांचा सारखाच उत्कर्ष व्हावा हें दोघांच्या आयुष्याचें ध्येय आहे. जगाला द्वेष, कलह, युद्धें यांची कीड लागली आहे; म्हणून सृष्टि इतकी सुंदर आणि समृद्ध असूनहि लोकांना आपत्तीमध्यें दिवस कंठावे लागत आहेत. सत्य आणि अहिंसा यांचें साम्राज्य सर्वत्र पसरलें तर सुख आणि समृद्धि यांची कोणालाहि वाण पडणार नाहीं हा दिव्य संदेश दोघांनाहि सांगावयाचा आहे.

महात्मे हे कोणत्याहि एका देशाचे नसतात. त्यांच्यावर सगळ्या जगाची सत्ता असते. सगळे देश आणि काळ यांच्याकरितां त्यांचा संदेश असतो. रोमन रोलंड हे फ्रेंच असले आणि महात्मा गांधी हे हिंदी असले तरी जगांतील २०० कोटि लोकांचे डोळे आपल्या उद्धाराकरितां त्यांच्याकडे लागले आहेत. महात्मा गांधींचें चरित्र सर्वांना अवगत आहेच. म्हणून रोमन रोलंड यांच्याविषयीं थोडी माहिति खालीं देतों.

युरोप–अमेरिकेंतील लोकांना रोमन रोलंड हे दिव्य संदेश सांगणाऱ्या देवदूतासारखे वाटतात, त्यांचें वय ६५ वर्षांचें आहे. या त्यांच्या आयुष्यांत त्यांनीं अनेक युद्धप्रसंग पाहिले आहेत. अगदीं लहानपणापासून युद्ध म्हटलें कीं त्यांच्या अंगावर कांटा उभा राहत असे. एक भयंकर युद्ध होणार आणि त्यांत लक्षावधि लोक मृत्युमुखीं पडणार अशीं त्यांना पूर्वींपासून स्वप्नें पडत असत. त्यामुळें त्यांचे बाळपणाचे दिवस देखील या चिंतेंतच गेले. आपल्या ग्रंथांतून त्यांनीं भावी युद्धाची आगाऊच सूचना दिली होती; या युद्धापासून अलिप्त रहा असा इषाराहि दिला होता; परंतु संपत्तीच्या मदानें आणि ऐश्वर्यानें धुंद झालेल्या युरोपनें त्यांचा संदेश नीट ऐकला नाहीं; आणि म्हणूनच १९१४ सालीं जर्मनी आणि फ्रान्स यांच्यामध्यें गेलें महायुद्ध सुरू झालें आणि या युद्धाचा वणवा युरोपांत किंबहुना सर्व जगांत पेटणार हें पाहून त्यांचा विश्वावर प्रेम करणारा मृदु आत्मा करपून गेला. जर्मन, फ्रेंच, इंग्लिश इत्यादि एकाच संस्कृतीच्या लोकांनीं परस्परांचे प्राण घ्यावयास उद्युक्त व्हावें हें आश्चर्य नव्हे काय! मग जगाचा उद्धार कसा होईल? जगांत विश्वबंधुत्व नांदावें हें आपलें

ध्येय—ज्याच्या प्रसाराकरतां आपण आजपर्यंत प्रयत्न केला—तें सर्व थोतांड म्हणून टाकून द्यावें काय असा क्षणभर त्यांच्या मनांत व्यामोह उत्पन्न झाला. परन्तु ते मोठे आशावादी आहेत. त्यांच्या ध्येयवादित्वाला एवढा अकल्पित धक्का बसला तरी मनुष्याच्या सत्प्रवृत्तीविषयीं त्यांची श्रद्धा अढळच राहिली. विश्वबंधुत्व हें जगांतून पार मेलें नाहीं; फार तर त्याला तात्पुरतें ग्रहण लागलें असें म्हणतां येईल. परन्तु लवकरच हें ग्रहण सुटेल आणि सर्व लोक बंधुभावानें पुन्हां नांदूं लागतील असा त्यांचा दांडगा विश्वास होता. आपल्या मातृभूमीबद्दल—फ्रान्सबद्दल—त्यांच्या ठिकाणीं अकृत्रिम प्रेम असलें तरी तिच्याकरितां जर्मनीचा द्वेष करणें आणि त्याच्याविरुद्ध सुद्धां युद्धाकरितां सज्ज होणें पाप आहे असें त्यांस वाटत होतें म्हणून शेवटपर्यंत ते शांतिवादीच आहेत. आणि त्याकरितां लोकनिंदाहि त्यांनीं सहन केली. युद्धसमाप्तीनंतर जित आणि जेते असा भेदभाव न करितां तह करा आणि बंधुत्वाचा प्रसार करा असा जाहीरनामा त्यांनीं काढला. दोस्त राष्ट्रांनीं त्यांच्या जाहीरनाम्याला मान दिला असता तर जेते व जित अशीं सर्वच राष्ट्रें आजच्यासारखीं डबघाईला आलीं नसतीं.

सन १९१४ सालापूर्वीं रोमन रोलंड यांची फ्रान्समध्येंहि फारशी प्रसिद्धी नव्हती. पॅरिसमधील नॉर्मल स्कूलमध्यें लेक्चररचें काम करावें आणि फावल्या वेळांत ग्रंथलेखन करावें हा त्यांचा व्यवसाय होता. त्यांना पैशाची किंवा कीर्तीची हांव नव्हती. लोकांत फारसें न मिसळतां एका बाजूला राहून आपला ग्रंथ-लेखनाचा उद्योग चालवावा एवढाच त्यांचा हेतु होता. लहानपणापासून त्यांना संगीताची आवड होती. प्रत्यक्ष त्यांच्या मातेनें त्यांना संगीताचे धडे दिले होते. संगीत आणि ललित कला यांविषयींचें सामान्य लोकांचें औदासिन्य पाहून त्यांना अत्यंत हळहळ वाटत असे. लोकांमध्यें संगीत आणि ललित कला यांविषयीं अभिरुचि वाढविण्याकरितां त्यांचे अहर्निश प्रयत्न चालू होते. त्याकरितां त्यांनीं बरेचसे ग्रंथहि लिहिले आहेत. राजकारणांतहि त्यांनीं थोडासा भाग घेण्याचा प्रयत्न केला. परंतु राजकारण कुटिल नीतिनें भरलें आहे, असें आढळून आल्याबरोबर त्यांनीं त्यांतून आपलें अंग काढून घेतलें.

परंतु रोमन रोलंड यांच्याकडे सगळ्या जगाचें लक्ष वेधलें गेलें तें वरील

गोष्टींनीं नव्हे. आपण एक नवलकथा लिहावी आणि तींत एकाच ध्येयाच्या पाठीमागें लागलेल्या कलावंताला प्रत्यक्ष जगांत किती खडतर अनुभव येतात हें दाखवावें असे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. रोममध्यें विद्याभ्यासाकरितां असतांना त्यांनीं मनांतल्या मनांत एक कथानकहि ठरवून ठेवलें होतें. परंतु १९०४ पर्यंत या कल्पनेला मूर्त स्वरूप आलें नाहीं. त्या सुमारास त्यांनीं राजकारणांतून अंग काढून घेऊन एकांतवासाचा स्वीकार केला. त्यामुळें त्यांना सवड सांपडली आणि त्यांनीं जीन-क्रिस्टोफीया नांवाची कादंबरी एका मासिकांतून लिहावयास सुरुवात केली. ही कादंबरी या मासिकांतून प्रसिद्ध व्हावयास ८ वर्षें लागलीं. ही कादंबरी लहानसहान नाहीं. तिची पृष्ठसंख्या १५०० च्या वर आहे. या मासिकाचा खप बेताचा आणि तोहि विद्वान् लोकांतच असल्यामुळें या अद्भुत कादंबरीचा बाहेर फारसा बोलबाला झाला नाहीं. तरीपण या ग्रंथ-राजाची खरी योग्यता हळुहळू लोकांच्या लक्षांत आल्याशिवाय राहिली नाहीं. प्रथम जर्मन वर्तमानपत्रकारांचें या थोर ग्रंथाकडे लक्ष वेधलें गेलें आणि मग या ग्रंथाचें स्तुतिस्तोत्र त्यांनीं गायलें. लवकरच त्याचें इंग्रजींत भाषांतर झालें आणि त्यानें इंग्लिश लोकांनाहि मोहनी घातली. मग हां हां म्हणतां या ग्रंथाचा कीर्तिपरिमल सर्व दिशांकडे पसरला. भराभर अनेक भाषांतून त्याचीं भाषांतरें झालीं, आणि जो ग्रंथकार फ्रान्समध्येंहि कोपऱ्यांत पडून राहिला होता तो जगांत अद्वितीय ठरला. आपद्ग्रस्त जगाला दिव्य संदेश सांगणारा हा कोणी तरी महापुरुष अवतीर्ण झाला आहे असें सर्वांस वाटूं लागलें. १९१५ सालचें नोबेल पारितोषिक उत्कृष्ट वाङ्मयलेखकाला द्यावयाचें होतें. १९१६ सालीं जाहीर झालें कीं जीन रोमन रोलंड यांना हें पारितोषिक देण्यांत आलें आहे. ५० वर्षांपर्यंत जो लेखक सांदी कोपऱ्यांत पडून राहिला होता तो एकाएकीं जगाच्या पुढें आला, आणि त्याची कीर्ति दिगंत पसरली.

जीन–क्रिस्टोफीया कादंबरींत एक गवई आणि त्याचे सहकारी यांचा जीवन-वृत्तांत आहे. ध्येयवादी माणसाला जीवितयात्रा सुलभ जात नाहीं. जगाच्या रामरगाड्यांत त्याचीं उदात्त ध्येयें आणि कोमल भावना यांचा चुराडा होतो. या कादंबरींतील नायकहि मोठा ध्येयवादी आहे. आपल्या ध्येय-

सिद्धीकरितां तो फ्रान्स व जर्मनी या देशांत प्रवासाला निघतो. ठिकठिकाणीं त्याला निरनिराळ्या वृत्तीचे आणि स्वभावाचे लोक भेटतात. हर्षामर्ष, लाभालाभ, जयापजय, प्रेमविद्वेष, मैत्री-वैर यांच्या अनेक प्रसंगांतून त्याला जावें लागतें. कमी धीराचा माणूस असता तर तो या कसोटीला टिकता ना. या खडतर अनुभवानंतर त्याचें मन गांगरून गेलें असतें. आपलीं उच्च ध्येयें आणि उदात्त भावना यांना रामराम ठोकून तो निराशवादी बनला असता आणि जगाला शिव्याशाप देत हळहळत त्यानें आपला अंत करून घेतला असता. प्रस्तुत नायकाचा अंत दुःखांत झाला आहे; तरी त्यांतच त्याचा विजय आहे. 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ' याप्रमाणें या धीरोदात्त पुरुषानें आपल्या ध्येयापासून यत्किंचितहि माघार घेतली नाहीं; शेवटीं ध्येयाकरितां आपल्या प्राणाचीहि आहुति दिली. यांतच खरें पौरुष आहे.—

'उद्यच्छेदेव न मेदुद्यमो ह्येव पौरुषम्
अप्यपर्वाणि भजेत न नमेदिह कर्हिचित्'

ताठच रहावें, वाकूं नये, कारण ताठ रहाणें हेंच पौरुष आहे. भलत्या ठिकाणीं मोडलें तरी हरकत नाहीं परंतु या जगांत वाकूं नये असा अत्युत्तम ध्येयवाद ज्या कादंबरींत आहे, त्या कादंबरीनें संपत्ति, साम्राज्य, वैर, युद्ध यांच्या पाठीमागें लागलेल्या युरोपचें लक्ष खेंचून घेतलें यांत नवल काय आहे? आपल्याला निद्रेंतून जागें करण्याकरितां दिव्य संदेश घेऊन हा कोणी तरी अवतारी पुरुष आला आहे असें आधिभौतिक संस्कृतीच्या भाराखालीं दडपून गेलेल्या युरोपला वाटलें आणि त्यांनीं या नवीन द्रष्ट्याचें मोठ्या आनंदानें स्वागत केलें ! रोमन रोलंड यांचे इतर अनेक ग्रंथ आहेत. परंतु वरील ग्रंथाची सर दुसऱ्याला येणार नाहीं. याच ग्रंथाबद्दल त्यांना नोबेल पारितोषिक मिळालें आहे. आणि 'विसाव्या शतकांतील पहिल्या नंबरचा ग्रंथ' असें शिफारसपत्र अनेक ज्ञात्या लोकांनीं त्या ग्रंथाला दिलें आहे.

रोमन रोलंड हे उत्कृष्ट लेखक आहेत तसेच द्रष्टेहि आहेत. जगांत बंधुभाव नांदावा आणि राष्ट्राराष्ट्रांमधील वैर लयाला जावें हा दिव्य संदेश त्यांनीं जगाला दिला आहे. भिन्न संस्कृतीच्या लोकांनीं एकत्र येऊन विचार-

विनिमय करून विचारैक्य घडवून आणावें असा उपदेश त्यांनीं आपल्या ग्रंथांतून केला आहे. ते उच्चध्येयवादी आहेत हें सांगावयास नकोच. परंतु आपलीं ध्येयें आणि कृति यांचा मेळ घातला पाहिजे असें त्यांचें निक्षून सांगणें आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात, ' अन्याय होत असतांना जो उघड्या डोळयांनीं तो पहातो आणि त्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करीत नाहीं, त्याला माणूस ही पदवीसुद्धां धड शोभणार नाहीं. ' आपल्या आयुष्यांत त्यांनीं अन्यायांशीं अनेकदां झुंजी केल्या आहेत. आणि प्रत्येक वेळेला त्यांच्या कोमल मनावर भयंकर आघात झाले आहेत. तरी मानव जातीच्या भवितव्याविषयीं त्यांच्या मनांत केव्हांहि संशय उत्पन्न झाला नाहीं. जगांतील युद्धें नाहींशीं झालीं पाहिजेत आणि निरनिराळया राष्ट्रांत सलोखा आणि प्रेम हीं राहिलीं पाहिजेत. याकरितां त्यांनीं आटोकाट प्रयत्न केले आहेत. १९२१ सालीं महात्मा गांधींनीं सत्य अहिंसा यांच्या भरभक्कम पायावर उभारलेली असहकारितेची चळवळ पाहून त्यांचें लक्ष महात्मा गांधींकडे गेलें. . त्यांनीं महात्मा गांधींच्या मतांचा अभ्यास करून १९२४ सालीं एक पुस्तक लिहिलें आणि गांधी हे खरोखरच महात्मा कसे आहेत, त्यांचा आत्मा विश्वव्यापी कसा आहे हें जगाच्या निदर्शनास आणून दिलें. तेव्हांपासून दोघांनाहि एकमेकांस भेटण्याची इच्छा होती. तो योग इतक्या वर्षांनीं घडून आला हें मोठें सुचिन्हच म्हटलें पाहिजे. यायोगानें युद्धाचा आणि मनुष्यहानीचा संभव थोडासा कमी झाला तरी तें मोठेंच कार्य होणार आहे. महात्मा गांधी, रोमन रोलंड, इन्स्टेन यांच्यासारख्या महापुरुषांनीं एकी करून युद्धें अशक्य करून टाकलीं पाहिजेत. युद्धें अशक्य होतील; मात्र आपण या महात्म्यांचा संदेश ऐकून त्याप्रमाणें वागावयास तयार झालें पाहिजे.

## हिंदुमहासभावाले ३४

जळगांवचे कांहीं हिंदुमहासभावाले वकील अंमळनेरला येऊन कांग्रेसला शिव्या देऊन कृतार्थ होऊन परत गेले. या वकिलांनीं या सभेंत जीं भाषणें केलीं तीं ऐकून त्यांच्या पोरकटपणाची कींव येत होती. त्यांच्या भाषणांतील मुद्दे पुढीलप्रमाणें होते.

(१) शिवाजी महाराजांनीं २० वर्षांत स्वराज्य मिळविलें. महात्मा गांधींना अद्याप २० वर्षांत मिळवितां आलें नाहीं.

(२) सोवळीं नेसून दुसऱ्या बाजीरावानें स्वराज्य घालविलें, मिळविलें नाहीं. त्याप्रमाणें लुंग्या नेसून स्वराज्य मिळत नसतें. महात्माजींची लुंगी म्हणजे सोवळ्यांचाच प्रकार.

(३) पं. जवाहरलाल नेहरू मारे शर्टवरून जाकीट घालतात. ते शिवाजी महाराजांस नांवें ठेवतात. जाकीट घालून अधिकार येत नाहीं.

(४) सं. प्रांतांत पहा मुसलमानांना किती सवलती. हिंदूंकडे कोणी पाहील तर शपथ!

(५) नेहमींप्रमाणें मुसलमानधार्जिणी कांग्रेस वगैरे.

(६) मुसलमानांचे अत्याचार वगैरे.

अशा अर्थाचीं तीं भाषणें होतीं. त्या पोरकट भाषणांस उत्तर देणें म्हणजेहि कमीपणा. परंतु मुलांची व वरवर विचार करणाऱ्यांची दिशाभूल होते म्हणून थोडें लिहितों.

(१) शिवाजी महाराजांनीं २० वर्षांत स्वराज्य स्थापिलें. त्यांना ही शक्ति कोणीं दिली? कशी मिळाली? त्यांनीं जनतेचा कार्यक्रम हातीं घेतला. जुने सरदार जहागिरदार त्यांना विरोध करावयास उभे राहिले. शिवाजी महाराजांनीं त्यांना दूर केलें. जनतेच्या गवताच्या काडीसहि हात लावूं नये; जनतेनें पोटच्या पोराप्रमाणें वाढविलेलीं झाडें, त्यांचीं फळें कोणी नेऊं नये असे हुकूम सोडले. खायला न मिळणाऱ्या शेतकऱ्यांची बाजू शिवाजीनें घेतली. कोणास जहागिरी दिली नाहीं; गादीवाले दूर केले.

जनतेचें शेतकऱ्यांचें राज्य स्थापिलें. जनतेंतूनच नवीन शूर सेनानी त्यांना मिळाले. क्रान्ति तेव्हां करतां येते, जेव्हां लुबाडणाऱ्यांस दूर करून जनतेची बाजू घेतली जाते.

आजहि क्रांति करतां येईल. परन्तु जनतेची, श्रमणाऱ्या जनतेची बाजू घेतली पाहिजे. परन्तु कांग्रेसनें साधा कुळकायदा आणला, साधें कर्जनिवारण बिल आणलें, तरी तुम्ही हिंदुमहासभावाले ओरडतां. तुमचीं पत्रें ओरडतात. महात्माजी स्वराज्यासाठीं जनता उठावी म्हणून तिचे प्रश्न सौम्यपणें व मर्यादेनें घेतात तरीहि तुम्ही त्यांच्याविरुद्ध उठतां. मग शिवाजी महाराजांप्रमाणें गरिबांच्या आड येणाऱ्या सर्वांस सफा करावयाचें कोणी ठरवलें तर काय म्हणाल?

महात्माजींनीं सांगितलें तें एकलेंत का? डॉक्टरानें सांगितलेलें औषध घ्यावयाचें नाहीं व रोग हटत नाहीं म्हणावयाचें, याला चावटपणा म्हणतात. स्वराज्याच्या तयारीच्या चार गोष्टी महात्माजींनीं सांगितल्या होत्या. अस्पृश्यतानिवारण, हिंदु-मुस्लिम ऐक्य, दारूबंदी व खादी. यांतील कोणती गोष्ट हिंदुमहासभावाल्यांनीं केली! जर केली नसेल तर महात्माजींस दोषहि देतां येणार नाहीं. हिंदुमहासभा हिंदूंचा तरी कैवार घेईल असें वाटत होतें. परंतु अस्पृश्यांचे बाबतींत काय? स्वातंत्र्यवीर सावरकर दूर ठेवा; तुम्ही काय करीत आहांत? हरिजनांना माणुसकी द्या. अमळनेरच्या वाडींत त्यांना घेऊन जा. त्यांना पाणी मिळेल अशी व्यवस्था करा. त्यांच्यासाठीं छात्रालयें काढा. मुडी येथें एका हरिजनावर तेथील मंडळींनीं अत्याचार केला. तेथें मुसलमान नव्हते, हिंदूच होते. जळगांवचे, धुळ्याचे, एरंडोलचे, अमळनेरचे सारे हिंदुमहासभावाले वकील तेथें धांवून गेले नाहींत. जे हिंदुमहासभावाले अस्पृश्यांस माणुसकी मिळावी म्हणून झटत नाहींत, त्यांना दुसऱ्यांस नांवें ठेवण्याचा अधिकारच नाहीं.

हिंदुमुस्लिम ऐक्य करा महात्माजी म्हणतात. महात्माजी मुसलमानांस कोरा चेकहि देण्यास तयार आहेत; जर ते स्वातंत्र्यासाठीं लढतील तर. लोकमान्यहि असें म्हणत. मुसलमान येथें राजे झाले तरी चालतील परंतु हा इंग्रज नको असें ते म्हणत. हिंदुमुस्लिम ऐक्याची जरूर सर्वांना वाटते. त्यासाठीं वाटेल ती किंमत द्या असें सेनापति बापट म्हणतात. बंगालमध्यें

१९२४मध्यें प्रांतिक कायदे कौन्सिलांत सरकारचा पराजय करतां यावा म्हणून देशबंधु दास यांनीं हिंदुमुस्लिम करार केला. ज्याला ज्याला हिंदुस्थान स्वतंत्र व्हावा असें वाटतें त्याला या एकींची नितांत आवश्यकता पटते. ९ कोटि मुसलमान व ६ कोटि अस्पृश्य असे १५ कोटि लोक जवळ न आले तर ब्रि. सरकार त्यांना जवळ करणार. आपण दोन जागा देऊं म्हटलें तर इंग्रज ३ देतों म्हणणार. हा हिशेब हास्यास्पद होणार. म्हणून लो. टिळक, महात्मा गांधी कोरा चेकहि जरूर तर घ्या असें म्हणावयास सिद्ध होतात.

अस्पृश्यतानिवारण व हिंदु-मुस्लिम ऐक्य या महात्माजींनीं स्वराज्यासाठीं २ अटी सांगितल्या. त्या जर पार पाडीत नसाल तर ते स्वराज्य कोठून देणार? हिंदुमहासभावाल्यांचें अस्पृश्यतेकडे लक्ष नाहीं, हिंदु मुस्लीम ऐक्याकडे लक्ष नाहीं, मग महात्माजींवर रागावून काय होणार!

दारुबंदी व खादी. दारुबंदी आज कॉंग्रेसनें हातीं घेतली आहे. त्याला संपूर्ण पाठिंबा द्या. आणि खादी? तिची तर टिंगल केली जाते. कोणी म्हणतात कीं त्यामुळें मुसलमानांसहि धंदा मिळतो. मिलमध्यें मुसलमान नाहींत का? आतां केवळ सनातनी हिंदूंची गिरणी काढा म्हणावें.

शिवाजी महाराजांच्या वेळेस शस्त्रास्त्रें होतीं. राष्ट्र निःशस्त्र नव्हतें. शिवाय महाराष्ट्रापुरता प्रथम प्रश्न होता. आज शस्त्रास्त्रें नाहींत. सर्व हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. जगांतील बलाढ्य साम्राज्याशीं सामना द्यावयाचा आहे. शस्त्रास्त्रांचा मार्ग मोकळा नाहीं हें पाहून निःशस्त्राचा लढा महात्माजींनीं सुरू केला. राष्ट्राला प्रचंड त्याग शिकविला. भिक्षांदेहि दूर केली. स्वावलंबनाचा मंत्र दिला. स्त्री–पुरुष, मुलें–वृद्ध यांचा आत्मा जागा केला. गिरिकंदरांतून वंदे मातरम्‌चे निनाद होऊं लागले. ही क्रांति एका लुंगीवाल्यानें केली. स्वराज्य जवळ आणलें. कोंडी फोडली. संघटणा प्रांताप्रांतांत उभी केली. एका भाषेनें बोलायला शिकविलें. खादीची ऊब दिली. त्यायोगें खेड्यांतील जनतेंत कार्यकर्ते जाऊं लागले. राष्ट्र एक होऊं लागलें. ब्रि. साम्राज्यसत्तेला महात्माजींनीं हलविलें असें जग म्हणूं लागलें. महात्माजी आमचा खरा शत्रू असें ब्रिटिश साम्राज्यवाले म्हणूं लागले. महात्माजींनीं सांगितलेल्या गोष्टी सर्वजण निश्चयानें, श्रद्धेनें अंमलांत आणते तर

आज स्वतंत्र झालोंहि असतों. तुरुंगांत असतांना एक आयरिश सुपरिंटेंडेंट म्हणाला, ‘ तुम्हांला २० सालींच महात्माजींनीं स्वराज्य दिलें असतें; परन्तु तुमची श्रद्धा नव्हती. ’ महात्माजींना बोल न लावतां स्वतःस लावा.

( २ ) महत्माजींची लुंगी म्हणजे सोवळेपणा नव्हे; तो धगधगीत त्याग आहे. कोट्यवधि लोक उघडे असतां मला कपड्याचें ढोंग कशाला? त्यांनीं राउंड टेबलला जात असतां एडनहून महादेवभाई वगैरेंनीं बरोबर घेतलेले अधिक कपडे परत पाठविले व ते म्हणाले, ‘ दरिद्री नारायणाचा प्रतिनिधी म्हणून मी जात आहें. मला हा संसार शोभत नाहीं. ’ समर्थांच्या कफनीला नांवें ठेवाल का? एक भगवी छाटी शिवाजी महाराजांचे निशाणासाठीं समर्थांनीं दिली. तो का सोंवळेपणा होता? भगवी लुंगी महाराष्ट्रांतील स्वराज्याचें चिन्ह होतें. राज्य गरिबांसाठीं आहे, राजानें संन्याशाप्रमाणें रहावें, याची ती जळजळीत खूण होती. परंतु आम्ही भगव्या लुंगीचा जरिपटका केला आणि महाराष्ट्राचें स्वराज्य गेलें. कारण शिवाजी महाराजांचें गरिबांचें राज्य जाऊन, सरदार दरकदार, जहागीरदार यांचें राज्य सुरू झालें. शेतकरी पुन्हां लुटला जाऊं लागला. सरंजामी सरदार जरीपटक्यानें शोभूं लागले. लुंगींत असा हा महान् अर्थ असतो. कोट्यवधि जनतेच्या भाकरीसाठीं तळमळणाऱ्या लुंगींत ब्रि. साम्राज्याला वांकविण्याची शक्ति असते. परंतु दृष्टि असेल त्याला हें दिसेल.

( ३ ) पंडित जवाहरलालांनीं आपल्या विश्वेतिहासांत श्री शिवाजी महाराजांविषयीं कांहीं गैर लिहिलें त्याची त्यांनीं क्षमाहि मागितली. दुसऱ्या आवृत्तींत बदलीन असें ते म्हणाले. शर्टवरील जाकीटांत असा दिलदारपणा आहे; परंतु आपल्या पगडींत मात्र तो दिसत नाहीं. आणि आपण आज पूर्वींच्या इतिहासाकडे नवीन दृष्टीनें बघतों. आपण नवीन ध्येयें, नवीन कल्पना यांनीं बघतों. आपण पूर्वजांच्या खांद्यावर उभें राहून आणखी दूरचें बघतों. आपणांस आणखी दूरचें दिसलें तर त्यांत पूर्वजांचा अपमान नाहीं. प्राचीन कालापासून अनेक थोरामोठ्या व्यक्तींनीं इतिहास बनवीत आणला. त्याचें मूल्यमापन आज आपण करतों. त्यांत अपमानाचा हेतु नसतो. किंवा त्या थोर ऐतिहासिक विभूतीपेक्षां आपण मोठे झालों असाहि अर्थ नसतो. तें शुद्ध ऐतिहासिक विवेचन असतें. शुद्ध मनुष्य चूक दिसली तर कबूल करतो.

असें हें इतिहास शास्त्र असतें. तेथें त्यागमूर्ति जवाहिरलालांचें जाकीट काढणें सदाभिरुचीस शोभत नाहीं. कृपण व अनुदार बुद्धीचें हें लक्षण आहे. नेहरूंना शिवाजी महाराजांवर टीका करण्याचा अधिकार नाहीं, आणि नेहरूंवर या कोटींतील किड्यांना टीका करण्याचा अधिकार पोंचतो का ?

(४) संयुक्त प्रांतांत म्हणे मुसलमानांना सवलती किती ? तुमचे लोकशाही पक्षाचे श्री. जमनादास मुंबईस मंत्री असतां सोन्यामारुति प्रकरण झालें. जमनादासांनीं कां मुसलमान झोडपले ? हिंदु सत्याग्रही त्यांच्या कारकीर्दींत तुरुंगांतच घातले ना ? मग संयुक्त प्रांतांत तर अधिकच परिस्थिति कठीण आहे. तेथें केवळ लोकसंख्येची हिशेबी वृत्ति ठेवून भागत नाहीं. तुम्हीं मंत्री असतां तर काय केलें असतेंत हें तुमच्या जमनादासी सोन्या मारुति प्रकरणांतील इतिहासानें कळून येत आहे.

(५) कांग्रेस मुसलमानधार्जिणी आहे असें तुम्ही म्हणतां. मुस्लीमलीगवाले कांग्रेस हिंदुधार्जिणी आहे असें म्हणतात. तेव्हां हे दोन्ही आरोप परस्पर खंडिले जाऊन कांग्रेस सर्वांचा सांभाळ करणारी ठरते. कांग्रेसला शिव्या देण्यांत का होईना हिंदुमहासभा व मुस्लीम लीग यांची एकी आहे ही त्यांतल्या त्यांत आनंदाची गोष्ट.

(६) मुसलमान अत्याचार करतात. आधीं हिंदुमहासभावाल्यांनीं हरिजनांवरील अत्याचार दूर करावे. स्वत:तील श्रेष्ठ-कनिष्ठपणा दूर करावा. यजुर्वेदी, ऋग्वेदी प्रकार बंद करावे. मग मुसलमानी अत्याचारांकडे वळूं. अंमळनेरच्या मिलमधील स्त्रियांची अब्रू कशी विकली जाते याची चौकशी जर तेथील तत्त्वज्ञानांतील कांहीं तत्त्वज्ञानी, मिलमधील हिंदु अभिमानी करंदीकर, दलाल वगैरे, तसेंच गांवांतील स्त्रियांच्या अब्रूची चाड असणारे, इतर करतील व ती पै किंमतीची होऊं नये म्हणून हे कारखाने सारे राष्ट्राच्या मालकीचे व्हावेत म्हणून क्रांति करावयास उठतील तर यांना नीतीची व धर्माची चाड आहे असें म्हणतां येईल.

गरिबीमुळें हिंदुस्थानांत सर्वच स्त्रियांची विटंबना आहे. मिलमधून स्त्रियांना नरकासारख्या स्थितींत रहावें लागतें. पोटासाठीं, पोटच्या पोरांसाठीं इतरत्राहि स्त्रियांना अब्रूचें मोल द्यावें लागतें. अब्रूचा हा वध हिंदुमहासभावाल्यांस दिसेल तर ते सामाजिक क्रांति करावयास उठतील.

परंतु अशी सामाजिक क्रांति करावयाची भाषा ऐकतांच ते अधर्म अधर्म म्हणून शंख करतात. कोणी एक महान् हिंदुमहासभावाले पुण्याच्या सभेंत एकदां बोलले, 'साम्यवाद राष्ट्रांतलि धनदौलत समाईक करणार. आमच्या स्त्रियांचीहि वाटणी करणार का?' या हिंदुमहासभावाल्यांची स्त्रियांकडे आपली एक मालमत्तेची वस्तु असें पाहण्याची अशी ही दृष्टि आहे. स्त्रिया म्हणजे जणुं एक मालकीची भोग्य वस्तु आहे! साम्यवादी लोकांची ती दृष्टि नाहीं. ते स्त्रियांची वाटणी नाहीं करणार. स्त्रियांना आत्मा आहे, स्वातंत्र्य आहे असें ते मानतात. स्त्रियांना ते जड समजत नाहींत. स्त्रियांना जड समजणाऱ्या, घरींदारीं त्यांना केवळ सुखीदुःखी गुलामाप्रमाणें वागविणाऱ्या अशा या हिंदुमहासभावाल्यांस स्त्रियांची अब्रु ही वस्तु काय हें कळावयास अद्याप शेंकडो जन्म घ्यावे लागतील. स्त्रियांची अब्रु मग एकटा मुसलमान गुंडच दवडीत नसून सर्वत्रच दवडली जात आहे, हें सत्य त्यांना समजून येईल. मग जळगांव, धुळें, अमळनेर वगैरे कारखान्यांतलि स्त्रियांची विटंबना त्यांना दिसेल. त्या कारखानदारां-विरुद्ध बंडाचा झेंडा घेऊन ते उभे रहातील. परंतु मग शेटजींकडून लाखों रुपये मिळणें बंद होईल. ज्याला ज्याला लाखों मायबहिणींची अब्रु वांचवायची असेल तो साम्यवादाची दिव्य स्थापना करण्यासाठीं सारें जीवन देईल. स्त्रियांची विटंबना हिंदुमहासभावाले वा अन्यवाले यांना थांबवितां येणार नाहीं. ती एक दिवस साम्यवादच थांबवील. साम्यवादच खरा माणुसकीचा, न्याय-नीतीचा, सर्वांगीण विकासाचा, खऱ्या संस्कृतीचा धर्म आणील. बाकीच्यांचें बडबडणें म्हणजे केवळ दंभ आहे. नबाबांचे, श्रीमंतांचे संसार ते अधिक सुंदर करतील, परन्तु कोट्यवधि कुटुंबांतील हायहाय त्यांना ऐकूंहि येत नसते व तिचें त्यांना कांहीं वाटतहि नसतें.

—वर्ष २, अंक १५.

## ' वंदे मातरम् ' ३५

### आपलें राष्ट्रगीत काय सांगतें ?

राष्ट्रीयत्वाची भावना ही अर्वाचीन आहे. अखिल भारतवर्ष हा माझा आहे, ही वृत्ति अलीकडील आहे. पूर्वी प्रांतिक स्वाभिमान देखील उत्कट असा नसे. वाङ्मयांत त्याचें प्रतिबिंब पडलेलें दिसत नाहीं. कवीनें रोमांच-युक्त होऊन अभिमानानें, प्रेमानें महाराष्ट्रभूचें यशोगान केलें आहे असें मराठी वाङ्मय कोठें आहे ? राष्ट्रीय भावना आज जागृत झाली असली तरी ती आपल्या हार्डीमासीं खिळून जाण्यास आणि आपल्या बोलण्या-चालण्यांत व कृतींत दिसून येण्यास अजूनहि बराच अवकाश आहे.

मनुष्य ज्या भूमींत राहतो ती त्याला प्रिय असते. दक्षिण आफ्रिकेंत राहणाऱ्या नीग्रोला तेथील उष्ण हवा प्रिय वाटत असेल; वाळवंटांतील अरबाला ती उन्हांत चमकणारी व मृगजल प्रसवणारी वाळूच हिऱ्यांच्या राशीहून प्यार असेल. प्रदेश कसाहि असो; जेथें आपण जन्मलों, राहिलों वाढलों, खेळलों, जेथें आपले पूर्वज राहिले; पराक्रम करते झाले, जेथील संस्कृति आपल्या रोमरोमांत भरलेली असते, जेथील थोर पुरुषांच्या कर्तब-गारींचे, वैभवाचे, सत्कीर्तींचे आपण वारसदार होतों, जेथें आपला धर्म, आपलें कर्म, आपलें शर्म, आप्त गणगोत, आपल्या विद्या, कला, वाङ्मय, इतिहास यांचा उत्कर्ष झाला तो भूप्रदेश कोणाला प्राणाहून प्रिय होणार नाहीं ? ज्याला म्हणून मन आहे, हृदय आहे, कृतज्ञता आहे त्याला ती भूमि प्रिय वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

जगांतील प्रत्येक राष्ट्राच्या वाङ्मयांत त्या त्या राष्ट्राचीं स्फूर्तिप्रद अशीं गानें आहेत. राष्ट्राची कीर्ति, उज्वलता, इतिहास, वैभव, तेज, सौन्दर्य, हीं जरी अनेक कवींनीं काव्यांत वर्णिलेलीं असलीं तरी त्या सर्वच काव्यांना राष्ट्रीयत्व प्राप्त होत नाहीं. आकाशांतील अनेक ताऱ्यांमध्यें तेजस्विता असली तरी चंद्राची शोभा अवर्णनीयच ठरते. त्याप्रमाणें राष्ट्राच्या वैभवाची

अनंत गानें असलीं तरी एकाद दुसरेंच गान अखिल राष्ट्रीय होऊन त्याला अग्रपूजेचा मान मिळत असतो.

जें दिव्य गीत ऐकून शूरांचे बाहु स्फुरतील, वृद्धसुद्धां उभे राहतील, स्त्रिया मरावयास पुढें येतील, तरुण हंसत गोळे झेलतील, असें गान इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या प्रत्येक राष्ट्राचें आहे. नेपोलियनचे लाखों शिपाई 'ला मार्सेलिस' गाणें गातच विजय मिळवीत. बँडवर हें गाणें सुरू होतांच हृदय उचंबळून येतें, दिव्य शूरता व प्राणाबद्दलची बेपर्वाई मनांत उभी राहते आणि आपली भूमि हेंच सर्वस्व आहे असें वाटूं लागतें.

भारतांत राष्ट्रीय वृत्तीचा जन्म ही एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट घडून आली आहे. सर्व भारतवर्ष माझा ही भावना मनांत बाळगून प्रांतिक अभिमान शिथिल होत आहेत. आपल्या वाङ्मयांत हा फरक दिसून येतो. आपण जीं गाणीं गातों त्यांत प्रांतिक देशभक्तीचीं गानें असलीं तरी ज्या वेळेस सर्व भारतांतील प्रतिनिधी एकत्र येतात त्या वेळेस प्रांतिक वातावरण सोडून आपणांस वरच्या वातावरणांत जाणें भाग पडतें. आधीं विशाल मग संकुचित. आज हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भाषांत राष्ट्रगीतें झालीं आहेत. परन्तु अखिल भारतीय होण्याचा मान यांपैकीं १।२ गीतांनाच प्राप्त झाला आहे.

आज आपलें कोणतें गीत राष्ट्रीय गीत म्हणून म्हटलें जातें बरें ? कोणतें राष्ट्रीय गीत म्हटल्याबद्दल १९०८ ते १९१० या काळांत तरुणांना तुरुंग पहावे लागत किंवा फटके खावे लागत ? कोणतें असें तें राष्ट्रीय गीत कीं, जें बारिसाल येथें १९२२ मध्यें प्रांतिक परिषदेच्या वेळीं म्हणूं दिलें नाहीं म्हणून, देशबंधु तुरुंगांत असतांना वाघासारखे चवताळले होते आणि त्यांना अन्नसुद्धां गोड लागलें नाहीं ? असें कोणतें तें गीत कीं जें लाखों लोकांस स्फूर्ति देईल, जें लाखों लोकांच्या मनांत देशभक्ति सजवील ? असें कोणतें तें गीत कीं जें यावच्चंद्रदिवाकरौ—जोंपर्यंत भारतवर्ष आहे तोंपर्यंत निनादत राहील ? प्रतिभेचें, देवि शारदेचें, असें कोणतें तें दिव्य अपत्य ? काव्यशक्तीनें आपल्या हृदयांतून काढलेलें कोणतें तें रत्न ? कवीनें समाधि स्थितींत जाऊन जनतेला दिलेला कोणता तो दिव्यरूप मेवा ?

तें गीत म्हणजे 'वंदे मातरम्.' एक काळ असा होता कीं, जेव्हां हें गीत गातांच साहेब लाल होऊन जात. 'वंदे मातरम्' म्हणतांच म्हणणाराच्या

अंगावर फटके उडत. असें हें दिव्य राष्ट्रीय गीत कोणा भाग्यवंतानें, कोणा वाग्देवीच्या प्रियपुत्रानें लिहिलें ? ज्या बंगालमध्यें प्रथम इंग्रजांनीं खंबीर पाय रोंवला त्या वंगभूमींत या अतुलनीय गीताचा जन्म झाला आहे. ज्या प्रदेशांत विशाल गंगा, ब्रह्मपुत्रा, मेघना, पद्मा अशा तीन तीन मैल रुंद नद्या वाहतात, जेथें जमीन सपाट व सुपीक आहे, जो प्रदेश जगांत अत्यंत सघन म्हणून प्रसिद्ध आहे अशा या वंगीय भूमींत या गीताचा जन्म झाला आहे. ज्या बंगालमध्यें अलौकिक बुद्धीचे व अलौकिक भावनांचे पुरुष झाले व होत आहेत त्यांचें हें अत्यंत तेजस्वी अपत्य आहे. भावनाप्रधान विशाल मनाच्या बंगालनें हें गीतरत्न भारतीय जनतेला दिलें आहे. ज्या ईश्वरी कृपेच्या पुत्रानें आपल्या प्रसादपूर्ण हृदयांतून हें गीत जनतेला दिलें त्याचें नांव बंकीमचंद्र. काव्यांत जें रवींद्रांचें स्थान–तें–वाङ्मयांत बंकीमांचें आहे. कादंबरी क्षेत्रांत त्यांनीं फार थोर कामगिरी केली आहे. बंगाली वाङ्मयांत कादंबरी व काव्य यांतील वाङ्मय श्रेष्ठ आहे. बंकीम-चंद्रांनीं जवळ जवळ १५कादंबऱ्या लिहिल्या. त्यांच्या कादंबऱ्या फार मोठ्या नाहींत. १५०–१७५ पानांची म्हणजे त्यांची फार मोठी कादंबरी! परन्तु तेवढ्या पानांतच बंकीम शृंगार, वीर, करुण इत्यादि रसांचा कल्लोळ उडवून देतात! त्या कादंबरींत एक आनंदमठ ही ऐतिहासिक कादंबरी १७५७–१७६० च्या काळांतील आहे. कलकत्त्याच्या आजूबाजूस त्या वेळेस संन्याशांनीं बंड केलें होतें. हें संन्याशांचें बंड म्हणून वंगीय इति-हासांत प्रसिद्ध आहे, ही कादंबरी अत्यंत उज्ज्वल आहे, उदात्त व ध्येय-पूर्ण आहे. तिच्यांत देशभक्ति भरलेली आहे. तींत ग्रंथकारानें जणूं काय आपलें हृदय ओतलें आहे. बंकीमचंद्र हे ज्या ज्या वेळेस उत्कृष्ट लिहीत त्या त्या वेळेस त्यांच्या मनावर व शरिरावर परिणाम होत असे. ते म्हणत ‘ मी जेव्हां माझ्या उत्कृष्ट कादंबऱ्या लिहिल्या, किंवा त्यांतील उत्कृष्ट भाग लिहिले, तेव्हां मला रोजच्या चौपट भूक लागत असे.’ असें स्वतःचें रक्त त्यांनीं या ग्रंथांत ओतलें आहे.

बंकीमचंद्र हे उत्कृष्ट पहिल्या दर्जाचे गद्य–लेखक होते. त्यांनीं पद्य मात्र मुळींच लिहिलें नाहीं असें म्हटलें तरी चालेल. एक दिवस बंकीमबाबूंच्या मुलीनें त्यांना प्रश्न विचारला, ‘ बाबा, तुमि तो बहुत

गद्य लिखते पारे, तार परे पद्य कि ना लिखते जारी?' तेव्हां बंकीमबाबू तेजस्वी दृष्टीनें म्हणाले, 'बाळ, मी एकच कविता लिहिली आहे. एकच गाणें रचलें आहे. परंतु तें गाणें तुझ्या पित्याचें नांव अजरामर करील.' बंकीमचंद्रांचें असें कोणतें बरें तें गाणें? होय तेंच 'वंदे मातरम्' हेंच तें उत्कृष्ट देशभक्तीचें गाणें. डोळ्यांतील अश्रूंनीं हृदयाच्या वीणेच्या अनंत तारा सामस्यानें वाजत असतां हें लिहिलेलें आहे. वाल्ट व्हिट्मन हा अमेरिकन कवि म्हणत असे, 'माझ्या काव्याच्या पुस्तकाला जो कोणी हात लावील, तो पुस्तकास हात लावीत नसून पुस्तककर्त्याच्या हृदयालाच जणूं स्पर्श करतो.' त्याप्रमाणें या गीतामध्येंहि गीतकाराचें हृदय ओतलेलें आहे. ज्या वेळेला आजूबाजूच्या परिस्थितीचा विसर पाडून मनुष्य वर्ण्य वस्तूंशीं तन्मय होतो, तेव्हां त्या दिव्य समाधीमध्येंच असें गीत बाहेर पडतें!

बंकीमचंद्रासारख्या साहित्यसम्राटानें हें गीत रचलें व प्रथम वंगीय कविसम्राट रवींद्र यांनीं कलकत्त्याच्या एका सभेंत तें गाऊन दाखविलें. बंकीम हे कांहीं संगीतज्ञ नव्हते. त्यांनीं स्फूर्तीच्या रंगांत गीत तर रचिलें. भराभरा शब्दरत्नें आलीं, तशी त्यांनीं जडावाची माळ केली! या गाण्याला कोणता ताल लावावा कोणता राग लावावा, हें संगीतज्ञांनीं पाहून घ्यावें. जडावाची माळ आहे, ती पटवेकऱ्याकडे नेऊन कशी पटवावी, कोणते गोंडे लावावे, कोणत्या रंगाचा गोप लावावा, हें ज्याचें त्यानें ठरवावें. रवींद्रनाथ हे बंकीमांहून वयानें लहान. त्या वेळेस रवींद्र अगदीं तरुण होते. रवींद्र उत्कृष्ट गाणारे आहेत त्यांचा आवाज मधुर, उंच, कोमल हवा तसा आहे. कलकत्त्याला एकदां सभा भरली असतांना तरुण रवींद्राला बंकीम म्हणाले, 'तुमि ओई गीत गुलि गाय छो—तुम्ही हें गीत म्हणून दाखवा.' रवींद्रांनीं म्हणून दाखवलें. तें दिव्य गीत स्वर्गीय कंठांतून सुस्वर आलापानें बाहेर पडलें व स्वर्ग पृथ्वी तटस्थ झाली. त्या दिवसापासून हें गीत सर्वत्र पसरलें. ही तान हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत वायुदेवानें नेली. त्या दिवसापासून या गीतानें सर्वांना वेडें केलें; अनंतांना देशभक्ती शिकविली; देशप्रीति दाखविली; मरायला आणि हंसायला तयार केलें; भारतमातेची पूजा करावयास तेहतीस कोटी लेंकरें तयार होऊं लागलीं.

# आगामी प्रकाशनें

## वि. स. खांडेकर

१ अश्रु
२ बुद्ध आणि हिटलर
३ तिसरी भूक
४ वर्षाकाल
५ छाया भाग १-२
६ चार भिंती
७ चक्रवर्ती
८ बडी मां
९ कालचीं स्वप्नें
१० विसावें शतक
११ कल्पलता
१२ वालुका
१३ मंजिऱ्या
१४ मराठीचा नाट्यसंसार
१५ चल ये राणी
१६ सुवर्णकण
१७ आजचीं स्वप्नें
१८ माझ्या कादंबऱ्या

## ग. त्र्यं. माडखोलकर

१ तीन दिवस
२ ऋणभार
३ माझे आवडते कवि
४ चक्रवर्ति उदयन
५ उर्वशी
६ उमरखय्याम
७ विलापिका
८ दोन तपें
९ हें युद्ध

## द. र. कवठेकर

१ आपुलकीची झळ
२ ढगाआड
३ आग आणि पाणी
४ आभाळाची सांवली

## ना. धों. ताम्हनकर

१ गुजाताई
२ शेजारी

## प्र. के. अत्रे

१ दुर्वा आणि फुलें
२ 'मी' कसा झालों

## कृष्णाबाई मोटे

१ अनामिकेची पूजा
२ कलाक्षेत्रांत
३ मवाली
४ गुणाची पोर

## काकासाहेब कालेलकर

१ स्मरण–यात्रा

## अनंत काणेकर

१ उघड्या खिडक्या
२ काळे आणि पांढरे

## चिं. वि. जोशी

१ गुंड्याभाऊ
२ दरबार कथा
३ लंकावैभव

## दत्तु बांदेकर

१ हिरवी माडी
२ कबुली जबाब
३ नजरबंदी

## साने गुरुजी

१ गोड निबंध भाग तिसरा

? क्षमाबाई राव

? आचार्य भागवत

REFBK-0019190